❀ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमाउली समर्थ. ❀

❀ श्रीगुलाबराव महाराजकृत. ❀

# सूक्तिरत्नावलि.

दशमयष्टि

# ❀ प्रेमनिकुंज. ❀

प्रकाशक

रा. रा. गोपाळ लक्ष्मण पाध्ये.

यांनीं " महाल प्रिंटिंग प्रेस " मध्यें ही गाथा छापिली.

आवृत्ति १ ली.

नागपूर, आषाढ शुद्ध १५, शाके १८४७

या ग्रंथाचे सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ. ॥

# परिचय.

श्रीगुलाबरावमहाराजांनीं आपलें मधुराद्वैतरूपी हृद्गत ज्यांत यथार्थ प्रगट केलें आहे तो 'प्रेमनिकुंज' ग्रंथ मुद्रित करून प्रेमळ सज्जनांस सादर करण्याचा आज सुयोग येत आहे, हें केवळ महाराजांच्याच कृपेचें फळ होय. व्रजभूमींतील यमुनातीरच्या निकुंजकथावर्णनांनीं जसा श्रीमद्भागवताचा दशमस्कंध शिरोभूषण झालेला आहे, तसाच हा 'प्रेमनिकुंज' महाराजांच्या मधुराद्वैत कथावर्णनांनीं त्यांच्या सूक्तिरत्नावळींत दशमस्थानीं शिरोभूषण झालेला आहे.

जें मधुराद्वैत श्रुतिजननीचें विश्रांतिमंदीर झालें, प्राचीन ऋषिमुनींचें जें सुखसर्वस्व होतें, शुकादि आत्मारामसुनींनी भाट होऊन ज्याचें रमणीय स्वरूप वर्णन केलें, व्रजगोपिकांनीं जें भूतलावर प्रगट करून भुवनत्रयाला पावन केलें, भगवान श्रीकृष्णांनीं आपल्या आवडत्या भक्तसख्यास ज्याचा गीतारूपानें उपदेश केला, भगवान् पूज्यपाद शंकरभारतींनीं आपल्या प्रेमपरिप्लुत गिर्वाण वाणीनें ज्याचें महत्व मोठ्या आवडीनें गायिलें, श्रीज्ञानेश्वर महाराजानीं अमृताला पैजेनें जिंकणारीं रसिक अक्षरें मिळवून व आपल्या मराठी बोलाचें कवतुक दाखवून ज्याचें प्रतिपादन केलें, नाथतुकारामादि संतांनी देह परोपकारार्थ कष्टवून ज्याचा अनुवाद केला, व महाराजांनीं आपल्या सूक्तिरत्नावलींत ज्याचा प्राधान्यें करून उद्घोष केला, तें मधुराद्वैततत्व— तें ज्ञानोत्तरभक्तीचें रहस्य— महाराजांनीं आपल्या आर्षवाणीनें शास्त्रीय उपपत्तिपूर्वक, सप्रमाण व सानुभव या प्रेमनिकुंजांत विशद केलें आहे.

"ज्ञानावांचून भक्तितत्व कळत नाहीं" हें यद्यपि मधुराद्वैताचें परंपरागत मंतव्य या ग्रंथांत प्रतिपादन केलें आहे, तथापि भक्तिरहित शब्दपाठानें ज्ञानाभिमान दृढ होतो, म्हणून अशा ज्ञान्याचा तीव्र निषेधही यांत केलेला आहे; (पृ० १३९) व वेदान्ताचा आव घालून भगवत्सेवाचोर होणारा ज्ञानी आसुरस्वभाव समजावा असें म्हणून, (पृ० १३०)

ज्ञान व भक्ति या दोहोंलाही मूळ सत्संगतीच कारण आहे हें मुख्य प्रतिपादनाचें धोरण यांत महाराजांनीं दर्शविलें आहे.

खऱ्याखुऱ्या प्रेमाच्या आवडीनें सद्गुरुमुखानें श्रवण केलें असतां देहत्रयाचा निरास होऊन शिष्यसंबंधयोग्यता कशी येते, व हळुहळु आपलेपणाचा विसर पडत जाऊन आज्ञापालनरूपी आत्यंतिक निष्काम प्रेम कसें दृढावत जातें, सद्गुरुप्रेमानें व सेवारूप योगाभ्यासानें भक्तिज्ञान समाधीची पूर्णता कशी होते, व शिष्याच्या सर्व शरीरचेष्टाही सेवारूपच होऊन लालनवात्सल्यादि मधुराद्वैताचें संपूर्ण वैभव त्याला कसें प्राप्त होतें, त्या माधुर्यसेवेनें पूर्ण भगवत्करुणेची प्राप्ति होऊन शेवटीं सगुणेश-भावापत्तीचा लाभ त्याला कसा मिळतो, व भगवंताच्या अवतारसमयीं त्याला सहायकसंबंधयोग्यता प्राप्त होऊन अखंडसेवारूपी परमानंदाचा तो कसा विभागी होतो इ० गोष्टींचें फार मार्मिकरीतीनें यांत प्रतिपादन केलें आहे.

ह्या आपल्या मधुराद्वैतमताच्या आलंबनार्थ महाराजांनीं " अन-ध्यस्तविवर्त " ही नवीन शास्त्रीय परिभाषा भगवद्भिमहाला लावून, व तिचें लक्षण बांधून आपल्या ग्रंथांत जो ठिकठिकाणीं त्याचा निर्देश केलेला आहे त्याचें मूळ त्रिपादमहानारायणोपनिषदेंतून व पुराणादि स्मृतिग्रंथांतून फार सुंदर रीतीनें या प्रेमनिकुंजांत उद्धृत केलें आहे; व स्वामीविद्यारण्यमधुसूदनप्रभृती प्राचीन वेदान्त्यांनां भक्तीची आवडी असूनही ' अनध्यस्तविवर्ताचा ' अंगिकार न केल्यामुळें भक्तीचें शास्त्रीय स्वरूप सांगतांनां त्यांनां कशी अडचण पडली हें सर्व वेदान्तमतांचें समालोचन करून, व अद्वैतसिद्धिसारख्या ग्रंथांचें मधुराद्वैतदृष्टीनें समीक्षण करून, विस्तृत रीतीनें स्पष्ट केलें आहे; व ' मधुराद्वैतदर्शन ' हें स्वतंत्र नसून शांकरमताच्याच भक्तितत्वाचें तें विशेष स्पष्टीकरण आहे हेंही यांत दाखविलें आहे. त्यावरून भक्तीचा व ज्ञानाचा समन्वय करण्याला, जीवन्मुक्तदशेंत भक्तीचें आलंबन दृढ राखण्याला, व तत्वज्ञान, मनो-

१ तें लक्षण हें— अभिन्नसत्यपररूपत्वेसति भेदाभानपूर्वकमधिष्ठानज्ञानाव-रकत्वेसतिच प्रातिभासत्वादधिष्ठानज्ञानानिवर्त्यमनध्यस्तविवर्तलक्षणम् ।

नाश व वासनाक्षय यांच्या एकत्र अभ्यासाचें फळ जी दृष्टदुःखनिवृत्ति ती सुलभ रीतीनें करून, शिवाय दृष्टपरमानंद प्राप्ति करून देण्याला अनध्यस्तविवर्त व मधुराद्वैतपद्धति किती उपकारी आहे हें भक्तीमर्मज्ञास दिसून येईल.

तसेंच, श्रीकृष्णावताराचें पूर्णत्व, व्रजभूमीचें रहस्य, गायींगोपी आदि विहाराची नित्यता, श्रीष्णाची वास्तवी व व्यावहारिकीलीला इ० इ० विषयांचें विवेचनही यांत फार सुंदर झालें आहे. या सर्व विषयांची अनुक्रमणिका ग्रंथारंभीं जोडली आहे त्यावरून त्यांचें स्वरूप लक्ष्यांत येईल.

एकंदर विषयप्रतिपादनक्रमांत मधुरभावाच्या विविध रमणीय खुणा वर्णन करतांनां महाराजांनीं जें स्वतःचें माधुर्यरसांत रंगलेलें अंतःकरण उघड करून दाखविलें आहे, तें ग्रंथपरिशीलन करणारांस तल्लीन करील यांत संशय नाहीं. तात्पर्य, प्राचीन ऋषीमुनी, आचार्य, विद्वान व साधुसंत यांच्या आवडत्या भक्तीची सुंदर शास्त्रीय मीमांसा करून, व संप्रदाय पुरुषांचा संतोष वाढवून जशी अपूर्व कामगिरी महाराजांच्या वाग्झरीनें केली तशीच स्वसंप्रदायिकांस भक्तीची पूर्णता व धन्यता मिळवून देण्याचीही अपूर्व कामगिरी त्यांच्या वाग्झरीनें केली आहे.

या ग्रंथाच्या श्रवणाचा अधिकार, चित्तांत भगवत्कथेविषयीं अत्यंत प्रेम असलेल्या सर्वांस ब्राह्मणापासून म्लेच्छापर्यंत सर्वांस समान महाराजांनीं दिला आहे; व या व्यतिरिक्त केवढाही सर्वगुणसंपन्न असला तरी त्याला येथें अनधिकारी ठरविलें आहे. या संबधाची जी मीमांसा महाराजांनीं प्रथम वल्लीच्या १०,-१८,-१९,-२०, ते २६ ओव्यांत केलेली आहे ती प्रेमळ भाविकांस फार उपकारक आहे. या निष्काम प्रेमाचें लक्षण महाराजांनीं पुढील ओव्यांत सांगितलें आहे तें असेः– प्रेमीं आपुलेपणा उरे । तरी द्वैत कल्पांतीं न मुरे । म्हणवोनि प्रेमभरें । ऐसें होवावें ॥१११॥ स्वामीचिया इच्छा लीला घडो । कां मोक्ष अथवा बंध पडो । परी स्वामीवरी सुरवाडो । प्रेम अत्यंत ॥११२॥ पृ० १६६

अशा निस्सीम प्रेमाला स्ववश करून या 'प्रेमनिकुंजांत' प्रवेश

केला असतां संपूर्ण मधुराद्वैताचें ऐश्वर्य संकल्पमात्रानें प्राप्त करून देणारा महाराजांचा विस्तीर्ण " संप्रदायसुरतरु " साधकाच्या भाग्योदयानें अकस्मात दृष्टीस पडतो, व तशी वेळ सांप्रत जवळही येत चालली आहे. म्हणून अशी संधी न दवडतां प्रेमनिकुंजाचें मनोभावानें सेवन करणें हें अखंड सुखेच्छूचें पहिलें कर्तव्य आहे.

हें मानवजन्माचें परम पवित्र कर्तव्य उत्तम प्रकारें बजावून महाराजांसारख्या परम कारुणिक सद्गुरु माउलीची कृपा ज्यांनीं संपादन केली, त्याच कृपालेशानें महाराजांच्या नवपंचकांत ज्यांस अग्रस्थान मिळालें, मधुराद्वैतदर्शनाचा सारसन्निवेश हातीं देऊन महाराजांनीं ज्यांचें पंडित नांव सार्थ केलें, व लेखनवाचनादि आंग मेहनतीनें विशेषतः 'प्रेमनिकुंज' व 'संप्रदायसुरतरु' या दोन ग्रंथांस दृश्य मुद्रितरूपानें परोपकारार्थ प्रगट करण्यास जे झटत आहेत, त्या बाबाजी महाराजांच्याच मर्मज्ञ वाणींतून महाराजांच्या सर्व मंगलप्रद ग्रंथांचें अंतरंगही सर्व वर्तमान व भावी संप्रदायमंडळास वारंवार श्रवण करण्याचा सुयोग लाभो अशी अनन्यभावानें प्रार्थना करून हा अल्प परिचय श्रीज्ञानेश्वरकन्याचरणीं समर्पण करितो.

# प्रेमनिकुंजाची विषयानुक्रमणिका. पृष्ठ


## प्रथम वल्ली – उपपत्ति निर्णय १-८

सद्गुरुआदिपंचेष्टदेवतानमस्काररूप मंगलाचरणश्लोक १-२, श्रीगुरुस्तुति व कमलरूपानें भगवत्प्रेमवर्णन १-६ १

श्रोत्यास प्राथना ६-९, ग्रंथाधिकारी व अनधिकारी वर्णन ९-२६, श्रीकृष्णचरित्राची सर्वजनप्रियता २७-३०, १-३

प्रेम हा आंधळा आहे ३०-४८ ३-४

रागद्वेष सुखदुःखास कारण आहेत ४९-६१, महात्म्यांचें आप्तत्व ६२-६९, या प्रेमप्रधानग्रंथाचा युक्तीनें विचार करणाऱ्यास उत्तर ७०-७३ ४-५

निर्गुणाचे ठिकाणीं भक्तिसिद्धि ७४-७९ ५-६

वल्लभमताचा शांकरमताशीं ग्राह्यांशसमन्वयपूर्वक स्वीकार व श्रीकृष्णाचे पूर्णब्रह्मत्व ८०-८४ व ११३-११७ ६-८

अनुकूलसिद्धान्ताभ्युपगमप्रतिपादन ८५-९१, भक्तिदृष्टीनें सर्वसंप्रदायऐक्यता व श्रीज्ञानेश्वर महाराज विष्णुस्वामी संप्रदायी व शांकर संप्रदायी आहेत या वाक्यांचा समन्वय ९२-१००, मायानंगीकृत दृष्टीनें वल्लभमतखंडण १०१-११० ६-७

विषमसत्ताकप्रकृत्यवच्छिन्नपरमेश्वरभक्तीनें आनंदाभिव्यक्ति सिद्धि १११-११२ ७-८

श्रीगुरुचरणीं कृति निवेदन ११८-११९ ८

## द्वितीया वल्ली – सेव्य निर्णय ८-१२२

श्रीगुरुमंगलाचरण १-२, मधुराद्वैतसेव्यप्रामाण्योपन्यास ८-१०

सगुणोपासकाना मोक्षाची इच्छा होत नाहीं या मननसारांतील वचनाचा अभिप्राय १४

मधुराद्वैत दर्शनाची सार्थकताप्रतिपादन ११-१३

ज्ञानी पुरुषाला द्वेषोत्पत्तिसंभव व त्याचें खंडण १३-१०

ज्ञानियाचें ठिकाणीं तामसनिद्रासंभव व त्याचें खंडण १४

ज्ञानी पुरुषाचें निद्रेंतील व समाधींतील भेद् १९
अनध्यस्त विवर्ताचे ठिकाणीं ज्ञानीपुरुषाच्या उपेक्षवृत्तीचे खंडण व विद्यारण्यानीं भगवत्स्वरूपाचे ठिकाणीं ज्ञानोत्तर मानलेल्या बाधितानुवृत्तीचें खंडण १५-१६
भक्ति लोकसंग्रहार्थ आहे म्हणणाऱ्यांचें खंडण १७-१८
ज्ञानोत्तर भक्तीला लोकदया नियामक आहे म्हणणाऱ्यांचे खंडण १८-२०
सकल सौंदर्याधिष्ठान ८ २०
सौंदर्य मीमांसा, स्वभाववादीयांचे सौंदर्यखंडण ११-१६ २०
अर्थशास्त्री नास्तिकांचें सौंदर्यखंडण १७-२१ २०-२१
सृष्टिप्रतिकवादीयांचे सौंदर्यखंडण २२-३०, स्वाभिमत सौंदर्य व त्याचें भेद ३१-४७ २१-२२
असीम सौंदर्याधिष्ठान ४७-४९, भगवत्स्वरूपाचें ठिकाणीं दृष्टिसृष्ट्याक्षेप व त्याचें खंडण ५०-५३ २२
भगवत्स्वरूपाचे अनध्यस्त विवर्तत्व ५४-५८, भगवच्छरीराचे परकर्माजन्यात्व ५९-६२, भगवच्छरीराचे माया परिणामत्व खंडण ६३, मुक्त व अवतार यांतील भेद ६४-१ ( चूर्णिका ) २३
ईश्वरशरीररूपानें ईश्वरकृत कारणमायागोचरत्वखंडण ( चूर्णिका ) २ २३-२४
भगवत्तनूचें परप्रारब्धजन्यत्वखंडण, प्रारब्ध जन्य भोग्य पदार्थांचे भेद २४-२६
परप्रारब्धजन्य भगवच्छरीर चेतन मानले तरी जीवत्वापत्ति दाखवून त्याचें खंडण २६
परमेश्वर शरीरांत प्रवेश करितो असें मानणाऱ्याचे खंडण, ब्रह्मलोकस्थपुरुषसंकल्पजन्यमातापितराप्रमाणें किंवा स्वप्नाप्रमाणें जीवप्रारब्धजन्य भगवच्छरीर मानणाऱ्याचे खंडण २७-२९
वेदान्तपक्षान्वयें भगवद्देहाचे मायाकार्यत्व खंडणप्रतिज्ञा ३०
जीवेश्वरपक्षांत ( १ ) श्रीमच्छंकराचार्यांचे मत ( २ )

प्रकटार्थविवरणकाराचें मत, ( ३ ) स्वामी विद्यारण्याचे मत ( ४ ) विद्यारण्याचे दुसरे मत (५) कांहीं प्राचीन वेदान्त्याचे व अर्वाचीन हंसराजादिकांचे मत ( ६ ) वाचस्पतीमिश्रांचे मत ( ७ ) सर्वज्ञात्माचार्यांचे मत ३१
( ८ ) स्वामी सदानंदाचे मत ( ९ ) प्रकाशात्माचार्यांचे मत ( १० ) स्वयंप्रकाशानंदाचे मत (११) मधुसूदनस्वामींचें मत ३२
उदाहृत पक्षांचा अद्वैतबोधार्थ अंगिकार व मधुराद्वैत दृष्टीनें त्यांची अपूर्णता. ३२
श्रीमच्छंकराचार्यांच्या पक्षांत भगवच्छरीराची मायाकार्यत्वासिद्धि ३२-३३
प्रकटार्थविवरणकाराच्या पक्षांत ,, ,, ३३-३४
स्वामी विद्यारण्यांच्या पक्षांत ,, ,, ३४-३५
,, ,, दुसऱ्या पक्षांत ,, ,, ३५
कांहीं प्राचीन वेदान्ती व हंसराजादिकांच्या पक्षांत ,, ३५-३६
वाचस्पतीच्या पक्षांत ,, ,, ३६-३८
सर्वज्ञात्माचार्यांच्या पक्षांत ,, ,, ३८-३९
स्वामीसदानंदाच्या पक्षांत ,, ,, ४९-४०
प्रकाशात्माचार्यांच्या पक्षाचा आदर व भगवत्तनूची मायाकार्यत्वासिद्धि ४०
स्वयंप्रकाशानंदाच्या मतांत अनभ्यस्त विवर्ताचा प्रवेश ४०-४१
मधुसूदनांच्या पक्षाचे मधुराद्वैतैकदेशित्व ४१-४२
मधुसूदनांच्या अद्वैतसिद्धींतील साकारखंडणाचें मधुराद्वैत दृष्टीनें खंडण ४२-८९
मधुसूदनांच्या प्रतिपादनांतील विरोध ४३
मधुसूदनानें मानलेल्या बिंबप्रतिबिंबन्यायानेंच साकारसिद्धि, "आदित्यवर्ण" या श्रुतीचा मधुसूदनानें केलेला अर्थ व त्याचे स्वोक्तीनें खंडण ४४
" हिरण्य श्मश्रु " इत्यादि श्रुतीचा मधुसूदनानें केलेला अर्थ व त्याचें खंडण, "विश्वतश्चक्षु" या श्रुतीचा त्यानी केलेला अर्थ व त्याचें खंडण पूर्वक साकारसिद्धि, "सर्वतः पाणिपादं" इत्यादि

श्रुतीचा मधुसूदनांचा अर्थ व त्याचे खंडण ४५

उपासना दृष्टीनें वरील श्रुतीची मधुसूदनोक्त व्यवस्था व त्याचे खंडण, साकाराचे व्यापकत्व. ४६

स्ववचनानें अनिष्टापादन, साकाराविषयीं श्रुतिप्रामाण्य ४७

कल्पांती अच्युतशरीर नाश पावते या महाभारतवचनाचा अभिप्राय ४८

" तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशत् " या श्रुतीचें द्वैतीकृत व्याख्यान, त्याचें मधुसूदनकृत खंडण, त्याचें तरंगिणीकारानें केलेले खंडण, या सर्वांचे खंडण करून साकार सिद्धि ४८-४९

विवर्त परिणामी असतोच या म्हणण्याचे खंडण ४९-५०

विग्रहपरिच्छिन्नत्वखंडण ५०-५१

अनध्यस्त विवर्ताचें मोक्षप्रदत्व, परमेश्वर विग्रहावर पांचभौतिकादि आक्षेप व त्यांचें खंडण ५१-५५

चार्वाकमतांत न्यायकुसुमांजलींतील वचनावरून ईश्वर सिद्धि व भगवद्विग्रहवादियांच्या मतांत प्रवेशशंका व त्याचें खंडण ५५-५७

नित्य आत्मा मानून अन्वयानें देहात्मवाद वेदान्तसंमत दाखवून स्वमंतव्याचे श्रेष्ठत्व ५७-५८

लीलेचें अविद्यात्व खंडण, " नाभ्याआसिदंतरिक्षं " या श्रुतीची मधुसूदनकृत व्यवस्था व तिचें खंडण ५९

" एको नारायणो आसीत् " या श्रुतीची व्यवस्था व तत् खंडणपूर्वक अनध्यस्तसाकारसिद्धि ५९-६०

परमेश्वराचे अखंडमायोपहितत्वखंडण ६०-६१

ब्रह्मानंदाच्या वचनानें साकारत्व सिद्धि ६१-६२

" तस्य ललाटात् " या श्रुतीचा टीकाकारानें केलेला अर्थ व त्याचे खंडण ६२

" नित्यो नित्यानां " या श्रुतिसाह्यानें अनध्यस्तसिद्धि ६२-६३

पुराणप्रामाण्यानें भगवद्विग्रहसिद्धि ६३-६४

"सर्वे नित्याः शाश्वताश्च" इत्यादि पुराणवाक्याची मधुसूदन कृत व्यवस्था व तिचे खंडण ६४-६५

" आनंदरूपममृतं " इत्यादि श्रुतीची व्यवस्था व खंडण ६५-६६
भगवद्विग्रहसावयवत्वखंडण ६७
श्रीकृष्णदेहनित्यत्वोपपादन ६७-६८
मधुराद्वैतांत भाट्ट किंवा जैनमतप्रवेशशंका व खंडण, त्रिपाद्-महानारायणोपनिषदेचे युक्तिनिरपेक्षत्वमंडण ६८
अनध्यस्तविग्रहानें महानारायणोपनिषत् व मुंडकोपनिषत् विरोध परिहार ६८
ब्रह्मानंदानें केलेलें शरीर लक्षण व त्याचे खंडण ६९
सगुण ब्रह्माचे तर्कागोचरत्व व श्रुतिनिर्मूलतर्काचें अप्रतिष्ठत्व ६९-७२
उपासनेंतहि तर्काची अनावश्यकता; ज्ञानाचा व उपासनेचा विषय, अनध्यस्तविवर्तमतांत कृष्णचैतन्यमताचा अप्रवेश ७३
अश्रद्धानिवर्तक तर्काची अपेक्षा, विग्रहाचे रूपावर न्यायाच्या शंका व त्यांचे खंडण ७३-७७
अवतार शरीराला जठराग्निसंयोगाभाव, अंतःकरणांत त्याचा आविर्भाव, भागवत वाक्याची व्यवस्था, विग्रहाचे ठिकाणीं पाकज रूपाचा निषेध व ब्रह्मानंदाचे स्वपक्षदोषदुष्टत्व ७८-७९
सगुणाशीं " अपाणिपादो " या श्रुतीचा विरोध प्रदर्शन व त्याचे खंडण, व विग्रहसिद्धि ७९-८०
विग्रहाच्या नित्यत्वावर आक्षेप व त्यांचे खंडण ८०-८३
विग्रहाचे उपादान अवयव मानून साकाराधिक्षेप व त्याचें खंडण ८३-८४
विग्रहाचे ठिकाणीं माया निरास व अनुभवानें अनध्यस्तविवर्त सिद्धि ८४-८५
उपादानभिन्न एकदेशसिद्धि ८५-८६
संयोगानें उपादानभिन्न एकदेश मानून विग्रहाचें ठिकाणीं अनित्यत्वारोप व त्याचे खंडण ८५-८६
यावद्व्यवहार ईश्वरमायानित्यत्वास्तव ईश्वरविग्रहनित्यत्व प्रतिपादन ८६-८७
मधुसूदनखंडणपूर्वक भगवल्लोकांचे नित्यत्व ८८
ईश्वराचे आवरणशून्यत्व, साकारमंडण, वल्लभमतखंडणाच्या

दृष्टीनें मधुसूदनाचे अभिनंदन ८८-८९
भागवतांतील माया जन्मावरून अनध्यस्तविवर्तसिद्धि ८९-९०
परमेश्वराच्या अनध्यस्त इच्छेचें स्वरूप (अपूर्व शोध) ९१
अध्यस्तकार्य व अनध्यस्तकार्य यांतील भेद ९२-९३
मायाजन्माचे रहस्यकथन ९४
अवताराधिक्षेप व त्याचे खंडण ९४-९५
परमेश्वरशरीरावेश खंडण, पंचम प्रकारक हरिदेहसिद्धि ९५-९६
आचरणदृष्ट्या रामापेक्षां श्रीकृष्णाचे गौणत्वखंडण ९७
ईश्वराचे ठिकाणीं सात्विक गुण पाहिजेत ह्मणणाऱ्यांचे खंडण
व प्रसंगानें धर्माचे, सत्वाचे, व शुद्ध सत्वाचे लक्षण ९८-९९
श्रीकृष्णजारत्वखंडण १०१
श्रीकृष्णाचे शुद्धसत्वोपहितत्व व माधुर्यालंबनत्व व पूर्णत्व १०२-१०३
रासक्रीडारूपकखंडण १०४-१०६
श्रीकृष्णाचे अंशावतारत्वखंडण १०६-११०
विष्णुपुराणप्रामाण्यानें पूर्णत्वमंडण १११-११६
श्रीकृष्णद्वयोपलब्धि— व्रजवासी श्रीकृष्णाचे पूर्णत्व, मथुरा-
वासीचे अंशत्व, श्रीकृष्णाचे कर्मनिरपेक्ष उद्धार करणें, ससा-
धनोद्धार सांगणारे आगम अंशावतार प्रतिपादक व निःसाधनो-
द्धार सांगणारे आगम व्रजस्थश्रीकृष्णप्रतिपादक असा भेद;
काव्यसमर्पण ११६-१२२

## तृतीया वल्ली – सेवकनिर्णय. १२३-१४०

सद्गुरुस्तुति १-२ सेवकलक्षण ३-३३ १२३-१२४
ज्ञानोत्तर संबंध, भिक्षु मतांत भक्तीची अवश्यकता ४०-४१
(अर्धी) मध्वमतांत वात्सल्य व माधूर्य भक्तीची अश-
क्यता ४१-६२ १२५-१२६
वल्लभमतांत ज्ञानोत्तर भक्तीचें दुःशक्यत्व व त्या मतांतील
दोष ६३-८२, अद्वैतज्ञानानंतरच खरी भक्ति होते ८३-८९ १२६-१२७
सेवेमध्यें निराभिमानवृत्ति प्रदर्शन ८६-१०६ १२८-१३०
ज्ञानाभिमान्याचा निषेध १०७-१०९, प्रभुचे १३०

माधीनत्व १०७-१२१ १३०-१३२
नेरभिमानसेवाकरणें जीवकर्तव्य, पुढें प्रेमदान व प्रेमरक्षण
परमेश्वराधीन किंवा संताधीन १२२-१२७ १३२
भजनावांचून हरि प्रेमदान कां करीत नाहीं असें म्हणणाऱ्या
नास्तिकाचें खंडण १२८-१३०, वात्सल्यांत व माधूर्यांत
लालन १३१-१३४, १३३
ईश्वरदयालुता १३५-१४१, ईश्वर साक्षात्काराचा मार्ग
१४२-१५५, स्वाप्निक ईश्वरसाक्षात्काराचे प्रातिभासिकत्वखंडण
१५६-१६४, ज्ञानोत्तर आहार्य द्वैताचें मंडण १६५-१७६ १३३-१३६
श्रीज्ञानेश्वर महाराज व भगवान् आचार्य यांच्या मतांत
विरोध आहे म्हणणाऱ्यांचें खंडण १७७-१८१, श्रीज्ञानेश्वर
महाराजांच्या मतांत मधुराद्वैताची सिद्धि १८२-१८३ १३६
लालन, वात्सल्य, माधूर्य यांची उत्तरोत्तर वृत्तिदृष्टीनें श्रेष्ठता
व अद्वैतज्ञानानंतरच खरी भक्ती होते असें प्रतिपादन
१८४-१९७ १३६-१३७
माधूर्य भक्तीचे अत्युच्चत्व १९८-२०५, माधूर्य भक्तीनेंच
" निर्गुणं गुणभोक्तृच " या वाक्यांची सार्थकता २०६-२१२,
श्रीकृष्णाचें धीरोदात्तत्व व माधूर्य भक्ताचे उत्तमा नायिकात्व
२१३-२१८, माधूर्य भक्तींत ज्ञानाची आवश्यकता २१९,
माधूर्य प्रेमाची असीम सुखरूपता २२०-२२५, माधूर्य भक्तींत
माधूर्यभक्ति करणाऱ्या गुरुची आवश्यकता २२६-२२८,
कवितासमर्पणपूर्वक श्रीगुरुचे ठिकाणीं सर्वभावसमर्पण
२२९-२३१ १३८-१४०

## चतुर्थवल्ली – सेवातत्व. १४०-१९८

श्रीगुरुस्तवन १-४, सेवेतील तत्वें ५-७, अद्वैतीं द्वैत ८-११,
संयोगीं वियोगोपलालन १२-१६७, वियोगाचे भेद व त्यांचे
स्पष्टी करण, स्वाभाविक व सापराध वियोगांतून सुटण्याला
उपाय १२-४१, सप्रेम वियोगाचें भगवद्रूपत्व व दुःखा-
भिभावकत्व, व त्याचें विवरण ४२-६३ १४०-१९३

भक्तीचे विषयप्रीतित्वखंडण ६४-७०, संयोगी वियोगोपलालन ७१-८३, प्रेमाचे अनिर्वचनीयत्व, व अंतःकरण उपाधीनें भेद ८४-८८, वियोगोपलालनांत नित्य संयोग ८९-९२ १४४-१४६
भक्तांच्या प्रारब्धाभिभवाचें रहस्य ९३-९८, भक्तींत समाधि-व्युत्थानादि भेद नाहीं ९९-१०३, ज्ञानोत्तरभक्तींत सर्वच सेवा होते १०४, सुरतरूक धर्माचा उपयोग १०५-१०८, अवतारसहायक मुक्तांचें व भगवंताचे ऐक्य, व अमुख्यत्वें भेद १०९-११४, भोग इच्छा ठेवून भगवत्प्रेमानें भगवल्लोक प्राप्ति व अवतारावरोबर पुनः संभव ११५, सवासन व निर्वासन सहायकांत बाह्यतः अभेद ११६-११७, मधुराद्वैतानें समुक्तिभक्तिप्राप्ति ११७ १४६-१४७
वृत्तिदृष्टीनें भक्तीची साधन व सिद्ध दशा ११८-११९, संयोगेच्छेनें वियोगोपलालन १२०-१२५ ( प्रथमचरण ), राधावल्लभ मतांतून स्वानुकूल प्रेमाचे भेद व राधावल्लभ मतांत अद्वैत भक्तीचा दंश व तेथें त्याची दुःशक्यता १२९-१३३ १४८-१४९
ज्ञानानंतर निर्गुण समाधीचा अनुपयोग व बंधकपणा १३४-१३६ पूर्वार्ध, ज्ञानानंतर सगुण समाधीचा उपयोग व तिचें स्वरूप, व्युत्थानीं सेवकवृत्यनुभव वर्णन १३६-१६७ १४९-१५२
गुणद्वेषरहित गुण वैतृष्ण्य १६८-२४३ १५२-१५८
गुणागुण अर्पण १६८-१७४, परवैराग्याचे योगानें व ज्ञानानें दुःसाध्यत्व १७५-१८६, भगवत्सेवेंत गुणार्पण १८७-१८९, आत्मार्पण १९०, सत्वार्पण १९१-१९२, रजार्पण १९३-२०६, सेवेचे लक्षण २०० धर्म काल देश भाव यांच्या अनुसार भजन २०८-२४३, कविता समर्पण २४४-२४८ १५३-१५८

### पंचम वल्ली – सेवाफलनिरूपण १५९-१७७

श्रीगुरुस्तवन १-९, भक्तिस्वरूप १०-१४, दृष्टदुःखनिवृत्यर्थ भक्त्यंगिकार १५-१६, अद्वैतभक्तींतील द्वैत खंडण १७-२१, ज्ञानावांचून सगुणसायुज्य पावलेल्यांची सावग्रहता व मुक्तांची निरवग्रहता २२-४८, एकजीववादान्वयें जीवापेक्षित

ईश्वराची जीवन्मुक्तिनंतर अस्थिति शंका व तिचें खंडण ४९-५७, जीवन्मुक्तींत सगुणेशसिद्धि, भक्तिसिद्धि ५८-६४, दृष्टिसृष्टिवादांत सगुणेशसिद्धि ६५-६८, मुक्ताना सगुणेशभावापत्ति ६९-९०, बिंबत्व प्रतिबिंबत्व यांतील स्वप्रत्ययाचा अर्थ ९१-९६, बिंबप्रतिबिंबाचे अंशांशत्व निराकरण ९७-१००, शुद्धप्रेममय भक्तीचे वर्णन व त्याचें प्रेमवर्धनच फळ १०१-११६ सगुणेशभावापत्ति, दीक्षिताच्या मताचा समन्वय, जीवेश्वर अंशांशी मानून सगुणेशभावापत्ति, निदिध्यासन प्रकाशांतील विदेहमुक्तिगत स्वोक्त भक्तीची व्यवस्था ११७-१२१, सृष्टिदृष्टि किंवा दृष्टिसृष्टिवादांतहि ईश्वराचे सत्यसंकल्पादि गुणांची सिद्धि व त्या गुणान्वयें लीला मंडन १३२-१३९, देवभक्तांच्या साकार लीलेचा ब्रह्माशीं अविरोध १४०-१४७, साकार लीलेचे श्रुतिपुराण वचनाने मंडन, अनध्यस्तच स्वरूप मुक्तप्राप्य आहे १४७-१५८, ज्ञानी व भक्त यांच्या मुक्तींतील भेद. १५९-१६३, विदेहमुक्तींतहि साकारसिद्धि, भक्ति व उपासनेंतील भेद १६४-१६९, मुक्तादि सर्व साकार सिद्धि १७०-१७३, मधुराद्वैतांत चैतन्यमतप्रवेशशंका व त्याचें खंडण १७४-१८४, श्रीकृष्णाचें प्रकृतिपरत्व व पूर्ण साकारत्व १७१-१७३

द्विविधलीलेचे वर्णन

सगुणेशभावापत्तिरूप मुक्तीमध्यें भक्तीची सिद्धि १८६-२०२, श्रीकृष्णाचे पूर्णत्व २०६-२०९, मरणसमयींच ज्ञान होते या संक्षेपशारीरककाराच्या उक्तीचे खंडण व भक्तीदृष्टीनें अंगिकार २१३-२२२, श्रीगुरुस्तवनपूर्वक कवितानिवेदन.

# श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ.

गुरुर्ज्ञानेश्वरः श्रीमान् उमा माता शिवः पिता ॥
पतिः कृष्णो राधिकाद्या भगिन्यो गोपिका मम ॥१॥
पंचायतनमित्येतत् हृद्यास्थाप्य प्रपूज्य च ॥
नत्वा सम्यक् प्रकुर्वेहं लेखनं प्रेमवर्धनम् ॥ २ ॥

ॐनमो हृत्कुसुमवनवसंता । ॐनमो निजजनतारणानुसंता । ॐ नमः कैवल्येंदिराकान्ता । सत्यज्ञानानंता आळंदिपते ॥ १ ॥ निगमगदित ब्रह्माणिमा । हरवोनि तवपदनखारुणिमा । दे आघविया जगा महिमा । एकपणाची ॥ २ ॥ पदतलरातोत्पलसौरभीं । आत्मजशिरद्विरेफ लोभीं । विराजता मोक्षकदंबीं । आरूढती ॥ ३ ॥ ते दिवास्पर्शे उजळे । कीं रातिस्पर्शें मुकुळे । ऐसें नोहे फुलले । काळीं तिहीं ॥४॥ ना इया कमला विस्तारू कैसा । जलाधाराविण सहसा । कमलावरी आपैसा । कमल वंशू ॥५॥ तें हृदयकमळ अधिष्ठान । पदकमला पटूपण । मग जाहलिया निंवलोण । भवजीवाचे ॥ ६ ॥ तो निर्मळसुखसोहळा । पहात्रयाचिया वेळा । अवधान याची सकळा । श्रवण लोभिया ॥७॥ कां मेघाचें सुख । वृक्षवल्लीया निष्कलंक । तेविं वक्तियाचें मुख । श्रोतृतंत्र ॥ ८ ॥ ह्मणोनी तुह्मा ह्मणे । जे येथ अवधान देणें । श्रवणीं होतांचि होणें । अंतःकरणें गोविंद ॥९॥ श्रीकृष्ण कथेची आवडी चित्तीं । असलिया अधिकारतापूर्ति । मग मुक्त मुमुक्षु बद्धांप्रति । श्रवणार्थी ना न ह्मणे ॥१०॥ “ निवृत्ततर्षै-रुपगीयमानाद्भवौषधाच्छ्रोत्रमनोभिरामात् । क उत्तमश्लोकगुणानुवादात् पुमान् विरज्येत विना पशुघ्नात् ” ॥ (भागवत दशमस्कंध अ. १ श्लो. ४) श्रीधरी टीकाः—अत्र लोके त्रिविधा जनाः मुक्ता मुमुक्षवो विषयिणश्च । तेषां मध्येऽत्र न कस्याप्यलंप्रत्यय इत्याह । निवृत्ततर्षैरिति । गततृष्णैर्मुक्तै-रित्यर्थः । मुमुक्षूणामयमेवोपाय इत्याह भवौषधात् इति विषयिणां परमो विषयोऽयमेवेत्याह श्रोत्रमनोभिरामात् इति । अपगता शुक् यस्मात् तमा-त्मानं हंतीति अपशुघ्नः तस्मात् । “पशुघातिन इति वा ।” भावार्थः—पाहोनी

हरिकथेचा प्रेमा । मुक्ताही चढे स्नेहगरिमा । तेणें वर्णिती पुरुषोत्तमा । मुक्तिमहिमा डावलोनी ॥ ११ ॥ कां ज्ञानेंहि प्राप्य स्थान । तें हें ऐश्वरचि ह्मणोन । येथचि प्रेम ठेवितां आधीं पासोन । तरी जीवा विदेहकैवल्य-भोगू ॥ १२ ॥ आणिक जे मुमुक्षु असती । ते नाना साधनीं श्रमती । मग भरवंसेनीं धरिती । पाय हरीचे ॥ १३ ॥ बाळ आपुलेनी• बळें । साधन करितां आंगें गळे । मग मायचरणीं लोळे । विश्वास ह्मणोनी ॥ १४ ॥ " पुरेह भूमन् बहवोऽपि योगिनस्त्वदर्पितेहा निजकर्मलब्धया । विबुध्य भक्त्यैव कथोपनीतया प्रपेदिरेंजोऽच्युत ते गतिं पराम् " ॥ ( भागवतस्कंध १० अ० ४ श्लो० ९ ) भक्त्यैव ज्ञानं नान्यथेति अत्रसदाचारं प्रमाणयति । पुरेति । हे भूमन् अपरिच्छिन्न इह लोके पूर्वं योगिनोऽपि संतो योगैर्ज्ञानमप्राप्य पश्चात्त्वदर्पितेहास्त्वय्यर्पिता लौकिक्यपीहा चेष्टा यैस्ते निजकर्मलब्धया त्वदर्पितैः निजैः कर्मभिर्लब्धया । त्वय्यर्पिता ईहा निजानि कर्माणि च तैर्लब्धयेत्येकं पदं वा । कथोपनीतया त्वत्समीपं प्रापितया भक्त्यैव विबुध्यात्मानं ज्ञात्वा अंजः सुखेनैव ते परां गतिं प्राप्ताः । ( श्रीधर ) तैसे नानासाधनीं श्रमले । मग भगवंतीं मनः कर्म समर्पण केलें । तयाच्या योगें मधुरावले । कीर्तनरंगें ॥ १५ ॥ तया मधुरभक्तीचेनी बळें । भगवद्गतीते पावले सकळे । ऐसें बोलिले कमळाबाळे । नंदबाळातें ॥ १६ ॥ आतां विषयी जे होती । तयांचा विषय यादवपति । ह्मणोनी तेही गा तरती । रंगती कीर्तनीं तरी ॥ १७ ॥ सोडोनियां सकलधर्म । जरी विषय जाहला आत्माराम । तरी कामचि निष्काम । सहज होय ॥ १८ ॥ कीर्तनप्रेमें धर्म भंगे । आणि अधर्म जंव न होय अंगें । तंव तारिजे रमारंगे । येथ संशयो नाहीं ॥ १९ ॥ परी आवडी पाहिजे मोठी । आवडी नसतां पोटीं । तरी सर्वगुणसंपन्नही शेवटीं । अनधिकारी तो ॥ २० ॥ हिंसक आणि आत्मघाती । निंदितांहि नये देवस्फूर्ति । महा नास्तिक दुर्मति । तो येथ निश्चिती अनधिकारी ॥ २१ ॥ ब्राह्मणापासूनि म्लेंच्छान्त । अधिकारी सर्व मनुष्यजात । गुण ऐकतां प्रेमजळें भरत । नेत्र जयाचे ॥ २२ ॥ " मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः । स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परां गतिम् " ॥ पापयोनि मूढ । परी माझेठायीं दृढ । वैश्य कां स्त्रिया शूद्र । अवघेचि तरती ॥ २३ ॥ ह्मणोनी एक प्रेम असतां ।

अधिकार आहे समस्तां । परी धर्मातें उपेक्षतां । अधर्मवार्ता न घडावी
॥ २४ ॥ कृष्णकाला व्यावया पाही । सहार ब्राह्मण एकेठायीं । जेवितील
परी शीतभेणें नाहीं । प्रात:स्नान ॥ २५ ॥ ऐसा हठिया आत्मघाती । तो
वर्जिजे इये ग्रंथीं । एरवीं कृष्णप्रेमा जयाचे चित्तीं । तो साधुमूर्ति अधि-
कारी ॥ २६ ॥ सकल सौंदर्याची खाणी । तो एक माझा शार्ङ्गपाणी ।
तया पाहतां पाहणी । बद्धाची हारपे ॥२७॥ विषयदोष देखोनी पोळले ।
निर्गुणीं धांवतां कांहीं न कळलें ऐसे मुमुक्षु विसावले । सगुण श्रीहरि
चरणीं ॥ २८ ॥ व्यतिरेकें मायाद्वेष । तेणें येऊं पाहे द्वैतविशेष । ह्मणोनी
साकार जगन्निवास । अन्वयें मुक्तहि भजताती ॥ २९ ॥ एवं बद्धमुमुक्षु-
मुक्तां । सारखी गोविंदवार्ता । आणि प्रेमाचिया ठायीं तत्वता । युक्ति कोणी
नापेक्षी ॥ ३० ॥ कां पुष्प एक गोड वाटे । तेथ तर्कें काय घटे । नातरी
कुरूप स्त्री आवडे नेटें । कामुका एका ॥ ३१ ॥ तेथ घरीची सुंदर पति-
व्रता । उपेगा नयेची सर्वथा । कीं विष्टेमाजी कृमि असतां । नेघे
चिळसी ॥ ३२ ॥ तांबुलाची लाल लाळ । तया नांव अमृत केवळ ।
ठेवोनिया वर्णिती रसाळ । भ्रांतकवि ॥ ३३ ॥ एरवीं विषयीजनप्रेम-
वार्ता । युक्तिवांचोनि दिसे सर्वथा । यास उदाहरण आतां । पुत्रप्रेमाचें
देखीजे ॥ ३४ ॥ पुत्रावरी ममता पूर्ण । असावया काय कारण । थाव
घेतां तर्कें करून । हातां किंचित्र सांपडे ॥३५॥ मनुष्यत्व जात्यवच्छिन्न ।
ह्मणोनी पुत्रावरी प्रेम पूर्ण । तरी मनुष्यत्व जात्यवच्छिन्न । इतरही मुलें
॥ ३६ ॥ आतां स्वउदरीं जाहला । ह्मणोनी पुत्रप्रेम वाढिन्नला । तरी
याही बोला । निष्फलत्व ॥ ३७ ॥ उदरीं जन्मला तो कोण । पुत्रदेह कीं
पुत्र आत्मा पूर्ण । प्रथमपक्षीं प्रेत निघालिया गर्भांतून । प्रेम उपजावा
तयावरी ॥३८॥ द्वितीयपक्षीं आत्मा जाहला । तरी मातेचा आत्मा भिन्न
कवणें केला । आतां देहात्मसंयोग ह्मणावा जन्मला । तरी संयोगांशज्ञान
कवणा ॥ ३९ ॥ संयोगांशज्ञानाविण । संयोग जन्म मानणें श्रद्धा पूर्ण ।
श्रद्धेनें ममता ठेविता जाण । तरी काष्टादिकीं नये कां ॥ ४० ॥ केवळ
जितजन्मदर्शन । जरी ह्मणावे प्रेम कारण । तरी कीटकादिकीं प्रमाण ।
होवावी ममता ॥ ४१ ॥ मानुषजितजन्मदर्शन । आणि ते स्वोदराव-
च्छिन्न । ऐसें ममत्वा कारण । तरी ते न घडे ॥ ४२ ॥ जीतजन्मावरी

ममता । उपजतसे कवणिया अर्था । कितीहि विवंचोनी पाहतां । देहास दृश्यता आत्मया नाहीं ॥ ४३ ॥ ह्मणोनी जीव ह्मणावया कारण । न घडे आत्मसंबंधानुमान । आतां श्वासोश्वासावरून । जीवत्वानुमान जरी कीजे ॥ ४४ ॥ तरी वायू भरता फुफुसी । श्वासोश्वास ये गर्भज प्रेतासी । तथापि ममतेसी । ठाव न दिले ॥ ४५ ॥ पुढें कार्य करील हे प्रयोजन । ममता वाढवी गहन । तरी बहुत पुत्र सायेस सोडोन । स्त्रीअधीन अनुभव हा ॥ ४६ ॥ आणि बहुत खंडण तर्क पाही । परी ते होती आना ठायीं । एवं बाध्य असतां पुत्रत्वही । पुत्रप्रेम जगातें ॥ ४७ ॥ ह्मणोनी मम एवं उक्ति । कीं प्रेम कदापि नापेक्षी युक्ती । तो प्रेम विषयरहित भगवद्भक्ति । होतां युक्ति अपेक्षिजे कां ॥ ४८ ॥ युक्तीचें मुख्य कारण। कीं कदापि भुलो नये आपण । परी भुलीचे मुख्य अधिष्ठान । विषयवन जाणिजे ॥ ४९ ॥ रक्त मांसाची पुतळी एका । ते डाकिणी जेथ मुख्य नायिका । दगडा ऐशा कनककणिका । सामग्रिया ॥ ५० ॥ आणि जंव जंव जीवित वाढे । तंव तंव जयाते तोष जोडे । तया काळाचे खाद्य फुडे । प्रत्यक्ष देह हा ॥ ५१ ॥ ऐसिया देहातें आत्मा मानोनी । तोषवावया भोगरचनीं । कवीहि लाळेस अमृतवचनीं । संबोधिती ॥ ५२ ॥ एवं विद्यावंता महाभ्रांति । तेथ कोण देखे मूढांची शांति । अवघे रागद्वेषप्रांतीं । भ्रमती हे ॥ ५३ ॥ स्त्रिया बोलती मधुर वचन । पति वश व्हावा ह्मणोन । वेश्या बोलती मधुर वचन । मिळावे धन ह्मणोनिया ॥५४॥ पिता बोले मधुर वचन । सुते वृद्धपणीं द्यावे जीवन । पुत्र बोले मधुर वचन । वाटा मज मिळेल ह्मणोनी ॥ ५५ ॥ शिष्य बोलती मधुरवाणी । कीं गुरुमहाराज कृपाकरोनी । आमुचे धनसुत कामिनी । करोत निर्विघ्न ॥ ५६ ॥ गुरुजीचे बोलणें अति मधुर । सुरंगीत करोनी शिष्यघर । पुरणपोळिया स्वकुटुंबोदर । भरावे आदरें ॥ ५७ ॥ एवं राग साखरेची सुरी । खोचिता प्रतिबंध होय अवसरी । तंव द्वेषाचिया तिखट धारीं । छेदिजे पुढिला ॥ ५८ ॥ राग विकारी होवोनी । करिती वेश्येसमान सनधरणी । तेचि द्वेषविकारा येऊनी । श्वान होवोनी भुंकिती ॥ ५९ ॥ एवं वेश्या आणि श्वान । या दोहों प्राणियाविण । ऊर्वी नाहीं विपर्याजन । आळंदीवल्लभ आण वाहे ॥ ६० ॥ राग द्वेषा वांचोनिया । कवण हेतु

भुलवावया । आणि राग द्वेषा तया । अधिष्ठान विषयवल्ली ॥ ६१ ॥ ते विषयवाघाची जाळी । जीहीं जाणोनी योग्यवेळीं । निःशेष केली होळी । वासनेची ॥ ६२ ॥ श्रृंगार पालटोनी वेश । दडला शांतांचिया पाठीस । तेथ नायिकात्व जावोन स्त्रियास । मातृत्व आले ॥ ६३ ॥ कां कवणही कामिनी पाहे दृष्टि । तंव विश्ववात्सल्य उघडे पेटी । स्वदेहीं शांति सुख सृष्टि । पुत्रही देखे ॥ ६४ ॥ भुलवावया ऐसे कोणी । उरलेचि नाहीं कुंभिनीं । तेथ श्रद्धेंतहि लोक वळवोन । कोणे दृष्टीं भुलवील ? ॥ ६५ ॥ ज्या विषेंकरोनी कपटकर्ता । मारावया पातला होता । तें विषचि न सांपडलीया हाता । कपटबुद्धि करील काय ? ॥ ६६ ॥ तैसे शरीररूविष-याचे वळें करोन । रागद्वेषवंत भोंदिती जन । त्या शरीरापरते उपदे-शिता ज्ञान । भुलविण्या ज्ञान न सांपडे ॥ ६७ ॥ विष नाहीं कपटिया पाशीं । तरी आधार काय न्यायमूर्तिसी । कीं हा मारावयासी । आला होता ह्मणोनिया ॥ ६८ ॥ तैसे विषयरहित शुद्धज्ञान । जरी उपदेशिलें श्रद्धें करोन । तरी ते भुलवील ह्मणोन । तार्किका तर्के कवण सिद्ध करा-वया ॥ ६९ ॥ तथापि केवळचि श्रद्धा । ऐसें मी न ह्मणे कोणा प्रबुद्धा । परी माझी एक अचल श्रद्धा । गोकुळप्रमदापतिपदीं ॥ ७० ॥ मग श्रद्धा अथवा युक्ति । मिया तेथचि ठेविली प्रीति । आणि तया आनंदें निघती । शब्द जे मुखें ॥७१॥ तया माझिया शब्दाचा । मजची उपयोगू साचा । कोणी वाटा ययाचा । घेवो न घेवो ॥ ७२ ॥ तिये आपुले शब्द सुसं-स्थिती । आणीतसे उपपत्ति । लावावया भगवंतीं । प्रीत्यनुसंधान ॥७३॥ आत्मयाचे व्यापकपण । तेचि ब्रह्म परिपूर्ण । सच्चिदानंदैक आनंदघन । अन्वयें पूर्ण विश्वरूप ॥ ७४ ॥ " झालेनि जगें मी झाके । तरी जगत्वे कोण फाके । किळेवरी माणिके । लोपिजे काई ॥ " " सोने सोनेपणा उगें । न येतां जाहले लेणें । तैसें न वेचतां जग होणें । अंगें जया ॥ " एवं ज्ञानेश्वरीं आणि चांगदेवपत्रीं । तात बोलिले शुद्धोत्तरीं । ह्मणोनी मृत्यालय नागालय धरित्री । ब्रह्मसूत्रीं गुंफिली ॥७५॥ तें ब्रह्म सच्चिदानंद । एकत्वें असे अभेद । तथापि वृत्तिदृष्ट्या विशद । पृथगिव भासे ॥ ७६ ॥ भावाभाव विशिष्ट सत्ता । वृत्यवच्छिन्न ते चित्ता । प्रीत्यादि वृत्यवच्छिन्न सत्ता । आनंद होय ॥ ७७ ॥ एवं पंचपादिकाकारांचे मत । स्पष्टही परी

अनुभवा येत । तेंचि विषद किंचित । कीजेल स्वयुक्ति ॥ ७८ ॥ व्यष्टि हृदयींची पृथगिय कथा । तीचि समष्टिहृदयीं वार्ता । कीं ब्रह्मसमष्टिवृत्तौ विश्वत्वार्थी । पृथगिवाविर्भवले ॥ ७९ ॥ वस्तुचिया आंत देख । असे जें कीं अंश पंचक । अस्ति भाति प्रिय हे त्रिक । आणि नामरूपद्वय ॥८०॥ त्यांत आद्य तीनहि ब्रह्म । शेष दोहींचा मायेंत उगम । यया दृष्टि अनुगम । अवघिया पदार्थांचा कीजे ॥ ८१ ॥ अस्तित्वांश प्रधान गोचर । तो याबद्देहादि जडाकार । आणि अस्तिभातिअंशद्वयगोचर । जीव बोलिजे ॥ ८२ ॥ अस्ति भाति प्रिय तिन्ही । सारिखे गोचर जया स्थानीं । तो परमात्मा कैवल्यदानी । व्यक्तराहणी ऐसी याची ॥ ८३ ॥ अस्तित्व प्रधान स्थावर व्यक्ति । सचिदंश प्रधान जंगम व्यक्ति । सच्चिदानंद पूर्ण व्यक्ति । श्रीकृष्णमूर्ति कृपाळू ॥ ८४ ॥ कोणीं म्हणेल हें वल्लभमत । शांकरमता विपरीत । तरी तयाचे यथार्थ । समाधान ऐकिजे ॥ ८५ ॥ अनुकूल असतां पराचें मत । प्रमाण घ्यावया आधार बहुत । भगवत्पादीय गीताभाष्यांत । सांख्यकारिका प्रमाण त्रयोदशाध्यायीं ॥८६॥ अमरसिंह बौद्ध असोन । तत्कोशार्चे आर्य घेती प्रमाण । व्यास ब्रह्मसूत्रीं योगसूत्राचें करिती खंडण । तिहीं भाष्य केलें योगसूत्रावरी ॥ ८७ ॥ मांडुक्यकारिका अद्वैत ग्रंथ । आहे गौडपादविरचित । आणि सांख्यकारिकेवरी यथार्थ । भाष्यहि तयांचेंचि ॥ ८८ ॥ अप्पय्या दीक्षित अद्वैती । शैव विशिष्ट श्रीकंठभाष्यावरुती । टीका केली यथा निगुती । आणि प्रमाणहि मानिलें तया ॥८९॥ निर्णय सिंध्वादि निबंधीं पाहतां । कित्येक तंत्रासही प्रमाणता । चैतन्य संप्रदायी परमती तत्वता । भगवत्पादषट्पदीं प्रमाण घेतले ॥ ९० ॥ तात्पर्य अनुकूल असतां वचन । दोष नाहीं घ्यावया प्रमाण । व्यर्थ धर्मधर्मी द्वेष वाढवोन । प्रयोजन काय सिद्ध होय ॥ ९१ ॥ म्हणोनी भक्तिदृष्टीं पाहता । वल्लभादि कृष्ण भजकां आम्हां ऐक्यता । भक्तमालेंत ऐसी कथा । कीं तात विष्णुस्वामी संप्रदायी ॥ ९२ ॥ आणि नाथसंप्रदायी आह्मी म्हणोन । तात ज्ञानेश्वरींत बोलिले आपण । या दोहोंचा समन्वय हाचि जाण । की भक्तिदृष्टीं ऐक्यपण दोघांचे ॥ ९३ ॥ शिवलोकींच्या ऐकोनी कथा । नाभाजी बोलिले तत्वता । ह्मणोनी कवणे कल्पींची कथा । बोलिलो तिहीं ॥ ९४ ॥ तथापि

तेथ विरोधू नाहीं । भक्ति दृष्टी ऐक्यता पाही । अथवा दोन स्वरुपीं लवलाही । होवोत तात ॥ ९५ ॥ योगवासिष्ठ-मुमुक्षु-व्यवहार--प्रकरणीं । द्वात्रिंशत व्यासाकार बोलिले वसिष्ठमुनि । आणि जितुकीं रूपें तात धरतील आम्हां लागुनी । तितुकी होईल गुरुमयसृष्टि ॥ ९६ ॥ एवं कोण्याही दृष्टि पाहतां । विरोधचि निवटे कथा । अप्रमाण अर्वाचीन ऐतिहासिकता । व्युदसिली स्वयें ॥ ९७ ॥ जयाच्या इतिहासाची कडसणी । कांहीं परिस्थिती घेऊनी । अनुमानांची उभारणी । नवीचि एक ॥ ९८ ॥ तो इतिहास निःशेष त्यागिला । दीव्यदृष्टीचा आश्रय केला । दोहीं संप्रदायीं स्थापिला । श्रीगुरु आपुला कृपाळू ॥ ९९ ॥ ह्मणोनी वल्लभ आणि आह्मी । एक्याचि श्रीकृष्णप्रेमीं । तथापि गरिमाविशेष धर्मी । शांकरमती जाहलों ॥ १०० ॥ वल्लभमताचिया ठायीं । सच्चिदानंदाविर्भाव सृष्टि पाही । परंतु तेथ मानिली नाहीं । माया एक ॥ १०१ ॥ माया असलियाविण । जरी जग झालें ब्रह्म पूर्ण । तरी ब्रह्मगृहीं व्रत बंध कवण । केला खटाटोप जग व्हावयाचा ॥ १०२ ॥ ब्रह्माची इच्छा ह्मणाल जरी । तरी निरीच्छा इच्छा कवणे परी । विरुद्ध गुणाश्रय ह्मणाल जरी । तरी माया शब्दें काय केलें ॥ १०३ ॥ समानसत्तेंत विरोध । एके ठायीं मानाल प्रसिद्ध । तरी नित्य अनित्यत्वाचा बोध । होवावा ब्रह्मीं ॥ १०४ ॥ ह्मणाल एकावरी शून्य देता । अभावशून्या ये दश भावता । तैसा ब्रह्मीं विरोध तत्वता । असंभवे स्वीकारू ॥ १०५ ॥ तरी शून्याचा अर्थ अभाव पूर्ण । परी आकृति एकांकांशासमान । ह्मणोनी आकृत्यर्थ दृश्य शून्य आपण । भावाभावरूप अनिर्वाच्य ॥ १०६ ॥ तया एक सत्यावरी बैसविता । तेणें एकास दिधली दशत्वानेकता । एवं बीज गणीत रेखागणीतींहि पाहता । अर्थू हा मिळे ॥ १०७ ॥ ह्मणोनी समसत्तेंत कांहीं । एक वस्तु परस्पर विरोधी नाहीं । वास्तव ब्रह्मीं विरोध लवलाही । विषमसत्ताक स्विकारिजे ॥ १०८ ॥ विषमसत्ताक विरोधचि माया । मग शांकरमत कां गेले वाया । उगीचि झिजविली आपुली काया । श्वशुर होवोनि वल्लभें ॥ १०९ ॥ परी नवल एक जाहले येथ । स्नुषा श्वशुराचे युद्ध बहुत । शेवटीं स्नुषा जय पावोनी निश्चित । जाहली पतिप्रिया ॥ ११० ॥ वाद्य जड आणि गान चेतनस्वर । या दोघांचें

ऐक्य होवोनि आनंद उपजे साचार । तैसें विषमसत्ताक प्रकृत्यवच्छिन्न परमेश्वर । प्रेमानंद उपजवी ॥ १११ ॥ काव्यांत विरोधाभास अलंकार । तो स्थाय्युद्रेक करी साचार । तेवि विषमसत्ताक विरोधहि परिकर । सत्वांशें उपजवी ब्रह्मप्रीति ॥ ११२ ॥ ह्मणवोनी मायातमोगुण । करोनी चिदानंदाचें आवरण । गौणरजांश विक्षेपें पूर्ण । भासवी सदधिष्ठान जडरूपें ॥ ११३ ॥ तमः करोनी आनंदावरण । रजोविक्षेपें अंतःकरणावच्छिन्न । सच्चिद्द्वय अंशाधिष्ठान । भासवी भिन्न इव जीवपणें ॥ ११४ ॥ मिश्रसत्वांत रजस्तमप्रवृत्ति । या लागीं ब्रह्मदेवैश्वर्य भासे स्थीति । तेथ आनंदाची अभिव्यक्ति ॥ जीवाहोनी विशेष ॥११५॥ शुद्धसत्वांत आवरकत्व नाहीं । आणि स्थीरत्वें विक्षेपहि नसे कांहीं । ह्मणोनि आनंदाधिष्ठान लवलाही । जैसेचि तैसे शुद्ध भासे ॥ ११६ ॥ परी सत्ववृत्तिस्तव पृथगिवपण । जे आनंदाधिष्ठानीं चिन्ह । तेचि अनध्यस्तविवर्त सगुण । ब्रह्म श्रीकृष्ण अस्मन्मतीं ॥ ११७ ॥ ते रासपणें आलिंगिले । श्रीगुरुपणें हृदयीं धरिले । अंतर्बाह्य सुंदर भरले । श्रीज्ञानेश्वर पदकमल ॥ ११८ ॥ तेथ ओवियाकमळमाळा । अर्पोनिया वेळोवेळा । दोहीं करीं वाजवोनि टाळा । ज्ञानेश्वर वदनीं गावूं ॥ ११९ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर कृपाप्रसादे ओवीछंदबद्धे प्रेमनिकुंजे उपपत्ति निर्णयोनाम प्रथमावल्ली.

# द्वितीया वल्ली.

जय जय सद्गुरु निर्विकारा । जय जय सद्गुरु करुणाकरा । जय जय सद्गुरु दीनोद्धारा । भक्तवत्सला ॥१॥ जय जय सद्गुरु प्रेमळ आई । करुणाकर ठेवोनि डोई । जीवन घालोनी लवलाही । पुढें वल्लरी वाढवी तूं ॥ २ ॥ मागां अनध्यस्तविवर्त । बोलिला ते विषयीं समस्त । झाले असेल आशंकित । श्रोतृमंडळ ॥ ३ ॥ कीं पावलिया संविती । काय ह्मणोनिया भक्ति । अनध्यस्तविवर्ती । कीजे ती पां ॥ ४ ॥ अनध्यस्तविवर्त कवण । प्रकार सत्ता कवण कवण । अभिव्यक्ति किंलक्षण । हे असतील

प्रश्न तरी समाधान आथिका ॥ ५ ॥ ज्ञानें व्यतिरेकीं ब्रह्मानंद । तोचि अन्वयें भक्ति प्रसिद्ध । प्रीत्यादि वृत्यवच्छेद । एकत्वेऽपि पृथगिव भासे ॥ ६ ॥ स्थावरादीव न होय उपेक्षा शंका । अधिक होता भक्त लिंपेल द्वैत कलंका । ह्मणोनि समसाम्य सखा । होवोनि भेटे ॥ ७ ॥

शिष्य उवाचः— महाराज ! युक्तीनें व अनुभवानें जरी आपण सांगत असला तरी या विषयीं एकादे प्राचीन प्रमाण आहे काय ?

मध्यस्थ उवाचः— अरे " गुरुवाक्यावांचुनि । शास्त्र हातीं न शिवे " असें श्रीमंताचें वचन तुला माहित आहेच; आणि हें मधुराद्वैत वेदान्तविशेष असल्यामुळें उद्घाटकावांचून याला प्राचीन प्रमाणांची अपेक्षाहि नाहीं.

प्रतिवादी उवाचः— आपण ह्मणतां तसें घटकाभर खरें धरिलें तरी श्रुतिस्मृतिपुराणइतिहासाविरुद्ध बौद्धादिकाप्रमाणें एखादा नवीन सिद्धान्त ग्रहण करावा असें आचार्यांचें आनुवंशिक शील नाहीं. वेदान्तांत १८२ मतें असून त्यांचा सहनशीलतेविषयीं जो प्रकार आढळतो त्यांत देखील पूर्वी उदाहृत वाक्यांचा अर्थाभास दाखवून यथार्थ अर्थ दाखविण्याचाच प्रयत्न झालेला आहे हें बीज आहे; ह्मणून सिद्धान्तीलाही प्राचीन प्रमाण दाखविणें अवश्य आहे.

सिद्धान्ती उवाचः— मी आपल्या मताला पूर्वी पुष्कळ प्रमाणें दिलीं आहेत, देणार आहे व देतही आहे. त्रिपुरारहस्याच्या २० व्या अध्यायाच्या ३३ । ३४ श्लोकांत व त्यावरील श्रीनिवासबुधविरचितटीकेंत असेंच ह्मटलें आहे. " गंभीरस्तिमितांभोधिरिव निश्चलभासनं । यत्सुभक्तै रतिशयप्रीत्या कैतववर्जनात् " ॥ ३३ ॥ स्वभावस्य स्वरसतो ज्ञात्वापि स्वाद्वयं पदम् । विभेदभावमाहृत्य सेव्यतेत्यंततत्परैः ॥ ३४ ॥ श्लोकांचा अर्थ व टीकेचा स्वभाषेंत अभिप्राय सांगतो. जें आत्मतत्त्व योगियांनां गंभीर असें प्रतीत होतें त्याच आत्मतत्त्वाचें जाणून भक्त अत्यंत प्रीतीनें सेवन करितात. प्रीति ह्मणजे एकसारखी त्याच तत्वाकडे लागून राहिलेली चित्तवृत्ति. अशा प्रकारची प्रीति द्वैती लोकांचे ठिकाणीं उत्पन्न होणें संभवनीय नसते, कारण " आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति " इत्यादि श्रुतींनीं आत्मभिन्न प्रीतीला गौणत्व दाखविलें असल्यामुळें जारजारिणीची

प्रीति जशी आपल्या सुखाचे ठिकाणीं मुख्य असून त्या परस्परांचें ठिकाणीं सुख साधनत्वेंकरून असते. तथापि ते मुख्यप्रीतीप्रमाणें करितात ह्मणून या प्रीतीला कापट्य ह्मटल्या जाते. तद्वत भोगकाम किंवा मोक्ष कामावाचून, आत्मभिन्न पदार्थांचे ठायीं, निरपेक्ष प्रीति संभवत नसल्या-मुळें खऱ्या भक्तीचे आस्वादक अद्वैतीच आहेत असें मी ह्मणतों.

शिष्य उवाचः— महाराज मला ही टीका ऐकतांच एक शंका आली आहे, तिचें समाधान टीकेचा अर्थ सांगतांनां आपण करण्याची कृपा कराल काय ?

मध्यस्थ उवाचः— कृपा करणें सामर्थ्याचे अधीन आहे. आपण लडिवाळपणानें विचारण्याविषयीं मात्र शंका धरूं नये. चातकाची आर्त पुरविण्याविषयीं मेघानें कधीं नको म्हटले आहे काय ?

शिष्य उवाचः— स्वामींच्या मौनानेंच त्याची संमति आहे असें समजून मी आपली शंका प्रकट करितो. वासुदेवानंद सरस्वती टेंभे स्वामी हे आपल्या प्राकृत मननसारांत म्हणतात कीं, सगुणोपासकांनां मोक्षाची इच्छा होत नाहीं व सगुणोपासकांनां भोगकाम नसतो; याविषयीं आप-ल्यालाही पुष्कळ कथा माहित आहेत. म्हणून सकामत्वास्तव द्वैतीउपास-कांच्या प्रीतीचें गौणत्व श्रुतीनें दाखविले आहे असें म्हणणें युक्त होणार नाहीं.

सिद्धान्ती उवाचः— अरे! स्वामी विद्यमान असल्यामुळें त्यांनांच जावून तुला विचारतां येतें. पुनः मोक्षकाम जरी सगुणोपासकांनां नसतो तरी समीपतामुक्तीची त्यांना इच्छा असते, असें द्वैतवाद्यांच्या ग्रंथावरून दिसून येतें. पुनः जसे वेदान्ती दुःखरहितत्व आपल्या मोक्षाला समज-तात तसे द्वैती समीपतादींनां समजतात; इतकेंच कीं, वेदान्ताच्या मोक्षाची त्यांनां इच्छा होत नसल्यामुळेंच ते ज्ञानाचा अभ्यास करीत नाहींत, असा स्वामींच्या म्हणण्याचा अभिप्राय आहे. पुनः सगुणोपास-कांनां मोक्षकाम नसतो असें स्वामी म्हणतात, तसा भोगकाम नसतो असें म्हणत नाहींत, कारण ते विद्यासागर असल्यामुळें त्यांनां आपला प्रभु संकटाचे समयीं धांवून येईल अशी उपासकांची समजूत ठाऊक असलीच पाहिजे, ह्मणून सर्वभोगपूर्तीचे आशेनें सगुणोपासकांनां मोक्षाची इच्छा होत नाहीं असाहि स्वामींच्या वचनाचा आशय निघूं शकतो.

तात्पर्य श्रुतीनें द्वैती उपासकांच्या प्रीतीला गौण म्हटलें आहे तें यथार्थच आहे.

शिष्य उवाचः– उत्तम समजलो; पण प्रभू ! आपले पुढें काय म्हणणें आहे ?

श्रीगुरु उवाचः— आमचे म्हणणें सध्या असूं दे, पण आह्मी त्रिपुरारहस्याच्या श्लोकाचा व टीकेचा अभिप्रायच तुला पहिले सांगतो. सर्व चैतन्य एकात्मक आहे असें जाणून देखील बलानें भेदज्ञानाचें ग्रहण करून तो सेव्यसेवकभाव कायम ठेवून भक्ति करित असतो.

शिष्य उवाचः— महाराज ! बलानें एकात्मवेत्ता भेदज्ञान ग्रहण कसे करितो ?

श्रीगुरु उवाचः– ज्याप्रमाणें कित्येकांना पूर्व जन्मामुळें राज्याची वासना होते, त्याप्रमाणें ज्ञानपूर्व केलेल्या भक्तीची ज्ञानानंतरही वासना राहते.

प्रतिवादी उवाचः– यावरून तर सर्व ज्ञानियांना भक्तिबद्धक्ति केलीच पाहिजे असा सिद्धान्तीचा आग्रह नाहीं हे सिद्ध होत आहे, व त्यावरून शांकरमताव्यतिरिक्त या मधुराद्वैतदर्शनाची आवश्यकता आहे असें आह्माला वाटत नाहीं.

सिद्धान्ती उवाचः– शांकरमताव्यतिरिक्त असले तर त्याची खरोखरीच आवश्यकता नाहीं असे मीहि म्हणतो, परंतु शांकरमतांतच मानलेल्या भक्तीचें ते विशेष स्पष्टीकरण असल्यामुळें, पूर्वपक्षाचें म्हणणें सम्यक् वाटत नाहीं. पुनः "अपिचेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः । सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि" या श्लोकांत ज्ञान महात्म्यास्तव अभ्युपगम केल्याप्रमाणें, एकाद्या पापी पुरुषाला अकस्मात् ज्ञान झालें तर तेवढ्यानें ज्ञानसंपादक चित्तशुध्यर्थ सर्व कर्मकांडोपदेश कोणीहि शांकरमती तिरस्कृत करण्यास इच्छित नाहीं. तद्वत् पूर्वभूमिवर भक्ति झाल्यावांचून उत्तर भूमिकेंत ज्ञानाची प्राप्तिच होत नाहीं, ह्या मधुसूदन वाक्यावरून ज्ञानानंतर पूर्वकृत भक्तीची वासना राहणेंच सर्वांना संभवनीय आहे, व म्हणूनच आमचा ज्ञानोत्तर भक्त्युपदेश सार्थकही आहे. राज्यादि वासना असणाऱ्या जनकादींच्या ठिकाणीं पुराणावरून भक्तीचा उद्रेक दिसतो. त्यांतून ज्ञानी येथें उदाहरण मात्र घेतला आहे.

मध्यस्थ उवाचः– पण तसें मानलें तरी ते गृहीत भेदज्ञानपूर्वक

भगवत्सेवन अनादरमयच झालें पाहिजे.

सिद्धान्ती उवाच– कां? आईचें सेवन करणाऱ्या साधकाला ज्ञानी झाल्यानंतर आईला लाथा मारतांना असें आपण कोठें पाहिले आहे काय? पुनः अत्यंत तत्परतेनें जडलेला पूर्वप्रेम एकाएकी अनादर कां उत्पन्न करील ? ज्ञान जसें अज्ञानाविषयीं अनादर उत्पन्न करितें, तसें तें प्रेमाविषयीं करीत नाहीं. यद्यपि प्रेमाविषयीं वैराग्य अनादर उत्पन्न करितें तथापि ते मिथ्या प्रेमाविषयींच अनादर उत्पन्न करितें, भगवत्प्रेमाविषयीं करीत नाहीं; कारण वैराग्य दोषदर्शनानें होत असतें व भगवत्प्रेमांत प्रारब्धाभिभावक गुण असल्यामुळें, व दुसरा कोणता दोष नसल्यामुळें भगवत्प्रेमाविषयीं वैराग्य अनादर उत्पन्न करीत नाहीं. यद्यपि ज्ञानानंतर द्वैताचे ठिकाणीं अनादर होत असल्यामुळें, आहार्यसेव्यसेवकत्व द्वैताचे ठिकाणीं अनादर असला पाहिजे, परंतु प्रारब्धबलानें भोग्य संयोगादि द्वैत गळ्यांत येऊन पडले असतां, कीतिही अनादर केल्यानें जात नाहीं तेंच आहृत सेव्यसेवकभेदज्ञानपूर्वक झालेल्या भक्तीनें जर अभिभूत होतें तर त्या भक्तीचे ठिकाणीं अनादर कसा राहील ? प्रत्युत अत्यंत आदरच राहिला पाहिजे. ह्याविषयीं तात ह्मणतात कीं " ऐसाहि स्वामी भृत्यु संबंधा । लागी उठती श्रद्धा । तरी देवोचि नुसुधा । कामविजे ॥ देव देऊळ परिवारु । कीजे कोरोनि डोंगरू । तैसा भक्तीचा वेव्हारू । कां न व्हावा ॥ कर्माचा हातू न लगे । ज्ञानाचेहि कांहीं न रिघे । ऐसीचि होतसे आंगे । उपास्ती हे " (अनुभवामृत अ० ९ ओव्या ३८-४१-५७) येथ उपास्ति शब्दानें भक्ति दाखविली असून मधुराद्वैतभिन्न लोकाना ओळखू यावा ह्मणून हा उपास्ती शब्द घातला आहे. प्रसिद्ध उपासनारूप अर्थानें त्याची योजना नाहीं कारण उपासना तर कर्मसमुच्चित सांगतात व तात तर " कर्माचा हातू न लगे " अशी उपास्ती सांगतात म्हणून हा शब्द भक्त्यर्थीच आहे. इतर ओव्यांचा पदार्थ श्रोतृवृंदानी समजून घ्यावा.

मध्यस्थ उवाचः– आपल्या मुखांतून अधिक अधिक निरूपण ऐकावेसेंच वाटतें तरी आणखी कांहीं प्रमाणें असल्यास कृपा करून सांगावें.

सिद्धान्ती उवाचः– मी आपल्यास उत्तम प्रमाणसंग्रह थोडक्यांत सांगतो. " प्रत्युत ज्ञानयज्ञस्तु प्रद्वेष्यो भासते स्वतः । विशुद्धज्ञानमुत्पन्नं यस्य तस्य महात्मनः ॥ ६९ ॥ शिवरुद्रमहादेवब्रह्मेशानादिनामसु । रुद्र मूर्तिषु सर्वासु शांतिदान्त्यादिसाधने ॥ ७० ॥ तिर्यक् त्रिपुंड्रे रुद्राक्षे तथा भस्मावगुंठने । शिवलिंगस्य पूजायां शिवस्थानेषु सुव्रताः ॥७१॥ प्रियबुद्धिः प्रजायेत स्वभावादेव सर्वदा । यस्य विज्ञानिनस्तेषु प्रद्वेषोवापि जायते । उपेक्षा वा न सज्ञानी पशुर्विज्ञानवंचकः ॥ ७२ ॥ सर्वत्र नास्ति विद्वेषः साध्यसाधनपूर्वके । साक्षाद्विज्ञानिनो विप्रा उपेक्षाबुद्धिरेवहि ॥७३॥ तथाप्युक्तेषु सर्वेषु शैवेषु द्विज पुंगवाः । प्रियबुद्धिः स्वतोभाति बाधिताकाररूपतः ७४ सूतसंहिता यज्ञवैभव खंड अध्या० २ श्लोक ७४ ची टीकाः– तत्किं शिवपूजास्तुत्यादावपि विदुष उपेक्षैव । नह्युपेक्षेत्याह । तथापीति उक्तेषु भस्मावगुंठनरुद्राक्षधारणशिवपूजातन्मंत्रजपादिषु तत्प्रसादबलादेव लब्धविज्ञानस्याकृतघ्नस्य । तत्र कथंप्रिय बुद्धिर्नजायत इत्यर्थः। नहि शिवाद्वैतविज्ञानाविरोधः स्यात् द्वैतस्फुरणादितिचेत्तत्राह । बाधिताकारेति रज्जुरियं नायंसर्प इति रज्जुतत्वं साक्षात्कुर्वतं सर्पभ्रमनिवृत्तावपि संस्कारबलाद्दग्धपटन्यायेन बाधितसर्पावभानानुवृत्तिर्यथा तत्वावबोधं न प्रतिबध्नाति । एवं प्राक्तनसंस्कारबलादनुवर्तमानस्यापि शिवपूजादेः शिव साक्षात्कारं प्रति न प्रतिकूलतेत्यर्थः ॥ ७४ ॥ बाधिता कारतोवापि यस्य बुद्धिः स्वतोनहि । एष्वसौ नैव विज्ञानी भ्रांत एव न संशयः ॥ ७५ ॥ श्लोक ७५ टीकाः– शिव पूजादौ यस्य बाधिताकारानुवृत्तिस्तस्य विद्यांप्रति न केवलं न प्रातिकूल्यं प्रत्युताऽऽनुकूल्यमित्याह बाधिकारतोवापीति एषु शिवपूजादिषु ॥ ७५ ॥

ह्या सर्वांचा अभिप्राय असा आहे कीं, शिवकृष्णादि भगवद्विग्रहाचे ठायीं ज्ञानी पुरुषाला स्फुरण लीलारूप स्वभावानें प्रिय बुद्धिच होते, द्वेष किंवा उपेक्षा होत नाहीं; कारण ज्ञानियाला उपेक्षा तर संसाराचे ठिकाणींहि असते. द्वेष कोठेंच नसतो.

शिष्य उवाचः– भगवन् तामसवृत्तिपासून सुख दुःख होत नसल्यामुळें व सुखदुःख देणाऱ्या वृत्तीलाच प्रारब्ध उत्पन्न करीत असल्यामुळें सात्विक व राजसच, ज्ञानीपुरुषाचें ठिकाणीं, वृत्ति उत्पन्न होतात

तामस होत नाहींत कारण सत्व हा सुखदायक आणि रज हा दुःखदायक आहे असें विद्यारण्यस्वामी आपल्या जीवन्मुक्तिविवेकांत ह्मणतात. द्वेषहि दुःखदायक आहे ह्मणून तो ज्ञानीपुरुषाचें ठिकाणीं अवश्य उत्पन्न झाला पाहिजे.

प्रतिवादी उवाचः— आणि तामसवृत्ति ज्ञानियाला उत्पन्न होत नाहींत हें ह्मणणें तरी कोठें सम्यक् आहे. कारण निद्राही तामस असून ती ज्ञानियाचे ठिकाणीं उत्पन्न होत असते. ज्ञानियाला सुषुप्ति होत असते असे तातांचेहि ह्मणणें आहेच.

सिद्धान्ती उवाचः— प्रथम ज्यानीं विचारले त्याच्या प्रश्नाचें उत्तर प्रथम देऊन मागाहून ज्यानीं विचारले त्याच्या प्रश्नाचें उत्तर मागाहून देतो. कोणत्याही व्यर्थ वृत्तीचें नांव तमोवृत्ति आहे. रजोगुणाचें दुःखरूप कार्य रागानेंच होत असल्यामुळें व रागच भोगादिप्रयत्नांचा नियामक असल्यामुळें द्वेषाला अर्थातच व्यर्थवृत्तित्व आहे. पुनः भोगकालीं जरी रजोगुणादिवृत्ति ज्ञानियाला उत्पन्न होत असल्या तरी त्या चिरकालिक आसक्तिरूपानें उत्पन्न होत नाहींत; ह्मणूनच ज्ञानी पुरुषाला सर्वत्र उपेक्षा राहते व द्वेष कोठेंहि उत्पन्न होत नाहीं. आतां ज्ञानी पुरुषाला तामसवृत्ति निद्रा जशी उत्पन्न होते तसा द्वेषहि तामस असला तरी उत्पन्न व्हावा असें जे प्रतिवादीचें ह्मणणें तें असंगत आहे; कारण ज्ञानियाला सात्विकच निद्रा उत्पन्न होते, तामस होत नाहीं. वाचस्पतीनीं योगसूत्रावर टीका करताना जिच्यामध्यें वैकल्यादिक उत्पन्न होत नाहींत अशा लक्षणाची व सुखस्वरूपच मी झालों होतो अशा स्वरूपानें असणारी सात्विक निद्राच योगाचें साधन आहे असे सांगितले आहे, आणि सुश्रुतादि ग्रंथकारांनींहि सात्विकादि निद्रांचे भेद दाखविले आहेत. दृष्टदुःखनिवृत्ति न झालेल्या ज्ञानियाला कदाचित् तामस निद्रा येत असलीहि तथापि जीवन्मुक्तांना सात्विकच येते असा उदाहृत वचनाचाहि अभिप्राय सोपबृंहण निघूं शकतो. भावार्थ रामायणांत नाथ ह्मणतात " जागृतीं वासिष्ठाचें श्रवण। तेचि स्वप्नीं मनन। तेणें सुषुप्ति समाधान। हे अगाध ज्ञान वासिष्ठाचें ॥ ( बालकांड अ० ११ ओवी ३०४ )

भावार्थ रामायण.

मध्यस्थ उवाच:— तर मग ज्ञानी पुरुषाच्या निद्रेंत व समाधींत कांहीं भेद नाहींच ह्मणावयाचा ?

सिद्धान्ती उवाच:— आहे तर. नाहीं कसा. ज्ञानियाच्या सात्विक निद्रेंत वृत्तींचा लय होतो आणि समाधींत निरोध होतो.

शिष्य उवाच:— तात्पर्य आपलें ह्मणणें ज्ञानियांचे ठिकाणीं संसाराचाहि द्वेष रहात नाहीं तर उपेक्षा रहाते हे मला उत्तम कळलें.

श्रीगुरु उवाच:— तसेंच हेंहि कळूं दे कीं, ज्या परमेश्वराच्या प्रसादानें परम ज्ञान होतें त्या परमेश्वर विग्रहाचें ठिकाणीं संसाराप्रमाणें जर उपेक्षा होईल तर त्याला ज्ञानी ह्मणण्यापेक्षां कृतघ्न ह्मणण्यांत कोणता प्रत्यवाय आहे ? असें विद्यारण्यस्वामींचें टीकावचन वर आह्मीं दिलेंच आहे. आतां पुन:हि सूतसंहितेचाच अभिप्राय सांगतो. बाधिताकारवृत्तीनेंच परमेश्वरविग्रहाचें ठिकाणीं व तच्चिन्हादिकांचें ठिकाणीं ज्ञानी पुरुषाची स्वभावानेंच प्रियबुद्धि होते. ही बाधिताकारवृत्ति भजकाचीच समजावी; कारण उपासनाच भक्तिरूपानें परिवर्तित होते ह्मणून, भज्य तर अनध्यस्त विवर्त आहे. स्वामी विद्यारण्य बाधिताकारवृत्तीचा असा अर्थ करितात कीं, रज्जूवर भासलेला सर्प रज्जुज्ञानानें मिथ्या आहे असा कळला तरी सर्पाचा स्मृतीमध्यें येणारा आकार ज्याप्रमाणें बाधित असतो व तो ज्ञान हानि करीत नाहीं तद्वत् भगवद्विग्रहहि समजावा. हे विद्यारण्यस्वामींचें ह्मणणें सम्यक् नाहीं; कारण रज्जुसर्प अध्यस्त विवर्त आहे ह्मणजे तो रज्ज्वविच्छिन्नचैतन्याचे ठिकाणीं अध्यस्त आहे व त्याचें ज्ञान अंत:करणावच्छिन्नचैतन्याचे ठिकाणीं अध्यस्त आहे; तथापि सर्पाकार हा साक्षात् अविद्येचा परिणाम असून सर्पज्ञान अंत:करणोपष्टब्ध अविद्येचा परिणाम आहे. रज्ज्वविच्छिन्नचैतन्यज्ञानानें तुला-अविद्या निवृत्त झाली तरी भ्रमज-संस्कारग्राहकान्त:करणोपष्टब्ध-अविद्या-वृत्ति कांहीं काल विक्षेप इत्र राहत असल्यामुळें सर्पस्मृति होते. पुन: अध्यस्ताचें ठिकाणीं वस्तुत:च आदर उत्पन्न होणें दुर्घट असते. बहुजन्मसंस्कारानें तो आदर उत्पन्न होतो असे देखील ह्मणता येत नाहीं; कारण अनादि संसार संस्कार अनंत जन्माचा सर्वानुभूत असूनहि व प्रियबुद्धीनेंच त्याचे सेवन केले असूनहि ज्ञानानंतर त्याचें ठिकाणीं तात्काल अनादर उत्पन्न होतो, तसा भगवद्वि-

ग्रहाचे ठिकाणींहि झाला पाहिजे; यावर विद्यारण्यस्वामींचा भक्त कदाचित् असे ह्मणेल कीं, यद्यपि संसाराचें प्रियबुद्धीनें सेवन केले आहे तथापि ज्ञानापूर्वी कांहीं कालपर्यंत त्याचे ठायीं दोषदृष्टि केली आहे आणि भगवद्विग्रहाचें ठायीं प्रियदृष्टि केली आहे ह्मणून संसाराच्या ठिकाणचा अनादर ज्ञानापूर्वीच्या कांहीं जन्मापासून अभ्यस्त असून भगवद्विग्रहावरील आदरही तसाच ज्ञानापूर्वीच्या कांहीं जन्मापासून अभ्यस्त आहे ह्मणून संसाराचें ठिकाणीं ज्ञानानंतर अनादर व भगवद्विग्रहाचे ठिकाणीं आदर असा भेद अध्यस्त विवर्त असूनहि राहतो; तर हें ह्मणणें सम्यक् नाहीं. अध्यस्त विवर्त जर दोन्हींहि आहेत तर भगवद्विग्रहाचें ठिकाणीं ज्ञानापूर्वी आदराभ्यास तरी कशाला करावा लागतो ? वस्तु महात्म्य कांहीं विशेष आहे ह्मणून ह्मणेल तर तें वस्तुमहात्म्य काय अध्याससंपादित आहे कीं ब्रह्मसंपादित आहे ? आद्य पक्ष घटत नाहीं, कारण संसारहि अध्यास संपादित असल्यामुळें त्याचेहि ठिकाणीं भगवद्विग्रहस्थ सामर्थ्य-विशेष, समानत्वें करून असावयाला पाहिजे. अविद्या महिमा ह्मणेल तर सर्व अविद्या महिम्याची शोभा ज्ञानात् प्राक्च असते. ज्ञानानंतर असत नाहीं; आणि द्वितीय पक्ष अंगिकार करील तर आमचा अनध्यस्त विवर्त मानल्यावांचून त्याची उपपत्ति जुळत नाहीं. ह्मणून स्वामी विद्यारण्यानीं येथील टीकेंत बाधिताकारवृत्ति विषयीं रज्जुसर्पाचें उदाहरण न घेऊन स्वर्णालंकाराचे घेतले असते तर त्यांना आपल्या अंतःकरणांतील अभिप्राय सम्यक् व्यक्त करता आला असता; कारण स्वर्णालंकार स्वर्ण ज्ञानानें स्वर्ण भिन्न नाहीं असे कळूनहि स्वविशेषत्वानें अवशिष्ट असतो; ह्मणूनच तो अनध्यस्त विवर्त आहे, व तसा भगवद्विग्रहहि आहे. नाथांची स्वात्म सुखांत अशा अभिप्रायाची ओवी आहे. "ह्मणे म्यां सोनें पहावे दृष्टि । तरी पुढे ठेविजेल खोटी । परी खोटी वेगळी भेटी । काय सुवर्ण निढळे ॥ ८६ ॥ तैसी आत्म सिद्धि देऊनि भेटी । सर्व साधना तत्काळ खोटी तिये आत्म सिद्धिवरी उठी । सद्गुरु भजन ॥९६॥ स्वात्मसुख ॥ हें असो परंतु स्वामींचा येथें अपराध नाहीं; कारण सर्व प्राचीन वेदान्त्यानीं अनध्यस्त विवर्ताचा अंगिकार केला नसल्यामुळें, भक्तीची आवडी असूनहि तिचें शास्त्रीय स्वरूप त्यांना सम्यक् रीतीनें सांगतां आले नाहीं. ह्याला

हे स्वामीविद्यारण्यटीकेचें उदाहरणच सम्यक् आहे. या प्रमाणें ६९ पासून ७४ श्लोकांचा अभिप्राय आहे. आतां ती भक्ति लोकसंग्रहार्थ नाहीं, हें ७५ व्या श्लोकानें सूत सांगतात व त्याचा अभिप्राय मी यथामति स्पष्ट करितों. " लोकसंग्रहमेवापि संपश्यन् कर्तुमर्हसि " असें भगवंतांचें वचन आहे; व लोकसंग्रहाकरितां ज्ञानी कर्म करितात, हा त्याचा अभिप्राय आहे व तशी भक्तिहि लोकसंग्रहार्थ आहे, असें पूर्वपक्षानें प्राप्त झालें असतां, सिद्धान्त असा आहे कीं, भक्ति लोकसंग्रहार्थ संभवनीय नाहीं; कारण लोकांना मार्ग नियमपूर्वक साधनाचा दाखवावयाचा असतो. भक्तींतील वर्तन संगनिषेधपूर्वक उन्मत्ता प्रमाणें असतें, ह्याविषयीं या दोन सात्वतश्रुति प्रमाण आहेत. " श्रृण्वन् सुभद्राणि रथांगपाणेर्जन्मानि कर्माणि च यानि लोके । नामानि गीतानि तदर्थकानि गायन् विलज्जो विचरेदसंगः ॥ ३९ ॥ ह्या श्रुतीचा अभिप्राय असा आहे कीं, लोकांमध्यें प्रसिद्ध असलेलें भगवंतांचें जन्मकर्म तो ऐकून, असंग होत्साता, त्याचें गायन करितो. ह्यांत 'असंग' जो शब्द आहे, तो अर्थातच लोकसंग्रहनिषेधपर आहे; आणि त्या निषेधालाच पुष्टि देणारा "विलज्ज" असा शब्द आहे. आतां तो जरी ज्ञानानें अलिप्त असला, तरी लोकसंग्रह करतो म्हणून तो वस्तुतः असंग असतो; तस्मात् भक्ति ही लोकसंग्रहार्थच आहे, ह्या शंकेचें निराकरण पुढील श्रुति करिते "एवंव्रतः स्वप्रियनामकीर्त्या जातानुरागो द्रुतचित्त उच्चैः । हसत्यथो रोदिति रौति गायत्युन्मादवन्नृत्यति लोकबाह्यः ॥" ( भागवतस्कंध ११ अ० २ श्लो० ४० ) श्रुत्यर्थः– एवं पूर्वश्लोकांत सांगितल्याप्रमाणें, श्रवणकीर्तनादि आहे व्रत ज्यांचें, अशा ह्या महात्म्यांचें चित्त द्रवीभूत झालेलें असतें. द्रवीभूत झालेल्या चित्ताचें कार्य भावी प्रयोजन स्मरून होत नसतें.

प्रतिवादी उवाचः–शोक करणारा पुरुष, आपली भावी हानि समजूनच, किंवा आपल्याला भावी लाभ होणार नाहीं असें समजूनच, शोक करितो हें दिसतें, त्या प्रमाणें द्रवीभूत झालेल्या चित्ताचें कार्यहि, भावी प्रयोजन स्मरूनच होत असतें, असें म्हणण्याला प्रत्यवाय नाहीं.

सिद्धान्ती उवाचः–अवश्य प्रत्यवाय आहे; कारण शोक करणाऱ्या पुरुषाला यद्यपि भावी लाभाविषयीं स्मृति असते, तथापि वर्तमान

हानिसंस्कारानेंच त्याचें चित्त द्रवीभूत झालेलें असतें आणि शोक करणाऱ्या पुरुषाचे हानिलाभ त्याचे स्वार्थानुसारें निश्चित असतात, तसा स्वार्थ ब्रह्मवेत्त्याला नसतो; म्हणून त्याचे ठिकाणीं तुझ्या म्हणण्याप्रमाणें द्रुतचित्तत्व संभवणार नाहीं.

मध्यस्थ उवाचः– कां, ज्ञानियाचेंहि चित्त लोकदयेनें द्रवीभूत होऊं शकेल.

सिद्धान्ती उवाचः– मुनिमहात्म्यांनीं केलेला निषेध व युक्ति, ह्यावरून लोकदयेनें ज्ञानियांचें चित्त द्रवीभूत होणें संभवनीय नाहीं. "लोकहानौ चिंता न कार्या निवेदितात्मलोकवेदत्वात्" ( नारदसूत्र ) असें यांचें सूत्र असून, आत्मा, लोक व वेद भगवदर्पण केले असल्यामुळें, महात्म्यांनीं लोकांच्या हानीची चिंता करूं नये असा त्याचा अर्थ आहे; व एतदानुसारीच " शांति क्षमा दया। त्याहि नका पंढरिराया " असें साधूवर्यांचे वचन आहे. पुनः ब्रह्मवेत्त्याला बुडणें व तरणें मिथ्या वाटत असल्यामुळें व स्वप्रयत्नावांचून आत्मज्ञान होणें शक्य नाहीं म्हणून, अधिकारानुसार उपदेश मात्र झाल्यास करावा, इतकें तो पूर्ण जाणत असल्यामुळें, ब्रह्मवेत्त्याचें चित्त लोकदयेनें द्रवीभूत होणें संभवनीयच नाहीं, असें सर्वतंत्रस्वतंत्र श्रीभगवत्पूज्यपादाचार्यांनींहि, आपल्या सोपानपंचकाच्या ४ थ्या श्लोकांत, "औदासीन्यमभीप्स्यतां जनकृपानैष्ठुर्यमुत्सृज्यताम्" असें स्पष्ट सांगितलें आहे.

प्रतिवादी उवाचः–तुमच्या म्हणण्याप्रमाणें, दयेचा संताचे ठिकाणीं ओलावा नसतो, असें सिद्ध होत आहे; परंतु "काय वाणूं आतां न पुरे हे वाणी। मस्तक चरणीं ठेवितसें ॥१॥ थोरिव सांडिली आपुली परिसें। नेणे शिवों कैसें लोखंडासी ॥२॥ जगाच्या कल्याणा संताच्या विभूति। देह कष्टविती उपकारें ॥ ३ ॥ भूतांची दया हें भांडवल संतां। आपुली ममता नाहीं देहीं ॥ ४ ॥ तुका म्हणे सुख पराचिया सुखें। अमृत हें मुखें स्रवतसे ॥ ५ ॥ इत्यादि वचनें आहेतच त्याची काय वाट ?

सिद्धान्ती उवाचः– भलतेंच समजलास. संतांनां दया नसते असें आम्हीं म्हणत नाहीं. त्यांच्या ज्ञानोत्तरभक्तीविषयीं मात्र लोकदया नियामक नाहीं, एवढेंच आम्हीं येथें म्हणत आहों. पुनः भक्त तीन

प्रकारचे सांगितले आहेत. त्यांत उत्तम भक्त तर, "सर्वभूतेषु यः पश्येत् भगवद्भावमात्मनः। भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः॥" ह्या श्लोकानें सर्वविकाररहित, असे सांगितले आहेत; आणि "ईश्वरे तदधीनेषु बालिशेषु द्विषत्सु च। प्रेममैत्रीकृपोपेक्षा यः करोति स मध्यमः" या श्लोकानें मध्यम भक्त सांगितले आहेत. ज्याची ज्ञानापूर्वी मध्यम भक्ति झाली आहे, तोच स्वरसतः ज्ञानानंतर दयावान् असतो, परंतु जो उत्तम भक्त असतो त्याला ज्ञानानंतर विधीनें दया राहात नाहीं; आणि असली तर तिचा निषेध होत नाहीं, पण भक्ति मात्र ज्ञानियाची लोकसंग्रहासाठीं नसून, अत्यंत प्रेमरूप स्वतःसिद्ध असते व तीमुळेंच तो महात्मा आपल्या प्रियकराच्या कीर्तीचें निर्लज्ज होऊन मोठ्यानें गान करितो. केव्हां हा कोणाला जिंकला जात नसूनहि, मी जिंकलें आहे असें मानून हांसतो; केव्हां माझी इतका वेळ पर्यंत कां उपेक्षा केली, असें मानून रडतो; केव्हां आपल्या आनंदांत गुंजारव करितो; हें सर्व, तो, असें भक्तांनीं वागावें, असें लोकांकरितां करून दाखवीत असेल, ह्या शंकेचें निराकरण करण्याकरितां श्रुतींत "उन्मादवत्" शब्द आला आहे. श्रीधरांनीं "किं दांभिकवत्" अशी उत्थाप्य शंका करून "न उन्मादवत्" असें तिचें उत्तर दिलें आहे. अर्थातच आपले मनांत नसून, लोकांकरितां करून दाखविणें, तो दंभ होय. तसें तो करून दाखवीत नाहीं. यद्यपि लोकसंग्रहाविषयीं "अंतस्त्यागी बहिः संगी लोके विहर राघव" असें स्मृतिवचन आहे, तरी तें भक्त[illegible]विषयीं लावतां येईल, असा प्रश्न संभवनीय आहे, तथापि ज्ञानियाला व्यवहार करणें असल्यास, लोकसंग्रहार्थ करावा, एवढाच त्या वचनाचा अभिप्राय आहे. भक्तीशीं त्या वचनाचा कांहीं संबंध नाहीं; व या शंकेचें निराकरण करण्याकरितांच "लोकबाह्य" असें श्रुतींत पद आहे. पुनः केवळ लोकसंग्रहार्थच जर ज्ञानोत्तर भक्ति मानली, तर ती आदरपूर्वक होणार नाहीं व आदरपूर्वक न झाल्यामुळें ज्ञानियाला भक्तिरसानुभव होणार नाहीं. किंबहुना लोकासाठीं भक्ति दाखविणाऱ्या या ज्ञान्याला, ज्ञानापूर्वी अभ्यास केलेल्या सत्यादिकांचा देखील बळेंकरून लोप करावा लागेल; कारण, भक्ती मधील रोमांच, अश्रुपात ज्ञानियाला [illegible]वास्तव उत्पन्न होणार नाहींत व लोकसंग्रहास्तव ते करून

दाखवावे लागतील. म्हणजे वेदान्तशास्त्रानंतर कुट्टिणीमतकाव्याचा अवश्य अभ्यास करावा लागेल. तात्पर्य, विद्याविरोधाभावास्तव, पृथगिव आनंद प्रतीतिरूप भजकप्रीतिवृत्तिधारा, भज्यअनध्यस्तविवर्तनंदनंदनचरणालिंग संतत करिते, तें लोकसंग्रहासाठीं नसून, स्वतःसाठींच असतें. परंतु भोजन करीत आहें हा अनुभव जसा लोकांनां सांगतां येतो, तसा तृप्तीचा अनुभव लोकांनां सांगतां येत नाहीं. कारण वर्तमानकाळीं सुख अनिर्वाच्य असल्यामुळें, अव्यवहित भावी सुखच अस्पष्ट शब्दानें किंचित् वर्णितां येतें; तद्वत् भगवत्प्रेमसुखाचा अनुभव नित्य वर्तमान असल्यामुळे भाविताभावास्तव ही भक्ति माझ्या साठीं आहे, असा अहंतापूर्वक अनुभव स्पष्ट कळत नाहीं. याप्रमाणें थोडक्यांत हा प्रमाणसंग्रह सांगितला. आणखी इतर प्रमाणें पुष्कळ असून, तीं बहुत ग्रंथांचें ठायीं मी दर्शविली आहेत व दर्शविणारहि आहें; म्हणून असीमसौंदर्य परमेश्वराचे ठिकाणी ज्ञानोत्तरभक्ति संभवते हें सिद्ध झालें.

ओव्या:— जी अव्यक्त ब्रह्मानंदगरिमा । अभिव्यक्तौ ती सौंदर्य सीमा । व्यापक यदीय महिमा । न वर्णवे कीरु ॥ ८ ॥ सौंदर्याचीं वेधें । वादी अभिभविले वादें । तन्मतें करोनी विशदें । स्वमतहि सांगूं ॥ ९ जेणें होय चित्ताकर्षण । तेंचि सौंदर्याचें लक्षण । सर्वमान्य तदपि का म्हणोन । विवाद जाण ये विषयीं ॥ १० ॥ स्थूलवादियांचें मत । सृष्टिस्वभाव सौंदर्यार्थ । पाहतां आनंद वाटत । म्हणोनियां ॥ ११ तरी एकाचि पदार्थाचा । स्वभाव प्रिय नव्हे साचा । तेथ द्वेष्य उपेक्ष्याचा । सांपडे ठावो ॥ १२ ॥ अग्नि प्रिय शीतकाळीं । आणि तोचि द्वेष्य उष्णकाळीं । दूर देखतां पर्वत जाळी । उपेक्ष्य होय ॥ १३ स्त्री पतीतें सुखदायिनी । सपत्नीतें दुःखकारिणी । निर्विण्णा उपेक्ष्य स्थानीं । प्रतीत होय ॥ १४ ॥ कनकाचा उपयोग जया । प्रिय वाटे तया । लाधलिया चोरभया । द्वेष्य होय ॥ १५ ॥ इतर दीना उपेक्ष्य होत । एवं उदाहरणें अनंत । म्हणोनी सृष्टिस्वभावगत । सौंदर्य नोहे ॥ १६ आणिक कोणाचें मत । स्वार्थ उपजे जेथ जेथ । सौंदर्य असें तेथ उपयोग होत आपणा ज्याचा ॥ १७ ॥ तरी विरक्तांचें वर्णन । भूतदयेचें निरूपण । केलिया काव्यांतून । ते सुंदर न वाटावें ॥ १८

स्वार्थाचिया चित्तीं । कोठुनी भूतदया विरक्ति । म्हणोनी कार्ये कराकीं लागतील पुढती । दयावैराग्यवर्जित ॥ १९ ॥ कराव्या लागतील भांडार-मूर्ति । रेखावे लागतील खडावे भिंती। अथवा पुष्पाचें चूर्ण निश्चितीं । करोनी दावावें लागेल ॥ २० ॥ भलतेंच भलतें काहीं । करावें लागेल भलतेठायीं । जरी स्वार्थतेच्या पायीं । सौंदर्य लागे ॥ २१ ॥ कोणाचें मत आणिक । सृष्टिस्वभाव प्रतीक । सौंदर्यरूप अधिक । उपजे सुख म्हणोनी ॥ २२ ॥ वाघ पाहतां भय वाटे । तच्चित्र पाहतां सौख्य दाटे। म्हणोनी सृष्टिप्रतीकीं गोमटें । सौंदर्य वसे ॥ २३॥ तरी पूर्णस्वभावीं सौंदर्य नाहीं । आभासीं तें म्हणतां पाहीं । आली सौंदर्याच्या ठायीं । आभासमात्रता ॥ २४ ॥ आभासाचा सत्यगुण । तया नांव सौंदर्य जाण तरी सत्याचें असत्य अधिष्ठान । न वा दृष्ट न वा श्रुत ॥ २५ ॥ सत्यांत जो नाहीं गुण । तो आभासीं यावा काय म्हणोन । आणि आभासीं नसेल मूळ द्रव्यगुण । तरी तो होय मनोमात्र ॥ २६ ॥ एवं सौंदर्य होतां मनोमात्रक । तरी वृथा होय सृष्टिप्रतीक । आणि वासनाहि देख । अधिक वाढे ॥ २७ ॥ भातुकें देतां बाळकासी । वासना धांवे त्याचि रसीं। तेविं मन गुंतवितां पदार्थाभासीं। पदार्थ विषीं वासना वाढे ॥२८॥ वासना वाढतां चंचल मन। चंचलत्वें चिंता गहन। चिंतायोगें समाधान । नाहीं हें आण वाहोनि सांगों ॥ २९ ॥ समाधानाविण सुंदरता । तरी जगीं नसावी तिरस्कार्यता । तिरस्कार्यता सुंदरता। अत्यंत विरोधी ॥३०॥ यालागीं सौंदर्य काय । त्याची सूज्ञ परिसोत सोय । चिंतोनियां सद्गुरुपाय निरूपित आहे यथामति ॥ ३१ ॥ चित्त एकाग्र होवोनी । सुख होय जया स्थानीं । सुंदरता तयालागुनी। बोलिजे कीरू ॥ ३२ ॥ गौण मुख्य भेदेंकरून । तिचेहि असती प्रकार दोन । यावत्काल ती बोलिजे गौण । नित्यप्रधान ओळखा ॥ ३३ ॥ एक वेळ पदार्थ सुंदर वाटे। अतिपरिचयें नावडे नेटें । स्वार्थियाचें सौंदर्य गोमटें । एवढेंचि कीं ॥ ३४ ॥ तोचि तोचि करितां आहार । न वाटे नित्य रुचिकर । आनंद वाटे जो जन्मतां पुत्र । तो मरणवरि घरीं बैसतां सुंदर न वाटे ॥ ३५ ॥ मित्र बसेल घरींच येवोन । तरी जाय भेटीचें सुंदरपण । वारंवार एक सुमन । सेवणें घ्राण योग्य न म्हणे ॥ ३६ ॥ म्हणोनी हें सुंदरपण। उपजे निमे क्षणक्षण

पूज्यबुद्धीची सुंदरता गहन । याहोनि टिके बहुकाळ ॥ ३७ ॥ मातृसेवका आपुली माता । आवडे वारंवार भेटतां । जी कां साध्वी पतिव्रता । तिते पति नित्य भेटतां सुंदर सुख ॥ ३८॥ नित्य भेटतां श्रीगुरुमूर्ति । सुंदर सौख्य शिष्यांप्रती । यांत जें वैचित्र्य निश्चितीं । तेंहि चिदाभिव्यक्त्येकभूत ॥ ३९॥ सौंदर्याची उत्पत्ति । मुख्य ब्रह्मणोऽभिव्यक्ति । सच्चिदानंदपणें प्रतीति । यति घेती जयाची ॥ ४० ॥ सदभिव्यक्ति द्रव्यपण । चिदभिव्यक्ति शक्तिस्वभावादि गुण । आनंदाभिव्यक्ति सुंदरपण । ओळखा खूण अंतरीं ॥ ४१ ॥ असो ही एक प्रक्रिया । दुसरीहि ऐकावया । मनस्थानीं श्रवणाचिया । आणिजे श्रोतीं ॥ ४२ ॥ अस्ति भाति प्रिय सम्यक । नाम रूप हें अंशपंचक । पहिले तीन ब्रह्म देख । दुसरे दोन प्रकृति ॥ ४३ ॥ प्रकृतिस्थ सत्वगुणें । ब्रह्माभिव्यक्ति होणें । मनाचेनि एकाग्रपणें । सहायता कीजे ॥ ४४ ॥ तेथ सात्विकरूपाश्रयें करून । एकाग्र होवोनि मन । अभिव्यक्त होय ब्रह्मप्रियत्वगुण । सौंदर्य तें ॥ ४५ ॥ पूज्याचिया ठायीं । हेचि अभिव्यक्ति होय पाहीं । म्हणोनी सुंदरता लवलाहीं । अधिक वाटे ॥ ४६ ॥ तेथचि मातृपितृपत्यादिक । संबंध जडतां सौंदर्य अधिक । मग जो स्वयें व्यक्त जगन्नायक । अनध्यस्तविवर्त तो सुंदर न कां ॥ ४७॥ व्यतिरेकीं व्यष्टिमुख । अन्वयें तें व्यापक । रसपुष्टया तें व्यक्त ब्रह्मसम्यक् । होतां सुंदर नोहे कां ॥ ४८ ॥ म्हणोनी सौंदर्याची सीमा । अनध्यस्तविवर्तहरिपादमहिमा । यालागीं तेथचि प्रेमा । आमुचा असो ॥ ४९॥ हा भावनासौंदर्यवाद । त्रिपुरारहस्यीं बोलिला विशद । तंव शिष्य म्हणे येणें बोध । दृष्टिसृष्टीचा जाहला ॥ ५० ॥ दृष्टिसृष्टींत सौंदर्य येतां । तरी प्रातिभासिक त्याची सत्ता । मग भगवद्रूपहि तत्वतां । प्रातिभासिकचि ॥ ५१॥ श्रीगुरु म्हणती ऐक । इतर सौंदर्य होकां प्रातिभासिक । मायाउपाधीनें धरिलें देख । म्हणोनी व्यावहारिक जाहले ॥ ५२ ॥ परी ज्ञानें तें नाशे । भगवत्सौंदर्य ज्ञानें न नाशे । यालागीं अनध्यस्तविवर्त असे । ऐसेंचि म्हणो ॥ ५३ ॥ अविद्योपाधिप्रतिबिंब जीव । बिंबभूत वासुदेव । शुद्धात्मा स्वरूपीं पृथगिव । आनंदाभिव्यक्ति सशरीर तो ॥ ५४॥ तें सशरीरपण । विवर्त परी न निवर्ते ज्ञानेंकरून । यालागीं अनध्यस्तलक्षण । म्हणें मी तया ॥ ५५ ॥ तें भिन्न इव शुद्धाभिन्न । नव्हे पृथक् सत्य द्वैतकारण ।

असत् नोहे तुच्छ म्हणोन । मदसन्नोहे विरोधास्तव ॥ ५६ ॥ अनिर्वच-नीय म्हणतां । तरी मायाकार्य होईल तत्वतां । आणि मायाकार्य सर्वथा । ज्ञानें नाशे ॥ ५७ ॥ ईश्वरासी नित्य ब्रह्मज्ञान । मग तें मायाकार्य शरीरचि न व्हावें उत्पन्न । आणि श्रुति स्मृति पुराण । सांगती अवतारदेह ॥५८॥ जीवाचिया कर्मेंकरून । जरी घडे नित्यज्ञानी ईश्वरा देहधरण । तरी जीवाचिया अज्ञानेंकरून । ईश्वर अज्ञान कां न होय ॥ ५९ ॥ दुसऱ्या ज्ञानिया परकर्मेंकरून । जरी होय देहधारण । तरी मुक्तजीवा स्वकर्में-करून । पुनर्जनन नसे कां ॥ ६० ॥ चूर्णिका—मुक्तिद नसेल नित्यज्ञान । तरी अनित्यज्ञाना सामर्थ्य कवण । म्हणाल दयेनें देव करी देहग्रहण । तरी दयेस पाहिजे अंतःकरण । आणि अंतःकरणकार्य प्रकृतीचें वा भूतांचें? ॥६१॥ भूताचें ऐसें सांख्य वेदान्त म्हणती । आणि कार्योपाधिरयं जीव इति । म्हणोनि बोलताहे श्रुति । कार्यता अंतःकरणाप्रति । तरी तदुपहित ईश्वरास येईल जीवत्व ॥ ६२ ॥ अथवा मायाचि धरी शरीर । तरी कारणावस्थेंत माया नसे गोचर । माया कार्यावस्थाशरीर । तरी पूर्वोक्त दोष घडे ॥६३॥ कार्योपाधिस्थ असोनी ब्रह्मविदपण । म्हणाल अवतारलक्षण । तरी मुक्त अवतार होतील अभिन्न । आणि दोहोंचा भेद शास्त्र सांगे ॥ ६४ ॥ "यं सर्वे देवा नमंति मुमुक्षवो ब्रह्मवादिनश्च" इति श्रुति । "इमं विव-स्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम्" इत्यादि जागृच्छ्रुति । "अनेनैवदेहेन इत्यादि तट्टीकोक्ति । "आत्मारामाश्च मुनयो निर्ग्रंथा अप्युरुक्रमे । कुर्वंत्य-हैतुकीं भक्तिमित्थंभूतगुणोहरि"रित्यादिभागवतोक्ति । तैशा बहुधा स्मृति । "विवक्षितगुणोपपत्तेश्च" इत्यादिसूत्रसंमति । "मुक्ता अपि लीलया विग्रहं कृत्वा भजंते" । "सत्यपि भेदापगमे नाथ तवाहमित्यादि वदली आचार्यभारती । "तरी ऐकेंगा रघुनाथा । तुम्हा अवताराची सत्ता । न ये जीवांचिये हाता । जरी यथार्थता मुक्त जाहला ॥" ऐसें भावार्थरामा-यणीं नाथ बोलती । ऐसे काय तुम्ही झाले रे जाणते । देवाहि परते तुका म्हणे॥" हें तुकाराम वचन आणि ऐशाचि बहु साधुउक्ति । भेद सांगती मुक्तअवतारांचा ॥ १ ॥ आतां आपुलिया बळें करून । देव कारणमाया गोचर करी शरीर घेऊन । तरी भावपदार्थस्वभाव अन्यथा-

करण । शक्ति मानावी लागेल ईश्वरा कारण । मग शरीरचि धरी ब्रह्म आपण । म्हणावया कवण ये बाधूं ॥ २ ॥ म्हणोनी आपुला नाश करावा ईश्वरें । तरी ही शंका घेणें मात्र नव्हे बरें । पाहिल्यावांचोनी न निपजे कर्म खरें । आणि आपला नाश आपण पहावा ऐसें धरितांचि नये अंतरें। जें न ये चित्तीं तें न ये संशयप्रांतीं । द्विकोटिक संशयस्थीति । आणि येथ तंव कोटीचि नास्ति । यालागीं आमुची योग्य उक्ति । आणि तुझी शंका परममिथ्या ॥

पूर्वपक्ष उवाचः- अहो ! एक शंका मिथ्या झाली । म्हणोनि काय बुद्धिचि मेली । मायाकार्य भगवत्तनू वहिली । परप्रारब्धें घटों शके ॥ ६९ ॥ मत्रेः- ही शंका योग्य नाहीं; कारण अत्यंत परप्रारब्धानें निर्मित पदार्थ अत्यंत भोग्यरूप असतात. जगांत दोन प्रकारचे भोग्य पदार्थ आहेत. एक अर्धसम भोग्यरूप आणि दुसरें अत्यंत भोग्यरूप. सचेतन पदार्थ आहेत ते अर्धसमभोग्यरूप असून, अचेतन आहेत ते अत्यंत भोग्यरूप आहेत.

शिष्य उवाचः- महाराज ? आपल्या म्हणण्याचा अर्थ नीट समजला नाहीं.

श्रीगुरुउवाचः-अरे थोडासा धीर धर. तुला मी अर्थ समजून सांगतोंच आहें. पण प्रतिवादीची बुद्धि समजण्याला किती पात्र आहे तें तरी पाहूं दे.

प्रतिवादी उवाचः- अर्धसमभोग्यरूप व अत्यंतभोग्यरूप हे पदार्थांचे दोन भेद मी नवीनच ऐकत असल्यामुळें माझीहि बुद्धि आपल्या शिष्याप्रमाणेंच झाली आहे.

शिद्धान्ती उवाचः- असें असेल तर स्पष्टीकरण सांगतों तें ध्यानांत धरा. पित्याला पुत्र, पतिला स्त्री, वत्साला गाय व पुरुषाला पशु इत्यादि पदार्थ अर्धसमभोग्य आहेत. म्हणजे या भोग्यरूप पदार्थांनीं भोक्ताही भोग्य आहे. ज्याप्रमाणें पित्याला पुत्र स्वपादसेवादिसाधनत्वेंकरून भोग्य आहे तसा पुत्रालाही पिता बाल्यलालनादि साधनत्वेंकरून भोग्य आहे. पतिला स्त्री ज्याप्रमाणें सुरतसाधनादिकत्वेंकरून भोग्य आहे, त्याप्रमाणें स्त्रीला पतिहि सुरतसाधनादिकत्वास्तवच भोग्य आहे; वत्साला धेनु

ज्याप्रमाणें दुग्धपानादि, साधनत्वेंकरून भोग्य आहे, त्याप्रमाणें धेनूलाही वत्स, पुत्रमोहविश्रामादि साधनत्वें करून भोग्य आहे; याप्रमाणें पुरुषांनाहि पशू क्षेत्रकर्षणादिसाधनत्वेंकरून भोग्य आहेत, तद्वत् पशूनांहि पुरुष तृणजलप्रदानादिसाधनत्वेंकरून भोग्य आहे; म्हणजे ह्या पदार्थांचे ठायीं भोग्यरूपता व भोक्तृरूपता, अर्धसमत्वेंकरून सिद्ध आहे, तशी अचेतन पदार्थांचे ठायीं नाहीं; म्हणजे, भात, पोळी, वरण, भाजी जसे मनुष्याला भोग्य आहेत, तसें भात, पोळी, वरण, भाजीनां मनुष्य भोग्य नाहीं.

मध्यस्थ उवाचः– आपल्या म्हणण्यानें प्रतिवादीचें समाधान झालेलें दिसत नाहीं.

शिष्य उवाचः– महाराज! माझेंहि समाधान झालें नाहीं, कारण, क्षेत्रामध्यें बीजारोपण केलें असतां, तृणनिःसारादिसाधनत्वेंकरून, आणि वाटिकामध्यें जलप्रदानादिसाधनत्वेंकरून, अन्नकारण वनस्पतींनां किंवा पुष्पकारणवनस्पतींनां, पुरुषही भोग्य आहेत, असे म्हणतां येते.

सिद्धान्ती उवाचः– उत्तर देण्यास मी चुकलों नसून, तुम्हांला समजावें इतक्या स्पष्ट रीतीनें मला सांगतां आलें नाहीं, हें खरें; परंतु, थोडासा विचार केल्यास माझ्या वाक्यांतच तुमच्या प्रश्नाचें उत्तर आहे. अन्नकारणवनस्पतींनां व पुष्पकारणवनस्पतींनां पुरुष भोग्य असो, परंतु, अन्नाला व पुष्पानां तो भोग्य नाहीं, असा माझ्या वाक्याचा अर्थ समजावा; किंवा हें समजलेंच नसेल तर आंथरूण, पात्र, घर इत्यादि उपयोगी पदार्थ पुरुषाला भोग्यरूप असून, या पदार्थांनां पुरुष भोग्यरूप नाहीं, हें उदाहरण स्पष्ट आहे.

मध्यस्थ उवाचः– पण ह्या तुमच्या विवेचनाचा प्रतिवादींनीं आपल्या प्रकृत विषयाशीं संबंध कसा घटवावा ?

सिद्धान्ती उवाचः– तेंच मी आतां सांगत आहें. ह्या माझ्या सर्व विवेचनाचा आशय असा कीं, जे पदार्थ अर्धसम भोग्यरूप आहेत, ते परस्पर प्रारब्धानीं निर्मित असून, जे पदार्थ अत्यंत भोग्यरूप आहेत, ते केवळ भोक्तृप्रारब्धानेंच निर्मित आहेत; व ह्मणूनच ते अचेतन आहेत. म्हणून पतीच्या प्रारब्धानें जशी स्त्री निर्मित आहे, तसा स्त्रीच्या प्रार-

ब्धानें पातेहि निर्मित आहे; पण पुरुषाच्या प्रारब्धानें जसें पात्र व घर निर्मित आहे, तसें, पात्राच्या व घराच्या प्रारब्धानें पुरुष निर्मित नाहीं.

शिष्य उवाचः— भगवन् मी आपला अभिप्राय संपूर्ण समजलों. परमेश्वराला स्वतःचें प्रारब्ध नसल्यामुळें, परप्रारब्धापेक्षां त्याचें शरीर, अत्यंत भोग्यरूपत्वास्तव, पाषाणादिकांप्रमाणें जड झालें पाहिजे; तसें नाहीं म्हणून, भगवच्छरीर परप्रारब्धजन्य नाहीं हाच कीं नाहीं ?

श्रीगुरु उवाचः— सम्यक् समजलास; असाच माझ्या म्हणण्याचा अभिप्राय आहे.

मध्यस्थ उवाचः— अहो पण पाषाणादिकांतहि चैतन्य आहे, या विषयीं योगवासिष्ठादि ग्रंथ प्रमाण आहेत ना ?

सिद्धान्ती उवाचः— त्याविषयीं वेदान्तांत दोन मतें आहेत. चित्रपटांतील मनुष्याला ज्याप्रमाणें पटाभास असून, चित्रपटांतील स्थावरांनां ते नाहींत, त्याप्रमाणें, ज्यांनां अंतःकरण आहे, त्यानांच फक्त चिदाभास असून, ज्यांनां अंतःकरण नाहीं, त्यांनां चिदाभास नाहीं. हा चिदाभासच भोक्ता असल्यामुळें, साक्षिचैतन्य जरी पाषाणादिकांस आश्रय आहे, तरी त्याला अलिप्तत्वास्तव भोग होत नाहींत. कारण भोक्ता चिदाभास आहे, असें विद्यारण्यस्वामींनीं आपल्या चित्रदीपांत म्हटलें आहे, हें एक-मत; व स्थावरांनांहि जीव असल्यामुळें, घ्राणमुखादि निरुद्ध प्राण्या-प्रमाणें चहुंकडून कोंचबल्यामुळें, त्याला दुःखभोग होऊं शकतात, असें दुसरें मत आहे. पहिल्या मताला अनुसरून मी उत्तर दिलें आहे; पण दुसऱ्या मताप्रमाणें परप्रारब्धजन्य भगवच्छरीर मानलें तरी, तें पाषाणा-प्रमाणें जड होऊन त्यापासून दुसऱ्याला जरी सुख होत असलें, तरी भगवंताला दुःखच होत असलें पाहिजे.

शिष्य उवाचः— महाराज ! परमेश्वर आप्तकाम असल्यामुळें, त्याला दुःखाचा स्पर्श होणें शक्य नाहीं.

श्रीगुरु उवाचः— तर मग, भगवच्छरीरामध्यें चेतनाविर्भावच नाहीं असें म्हणून, पहिल्या पक्षाप्रमाणेंच, जड व अत्यंत भोग्यरूप पर-मेश्वरशरीर आहे, असें मान.

मध्यस्थ उवाचः— दयेनें परमेश्वर त्या शरीरांत प्रवेश करितो,

असें ह्मणतां येतें.

सिद्धान्ती उवाचः– प्रवेश करितो म्हणजे काय ? स्वयं प्रवेश करितो, कीं अनुप्रवेश करितो ? स्वयं प्रवेश तर, त्याचा अंतर्यामित्वें-करून, चराचर पदार्थांचे ठिकाणीं सिद्ध आहे. त्यामुळें, वृक्षपाषाणादि-कहि भगवच्छरीरेंच होतील. अनुप्रवेश तर, जीवाचा असतो. तो स्वीका-रल्यास परमेश्वर जीव होईल. अथवा, जर अनुप्रवेशाची प्रवृत्ति परमे-श्वराचे ठिकाणीं मानीत आहां, तर दयेनेंच परमात्मा शरीर घेतो असेंही माना. परप्रारब्धाला भगवच्छरीर कारण मानण्यांत गौरव आहे.

मध्यस्थ उवाचः– प्रतिवादिन्, तुम्हीं आपला पक्ष मात्र आतां सोडून दिला पाहिजे; कारण, मला तर बुवा कांहीं येथें शंका वाटत नाहीं.

प्रतिवादी उवाचः– अहो, पण सिद्धान्तीनें केलेल्या विवेचनांत, सचेतन पदार्थ परप्रारब्धजन्य नसतात, असा जो सिद्धान्त आला आहे, तोच मला आधीं मान्य नाहीं. कारण, " संकल्पादेवास्य पितरः समु-त्तिष्ठंति " ॥ ( छांदोग्य ) इत्यादि श्रुति, पुण्यसमुच्चित उपासक ब्रह्म-लोकीं गेल्यावर, संकल्पानेंच पिता, माता, आदि सर्व सचेतन अचेतन पदार्थ उत्पन्न करितो, अशी श्रुति आहे; आणि स्वप्नांत तसें जीव करीत असतो, हा अनुभवहि आहे; एवढ्याकरितां, भगवच्छरीर परप्रारब्धजन्य किंवा भक्तेच्छाजन्य होऊं शकतें, असें माझें म्हणणें आहे.

सिद्धान्ती उवाचः– प्रतिवादिन्, ह्या शंकेनें, तूं आपल्या शांकर-भाष्यवाचनाविषयींचें अज्ञान मात्र प्रगट केलें आहेस. तथापि उत्तर श्रवण कर. ब्रह्मलोकामध्यें, दुसऱ्या कांहीं जीवांनां भोग्य करून, तो ब्रह्म लोकस्थ मुक्त पुरुष अर्धसमभोग्य पदार्थ निर्माण करीत असतो, असें वृथा शंका करणाऱ्या तुला, वृथा युक्ति उभारून, उत्तर देतां येतें. उद्धृत केलेल्या श्रुतीची तर, सूत्रकार आणि भाष्यकार, उत्तर मीमांसेच्या, चौथ्या अध्यायाच्या, चौथ्या पादांत, अशी व्यवस्था करितात कीं, ब्रह्म-लोकस्थ मुक्त जे, जे सचेतन भोग्य पदार्थ निर्माण करितो, त्या सर्वांत [illegible] प्रवेश करून, आपलें ऐश्वर्य आपण भोगतो. हें महत्पुण्यफल आहे, परंतु त्याला जगद्व्यापार करण्याचें सामर्थ्य मात्र येत नाहीं.

मध्यस्थ उवाचः— आणि प्रतिवादीनीं सांगितलेल्या स्वप्नयुक्तीचीहि व्यवस्था, जीवाभासदृष्टीनें लागूं शकते.

प्रतिवादी उवाचः— म्हणून काय होतें ? सचेतन शरीर तर स्वप्नामध्यें अन्यजीवाभासासहित पुरुष निर्माण करूं शकतो, त्याप्रमाणेंच भगवच्छरीरहि निर्माण करूं शकतो.

सिद्धान्ती उवाचः— पूर्वी जसें भाष्याचें अज्ञान प्रगट झालें होतें, तसें आतां विवरणादि आलोचनाचें अज्ञान प्रगट होत आहे. आणि तात्पर्यनिर्णायक बुद्धीचा अभावहि प्रगट होत आहे. प्रतिवादिन् , स्वप्नाध्यासाला जीवचैतन्य अधिष्ठान आहे, असें एकमत आहे; आणि ब्रह्मचैतन्य अधिष्ठान आहे, असें दुसरें मत आहे; याप्रमाणें वेदान्तांत दोन मतें आहेत. प्रथममतान्वयें, स्वप्नांतील प्राण्यांचे ठायीं, स्वप्ननिर्मातृजीवाचेच आभास होतात, असें उत्तर आहे; आणि द्वितीयमतान्वयें स्वप्नांतील प्राण्यांत राहणाऱ्या जीवरूप ब्रह्माभासांना सुखदुःखभोग होतात; कारण, स्वप्नमध्यें आपल्याला भिऊन पळालेला शत्रूहि आपण पहातों व त्यावरून त्याला दुःख झाल्याचें अनुमान होतें. ज्याप्रमाणें, स्वप्न, प्रतीतिमात्र आहे, त्याप्रमाणेंच प्रतीतिसिद्धच तेथील अनुमानादि प्रमाणप्रमेयव्यवस्थाहि आहे.

शिष्य उवाचः— पण या दुसऱ्या मतान्वये स्वप्नांतील प्राण्यांनां स्वकर्मानें भोग होतो, अथवा स्वप्ननिर्मातृकर्मानें भोग होतो, असा मला संशय आला आहे.

श्रीगुरु उवाचः— कसेंहि कां होईना, स्वकर्मानें भोग झाला तरीहि, आह्माला इष्टापत्तिच आहे. आणि स्वप्ननिर्मातृकर्मानें जर भोग झाला तर आमची कांहीं हानी नाहीं; परंतु, प्रतिवादीला अनिष्ट आहे. कारण, स्वप्ननिर्मातृकर्मानें जसा सचेतन प्राण्यांना भोग होतो, त्याप्रमाणें परमेश्वर शरीरहि परप्रारब्धनिर्मित असल्यास निर्मातृजीवकर्मानेंच परमेश्वराला बळेंकरून भोग झाला पाहिजे. हाच दोष पहिल्या मतान्वयें स्वप्न मानून शंका केली असतांनाहि येतो; आणि श्रुतींतील ब्रह्मलोकस्थ मुक्त पुरुष जसा स्वतः आपल्या संकल्पनिर्मित पित्रादि शरीरामध्यें प्रवेश करितो, या विषयीं शास्त्र आहे, तसा स्वप्रारब्धानें अवतारशरीर निर्माण करून,

त्यांतहि तो प्रारब्धनिष्ठ पुरुषच प्रवेश करितो, या विषयीं शास्त्र नाहीं. युक्त्यन्वयें अवतारशरीरनिर्माता जीव, अवतारशरीरांत प्रवेश करतोच असें प्रतिवादी म्हणेल, तर काय बद्ध जीव प्रवेश करितो, कीं मुक्त जीव प्रवेश करितो ? पहिल्यापक्षीं, प्रवेशकाला सुखदुःखभोग होतील; व दुसऱ्या पक्षीं, मुक्ताला कर्तव्यापत्ति येईल आणि "परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे " हा जो संतअवतारःविषयींचा पाल्यपालकभेद, तो सांगणारी जागृच्छ्रुति अप्रमाण होईल. पुनः जो, जो ज्ञानी, तो, तो योगी असलाच पाहिजे, असा वेदान्तांत अनवश्यक असलेला सिद्धान्त प्रतिवादीला मानावा लागेल; कारण निर्माणकार्यत्व ही सिद्धि योगावांचून संभवत नाहीं. पुनः प्रतिवादीच्या मतांत असुराच्या प्रारब्धानेंच परमेश्वरशरीर असुरांना दुःखदायक होतें असें मानलें आहे. मुक्त कोणी, असुर असूं शकणार नाहीं; अथवा असुर मुक्त असल्यास, तो आपल्याला दुःख करून घेण्याकरितां, मुद्दाम अवतारशरीरांत प्रवेश करून घेणार नाहीं; आणि प्रारब्ध भोगण्याकरितां प्रवेश जरी केला, तरी तो उपास्य होणार नाहीं. कारण जीवाची उपासना सर्व श्रुतींत प्रतिषिद्ध आहे व या विषयीं "सर्वत्र प्रसिद्धोपदेशात्" "विवक्षितगुणोपपत्तेश्च," "अनुपपत्तेस्तु न शारीरः" इत्यादि न्याय ब्रह्मसूत्रकारांनीं दर्शविले आहेत. ह्या सूत्रांचा अर्थ असा आहे. श्रुतिस्मृतिपुराणांत सर्वत्र परमेश्वरच श्रेष्ठत्वेंकरून पठित आहे, म्हणून तोच उपास्य आहे. जीवाला इष्ट असणारे सत्यसंकल्पादि गुण, परमेश्वराचे ठिकाणींच सिद्ध होतात; ह्मणून तोच उपास्य आहे; आणि जीवाचे ठिकाणीं, ते गुण सिद्ध होत नाहींत; ह्मणून तो उपास्य नाहीं. अवतारांची उपासना तर, तापनीयादि श्रुतींत व भागवतादि पुराणांत, सर्वत्र सांगितलेली आहे. एवढ्याकरितां ते जीव नसून त्यांचें शरीर स्वकर्मजन्य किंवा परकर्मजन्य नाहीं, असा श्रुति-युक्ति-अनुभव-परीक्षित आमुचा सिद्धान्त आहे; व त्यावर आतां प्रतिवादीला शंका करण्याचें सामर्थ्यहि नाहीं, असें आम्ही स्पष्ट म्हणतों.

शिष्य उवाचः- भगवन् भगवच्छरीर कर्मजन्य नसल्यामुळेंच तें

भूतकार्य नाहीं, हें मी आतां उत्तम समजलों.

चूर्णिका— एवं लौकिक देह न घडे कर्मेंविण । स्वकर्म परकर्म ईश्वरा असेलन । मायिक देहाचें केलें खंडण । भगवद्देह तंव सांगती श्रुतिस्मृतिपुराण । "सहस्रशीर्षः" ही श्रुति प्रमाण । हिला विराटपर न लावावें कोण । "ततो विराडजायत" इत्यादि पुढील वचनेंकरोन । 'सहस्रशीर्षा पुरुषः' विराट्कारण निश्चितें । "त्वं जातो भवसि विश्वतोमुखः ही अपर श्रुति । संभवाम्यात्ममायया ही जागृच्छ्रुति । एवं अनेक स्मृति पुराण आणि आचार्योक्ति । सांगती भगवद्विग्रहो ॥ ५ ॥ हेंच आतां विशेष सांगतों.

श्लोकः— वेदान्तपक्ष अकरांस विचारितां या । केव्हां शकेन घडु माधवदेहमाया । अध्यस्त तो नसुनि ब्रह्मविवर्त एक । साधूजनां नयनगोचर वा अनेक ॥ १ ॥

परमेश्वरशरीर मायाकार्य होऊं शकत नाहीं, ही प्रतिज्ञा आहे. वेदान्तांत सिद्ध होत नाहीं, ह्मणून हा हेतु आहे. याकरितां श्रोत्यांना वेदान्ताच्या अकरा पक्षांचा विचार करूं असें म्हणतों. यद्यपि परमेश्वराविषयीं, नाना धर्मांत भिन्न भिन्न पक्ष आहेत. तथापि, ज्या धर्मांत परमात्मा अवतार घेऊं शकत नाहीं, त्या धर्मांचा येथें आह्माला विचार कर्तव्य नाहीं. त्याचें समीक्षण दुसऱ्या एकाद्या ठिकाणीं करूं. नास्तिक मतावांचून वेदाश्रित आस्तिक मतामध्यें, परमेश्वरशरीर मायाकार्य मानलेलें नाहीं म्हणून, त्यांचें म्हणणें अंशतः आम्हाला अनुकूलच आहे. शांकर वेदान्तांत मात्र, परमेश्वरशरीराला, मायाकार्य म्हटलें आहे, तें युक्तिसिद्ध नाहीं, असें आमचें म्हणणें आहे. कारण वेदान्तांत परमेश्वराविषयीं अकरा पक्ष आहेत. आम्ही शांकरमतीच आहों, हें प्रथमवल्लींत प्रतिपादन केलेंच आहे. परंतु वस्तु मताग्रहाची अपेक्षा करीत नसते, ह्मणून वेदान्तांत, भगवच्छरीर मायाकार्य होऊं शकत नाहीं, हें आम्हीं युक्तीनें सिद्ध करितों. वेदान्तांत जीवेश्वर विचाराविषयीं अकरा पक्ष आहेत.

(१) शंकराचार्यांनीं आपल्या "सर्ववेदान्तसिद्धान्तसारसंग्रहांत,"

वनवृक्षाप्रमाणें, समष्टि व व्यष्टि असे अज्ञानाचे दोन भेद करून, समष्टि-अज्ञानोपहितचैतन्य ईश्वर व व्यष्टयज्ञानावच्छिन्नचैतन्य जीव आहे, असें म्हटलें आहे. समष्टि अज्ञान शुद्धसत्वरूप असल्यामुळें, उत्कृष्ट आहे म्हणून, तदुपहित ईश्वरहि सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, आणि स्वतंत्र आहे. व्यष्टि अज्ञान मलिनसत्वरूप असल्यामुळें जीवाच्या ठिकाणीं ईश्वराच्या विपरीत धर्म आले आहेत.

(२) अनिर्वाच्यानादिप्रकृति माया होय. तिच्यामध्यें पडलेलें चैतन्याचें प्रतिबिंब ईश्वर, आणि तिचें जें आवरण व विक्षेपशक्तिरूप अविद्या संज्ञेला प्राप्त होणारे भाग, त्या भागांमध्यें पडलेलीं चैतन्याचीं प्रतिबिंबें जीव होत, असें प्रगटार्थविवरणकार म्हणतात.

(३) मूळ प्रकृति एक असून शुद्धसत्वप्रधान असल्यामुळें, माया होते व मलिनसत्वप्रधान असल्यामुळें अविद्या होते. मायेमध्यें चैतन्याचा आभास ईश्वर होय, व अविद्येमध्यें चैतन्याचें आभास जीव होत, असें तत्वविवेकांत विद्यारण्यस्वामी म्हणतात.

(४) आनंदमयकोशांतील सर्व बुद्धिवासनेमध्यें पडलेले प्रतिबिंब ईश्वर, व अनेक विज्ञानमयकोशांतील व्यष्टिबुद्धिवासनेमध्यें पडलेले प्रति-बिंब जीव, असें मेघाकाशाच्या व जलाकाशाच्या दृष्टान्तानें विद्यारण्य-स्वामींनीं चित्रदीपांत म्हटलें आहे.

(५) एकच प्रकृति विक्षेपशक्तिप्रधान असली म्हणजे माया होते व आवरणशक्तिप्रधान असली म्हणजे अविद्या होते. माया ही ईश्वराची उपाधि आणि अविद्या ही जीवाची उपाधि होय, असें कांहीं प्राचीन वेदान्ती ह्मणतात व अर्वाचीन हंसराजांनींहि आपल्या लघुवाक्य-वृत्तीच्या टीकेंत म्हटलें आहे.

(६) अज्ञान नाना आहेत व म्हणून तदवच्छिन्न जीवहि नाना आहेत. आणि त्या प्रत्येक जीवाला एक एक प्रपंच असून प्रत्येकाला एक एक ईश्वर आहे. याप्रमाणें प्रपंच व ईश्वर नाना आहेत, असें वाचस्पतिमिश्र ह्मणतात.

(७) अंतःकरणांत प्रतिबिंब जीव आहे आणि अविद्येंत प्रतिबिंब ईश्वर आहे, असें सर्वज्ञात्माचार्य संक्षेपशारिरकांत म्हणतात.

(८) स्वामीसदानंद आपल्या वेदान्तसारांत असें म्हणतात कीं अज्ञानोपाहितचैतन्य ईश्वर. तें उपाधिप्रधान असलें म्हणजे जगाचें उपादान होतें आणि ब्रह्मस्वरूपप्राधान्यानें निमित्त होतें.

(९) अज्ञान एकच आहे. त्यांत असलेलें प्रतिबिंब जीव आहे आणि बिंब ईश्वर आहे. उपाधि प्रतिबिंबपक्षपाती असतो, म्हणून अल्पज्ञत्वादिक जे उपाधीचे धर्म, ते बिंबभूत परमेश्वराचे ठिकाणीं घटत नाहींत, असें विवरणकार प्रकाशात्मयति व तदनुसारी रामानंदादिक म्हणतात. याप्रमाणें सृष्टिदृष्टिवादांत ईश्वराविषयीं पक्ष आहेत.

(१०) अज्ञान एक असल्यामुळें जीव एक आहे व स्वप्नाप्रमाणें प्रपंच जीवकल्पित असून, स्वप्नांतील राजाप्रमाणें ईश्वरहि जीवकल्पित आहे, असें सिद्धान्तमुक्तावलिकार स्वयंप्रकाशानंदादिक म्हणतात.

(११) विवरणकाराप्रमाणें, शुद्ध वा बिंब, दृष्टिसृष्टिवादांतहि ईश्वर होतो, असें मधुसूदनस्वामींनें सिद्धान्तबिंदूंत म्हटलें आहे.

हें सर्वपक्ष अद्वैतबोधार्थ व मुक्तिदानार्थ उत्तम आहेत, परंतु भगवंताचें शरीर मायाकार्य घटूं शकत नाहीं, एवढेंच येथें दाखवावयाचें आहे.

(१) प्रथम पक्षांत व्यष्टि व समष्टि असें दोन प्रकारचें अज्ञान मानलें आहे, परंतु व्यष्टि, मलिनसत्वात्मकाची, व समष्टि, शुद्धसत्वात्मकाची काय म्हणून व्हावी, या बद्दल युक्ति दिलेली नाहीं. प्रत्येक मलिनसत्वांशरूप अविद्येंत, सत्वाचाच अंश अधिक आहे, म्हणून समष्टिअज्ञानांत अर्थातच तो अधिक होतो, असें म्हणता येणार नाहीं. कारण व्यष्टिअज्ञानांत अधिक सत्व मानल्यास, त्यांतील न्यून रजस्तम तिरस्कृत झाल्यामुळें, तदवच्छिन्न सर्व जीव सर्वज्ञ होतील; परंतु आचार्य म्हणतात म्हणून ग्रहण केलें तरी, समष्टिअज्ञानकार्य जें भगवच्छरीर, तें अर्थातच स्थूल ब्रह्मांडाएवढें झालें पाहिजे. वृंदावनादि एक स्थानीय होणार नाहीं. आणि भगवल्लीला तर, भागवतादिक ग्रंथांत व आचार्यांनीं आपल्या गोविंदाष्टकादिकांतहि वृंदावनादि एकस्थानीय सांगितली आहे. समष्टिअज्ञानाचें कार्य अल्पदेशस्थ मानल्यास, तें व्यष्टिअविद्येचें भूतकार्य होईल; परंतु आपल्या गीताभाष्यांत आचार्यांनीं भूतकार्य मानलें

नाहीं. एकानेंच केलेल्या दोन ग्रंथांत विरोध असणें युक्त नाहीं. म्हणून, सर्व वेदान्तसिद्धान्तसारसंग्रहांतील वाक्याची अशी व्यवस्था करावी कीं, समष्टिअज्ञान व त्यांतील आभास हे दोन्ही ज्या चैतन्याचे उपाधि आहेत, त्याला आचार्यांनीं सर्वज्ञ सर्वशक्तिमान् ईश्वर म्हटलें आहे. उपाधीचा व उपहिताचा परदृष्टीनें संबंध भासतो, स्वदृष्टीनें नसतो, म्हणून परमेश्वराचा व समष्टिअज्ञानाचा संबंध राहूं शकत नाहींत. यास्तव परमेश्वरसंबंधावाचून मायाकार्य देहादिक भाव घटत नाहींत, म्हणून परमेश्वराचें शरीर मायाकार्य होऊं शकत नाहीं. समष्टिअज्ञानांतील आभास अव्याकृत हिरण्यगर्भ समजावा. त्या आभासाचें समष्टिअज्ञान हें विशेषण आहे. विशेषण हें स्वनिष्ठ असतें, म्हणून समष्टि अंतःकरण हें हिरण्यगर्भाचें शरीर होऊं शकतें. यद्यपि उपाधि प्रतिबिंबपक्षपाती असतो, असें विवरणकारांनीं म्हटलें आहे, तथापि, अज्ञान जीवेश्वरत्वविशिष्ट चैतन्याचा उपाधि असून नैकट्यास्तव जीवाचें विशेषण झाला आहे, म्हणून तो प्रतिबिंबपक्षपाती असतो अशी तेथें विवक्षा समजावी. आचार्यांनीं स्वीकारलेलें व्यष्टि अज्ञान हें जीवाचें विशेषणच आहे; म्हणूनच व्यष्ट्यवच्छिन्न असा शब्द आचार्यांनीं जीवनिरूपण करतानां, योजिला आहे. विशेष्याचें अवच्छेदक जसें विशेषण होऊं शकतें, तसा उपहिताचा अवच्छेदक उपाधि होऊं शकत नाहीं. कारण, उपाधि वस्तुबहिर्भूत असून व्यावर्तक असतो. तात्पर्य, या पक्षांत भगवच्छरीर मायाकार्य होऊं शकत नाहीं. आतां, दुसऱ्या पक्षाचा विचार करूं.

(२) सर्व प्रकृतींत पडलेलें चैतन्याचें प्रतिबिंब ईश्वर; असें या पक्षांत गृहीत असेल, तर अविद्यासंज्ञक तिच्या प्रदेशांतहि ईश्वर प्रतिबिंबच आहे, असें म्हटलें पाहिजे. तसें मानून भगवच्छरीर मायाकार्य मानल्यास, प्रथमपक्षावर येणारेच दोष पुनः येतात आणि ईश्वराच्या सर्वज्ञत्वादिकाची हानि होते. सभोंवतीं मलीन प्रदेश मानून मध्यें एक स्वच्छ प्रदेश मानल्यास, त्या स्वच्छ प्रदेशाच्या बाहेर, ईश्वराची स्थिति होणार नाहीं व त्यामुळें परमेश्वराचें अंतर्यामित्व सांगणारी श्रुति अप्रमाण होईल आणि मलिन प्रदेशाला सोडून, स्वच्छ प्रदेश अंशरूपानें किंवा पूर्णरूपानें भगवच्छरीरात्मक कार्यरूप होतो, असें मानल्यास, अज्ञान सावयव होईल.

निरवयवांत, प्रदेश कल्पितां येणें शक्य नाहीं. निरवयवपरमाणूंच्या संयोगानें "उभयथापि" या सूत्रांत बादरायणाचार्यांनीं खंडण केलें आहे, म्हणून त्याचा दृष्टान्त घेऊनहि, निरवयवांत प्रदेश कल्पतां येत नाहीं आणि पुनः निरवयवापासून भगवच्छरीरहि उत्पन्न होणें शक्य नाहीं. अघटितघटनापटुत्वामुळें होतें असें म्हणेल, तर एवढें अघटितघटनापटुत्व मायेला स्वतः सिद्ध आहे, कीं चैतन्याच्या आश्रयानें आहे? प्रथमपक्षीं सांख्याचा जडवाद स्वीकारावा लागेल. दुसऱ्यापक्षीं, चैतन्य सर्वसमर्थ असल्यामुळें, तेंच जीवानुग्रहार्थ शरीर धरतें, असें म्हणण्याला काय होतें? याप्रमाणें दुसऱ्या पक्षाचा विचार झाला. आतां तिसऱ्या पक्षाचा विचार करूं.

(३) सहा पदार्थ वेदान्तांत अनादि सांगितले आहेत. त्यामध्यें अविद्या एकच सांगितली आहे. मायाअविद्येचा भेद असा, सातवा पदार्थ, कोठें वेदान्तांत सांगितला नाहीं. जीवेश्वराचा भेद अनादि सांगितल्यामुळेंच, श्रुतार्थापत्तीनें, मायाअविद्येचा भेद आम्हीं मानतों, हें म्हणणें सम्यक् नाहीं. एक अज्ञान होऊनहि, जीवेश्वराचा भेद होऊं शकतो, असें विवरणकारानीं उत्तम सिद्ध केलें आहे; म्हणून, मायाअविद्येच्या भेदास कोणत्या तरी निमित्ताचा स्वीकार करणें भाग पडतें, तें निमित्त स्वामीविद्यारण्यानीं कोठें दाखविलें नाहीं. तथापि, ते मजपेक्षां वरिष्ठ असल्यामुळें त्यांच्या सांगण्यावरच विश्वास ठेविला तरीहि, भगवच्छरीर मायाकार्य सिद्ध होत नाहीं. शुद्धसत्व हें अचल असल्यामुळें रजानें प्रवर्तविल्यावांचून तें भगवच्छरीरकार्य करण्याला समर्थ होणार नाहीं, आणि रजाचें प्रवर्तविणें मानल्यास कार्यस्थित्यर्थ तमाचेंहि नियमन मानावें लागेल; म्हणजे, अर्थातच दोन गुणांचें आधिक्य होऊन, शुद्धसत्वाला मालिन्य आल्यामुळें, मायेला अविद्यात्व येऊन, तत्कार्यरूप भगवच्छरीरालाहि भूतकार्यत्व येतें. चैतन्याच्या सामर्थ्यामुळें, शुद्धसत्व चल होऊं शकतें, हें म्हणणें सर्वथा विसंगत आहे, कारण, शुद्धसत्वरूपबुद्धीनें निश्चलचैतन्याचा प्रत्यय येत असतो; परंतु, शुद्धसत्वाला चैतन्यसान्निध्यानें चांचल्य व कार्यक्षमत्व मानल्यास समाधिच घटणार नाहीं. प्राणिकर्म शुद्धसत्वाला प्रवर्तवितें असें जर विद्यारण्यस्वामींचा भक्त म्हणेल, तर त्याला मी असें विचारतें कीं, जीवाच्या कर्माचा लय मायेंत काय म्हणून व्हावा? ते

अविद्याश्रित असल्यामुळें, अविद्येतच त्यांचा लय झाला पाहिजे. बरें प्रत्येक प्राणिकर्म शुद्धसत्वाला चालक मानतोस किंवा सर्व प्राणिकर्मांचा संघात शुद्धसत्वाला चालक मानतोस ? पहिल्यापक्षीं, ईश्वराला सर्वदा अवतार घ्यावे लागतील व मग त्यामुळें " संभवामि युगे युगे " इत्यादि वचनांचा बाध होईल. प्रलयावांचून, सर्व प्राणिकर्म एकत्र होत नाहींत; आणि प्रलयकाळीं अवताराचा कांहीं उपयोग नाहीं; म्हणून, दुसराहि पक्ष उत्तम नाहीं. याप्रमाणें या तिसऱ्या पक्षाचा विचार झाला.

(४) चवथा पक्ष स्वीकारणाऱ्या तुला, आम्हीं विचारतों, काय परमेश्वर आनंदमय केवल अज्ञानांत प्रतिबिंब आहे, कीं बुद्धिवासनासहित अज्ञानांत प्रतिबिंब आहे, कीं केवल बुद्धिवासनेंत प्रतिबिंब आहे? पहिल्या पक्षीं, तुझ्या ईश्वरावर, विवरणकारानीं सांगितलेले जीवधर्म येतात आणि अज्ञान अंतःकरणरूपानें परिणाम पावल्यावांचून एकदम स्थूल भगवच्छरीररूप कार्य त्याचें होऊं शकत नाहीं. दुसऱ्या पक्षीं, केवल अज्ञानच उपाधि मानणें बरें. बुद्धिवासनासहित अज्ञान मानणें निष्फल आहे, पण याही पक्षीं स्थूल शरीर, बुद्धिवासनांचा परिणाम होऊं शकत असल्यामुळें बुद्धिवासनासहित अज्ञानाचें कार्य, भगवच्छरीर होऊं शकणार नाहीं. तिसऱ्या पक्षीं, प्रत्येक बुद्धिवासनेमध्यें प्रतिबिंब ईश्वर आहे, कीं सर्व बुद्धिवासनेंमध्यें प्रतिबिंब ईश्वर आहे ? आद्य, ईश्वर अनंत होऊन, अल्पज्ञ होतील. अंत्य पक्षही बरोबर नाहीं. कारण सर्व बुद्धिवासना प्रलयावांचून एकत्र होत नाहींत; ह्मणून स्थीतिकालीं जगाचें पालन करण्याला ईश्वरच कोणी राहणार नाहीं व प्रलयांत, भगवच्छरीराचा उपयोग नाहीं. असो; पण या दोनही पक्षांत भगवच्छरीर मायाकार्य घटूं शकत नाहीं. कारण, प्रत्येक वासनेचें कार्य व्यष्टिस्थूलदेहरूप होईल व समष्टिवासनेचें कार्य स्थूलविराडदेहरूप होईल. याप्रमाणें चतुर्थपक्षहि अयोग्य आहे.

(५) वादिन् ! विक्षेपाचें लक्षण तूं काय करतोस ? अन्यथाभास एवढेंच त्याचें लक्षण करीत असशील, तर अन्यथाभास वस्तुज्ञानपूर्वक होतो कीं वस्त्वज्ञानपूर्वक होतो ? प्रथमपक्षीं, मायेचा स्वीकार न करून ब्रह्मच संसाररूप झालें आहे, असा परिणामवाद बळेंकरून तुला स्वीकारावा लागेल, आणि दुसऱ्यापक्षीं, आवरणविक्षेपाची स्थीति होत अस-

त्यामुळें, अविद्यापूर्वकच विक्षेपाचा अंगिकार करावा लागेल. आतां प्राचीनांचें म्हणणें म्हणून, विश्वास ठेवून गृहीत केलें, तथापि दोषविमुक्तता होत नाहीं. कारण, आवरणरहित विक्षेप मानला असतां, मुक्तांनां देखील बंधन होण्याचा संभव आहे; आणि विक्षेपाला आवरण नियामक नसल्यामुळें, विक्षेपरूप प्रारब्धाची निवृत्ति संभवणार नाहीं. आणि त्यामुळें, विदेह-मुक्ति सांगणाऱ्या श्रुतींचा व्याकोप होईल. बरें, " आज्ञा गुरूणां ह्य विचारणीया " या उक्ति प्रमाणें ग्रहण केलें तरी, या पक्षांत भगवच्छरीर मायाकार्य सिद्ध होत नाहीं. कारण, विक्षेपशक्तिजन्य ज्याप्रमाणें श्रीकृष्ण-शरीर आहे, त्याप्रमाणें, भूतेंहि विक्षेपशक्तिजन्य आहेत, आणि पूर्व-विक्षेपसंस्कारावच्छिन्न उत्तरविक्षेप धर्माधर्मनिमित्तक असतो. भगवंताचें शरीर विक्षेपसजातीय मानल्यास, धर्माधर्मजन्य होऊन, भूतकार्य होईल. आतां भूतकार्यरूपानें माया परिणाम न पावून केवल कारणमायाच दृग्गो-चर होते, अघटितघटनापटुत्वास्तव, ह्मणून भगवच्छरीर भूतकार्य नाहीं, मायाकार्य आहे; असेंहि ह्मणणें सुसंगत नाहीं. कारण, अघटितघटनाप-टुत्व जर मायेला मानतोस, तर मग, ज्याच्या सान्निध्यानें मायेला इतकें सामर्थ्य येतें, त्या ब्रह्मालाहि अघटितघटनापटुत्व मानण्यास, तुला कोणती अडचण आहे? माया जशी भगवच्छरीराचे ठिकाणीं कारणत्वेंकरून दृग्गोचर होते व इतरत्र कार्यत्वेंकरून दृग्गोचर होते; हा नियम ब्रह्मसत्ते-मुळेंच झाला आहे. कारण, मिथ्या वस्तूची नियति अधिष्ठानसत्वोपष्टब्ध असते असें मानलें तर, अघटितघटनापटु ब्रह्महि अवताररूप होऊं शकतें. पण, मुक्तांनां बंध होत नाहीं असें ह्मणतां येतें, किंवा मुक्त एकवेळ परमे-श्वरस्वरूप झाल्यामुळें, त्यांची अविद्याच नष्ट होते, व त्यामुळें, अर्थातच पृथक्स्वरूपाभावास्तव पुनर्बंध संभवत नाहीं. स्वतःचेंच अघटितघटनापटुत्व स्वतःला घातक होत नाहीं. याप्रमाणें, पांचवा प्रश्न असंगत आहे.

(६) या पक्षांत तर, जीवाच्या अज्ञानाचें कार्य परमेश्वरशरीर होत असल्यामुळें, व आवृत्त जीवाला शुद्धसत्वरूपाची कल्पना करतां येणें शक्य नसल्यामुळें, भगवच्छरीर भूतकार्यच होईल. पुनः, एक, एक जीवाला एक, एक ईश्वर आहे, तो काय जीवाच्या अज्ञानानें आहे, कीं ईश्वराची उपाधि जीवाच्या अज्ञानाहून भिन्न आहे ? प्रथमपक्षीं सर्व

ईश्वर अल्पज्ञ होताल व द्वितीय पक्षीं प्रमाणाचा अभाव आहे. हा दोष येऊं नये म्हणून, वाचस्पतीचा भक्त असें म्हणेल कीं, अविद्यावच्छिन्न अथवा अंतःकरणावच्छिन्न चैतन्य जीव आहे, आणि अविद्यानवच्छिन्न किंवा अंतःकरणानवच्छिन्न चैतन्य ईश्वर आहे. ते अविद्या अथवा अंतःकरण नाना आहेत, म्हणून तदवच्छिन्न जीव नाना आहेत, आणि तदनवच्छिन्न प्रदेशाचे ठिकाणीं नानात्वकल्पना होत असल्यामुळें, प्रतिजीवाला भिन्न भिन्न ईश्वर आहेत. याप्रमाणें, ईश्वरहि नाना आहेत. आणि ते सर्व ईश्वर अविद्येनें अनवच्छिन्न असल्यामुळें आवरणरहितत्वास्तव सर्व सर्वज्ञ आहेत, हें म्हणणें बरोबर नाहीं; कारण, सर्वशक्तिमत्व सांगणाऱ्या वाक्यांचा हे वादिन् ! तुझ्या पक्षाचे ठायीं व्याकोप होतो. ज्या जीवाचा जो ईश्वर असेल, तो त्याच जीवाचें कर्मफलादिक नियमन करितो, किंवा अन्य जीवाचें कर्मफलादिक नियमन करितो? प्रथमपक्षीं, परमेश्वर सर्वशक्तिमान् होत नाहीं, आणि द्वितीयपक्षीं, एकाच ईश्वरानें, सर्वकार्य होत असल्यामुळें, नाना ईश्वर मानणें व्यर्थ आहे. हा अनेक ईश्वरवाद, श्रुति, स्मृति, पुराण, सूत्र भाष्य, वार्तिक विवरणादिकांशीं विरुद्ध आहे, म्हणून, सर्वथा त्याज्य आहे. या पक्षांतहि मायाकार्य भगवच्छरीर सिद्ध होत नाहीं, कारण, या पक्षांत, परमेश्वर अनवच्छिन्न आहे. अविद्येहून माया दुसरी मानलेली नाहीं. म्हणून अनवच्छिन्न परमात्मा जर अविद्यावच्छिन्न होईल, तर तो जीव होऊन, त्याचें शरीरहि भूतकार्य होईल. आतां अनवच्छिन्न जो परमेश्वर, तो स्वतःच शरीर धारण करितो, असें म्हणणें तुला योग्य होणार नाहीं, कारण, अनवच्छिन्न सर्वच ब्रह्म आहे, म्हणून सर्वच ब्रह्म शरीरी झालें पाहिजे. तसें मानलें म्हणजे, सर्वसाकारवाद मानणाऱ्या विष्णुस्वामिमताचा शांकरमति अशा तुझ्यांत प्रवेश होईल; अथवा ब्रह्माच्या जेवढ्या आरोपित प्रदेशावर ईश्वरत्वाचा आरोप झाला आहे, तें ईश्वरत्वारोपावच्छिन्न ब्रह्मच अविद्येचा आश्रय न घेऊन, शरीरी होतें, असें, म्हणशील तर, आमचाच पक्ष तुझ्या गळ्यांत पडला. कारण, आम्हींहि प्रतिबिंबापेक्षिक, बिंबत्वारोपावच्छिन्न बिंबभूत परमेश्वरच अनभ्यस्तविवर्त अशा शरीरातें धारण करितो, असें ह्मणतो. आतां जेथें जेथें विवर्त असतो, तेथें तेथें अध्यास असतो असें मात्र ह्मणूं नकोस.

कारण, त्याचें समाधान आम्ही भक्तिसूत्रभाष्यांत केलें आहे. हे वाचस्पतिप्रिय! निग्रहीत झालेला तूं, हे दोष टाळण्याकरितां अविद्यावच्छिन्न चैतन्य ईश्वर आहे, आणि अंतःकरणावच्छिन्न चैतन्य जीव आहे, असें म्हणशील तरीहि अविद्याकार्य भगवच्छरीर झाल्यामुळें, तें भूतकार्यच होईल. कारण, अविद्याकार्यच भूतें आहेत. स्थूलसूक्ष्मभूतांहून भिन्न अविद्याकार्य दिसत नाहीं. पुनः अविद्यावच्छिन्न परमेश्वर जो तूं मानतोस, तो काय अविद्येंतील आवरणांशावच्छिन्न मानतोस, कीं विक्षेपांशावच्छिन्न मानतोस? प्रथमपक्षीं, पुढें जे आम्ही सातव्या पक्षावर दोष सांगणार आहोंत, ते दोष येतात. आणि द्वितीय पक्षीं, पांचव्या पक्षांत सांगितलेले दोष येतात; तात्पर्य, कोणत्याही दृष्टीनें हा सहावा पक्ष अयुक्त आहे.

(७) हें म्हणणेंच योग्य नाहीं. कारण अविद्येचें आवरण परमेश्वराचे ठिकाणीं स्थापित होतें. व त्यामुळें परमेश्वर असर्वज्ञ होतो. आणि आवृत्त झाल्यामुळें अधिष्ठानाच्या ज्ञानावांचून परमेश्वर बद्धहि होतो. बद्ध झाल्यामुळें जीव होतो. जीव झाल्यामुळें, संसारी होतो व त्याला मुक्त होण्याकरितां उपदेशाची अपेक्षा लागते; आणि त्याला उपदेश करणारा दुसरा एक नित्यसिद्ध ईश्वर मानावा लागतो; आणि तो न मानल्यास ईश्वराची अनवस्था होते; आणि बद्धानें उच्चारलेलें वाक्य प्रमाण होत नसल्यामुळें वेद अप्रमाण होतात. सर्वज्ञात्माचार्य जरी वरिष्ठ आहेत, तरी वेदाला अप्रमाण केल्यावरहि, त्यांनां आम्ही पूज्य मानावें, एवढी त्यांच्या ठिकाणीं आमची प्रीति नाहीं. पुनः ज्ञानानें अविद्या निवृत्त होत असल्यामुळें अविद्येमध्यें पडलेलें प्रतिबिंब जो ईश्वर, तोही, अर्थातच निवृत्त होईल; व मग जीवन्मुक्ताच्या प्रारब्धभोगाचें नियमन करणारा ईश्वरच कोणी राहणार नाहीं. एवढ्याकरितां प्रारब्धावष्टब्ध अविद्येच्या विक्षेपांशाच्या ठायीं, परमेश्वराचें प्रतिबिंब मानलें तर, अंतःकरणहि विक्षेपरूप असल्यामुळें, त्यांतहि परमेश्वर प्रतिबिंब मानावा लागेल व त्यामुळें एकाच प्रदेशांत जीवरूपप्रतिबिंब व ईश्वररूपप्रतिबिंब या दोहोंची स्थीति झाल्यामुळें, दोघांचें सांकर्य होईल आणि मग जीवाला होणारे स्वर्गनरकादिक भोग परमेश्वरालाहि होतील. भिन्न प्रदेश कल्पून किंवा अंतःकरणभिन्न विक्षेपाचे ठायीं, चेतनप्रतिबिंब परमेश्वर मानल्यास, तो, अंतर्यामी होणार

नाहीं; व त्यामुळें अंतर्यामित्व प्रतिपादन करणाऱ्या श्रुतींचा बाध होईल. मायाअविद्येप्रमाणें, अंतःकरणाचे शुद्धसत्व व मलिनसत्व असे दोन भाग करशील, तर पूर्वी सांगितलेले सर्व दोष तुझ्या मतावर येतात.

वादी उवाचः– अहो ! पण हा युक्तीचा पक्ष असो; " कार्योपाधिरयं जीवः कारणोपाधिरीश्वरः " अशी श्रुति आहेना ?

उत्तरः– अरे ! या श्रुतीचा अर्थ तुला नीट समजला नाहीं. प्रतिबिंबापेक्षिक बिंबत्वारोपावच्छिन्न बिंबभूत परमेश्वराचे ठायीं, जीवानेंच जगत्कारणत्वादिकांचा आरोप केला आहे. ह्मणूनच तदुपहित तटस्थलक्षण परमात्मा; अशी चैतन्याला संज्ञा आलेली आहे. आणि जीवाचा कार्योपाधि अंतःकरणादि स्पष्ट आहे. तात्पर्य, या श्रुतीवरून अविद्येमध्यें प्रतिबिंब परमेश्वर आहे, असें मानण्याची कांहीं आवश्यकता नाहीं; आणि सर्वेच उपाधि, नियमानें प्रतिबिंब संपादन करीत नाहीं. शाखा जसा चंद्राचा उपाधि असतो; तो प्रतिबिंबसंपादक होत नाहीं; किंतु व्यावर्तक मात्र होतो, तद्वत् जगत्कारणत्वोपाधि जीव, परमाणुप्रधानादिकाहून परमेश्वराचें व्यावर्तन करितो, चैतन्याचें प्रतिबिंबसंपादन करीत नाहीं, ह्मणूनहि अविद्येंत प्रतिबिंब परमेश्वर आहे, असें म्हणण्याची आवश्यकता नाहीं. पुनः या पक्षांत, कोणत्याही दृष्टीनें परमेश्वराचें शरीर मायाकार्य सिद्ध होत नाहीं. माया अविद्येहून पृथक् मानली नाहीं, ह्मणून पूर्वी सांगितलेलेहि अनेक दोष या पक्षावर येतात; ते सूज्ञांनीं पाहून घ्यावेत. ग्रंथभूयस्त्वभयास्तव, मी येथें लिहीत नाहीं. सारांश हा सप्तमपक्ष समीचीन नाहीं.

(८) या आठव्या पक्षांतहि, मायाकार्य भगवच्छरीर होऊं शकत नाहीं. कारण मायाप्रधान चैतन्य जगदुपादान आहे; आणि तशा मायेचें शरीर क्रमानें भौतिक झालें पाहिजे, कारण, उद्भूतरूपवत्व, प्रत्यक्ष होण्याला कारण आहे. भगवच्छरीर उद्भूतरूपवत्व मानल्यास, अर्थातच तेजोरूप होईल. पंचभूतांचें, अतिसूक्ष्मरूप प्रकृति आहे ह्मणून भगवच्छरीरकारण माया आहे, असें म्हटल्यास त्याला भूतत्वपरिणामाची अपेक्षा लागेल. चैतन्यावर हा दोष येत नाहीं. ब्रह्मरूपप्राधान्यानें जर परमात्मा जगन्निमित्त आहे, तर त्याच्या इच्छादिक माया विलक्षण

मानल्याच पाहिजेत; तर तो मायानियमनकर्ता होईल. नाहींतर इच्छादिक मायेचें स्वरूप; आणि इच्छादिकानें मायेचें नियमन; असे आत्माश्रयादि दोष येतात. मायाईश्वराचा बीजवृक्षाप्रमाणें प्रवाह नाहीं, ह्मणून दोष क्षम्य होऊं शकत नाहीं. एवढ्याकरितां पंचमप्रकारक मायावच्छेद संपादित अनध्यस्त विवर्तस्वरूपप्राधान्येन स्वरूपप्रधान निमित्तकारण, असें परमेश्वराचें शरीर आहे असें ह्मणतां येतें.

(९) या नवव्या पक्षांतहि, परमेश्वराचें शरीर मायाकार्य मानलें तर, उपाधि बिंबपक्षपाती होईल म्हणून, परमेश्वराचें शरीर बिंबसामर्थ्यानेंच मानलें पाहिजे. तसें मानणें म्हणजे, अनध्यस्तविवर्त भगवच्छरीर मानणाऱ्या आमच्या पक्षाचा स्वीकार करणेंच होय. अवतार सांगणाऱ्या श्रुतींची व्यवस्था लावण्याकरितां, बिंबसामर्थ्य मानणें, शब्दप्रमाण मानणाऱ्या आम्हाला विरोधी नाहीं; आणि आरोपावच्छिन्न बिंबभूतावांचून, अत्यंत निरुपाधिकाला आम्हीं साकार मानीत नसल्यामुळें, विष्णुस्वामीमताचा आमच्या मतांत प्रवेशहि होत नाहीं. पुनः हा नवमपक्ष जरी व्यावहारिक आहे, तरी अनुभवदृष्टीनें अतिशय उत्तम आहे; म्हणून यापक्षाचे ठिकाणीं माझी अत्यंत पूज्यबुद्धि असल्यामुळें, व मला ह्या पक्षाचें खंडण करण्याचें सामर्थ्यहि नसल्यमुळें, उगेंच वाक्पाटव करीत बसत नाहीं. या पक्षाचें मी खंडण केलेलें नाहीं. या पक्षांत मायाकार्य भगवच्छरीर होऊं शकत नाहीं, इतकेंच दाखविलें आहे. ह्याविषयीं संपूर्ण विवेचन "ज्ञानेश्वरचरणभूषण" ग्रंथांत करीन.

(१०) या दहाव्या पक्षांत, जीवानें, ईश्वर अर्थातच आपल्या उपाधीहून, व आपल्या अल्पज्ञत्वादि गुणाहून, सर्वज्ञत्व इत्यादि गुणांचा, भिन्न असा, कल्पिला आहे. जो जीव एवढ्या समर्थ ईश्वराची कल्पना करूं शकतो, तोच जीव त्याच्या अनध्यस्तविवर्त अशा शरीराचीहि कल्पना करितो, म्हणून शरीर धरण्याला, त्याला अज्ञातसत्तारूपिणी अशी माया मानावी लागत नाहीं. या पक्षाचें आम्हीं प्राह्यांशग्रहणपूर्वक व त्याज्यांशत्यागपूर्वक निरूपण "प्रियलीलामहोत्सवाचे" ठायीं केलें आहे. हा पक्ष दृष्टिसृष्टिवादियांचा असल्यामुळें, मुमुक्षूंनां अत्यंत उपादेय आहे. म्हणून ह्याचें खंडण, मज अज्ञाकडून होणें संभवनीयच नाहीं; किंतु या पक्षां-

तहि भगवच्छरीर मायाकार्य मानण्याची आवश्यकता नाहीं, एवढेंच दाखविलें आहे.

(११) या पक्षांत मायेचें कार्य परमेश्वरशरीर आहे, असें मानलें तर त्याला मायेवर आरूढ व्हावें लागत असल्यामुळें, बिंबभूतत्वच संभवणार नाहीं; म्हणून बिंबत्वारोपावच्छिन्न बिंबभूत, लीलामात्रेंकरून, अनध्यस्तविवर्त, अशा शरीरातें धारण करितो, असेंच या पक्षकारानें मानलें पाहिजे. आणि तसेंच त्यानीं मानलेंहि आहे. हा पक्ष मधुसूदनस्वामीचा असून, लीलामात्रच विग्रह ब्रह्माचे ठिकाणीं आहे; मायिक किंवा भौतिक नाहीं; असें, गूढार्थदीपिकेंत मधुसूदनस्वामींनीं म्हटलें आहे. आणि तसेंच आम्हीहि मानतों. तात्पर्य, या पक्षाचे ठिकाणीं आमचा पूर्णपणें आदर आहे. कारण, या पक्षांत शांकरज्ञानोत्तरभक्ति होते; परंतु, मधुसूदनाला बलानें शत्रु समजणारा धनपति आहे, त्यानें या मधुसूदनपक्षाचें आपल्या 'गीताभाष्योत्कर्षदीपिकेंत' खंडण केलें आहे. व त्यामुळें ज्ञानोत्तरभक्तीची अर्थातच त्याच्या हातून उपेक्षा झाली आहे. परंतु "घोटवीन लाळ ब्रह्मज्ञान्याहातीं । मुक्तां आत्मस्थिति सोडवीन" हें समर्थाचें वचन मिथ्या करण्याला परमेश्वराचें देखील सामर्थ्य नाहीं. मग, इतरांची कथा काय? या मधुसूदनशत्रूनें आपल्या भ्रमरगीतेच्या टीकेंत उद्धवकृत गोपीस्तुतीचें व्याख्यान करतांनां, "तत्वविदा तु सर्वात्मनि रूढभावत्वेऽपि तादृशरूढप्रेमाभावाद्वांच्छा" असें म्हटलें आहे, आणि मुक्त ब्रह्मस्वरूप झाले, तरी सगुणश्रीकृष्णभक्तीची ते इच्छा करितात, असा त्याचा अर्थ आहे. भगवंताचें मायाशरीर मानल्यास तुच्छत्वास्तव ज्ञानियाकडून त्याचे ठिकाणीं प्रेम कसा संभवेल, या धनपतिसूरीच्या बोलण्याचा कांहीं नियमही नाहीं. यानें आपल्या गीताभाष्योत्कर्षदीपिकेंत वर्णाश्रमकर्मावाचून भक्तीचा अधिकार येत नाहीं असें ध्वनित केलें आहे; आणि रासपंचाध्यायीच्या टीकेंत "भक्तितत्वज्ञानानधिकारिणोऽप्युद्धर्तव्या इतीच्छयैव भगवदवतरणम्" असें म्हटलें आहे. भक्ति आणि तत्वज्ञानाला, अधिकारि नसलेल्याचाहि, उद्धार करावा या इच्छेनेंच भगवंताचा अवतार आहे, असा त्याचा अर्थ आहे. पुढें या भवतरणासंबंधीं या श्लोकावरच टीका करतांनां, भगवदिच्छेनें पुरुषार्थ मिळणें सुकर नाहीं. कारण, पुरुषार्थ जीवकर्मसापेक्ष्य आहे म्हणून, आणि

ईश्वरावर निर्दयपणा व विषमपणा हे दोष येतात म्हणून, असें म्हटलें असून, याच श्लोकाच्या पुढील टीकेंत "जारबुद्धीनें देखील भगवंताचें आराधन मोक्षच देणारें आहे; असें म्हटलें आहे. वैश्याच्या व्यापारगृहा-प्रमाणें या धनपतीच्याहि भांडागारांत काय सांपडेल याचा कांहीं नेम नाहीं. ज्ञानोत्तरभक्ति जर याला अपेक्षित आहे, तर मधुसूदनस्वामीचा पक्ष खंडण करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. "परमेश्वरे देहदेहीभावं न मन्यते" या मधुसू-दनीय पक्षाचाच अनुवाद, सदानंदस्वामीनीं, आपल्या "अद्वैत ब्रह्मसिद्धींत" केला आहे. परंतु, या पक्षांत व आमच्या पक्षांत भेद एवढाच कीं, आम्हीं अनध्यस्तविवर्ताविषयीं प्रतिबिंबापेक्षिक बिंबत्वारोपावच्छेद, किंवा विद्या वृत्त्यवच्छेद, अथवा आणखी मी आपल्या ग्रंथीं निरूपण केलेले अवच्छेद, मानत असून, स्वामी मधुसूदनानीं कोणताच अवच्छेद न मानल्यामुळें, अनध्यस्तविवर्त अशा शास्त्रीय शब्दानें, आपलें मत त्यानां सांगतां आलें नाहीं. व त्यामुळें, ते शांकरमती असूनहि सूक्ष्मदृष्टीनें पाहिलें असतां ते शंकराचार्यांच्या विरुद्ध झाले आहेत. व वल्लभमताचें खंडण करूनहि विसरून म्हणा, कीं न कळून म्हणा. त्यानीं वल्लभमताच्या सिद्धान्ताचाच स्वीकार केला आहे. धनपतीनें हा प्रमाद उघड केला आहे. तथापि त्यानें भगवंताचें शरीर अनध्यस्त न मानून, केवल मायाकार्यच मानिलें आहे; म्हणून, आह्मीं दिलेले सर्व दोष त्याच्या मतावर येतातच. म्हणून, थोडासा व्यक्तिदोष सोडून देऊन, मधुसूदनाच्या मताची आम्हीं विशेष व्यवस्था केली आहे. असेंही कोणी समजल्यास आमची ना नाहीं. वडिलांच्या ठेवीवांचून, मी हीनचक्षु, दुसरें विद्याधन कोठून मिळविणार !

वसंततिलका.

वादी म्हणे, तुह्मि कसे वदतां, कळेना । 'अद्वैतसिद्धि,' मधुसूदन बोलले ना ॥ साकार ईश्वर नसे, अशि तेथ वाणी । पाहोनि तें तुह्मि कशी न गणां प्रमाणीं ॥ १ ॥

इंद्रवज्रा.

[illegible]द्रान्ति बोले, भय दाविजेना । माझा गुरु ज्ञानदिवा, विझेना ॥ अद्वै[illegible]द्धी, मधुसूदनानीं । केली चुकी, तें न गणीं प्रमाणीं ॥ २ ॥

अद्वै[illegible]सिद्धीच्या दुसऱ्या परिच्छेदांत याविषयीं विवाद केला आहे, तो

मुळा सखंडण सांगतो. "आदित्यवर्णं तमसःपरस्तात्" या श्रुति घेऊन, विशेषेंकरून वाद केला आहे. ही श्रुति अविद्याविलक्षण चिन्मात्रपर आहे, असें म्हटलें आहे. याच्यावर 'निर्गुणोपपत्ति' एक प्रकरण आहे. त्यामध्यें उपनिषत् निर्विशेषब्रह्मच प्रतिपादक आहेत, असें म्हटलें आहे; परंतु, याच ग्रंथाच्या पहिल्या परिच्छेदांत 'दृश्यत्वनिरुक्तीमध्यें वेदान्त-जन्यवृत्तिव्याप्य ब्रह्म शून्य नव्हे तर मिथ्या आहे, असें अंगीकृतपक्षानें सांगितलें आहे; आणि बिंबभूत किंवा शुद्धब्रह्म ईश्वर आहे, असें सिद्धान्तबिंदूंत याच भारतीनें ह्मटलें आहे; तेव्हां मधुसूदनांच्या बोलण्याचा काय नियम सांगावा बरें !

मध्यस्थः— अहो प्रक्रियाभेदानें तसें ह्मटलें ह्मणून काय झालें ?

सिद्धान्तीः— अहो. वेदान्तामध्यें जो प्रक्रियाभेद मान्य आहे, तो वृत्तिव्युत्पादनार्थ आहे, कीं सिद्धान्तभेदार्थ आहे ? प्रथमपक्षीं, इष्टापत्ति आहे; द्वितीयपक्षीं, योग्य नाहीं; कारण, दोन ब्रह्म सांगणारा द्वैतवाद, किंवा चार्वाकबौद्धादिकांचे वादही, मग साक्षात् मोक्षप्रक्रियाच ठरतील. सूतसंहितेंत त्यांचें अपरोक्षवृत्तिव्युत्पादकप्रक्रियात्व अंगीकृत आहे; आणि वेदान्तांतील प्रक्रियाभेद अपरोक्षवृत्तिव्युत्पादनार्थ आहे, पण साक्षात् मोक्षाचे ठिकाणीं सिद्धान्तैक्यच असलें पाहिजे. यद्यपि; बिंबरूपपरमेश्वराची विदेहमुक्तींतील प्राप्ति शुद्धाचीच आहे, असें विवरणाचार्य म्हणतात, तथापि 'दृश्यत्वनिरुक्तींतील मधुसूदनीय पक्षांतरांचा तसा अभिप्राय नाहीं. आणि असला तर शब्दजन्यवृत्तिव्याप्यब्रह्माला जें मिथ्यात्व दिलें आहे, त्याच्या योगानें शुद्धब्रह्माचे ठिकाणीं प्रमाण नाहींसें होईल; कारण, वृत्तिव्याप्यब्रह्मही शब्दलक्षणोपपाद्य आहे, ह्मणून, अज्ञानोपहित ब्रह्माचे ठिकाणीं शक्तिवृत्ति व लक्षणाजन्यवृत्तिव्याप्यब्रह्माचे ठिकाणीं लक्षणाही समाप्त झाल्यामुळें, शुद्धब्रह्माचे ठिकाणीं उपनिषन्मानच संभवत नाहीं. स्वयंप्रकाशरूपानेंच शुद्धब्रह्म सिद्ध होतें, असें मधुसूदनानें म्हटलें आहे. बरें, व "यत्तदद्रेश्य" ही श्रुतिहि त्याला प्रमाण दिली आहे. परं[illegible]ीत वेदान्तशब्दभिन्नवृत्तिविषयत्वाचा निषेध केला आहे. वेदान्तश[illegible]त्ति-विषयत्वाचा निषेध केला नाहीं. 'शुद्धं स्वप्रकाशं' या वाक्यानें अशु[illegible]पर-प्रकाश्य याची व्यावृत्ति करून लक्षणेनें शुद्धाची सिद्धि होते असें मधुसूदन

ह्मणतात, तें बरोबर नाहीं; कारण या वाक्यानेंहि वृत्ति उत्पन्न होतेच; आणि वृत्तिव्याप्यब्रह्म तर, वृत्तिकालीं अनुपहित नसतें, असें येथेंच मधुसूदनानें ह्मटलें आहे व या विषयीं पुष्कळ विवाद केला आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणाशीं इतकाच ' दृश्यत्वनिरुक्तींतील ' विरोध दाखविणें पुरें आहे. अपरोक्षब्रह्म सर्वदा मिथ्या व शुद्धब्रह्म सर्वदा परोक्ष, ह्मणून शाद्बच असेंहि; मधुसूदनाला, यामुळें मानण्याची पाळी येते; परंतु, प्रस्तुत प्रकरणांत ब्रह्म सर्वथा श्रुतीचें होऊन राहत नाहीं, असा आशय दाखविला आहे. अथवा शून्याची सिद्धि मधुसूदनाला मान्यच आहे. तरी आमची कांहीं हानि नाहीं, आह्माला इष्टापत्तिच आहे. परंतु बिंबप्रतिबिंबन्यायही मधुसूदनानें मानला आहे. तेव्हां सर्व शुद्ध बिंबरूप आहे कीं शुद्धाचा एकदेश बिंबभूत आहे? प्रथमपक्षीं आरोप संभवत असूनही हानि होत नाहीं, ह्मणून अनध्यस्तविवर्तत्वानेंही हानि नाहीं, अशी आह्माला इष्टापत्ति होत आहे; आणि द्वितीयपक्षीं अनायाससाकारासिद्धि झाल्यामुळें भारतीची प्रतिज्ञा भंग होत आहे. कारण, देशावच्छेद सत्तामात्रानें वस्त्ववच्छेदारोपाला साधक होतो, हा सर्व विवर्ताविषयीं नियम आहे. बिंबभूतत्व मायाकार्य नाहीं ह्मणून हा अवच्छेदही मायाकार्य नव्हे. आतां प्रस्तुतप्रकरणांत " आदित्यवर्ण" ही श्रुति उपास्यपर लाविली आहे. त्या विषयीं आमचा कांहीं विवाद नाहीं. परंतु " तमसः परस्तात " या पुढील श्रुतीचा अर्थ करतांनां मधुसूदन ह्मणतो. "उपास्याला तमाच्या पलीकडे असणें शोभत नाहीं असें ह्मणूं नका; उपास्यविग्रह ज्याचें उपलक्षण आहे, असें ब्रह्मच तमाच्या पलीकडे सांगितलें आहे. रूपविशिष्ट ब्रह्म तमाच्या पलीकडे सांगितलें नाहीं. हें मधुसूदनाचें ह्मणणें बरोबर नाहीं. कारण, मायाकार्यदेह मधुसूदनानें प्रस्तुत प्रकरणांत किंवा अन्य प्रकरणांत मानला आहे. आणि ' गूढार्थदीपिकेंत ' तर, अमायिक भगवद्देहही मानला आहे. तेव्हां प्रथमपक्षीं मायिक आणि द्वितीयपक्षीं ब्राह्म असेंच रूप भगवद्देहाचे ठिकाणीं सिद्ध होत आहे. सन्निधानवैलक्षण्यावांचून उपलक्षण व विशेषणाचा भेद संभवत नाहीं. ह्मणून, दोन्हीपक्षीं विग्रहोपलक्षित आणि विग्रहविशिष्ट असा भेद करणें योग्य होत नाहीं. आतां भगवद्देह द्रव्यरूपगुणविशिष्ट आहे, आणि भगवदात्मा रूपवत्भगवद्देहद्रव्योपलक्षित आहे,

असेंही ह्मणतां येत नाहीं. मायेमध्यें द्रव्यगुणांचा भेदेंकरून अंगिकार नाहीं. आतां, भौतिकपक्षीं रूपविशिष्टत्वाचा निषेध केला असेल, तर आह्मांला इष्टापत्ति आहे "हिरण्यश्मश्रुहिरण्यकेशः, इत्यादि वर्तमान अपरोक्ष ब्रह्म आरोपित नाहीं, कारण, स्त्रीचे ठिकाणीं अग्नित्व जें श्रुतीनें आरोपित केलें आहे तें अपरोक्ष होत नाहीं, असें पूर्वपक्षानें ह्मटलें असतां, मधुसूदन ह्मणतात, प्रतीकोपासनेमध्यें साक्षात्कार होतोच असा नियम नसला तरी, सगुणोपासनेमध्यें साक्षात्कार होतोच अशी श्रुति आहे " तस्य स्याद्द्धा " इत्यादि वाक्यें प्रमाणार्थ समजावीं; पण हें मधुसूदनाचें ह्मणणें तरी, विलक्षणच आहे. प्रतिकभीन्न हें सगुणस्वरूप काय आहे? बरें, प्रतीकभिन्न जर हा सगुणाकार निराळा आहे, तर तो भौतिक विलक्षणच असला पाहिजे; आणि केवळ ध्यानसिद्ध नसून, वस्तुसिद्ध असला पाहिजे. त्याला मायाकार्य मानलें, तर मधुसूदनासहित अनेक ग्रंथकारांचा कसा विरोध येतो हें आह्मीं वर सांगितलेंच आहे. 'विश्वतश्चक्षु' इत्यादि श्रुतींचा अर्थ जो मधुसूदनानें केला आहे, तो निवळ चुकीचा होय, असें आम्हीं ह्मणत नाहीं. परंतु, तो लक्ष्यार्थ आहे. लक्ष्यार्थाला वाच्यार्थ अवश्य असावा लागतो; ह्मणून त्या श्रुतीचा शक्यार्थ अनध्यस्तविवर्तपर आहे, असें आम्हीं म्हणतों. सर्वतः पाणिपादांचा असंभव आहे म्हणून, 'विश्वतश्चक्षु' इत्यादिवाक्यें अंतर्यामी परमेश्वराविषयीं जीवाच्या हातपायांला घेऊन प्रवृत्त झालीं आहेत, याप्रमाणें हा शब्द अनुवादक आहे, हेंही मधुसूदनाचें म्हणणें कितपत योग्य असेल बरें! कारण, जीवाचे भौतिक हातपाय घेऊन, सर्वतः पाणिपाद इत्यादि ब्रह्म उपास्य होऊं शकत नाहीं. यद्यपि प्राण वगैरे शब्दांनीं ब्रह्माची उपासना सांगितली आहे, तथापि ती प्राणव्यतिरेकपूर्वक प्राणसमशक्तित्वानें सांगितली आहे. प्राणवायूला घेऊन सांगितली नाहीं. पुनः 'प्राणोब्रह्म' इत्यादि श्रौतलिंग उपास्यप्रदर्शक आहे; ज्ञेयत्वदर्शक नाहीं. यद्यपि प्रज्ञाप्राणसमन्वयेंकरून कौषीतक्युपनिषदेमध्यें बालाकीला प्राणाचा ज्ञेयब्रह्मत्वेंकरून उपदेश केला आहे, तथापि "अतएवप्राणः" इत्यादि सूत्रामध्यें उपास्यत्वेंकरूनच भगवान वेदव्यासांनीं समन्वय केला आहे. अथवा ज्ञेयत्वेंकरून मानला तरी, प्राणगुणारोपपूर्वकच प्रथम ध्यान सांगून नंतर तद्गुणव्यतिरेकानेंच ज्ञान करून घेतलें

पाहिजे; शिवाय उपासनाही जीवभेदें करूनच सांगितली आहे, याविषयीं ब्रह्मसूत्र अध्याय, पाद २, सूत्र ४–५ वरील शांकरभाष्य पहावें.

मध्यस्थः– अहो मनोमयत्वादि जीवसंबंधीं गुणही, परमेश्वराचे ठिकाणीं स्थापून उपासना सांगितली आहेना ?

सिद्धान्तीः— होय, पण तद्गुणाधीकरणसंबंध जरी जीवाला दिसतो, तरी ते गुण साक्षात् जीवाचे ठिकाणीं उपपन्न नाहींत. सत्यसंकल्पत्वादि हे ते गुण होत. म्हणून ते जीवाचे ठिकाणीं दिसत नाहींत. पण भौतिक हातपाय परमेश्वराचे ठिकाणीं मानल्यास, "ननु ईश्वरोऽपि शरीरे भवति। सत्यं शरीरे भवति, न तु शरीर एव भवति" ईश्वर शरीरांत असला तरी, शरीररूप होत नाहीं इत्यादि भाष्याचा विरोध येतो. पृथिव्यादिकाला घेऊन जें परमेश्वराचें निरूपण केलें आहे, तें उपास्यत्व सांगण्यासाठीं नाहीं, अंतर्यामित्व सांगण्यासाठीं आहे, आणि पृथिव्यादिकाला घेऊन जी ईश्वराची उपासना सांगितली आहे, ती तर, मायामय पृथिवीवदवच्छेदानें, किंवा धारकत्वादि पृथ्वीसमशक्तित्वानें, सांगितली आहे असें समजावें. परमेश्वर शरीर होत नाहीं इत्यादि भाष्यें जीवशरीरनिषेधपरच आहेत. अक्षिणिपुरुषउपासनेमध्यें देखील, हिरण्यश्मश्रुत्वादि विशिष्ट रूपाविषयीं, मायाकार्यत्वाचा भाष्यकारानीं अंगिकार केला आहे. तेव्हां भौतिक शरीर उपास्य होतच नाहीं. आणि प्रतीकाभिन्न सगुणोपासना साकार मानली नाहीं तर आविद्यसमत्वानें, जीवालाही तसें; सगुणत्व येण्याचा संभव आहे.अवयवभेद मानला कीं, साकारत्व आलेंच. शिवाय साकारत्व व्यापक नसतें, असेंही ह्मणतां येत नाहीं; कारण, परब्रह्माचे ठिकाणीं आकाशादि दोष विषमसत्ताक आहेत. अल्प अशा कंठनाडीचे ठिकाणीं, आपण स्वप्नामध्यें, ब्रह्मांडासहित पूर्ण आकाश पहातों, तेव्हां आकाशादि दृष्टान्तावरून केलेली व्यापकत्वाची कल्पना शब्दमूलक नसेल तर, तुच्छ आहे. आणि शब्दमूलक असेल तर, अघटितघटनापटुमायासामर्थ्येंकरून अल्पस्थानींही समान आहे; ह्मणून दोष येत नाहीं. 'सर्वतः पाणिपादन्तः' सर्वीकडे हात पायाचा असंभव ह्मणणेंही योग्य नाहीं. कारण, जिकडे तिकडे हातपाय असणारे कांहीं किडे ज्याच्या मायेनें निर्माण होतात, ती माया सर्वीकडे हातपाय

निर्माण करूं शकणार नाहीं, हें म्हणणें श्रुतिविरुद्ध आहे; आणि पुनः त्रिविक्रमावतार तीन पायांत ब्रह्मांड आटविणार म्हणून पुराणांत सांगितला आहे. युक्तीपेक्षां पुराणवचन देखील प्रमाणच आहे. किंवा, 'सर्वतः पाणिपादं' इत्यादि वाक्यें विराटपर घेतलीं तर, " पंचमुखं षण्मुखं " इत्यादि वाक्यें तरी भौतिकभिन्नमायाकार्यपर घ्यावीं लागतील. त्या दृष्टीनें आमुचें द्विभुजश्रीकृष्णब्रम्ह शांकरमतानें मायाकार्य, पण मधुसूदनाच्या गूढार्थदीपिकेच्या मतानें तर, ब्रम्हस्वरूपच ठरत आहे. याविषयीं गीतेच्या चवथ्या अध्यायांतील ६।७।८ श्लोकांवरील टीका पहावी. तिचा समन्वयही अद्वैतसिद्धींत केला नाहीं. ह्मणून स्वामीचें साकार निषेध करणें, आपल्या पायावर धोंडा पाडून घेण्याप्रमाणें, स्ववचनविरुद्ध आहे. पुनः मधुसूदन म्हणतात. देशविशेषावच्छिन्न क्रममुक्तिप्रवेष्टृत्वादिक सांगतां येणार नाहींत हें म्हणणें योग्य नाहीं, मायेंत सामर्थ्य आहे म्हणून. ' विकरणत्वान्नेतिचेत्तदुक्तम् ' (द्वितीयाध्याय, पादप्रथम, सूत्र ३१.) या सूत्राच्या भाष्यांत ब्रम्हाला इंद्रिय नसल्यामुळें, सर्वशक्तित्व, संभवणार नाहीं, या पूर्वपक्षावर, श्रुतीनें सांगितलें आहे तसें मानलेंच पाहिजे, असें उत्तर दिलें आहे. श्रुतिच ब्रह्माचें ठिकाणीं शरीर सांगत आहे, याविषयीं "त्रिपादमहानारायणोपनिषदेंत श्रुति पहाव्या. " साकारस्तु द्विविधः । सोपाधिको निरुपाधिकश्च । निरुपाधिकसाकारस्त्रिविधः । ब्रह्मविद्यासाकारश्चानन्दसाकार उभयात्मकसाकारश्चेति । त्रिविधसाकारोऽपि पुनर्द्विविधो भवति । नित्यसाकारो मुक्तसाकारश्चेति । नित्यसाकारस्त्वाद्यन्तशून्यः शाश्वतः । नित्यसाकारस्त्वैच्छिक इति । तस्मात्परब्रम्हणः परमार्थतः साकारनिराकारौ स्वभावसिद्धौ " । पण मधुसूदन याच प्रकरणांत पुढें श्रुतिमात्रानें ब्रह्माचें ठिकाणीं, शरीरसिद्धीचा निषेध करीत आहे, आणि येथें " अविद्यापरिणामस्य करणस्थानीयस्यांगीकारादविरोधात् " असें म्हणत आहे. करणस्थानीय अविद्यापरिणामाचा अंगीकार आहे, असा या वाक्याचा अर्थ आहे. आचार्यांनींही या सूत्राच्या भाष्यांत अविद्यामयरूपाचा उपन्यास केला आहे। परंतु करणस्थानीय अविद्यापरिणाम व्यापक आहे, कीं अव्यापक आहे? प्रथमपक्षीं, जीवाच्याही अविद्येंत तो असल्यामुळें, सर्वज्ञत्वादि त्यालाही प्राप्त होतील, आणि द्वितीयपक्षीं,

ईश्वराला सर्वेशत्वादि धर्म येणार नाहींत " अपाणिपादो जवनो गृहीता " हात पाय नसून जो गमनागमन करितो इत्यादि श्रुति वास्तविक हात-पायांचा निषेध करीत आहेत. वैवर्तिक हातपायांचा निषेध करीत नाहीं; म्हणूनही परमेश्वराकार विरुद्ध नाहीं. मायाकार्यभगवच्छरीरांतील अडचणी आम्हीं दाखविल्याच आहेत; म्हणून मायाकार्योपपत्तीनें भूतकार्य-भगवच्छरीराचा निषेध करून, अनध्यस्तत्वांगीकरणानें, आम्हीं माया-कार्यत्वाचाही निषेध करितों. आणि विवर्तत्वाधिष्ठानानें शुद्ध ब्रह्माचीही स्थिति राहते. श्रुतिही यावत् ईश्वर तच्छरीरनित्यत्वाचा बोध करिते. कल्पांतीं अच्युतशरीराचा नाश, जो महाभारतांत सांगितला आहे. तो देवादि सर्वलोक–अदर्शनरूप आहे, अभावरूप नाहीं; कारण, वेदान्तांत यावत्संसार सत्कार्यवाद आहे म्हणून इतर संसार यावदविद्या सत्य आहे; आणि भगवच्छरीर यावदीश्वर सत्य आहे. मुक्तप्राप्येश्वरपक्षाचे ठिकाणीं, ईश्वराची नित्यता शांकरभाष्य आणि सिद्धान्तलेश ग्रंथांत सांगितली आहे, म्हणून भगवदाकार असिद्ध नाहीं. पुनः मधुसूदन म्हणतात.–द्वैती म्हणतो कीं, " तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशत् " या श्रुतीमध्यें ब्रम्हाचा प्रवेश सांगितला आहे आणि " ब्रह्मविदाप्नोति परं " या श्रुतीमध्यें ब्रम्हाला मुक्ताच्या जाण्याचें ठिकाण सांगितलें आहे. यावरून ब्रम्हाला आकार असला पाहिजे, हें या द्वैतीयांचें म्हणणें, बरोबर नाहीं. त्याला उत्पन्न करून, मागाहून त्यांत प्रवेश करितो असा पहिल्या श्रुतीचा अर्थ आहे; म्हणजे, मन आदिक जें अविद्येचें कार्य त्यांत जीवादि स्फूर्तिरूपानें, अभिव्यक्त होतो. परब्रम्ह व्यापक असल्यामुळें, त्याचा साक्षात् प्रवेश संभवत नाहीं. ब्रह्मविद् परंपदाला जातो; यांत जें प्राप्यत्व सांगितलें आहे, तें आरोपित सगुणरूपाचें दर्शक आहे, किंवा सगुणोपासनेनें साक्षात् मुक्ति होते, या पक्षाचे ठिकाणीं तदुपहित आत्मज्ञानाचें निदर्शक आहे, अथवा, अविद्यानाशानें तात्कालिक मुक्ति देणाऱ्या निर्गुणज्ञानाचें निदर्शक आहे. याप्रमाणें " तमेवं विद्वान् " इत्यादि द्वैती लोकांनीं लावलेल्या श्रुतींचेंही व्याख्यान करावें. याप्रमाणें मधुसूदनाच्या म्हणण्यावर तरंगिणीकारांनीं दोष आणले आहेत. कारण, ' न्यायामृत तरंगिणी, हा ग्रंथ ' अद्वैतसिद्धीचें ' खंडण आहे, परंतु ते दोष योग्य

नाहींत, कारण सर्वच ब्रह्म विग्रहरुप आहे, असें समजून त्यांनीं ते दोष आणले आहेत. सर्वच ब्रह्म विग्रहरुप मानल्यास जीवाला ही विग्रहरूप मानावें लागेल, मग ज्ञानानें ब्रह्मप्राप्ति होणार नाहीं आणि क्रियेनें झालेली प्राप्ति टिकणार नाहीं. ह्मणून ज्ञानानें निर्गुणप्राप्ति झाल्यावर यावद्व्यवहार मुक्तांचें आनंदस्फूर्तीनें सगुणप्राप्य आहे. जसें, स्वर्णकणाला मिळालेलें स्वर्णत्व स्वर्णावरच राहतें, तद्व्याप्य अलंकारावर राहत नाहीं, तद्वत् जीव निर्गुणाचे ठिकाणीं प्राप्त होऊन, ईश्वराचा खंड, ब्रम्हप्राप्तीची जागा नसल्यामुळें, ईश्वराचेच ठायीं तो प्राप्त इव होतो. विवरणकार तर, ईश्वरच मुक्तप्राप्य असून ईश्वराची प्राप्ति ही शुद्धाचीच प्राप्ति आहे, असें म्हणतात, म्हणून अलंकाराप्रमाणें स्थित असलेल्या विग्रहाचा मुक्तप्रेमानंदाशीं विरोध नाहीं. स्वर्णालंकाराप्रमाणें जीवही स्वर्णकणरूप आहे ह्मणून विग्रहवान् आहे, असें म्हणण्याची आवश्यकता नाहीं; कारण, तसा शद्ब नाहीं. परमेश्वराविषयीं आणि परमेश्वरविग्रहा-विषयीं त्रिपादविभूतिमहानारायणोपनिषतश्रुति प्रसिद्ध आहेत. आतां जीव निर्गुण, आणि सगुणाची प्राप्ति विरुद्ध आहे, असें म्हणतां येत नाहीं; कारण निर्गुण ईश्वराला तो प्राप्त होऊन, अनध्यस्तविवर्तरूपानें, तो विग्रह होऊं शकतो.

मध्यस्थ उवाचः– अहो ! आरोपितरूप तर मधुसूदनानाही कबुलच आहे. मग तुम्ही त्याचें खंडण कां करितां ?

सिद्धान्ती उवाचः— असलें म्हणून काय झालें ? मधुसूदन हा, मायेचा परिणाम ईश्वरशरीर मानतो; आणि आम्हीं मायेनें आरोपित केलेला चैतन्याचा धर्म भगवच्छरीर मानतों. तो स्थूलवत् असला तरी भक्तांच्या हृदयांतही प्रवेष्टुं योग्य असल्यामुळें, स्थूलद्रव्यवत् मर्यादापन्न नाहीं.

वादी उवाचः–विवर्त असला तरी कशाचा तरी परिणाम असलाच पाहिजे ?

सिद्धान्ती उवाचः– अनध्यस्तविवर्ताविषयीं हा नियम लागू नाहीं. कारण स्वर्णालंकाराचे ठिकाणीं अलंकार जसा विवर्त आहे, तसा तो कशाचा तरी परिणाम आहे, असें दिसत नाहीं; कारण, परिणामी-

द्रव्याचे घटक परिणामाचे ठायीं असतात. रज्जुसर्प हा भ्रांतीचा परिणाम आहे. कारण, भ्रांतिनिवृत्तिबरोबर तो निवृत्त होतो. अलंकार कल्पणाऱ्याची बुद्धि अलंकार कल्पून जशी निराळी असते, त्याप्रमाणें माया ही परमेश्वराचे ठिकाणीं शरीर कल्पून निराळी राहते. जशी रज्जुसर्प कल्पणारी भ्रांति सर्पाहून निराळी राहत नाहीं, तशी संसार कल्पणारी अविद्या संसाराहून निराळी राहत नाहीं. ज्याप्रमाणें घटाकाशाचे अवच्छिन्नत्वादिक धर्म आकाशाशींच अभिन्नत्वानें प्रतीत होतात, रूपादिकांप्रमाणें घटाशीं अभिन्नत्वानें प्रतीत होत नाहींत; किंवा घटावच्छिन्नत्व आकाशाचेंच विशेषण होतें, घटाचें होत नाहीं, त्याप्रमाणें, मायावच्छेदकृत विग्रहत्व चैतन्याचेंच विशेषण होतें, मायेचें होत नाहीं. यद्यपि घटाचें घटावच्छिन्नत्व विशेषण, नैय्यायिक मतांत होऊं शकतें, तथापि वेदान्तपरिगृहीतपक्षतावच्छेदकत्व नैय्यायिकमताला प्राप्त होत नाहीं. अथवा, निराकार जी घटत्वजाति तिचा साकार घट, अवच्छेदक होतो, तथापि अवच्छिन्नत्वधर्म निराकारघटत्वजातीचा होतो, साकार घटाचा होत नाहीं; त्याप्रमाणें, सांशमायावच्छेदकृतविग्रहत्व निरंशब्रम्हाचाच धर्म किंवा विशेषण होतें; सांश मायेचा धर्म किंवा विशेषण होऊं शकतच नाहीं.

वादी उवाचः— अहो विग्रहाचे ठिकाणीं परिच्छिन्नत्व आहे. घटावच्छेदावच्छिन्नघटत्वाचे ठिकाणीं परिच्छिन्नत्व नाहीं. म्हणून नैय्यायिकाचें समाधान करण्याकरितां तरी, तुमचा दृष्टान्त विषम आहे. कारण, नैय्यायिकमतांतही परमात्मा, विभु असल्यामुळें, विग्रहवान् संभवत नाहीं.

सिद्धान्ती उवाचः— वादीचें म्हणणें योग्य नाहीं व आमचा दृष्टान्तही विषम नाहीं. कारण, सन्निहितघटावच्छेदकावरून, जरी अखिलघटावच्छेदकावच्छिन्नघटत्वाचें ज्ञान होतें, तथापि तें अलौकिकसन्निकर्षजन्य आहे, किंवा सामान्यलक्षणसन्निकर्षजन्य आहे; अथवा परोक्ष आहे किंवा आश्रयपरोक्ष आहे; त्यामुळेंच सन्निहितघटावच्छेदकत्वेंकरून तदवच्छिन्नघटत्वाचे ठायीं, लौकिकसंन्निकर्षजन्य किंवा अपरोक्ष किंवा आश्रयापरोक्षरूप परिच्छेदाचें अनुभवज्ञान होतें, ह्मणून दृष्टान्त सम आहे. यद्यपि नैय्यायिक परमात्मा विभु मानतात. तथापि परमाणुशरीरवादी

आकाशरीरवादी, आणि आविष्टशरीरवादी नैय्यायिकांत आहेत, त्यामुळें नैय्यायिकांनां भगवद्विग्रह अपरिचित नाहीं. निराकारकाल ज्याप्रमाणें वेदान्तपरिभाषाकार इंद्रियग्राही मानतो, त्याप्रमाणें निर्गुणचैतन्यही अध्यस्तविवर्तत्वेंकरून, प्रतीत होण्यास हानि नाहीं. शिवाय गूढार्थदीपिकेंत वास्तविकशरीरांचें निराकरण करून, मायाकार्यशरीराचेंही मधुसूदनानें निराकरण केलें आहे. आणि प्रौढीवादार्थ मायाकार्यवादाचा स्वीकारही केला आहे. त्याप्रमाणें, येथील साकारखंडणही प्रौढीवादमात्र आहे, तथापि तें प्रेमाची अप्रौढी मात्र सुचवितें; कारण गूढार्थदीपिकेंत मधुसूदन ह्मणतात " ध्यानाभ्यासवशीकृतेन मनसा तन्निर्गुणं निष्क्रियं । ज्योतिः किंचन योगिनो यदि परं पश्यंति पश्यंतु ते । अस्माकं तु तदेव लोचनचमत्काराय भूयाच्चिरम् । कालिंदीपुलिनोदरे किमपियन्नीलं महो धावति ॥ "

शार्दूलविक्रीडित.— योगाभ्यास करोनि निर्गुण मनीं ध्याताति जे संप्रती । त्यांचें सौख्य तयां असो परि अम्हा साकार डोळ्यांप्रती । कृष्ण ब्रह्म असो मनांतहि वसो केव्हां तुटीही नसो । जें नीलोज्वल सूर्यनंदिनितटीं खेळे सुखी तें असो ॥ १ ॥

सगुणविद्याउपलक्षित आत्मज्ञानानेंच साक्षात् मोक्ष होतो असा जो मधुसूदनाचा येथें आग्रह दिसतो तो, 'नित्य साकारः' या महानारायण श्रुतिवचनावरून, " मुक्ता अपि लीलया विग्रहं कृत्वा भजन्ते " इत्यादि भगवत्पूज्यपादवचनावरून, आणि 'गूढार्थदीपिका' 'संक्षेपशारीरकटीका' 'सिद्धान्तबिंदु' आणि 'आनंदमंदाकिनी' इत्यादि ग्रंथांतील स्ववचनावरूनही, निरर्थक ठरतो. पुनः मधुसूदन म्हणतो.— परमेश्वरविग्रह पंचभूतांनीं घडविलेला आहे कीं पंचभूतांनीं घडविलेला नाहीं ? पंचभूतांनीं केलेला नसला तरी, तो मायाकृत आहे, कीं मायाकृत नाहीं ? मायाकृत नसला तरी, तो ब्रह्मभिन्न आहे कीं ब्रह्माभिन्न आहे ? भौतिक व मायिक धरला तरी, स्वकर्मार्जित आहे कीं परकर्मार्जित आहे ? यांतील, स्वकर्मार्जित भौतिक किंवा मायिक परमेश्वराचा विग्रह आहे, हा प्रथमपक्ष योग्य नाहीं. कारण, तो मानल्यास ईश्वरही संसारी होतो, आणि भौतिक अथवा मायिक भगवद्विग्रह परकर्मार्जित म्हणजे जीवकर्मजन्य आहे, हा पक्ष आम्हाला मान्य आहे. आतां अमायिक विग्रह

ब्रह्मभिन्न आहे, असें मानल्यास द्वैतीचा अपसिद्धान्त होतो. ' नेतिनेति ' या श्रुतीनें त्याचा निषेध होत असल्यामुळें, ' अपाणिपादो जवनो गृहीता। पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः ' इत्यादि श्रुतींचा विरोध येतो. कारण, पाय नसलेला जो चालतो, हात नसलेला ग्रहण करितो, डोळ्यांवांचून पहातो व कानावांचून ऐकतो; असा श्रुतीचा अर्थ असून यांत ब्रह्मच स्पष्ट विशेष्य आहे. बरें, अमायिक देह ब्रम्हाशीं अभिन्न मानला तरीही, उक्तश्रुतीचाच विरोध येतो आणि चार्वाक मताचा प्रवेश होतो. पुनः प्रमाणही कांहीं सांपडत नाहीं. म्हणून भगवद्विग्रहसिद्धि होत नाहीं.

सिद्धान्ती उवाचः— वाहवा ! काय म्हणावें या मधुसूदनाच्या विज्ञानाला ? परकर्मार्जित परमेश्वराचा भौतिक देह देखील याला इष्ट आहे, पण भौतिक देह परकर्मार्जित असूंच शकत नाहीं. आवेशावताराचे ठिकाणीं जर मधुसूदनाचें म्हणणें लागू करावें, तर तेंही बरोबर नाहीं. कारण, त्या देहावर जीवाचाच अभिमान असतो, परमेश्वराचा नसतो. अथवा अंतर्यामित्वेंकरून आणि " यस्य पृथिवीशरीरं " इत्यादि श्रुतींवरून, सर्वच भौतिक पदार्थांत परमेश्वराचा आवेश असल्यामुळें, सर्वच भौतिक पदार्थ परमेश्वराचीं शरीरें होतील. आणि परमेश्वर सर्वविग्रहवान् ठरेल. मग अनुप्रवेश मानला तरीही, परमेश्वराचा विग्रह होत नाहीं, ही जी मागें द्वैतियावर मधुसूदनानें कोटी केली ती व्यर्थ होते. चंद्रिकाकारानें 'जीवादिरूप अभिव्यक्ति' अनुप्रवेशाचा अर्थ केला आहे, परंतु तो " यस्य आत्माशरीरं " या श्रुतीशीं विरुद्ध आहे. यद्यपि जीवांतील चैतन्यांश ईश्वराचें शरीर होत नसलें, तरी आभासांश, परिच्छिन्नत्वास्तव अवच्छेदक होत असल्यामुळें, भगवच्छरीराप्रमाणें होतो; म्हणून श्रुतीचें म्हणणें सार्थक आहे. आवेशावताराचे ठिकाणीं जीव आणि आविष्ट ईश्वर जसा दृष्टीस पडतो, तसा कृष्णविष्णुशिवशरीराचे ठिकाणीं अन्यजीव आरूढ दृष्ट नाहीं. यद्यपि सायुज्यप्राप्तजीव आहीं शरीराचे ठिकाणीं राहात असतात, तथापि उपास्यत्वाश्रित धर्मीशरीराचे ठायीं, परमेश्वराहंस्फूर्तिच अनुगत असते. सायुज्यप्राप्तजीवांची अहंकृति तर भोक्तृत्वेंकरूनच असते, सृष्टिकर्तृत्वादिकेंकरून नसते; आणि असुरपरिहरणादिकत्वेंकरूनहि नसते, कारण तो सृष्टिपालनव्यापार आहे. जगद्व्या-

पाराधिकरणांत भगवत्पूज्यपादाचार्यांनीं हेंच सिद्ध केलें आहे. आविष्ट शरीराची गोष्ट तशी नाहीं. त्याठिकाणीं शरीरावर जीवाचा अभिमान मुख्य असतो, आणि ईश्वराची अहंस्फूर्ति गौण असते; किंवा आवेश-शरीरांतही ध्यानरूपानें अनध्यस्तविवर्त विग्रही परमेश्वरच घरांतील माणसाप्रमाणें रहात असतो. या विषयीं "जे ध्यानमिषें घर । माझें झालें" हें तातवचन प्रमाणहि आहे; नाहींतर जीवादिकाप्रमाणें बुद्ध्यादिकांमध्यें परमेश्वराला प्रथम आविष्ट व्हावें लागेल, तसें मानलें म्हणजे, ईश्वराला आभासत्व येऊन जीवत्व येईल आणि जीवईश्वरांचें सांकर्य होईल. औपाधिक कल्पनेनें देखील जीवाचा व ईश्वराचा उपाधि एकच झाल्यामुळें, सांकर्यपरिहार करतां येणारनाहीं; असेंहि करण्याचें अघटित-घटनापटुत्व परमेश्वराचे ठिकाणीं आहे, असें जर मधुसूदनयतिभक्त म्हणेल, तर अनध्यस्तविवर्तविग्रहाचें अघटितघटनापटुत्वसामर्थ्य परमेश्वराचे ठिकाणीं नाहीं असें या भक्ताचें म्हणणें प्रमाणशून्य व युक्तिशून्य ठरतें; म्हणून भौतिक देह स्वकर्मार्जितच आहे, हें म्हणणें बरें आहे; आणि परकर्मार्जित भौतिक किंवा मायिक परमेश्वरदेह नाहीं; याचेंही आम्हीं याच वल्लींत निरूपण केलें आहे. आतां ब्रह्मभिन्न मायिक देह, कोणीच द्वैती ईश्वरवादी मानीत नाहींत; म्हणून, ही उत्थाप्य शंका घेऊन द्वैती मतावरील मधुसूदनाची कोटी छलरूप आहे. मी स्वतः द्वैती नाहीं, तथापि स्वपक्षीयांच्या छलाचा गुण गाणाराही नाहीं; अथवा चिदचित् भगवच्छरीर मानणाऱ्या रामानुजमतांत हा अपसिद्धान्तही होत नाहीं; ह्मणून मधुसूदनाच्या ह्मणण्यांत न्यूनदेशवर्ति छलत्व हें महादूषण प्राप्त झालें आहे. आतां, भगवद्विग्रह ब्रह्माशीं अभिन्न मानला असतां, जो उक्तश्रुतीचा विरोध ह्मणून मधुसूदनानें सांगितला तो येत नाहीं, कारण, " नित्यसाकारः " इत्यादि महानारायणोपनिषत्श्रुति विद्यमान आहेत; आणि "अपाणिपादो जवनो गृहीता" इत्यादि श्रुति जरी पाणिपादादि सावयव शरीराचा निषेध करीत असल्या, तरी त्या काय ब्रह्माचें साक्षित्व सांगतात, कीं वृत्तिविशिष्ट विषयग्राहकत्व सांगतात? प्रथमपक्ष योग्य नाहीं. कारण, विषयाचे ठिकाणीं व वृत्तीचे ठिकाणीं साक्षीचा समप्रकाश आहे. पाषाणादिकांचे ठिकाणीं देखील आभास नसला तरी, साक्षिचैतन्य आहेच आहे, असें

विद्यारण्यांचें ही पंचदशींत वचन आहे. साक्षिचैतन्यपर श्रुति लावल्यास 'नित्यसाकार:' इत्यादि श्रौतपदें निरालंबन ठरतील. एका श्रौत पदाला देखील निरालंबन ठरविणें उत्तरमीमांसेंत भगवत्पूज्यपादाचार्यांनीं तुच्छ मानलें आहे. ह्मणून, सर्वज्ञत्वादि ईश्वराचे धर्म मुक्तींत राहतात, असा अंगिकार ब्रह्मसूत्रीय शांकरभाष्यांत, केला आहे, द्वितीयपक्ष मानला तर, वृत्तिविशिष्ट ब्रह्मच विषयग्राहक मानावें लागेल. ती वृत्ति मायेची आहे, असें मानल्यास, मायेच्या कारणवृत्तींत भेद असूं शकत नाहीं; कार्यवृत्तींतच भेद असूंशकतो; आणि मायाकार्यवृत्तिविशिष्टईश्वरचैतन्य विषयग्राहक मानल्यास, त्याचें जीवत्व चुकवितां येत नाहीं; अथवा कारणमायांतर्गत सत्वमात्रवृत्तिविशिष्ट ईश्वरचैतन्य, विषयग्राहक आहे, असें म्हणेल तर पश्यति शृणोति इत्यादि श्रौतपदें जरी सालंबन ठरतात, तरी 'जवनो गृहीता' इत्यादि पदें निरालंबन ठरतातच; कारण जवनग्रहण रजोवृत्तीवांचून घटत नाहीं. म्हणून त्याचा अर्थ अत्यंत शुद्धब्रह्मपर किंवा मायाकार्यपर न लावतां, अनध्यस्तविवर्तपरच लावावा लागतो ज्याप्रमाणें न्यायमकरंदकारानें युक्तिसालंबनसिद्ध्यर्थ, मुक्तीचे ठिकाणीं, पंचम प्रकाराचा अंगीकार केला आहे; आणि मधुसूदनानें या अद्वैतसिद्धींतच त्याचा अनुवादही केला आहे; त्याप्रमाणें, त्याहीपेक्षां उत्तम अशा श्रुतिसालंबनसिध्यर्थ, आम्हीं अनध्यस्तविवर्तभगवद्विग्रहाचा अंगीकार करितों. मायिक किंवा भौतिक परमेश्वरदेह नाहीं, आणि वास्तविक शुद्धब्रह्महीं देहस्वरूप नाहीं, तर कोणत्या तरी प्रकारानें, भगवद्विग्रह परमेश्वराशीं अभिन्न आहे; या पक्षाचा अंगीकार गूढार्थदीपिकेंत चवथ्या अध्यायांत मधुसूदनानें जाणून केला आहे; म्हणून, ब्रह्माभिन्नभगवद्विग्रहाचे ठिकाणीं प्रमाण नाहीं असें जें मधुसूदनाचें ह्मणणें, त्याचा अर्थ मेलेल्या मधुसूदनाच्या पैशाच देहाचा साक्षात्कार करून वादीनें त्यालाच विचारावा. ब्रह्माशीं अभिन्न परमेश्वरदेह मानल्यास चार्वाकमतप्रवेश होतो, असें मधुसूदनानें ह्मटलें आहे तें अतिछलमात्र असून, त्यानें त्याची दुर्बुद्धि मात्र प्रगट केली आहे. कारण हें ह्मणणें त्याच्या गीतागूढार्थदीपिकावचनाशींच विरुद्ध आहे. पुनः चार्वाकाचा देहात्मवाद जीवविषयक आहे. चार्वाकाला ईश्वराची प्रतीति नाहीं. ह्मणून ईश्वरदेह ब्रह्मभिन्न कीं ब्रह्माभिन्न याविषयीं चार्वाक

विचार करूं शकत नाहीं. शांकरवेदान्ती लोकांनीं चार्वाकाला त्वंपद-विवेकांतच प्रथमभूमिकास्थान दिलें आहे. "तृणार्चकादियोगान्ता ईश्वरे भ्रांतिमाश्रिताः। लोकायतादि सांख्यान्ता जीवे विभ्रांतिमाश्रिताः" चित्रदीप श्लो० २७ या विद्यारण्योक्त पंचदशीस्थ चित्रदीपवचनाचा भावार्थ आणि अभिप्राय असा आहे, कीं गवताची पूजा करणाऱ्या पासून तर योगियापर्यंत, ईश्वराविषयीं सर्व भ्रांतींत आहेत आणि लोकायत ह्मणजे देहात्मवादी चार्वाकापासून तर सांख्यापर्यंत, जीवाविषयीं भ्रांतिष्ठ आहेत; ह्मणजे, पहिल्या पक्षाला ईश्वर समजला नाहीं व दुसऱ्या पक्षाला जीव समजला नाहीं. न समजो; परंतु ईश्वरवादीपक्ष उपास्यत्व घेऊन प्रवृत्त झाला आहे, चार्वाकपक्ष कोणतेंच उपास्यत्व घेऊन प्रवृत्त झाला नाहीं. ह्मणून, ब्रह्माशीं अभिन्नईश्वरविग्रहमतांत चार्वाकमताचा प्रवेशच संभवत नाहीं. ईश्वर जरी या लोकांना समजला नाहीं, तरी वाकसकुदळी इत्यादि पदार्थांतून कोणताही पदार्थ ईश्वर मानून पूजला असतां फलदायी होतोच; असें विद्यारण्यस्वामींनीं चित्रदीपांतच म्हटलें आहे. आतां त्याला जें अल्पफल होतें त्याचें कारण कामनादोष आहे.

वादी उवाचः– अहो ! ' न्यायकुसुमांजलींत ' उदयनाचार्यांनीं चार्वाकही उपास्यवृत्ति घेऊन अंशांतरानें ईश्वर मानतात, असें म्हटलें आहे, आणि चार्वाकदर्शनांतही, वैभवशाली राजाच ईश्वर आहे, असें माधवाचार्यांनीं निरूपणही केलें आहे; म्हणून चार्वाकाला ईश्वराची प्रतीति आहे; परंतु ती देहात्मरूपानेंच असल्यामुळें, ब्रह्माशीं अभिन्न भगवद्विग्रह मानणाऱ्याच्या मतांत, चार्वाकमताचा प्रवेश मधुसूदनानें सांगितलेला योग्य आहे.

सिद्धान्ती उवाचः– तुला भ्रम झाला आहे, त्याचें आम्हीं निराकरण करितों. चार्वाकानें राजा हाच ईश्वर आहे असें जें म्हटलें आहे, तें उपास्यवृत्तीला घेऊन म्हटलेलें नाहीं. तर तुम्हांला ईश्वर पाहिजेच तर राजालाच कां मानाना; व त्यासारखे तुह्मीं आपल्यास करून घ्याना; असें, लोकांच्या अध्या मताचा अंगीकार करून, त्यानें म्हटलें आहे. राजा ईश्वर आहे म्हणून त्याची उपासना करावी, अशा अभिप्रायानें म्हटलें नाहीं; कारण, ' ऋणं कृत्वा घृतं पिबेत् ' ऋण काढून सण करा-

वा इत्यादि त्यांचीं वाक्यें राजाज्ञारूप नीतीशीं विरुद्ध आहेत. बळें-करून कोणासही लुबाडणें, ही कोणत्याही राजाची आज्ञा असणें संभवनीय नाहीं; कारण, तशी आज्ञा करणाऱ्या राजालाच प्रजा प्रथम लुबाडील. आज्ञा उल्लंघन करणें उपासनेचें सूचक नाहीं; कारण सर्वथा उपास्याधीन होणें हें प्रेमाचें लक्षण आहे. व सर्वथा अधीन झाल्यावर आज्ञा उल्लंघन करण्याइतकी स्वतंत्रता संभवतच नाहीं; म्हणून, चार्वाकाचें राजाला ईश्वर मानणें ईश्वरप्रतीति-मूलक नव्हे. आतां न्यायकुसुमांजलींत उदयनाचार्यांनीं जें "लोकव्यवहा-रसिद्ध इति चार्वाकाः" असें म्हटलें आहे, त्याचा पूर्वापर अर्थ तूं ध्यानांत आण. प्रथम त्यानीं ईश्वरवादियांचीं मतें देतांनां प्रयोजनवाक्य उच्चारलें आहे तें हें. "यद्यपि यं कमपि पुरुषार्थमर्थयमानाः" कोणत्या तरी पुरुषार्थी साठीं सर्व ईश्वरवादी ईश्वराला मानतात असा त्या वाक्याचा भाव आहे. सर्वच ईश्वरवादी मोक्षाची इच्छा करीत नाहींत, असें त्या वाक्याचें व्यंग्य आहे. म्हणून लोकव्यवहारसिद्ध जो राजा तो ईश्वर, असें चार्वाकानें मानलें आहे. तें मोक्षासाठीं मानलें नाहीं, तर आम्हीं आतांच म्हटल्या प्रमाणें, लोकानां भुलविण्याकरितां मानलें आहे. कारण, मरणालाच त्यानें मोक्ष म्हटलें आहे, आणि मरण कांहीं त्याला राजापासून मागाव-याचें नाहीं, म्हणून चार्वाकाला ईश्वराची प्रतीति नाहीं. यास्तव ईश्वर-विग्रह मानणाऱ्यांच्या मतांत चार्वाकमतप्रवेश होतो, हें मधुसूदनाचें म्हणणें बरोबर नाहीं. यद्यपि वर्धमानाचार्यांनीं 'प्रकाश' नांवाच्या कुसुमांजलीवर केलेल्या टीकेंत, लोकांचे ठिकाणीं चतुर्भुजानें जो व्यवहार करितो तोच ईश्वर होय, अदृश्य ईश्वर असा कोणी नाहीं; असा " लोकव्यवहारसिद्ध इति चार्वाकाः" या वाक्याचा अर्थ केला आहे, तो अज्ञानपणाचा होय. कारण, चार्वाकाच्या मतांत चतुर्भुजईश्वराचा देह आहे, हें मंतव्यच संभवनीय नाहीं. प्रत्यक्षावांचून तर, तो प्रमाण मानीत नाहीं व चतुर्भुजाचे ठिकाणीं तर, अनुमान देखील चालत नाहीं, शब्दप्रमाणच चालतें. लोकाला भुलविण्याला राजा ईश्वर मानला तरी, त्याचाही नाश आपल्या प्रमाणेंच होतो, असें चार्वाक मानतात; ब्रह्माभिन्न भगवद्विग्रहवादी मानीत नाहींत; म्हणूनही त्यांच्या मतांत मधुसूदनोक्त चार्वाकमतप्रवेश होत नाहीं किंवा

" उक्तस्य गतिश्चिंतनीया " या न्यायानें वर्धमानाचार्यांच्या वाक्याचा असा आशय समजावा.— ज्या भोळ्या लोकांनीं चार्वाकाला म्हटलें कीं, अरे ! ईश्वर कोणीतरी अदृश्य आहे ना ? मग तुम्ही प्रत्यक्षप्रमाणच कसें म्हणतां ? तेव्हां तो ह्मणाला, तुमचा ईश्वर देखील चतुर्भुजादिरूपानें प्रत्यक्षच आहे, अदृश्य नाहीं, म्हणून तो नित्य नाहीं; कारण, " नैवात्मा पारलौकिकः " परलोकांत जाणारा आत्मा कोणी नाहीं, या चार्वाकवचनाशींच त्याचा विरोध येत आहे; अथवा चतुर्भुजादि दृश्य विग्रहवान् नित्य परमात्मा, जर वर्धमानाचार्यांच्या वाक्यावरून, तूं अंगिकार करीत असशील, तर तशा चार्वाकमताचा, ब्रह्माभिन्न भगवद्विग्रहवादियाच्या मतांत, प्रवेश झाल्यास काय हानि आहे ? चार्वाक हें नांव घेणें कांहीं दोष नव्हे. चार्वाकाचा अनित्यात्मवाद मानणें दोष आहे. आणि त्याचा तर ब्रह्माभिन्नविग्रहवादियांच्या मतांत प्रवेश होणें संभवनीयच नाहीं. आतां, नित्यपरमात्मा मानून विग्रहात्मवाद मानणें जर मधुसूदनाला दूषण वाटून, चार्वाकासारखें वाटत असेल, तर त्याला सांगावें कीं, थोडासा धीर धर; आम्हीं याची सिद्धि वेदान्तानेंच करून देतों; कारण नित्यआत्मा मानून अन्वयानें देहात्मवाद, अतिशय उच्च असा वेदान्तांत देखील मानला आहेच. श्रीमच्छंकराचार्यभगवत्पूज्यपाद अपरोक्षानुभूतींत ह्मणतातः— " मृद्रूपोहि यथा कुंभो तद्वद्देहोऽपि चिन्मयः । आत्मानात्मविवेकोऽयं मुधैव क्रियते बुधैः " भावार्थः— ( अनुष्टुप् ) मातीरूप जसा कुंभ तशी तनुहि चिन्मय । आत्मानात्मविवेकातें वायां मूढचि सेविती " ॥ १ ॥ या वाक्यांत व्यतिरेक गौण मानला असून, नित्यआत्म्याचा देहाचे ठिकाणीं अन्वय मुख्य मानला आहे. आतां मधुसूदनाला आम्हीं विचारतों कीं, आचार्यवचन तुला प्रमाण आहे कीं नाहीं ? नाहीं म्हणशील तर तूंहि आम्हांस प्रमाण नाहींस; कारण आचार्यच अद्वैताचे प्रवर्तक आहेत. प्रमाण आहे ह्मणशील, तर " तद्वद्देहोऽपि चिन्मयः " या वाक्याचा अर्थ काय भौतिकदेहपर लावतोस, मायाकार्यदेहपर लावतोस, कीं शुद्धचिन्मयदेहपर लावतोस ? प्रथमपक्ष संभवत नाहीं; कारण भौतिकदेहाचा सर्व आस्तिकवादियांनीं व्यतिरेक केला आहे आणि त्याला तुच्छ मानलें आहे. द्वितीयपक्षही संभवत नाहीं. कारण ज्ञानानें मायेचा निषेध होत

असतो व मायेचा निषेध झाल्यामुळें मायाकार्याचाही निषेध होतो. शिवाय माया किंवा मायाकार्य राखून ब्रह्माचा अन्वय संसारांतही सिद्ध आहे, मग त्याचा उपदेश करणें व्यर्थ होईल. कारण अज्ञात वस्तूचाच उपदेश होत असतो. तृतीयपक्ष तर अत्यंत असत्य आहे. कारण, ब्रह्म साकार आहे, याचा तूंच येथें अद्वैतसिद्धांत अंगीकार करीत नाहींस. शिवाय शुद्धब्रह्म साकार मानल्यास अव्यापकत्वादि दोष येतात, मग या वाक्याची संगति कशी? एवढ्याकरितां तुला आमच्याच मताचा स्वीकार केला पाहिजे. मयट्प्रत्यय येथें विवर्ताधिकारार्थी आहे. चिन्मय-देह म्हणजे, मुक्त जे सद्गुरु, त्यांचे देह अनध्यस्तविवर्त आहेत असा आहे. सर्व ब्रम्हवेत्ते मुक्तप्राप्यईश्वरत्वास्तव ईश्वर आहेत आणि सर्व अज्ञानी जीवांचे सद्गुरु आहेत म्हणून "तद्वद्देहोऽपि चिन्मयः" हें वाक्य सुसंगत आहे. शिष्याला सद्गुरुवांचून अन्य उपास्य नाहीं. भगवद्विग्रह शास्त्रीय अनध्यस्तविवर्त जरी आहे, तथापि ब्रह्मज्ञान झाल्यानंतर शिष्याला तो परोक्ष आहे; सद्गुरुविग्रह अपरोक्ष आहे. भक्तीमध्यें सद्गुरूशीं व देवाशीं "यस्य देवे पराभक्ति"रित्यादि श्रुति अभेदचिंतन सांगत आहेत. ब्रह्मज्ञानानंतर भक्तीची तर अपेक्षा आहे, परंतु सद्गुरुभक्ति सांडून अन्य विग्रहाचें ध्यान करणें, हातचें सांडून पळत्याचे पाठीं लागण्यासारखें आहे. म्हणून शास्त्रीय अनध्यस्तविवर्तत्व ईश्वराचे ठिकाणीं आणि मुक्तजीवाचे ठिकाणीं समान आहे; आणि सद्गुरूचे ठिकाणीं शिष्यापुरतें विशेष आहे. सर्व ब्रह्मवेत्ते जरी सद्गुरु आहेत, तथापि प्रतिशिष्यसापेक्ष्य आहेत, म्हणून गुरूपासनासंकर संभवत नाहीं. ज्याप्रमाणें कृष्ण-कूर्मोपासनासंकर संभवत नाहीं, तसेंच येथेंही समजावें. अनध्यस्तविवर्त शास्त्रीय परिभाषा न मानून, तशा प्रकारचा एक प्रकार मधुसूदनानें गूढार्थदीपिकेंत मानलाच आहे. येथील साकारनिषेध तर, सर्वब्रह्मसाकार मानणाऱ्या वल्लभमताचा निषेध करण्याकरितां शोभतच आहे. परंतु, त्यांत देखील चार्वाकमताचा प्रवेश संभवत नाहीं. आम्हीं तर अलंकार जसा सुवर्णव्याप्य आहे, तसा अनध्यस्तविवर्तभगवद्विग्रह मायावच्छेदावच्छिन्न आणि ब्रह्मव्याप्य म्हणतों. म्हणून, आमच्या मतांत तर मुळींच चार्वाकमत प्रवेश होत नाहीं.

वादी उवाचः– अहो " मुक्ता अपि लीलया विग्रहं कृत्वा भजंते" या ठिकाणीं लीलेचा परिणाम विग्रह ठरतोना ? आणि लीला ही अविद्या-सिद्ध आहे!

सिद्धान्ती उवाचः– लीला जर अविद्या आहे, तर तिची मुक्तांला आवश्यकता नाहीं. लीला ही बुद्धिपूर्वक असते, भ्रांति ही अबुद्धिपूर्वक असते. ह्मणूनही मुक्तांची लीला, अविद्या संभवत नाहीं. आतां मुक्तांची लीला माया ह्मटलें, तरी ती विग्रहाचें ठिकाणीं अनुगत नसते; ध्येयरूप मनोमात्र विग्रहाचें ठिकाणीं जरी अनुगत असली, तरी अनुभूत विग्रहाचे ठिकाणीं मुळींच नसते. आतां जें मधुसूदनाचें ह्मणणें कीं, " नाभ्या आसीदंतरिक्षं " नाभीपासून आकाश झालें इत्यादि श्रुति भगवच्छरीराला भूतकारणत्व सांगत असल्यामुळें, भगवद्विग्रह भूतकार्य होऊं शकत नाहीं, असा पूर्वपक्ष आहे. तो योग्य नाहीं, कारण, 'अग्निर्मूर्द्धा' इत्यादि श्रुतींत विराट्शरीरच सांगितलें असल्यामुळें, भूतकारणत्व त्या शरीराला संभवत नाहीं; पण हेंही मधुसूदनाचें ह्मणणें योग्य नाहीं; कारण पुरुषसूक्तांत दोन प्रकारचे पुरुष सांगितले असून, सहस्रशीर्षा इत्यादि श्रुतीला आरंभ करून प्रथमपुरुषाचें निरूपण केलें आहे आणि " ततो विराडजायत " हा दुसरा पुरुष सांगितला आहे. शिवाय मधुसूदनाचें म्हणणें, बळेंकरून भगवद्देहाला भूतकार्य ठरवावें, असें आहे, तें परपक्ष-द्वेषमात्र आहे; एरवीं तें मधुसूदनाच्या गूढार्थदीपिकावचनाशीं विरुद्ध आहे. पुनः मधुसूदन म्हणतो " तमसः परस्तात् " तमाच्या पलीकडे आहे इत्यादि श्रुति विराडुपलक्षित परब्रह्माचें प्रतिपादन करितात, विग्रहाचें करीत नाहींत, हें मधुसूदनाचें म्हणणें सामान्यश्रुतीस्तव बरोबर आहे, याविषयीं आमचें कांहीं म्हणणें नाहीं. परंतु ' नाभ्या आसीदंतरीक्षं ' या सूक्तांतील पंचमीचा अर्थ, मधुसूदनाच्या ध्यानांत येऊं नये, हें आश्चर्य आहे. आणखी त्याचें ह्मणणें कीं, " एको नारायणो आसीन्नब्रह्मा न च शंकरः " इत्यादि श्रुतींनीं विग्रहसिद्धि होत नाहीं; कारण " सदेव सोम्येदमग्र आसीत् " या जगाच्या पूर्वी सर्व सत्य होतें या श्रुतींतील परब्रह्मच नारायण शब्दानें येथें सांगितलें आहे. परंतु हें मधुसूदनाचें ह्मणणें बरोबर नाहीं; कारण " सदेव सोम्य " या श्रुतींत ब्रह्माचें विधान

मात्र केलें आहे; पण कशाचा निषेध मात्र केला नाहीं, आणि " एको नारायण " या श्रुतींत, नारायणाचें विधान करून, ब्रह्मा व शंकर यांची व्यावृत्ति केली आहे. यद्यपि शिवतत्वविवेकांत नारायणाची व्यावृत्ति करून शिवत्व ठरविलें आहे, तथापि शिवाला चतुर्थमूर्तित्व अपय्यादीक्षितानीं तेथें कबूल केलें आहे. आणि त्रिपादमहानारायणादि उपनिषदांवरून, भगवान् नारायणालाही चतुर्थमूर्तित्व सिद्ध आहे. ' अद्वैतकौस्तुभामध्यें, जें चतुर्थमूर्तित्व नाहीं असें ह्मटलेंआहे, तें भक्तिरहिताला शोभण्यासारखें आहे. जगत्कार्य करण्याकरितां मूर्तित्रयाव्यतिरिक्त चतुर्थमूर्तीची अपेक्षा नाहीं, असा अद्वैतकौस्तुभवचनाचा अर्थ आहे; कारण परमात्मा निमित्त व उपादान उभय सृष्टिकारण आहे. गुणाश्रयेंकरून तो कार्य करीत असल्यामुळें त्रिगुणांचें कार्य त्रिमूर्तीनेंच होण्यासारखें आहे. परंतु गुण दृढ झाले कीं, भूतकार्यात्मकच उत्पत्ति होते; ह्मणून भक्ताकरितां भगवान् अनध्यस्तविवर्त चतुर्थमूर्तिदेह धारण करितो, असें ह्मणणें हितावह आहे. मधुसूदनानें सिद्धान्तबिंद्वादि ग्रंथांत, हें कबूलही केलें आहे. " एकोनारायण " ही श्रुति मायोपहित ब्रह्मपर असून, विग्रहपर नाहीं, या ह्मणण्यांतही स्वारस्य नाहीं. कारण, मायिक भगवद्देहवादांत देखील मायोपहित ब्रह्म समानच आहे. मायोपहित ब्रह्मापासून भगवद्देह अगदीं निराळा करणें, ह्मणजे भगवद्देहाला भूतकार्यत्व देणेंच होय; पण तसें करणें श्रुतिस्मृतिपुराणविरुद्ध आहे; आणि आचार्यांच्या गीताभाष्याशीं ही विरुद्ध आहे; व त्याप्रमाणें स्वतः मधुसूदनाच्या वचनाशींच विरुद्ध आहे. इतिहासपुराणांवरून वेदाचा अर्थ करावा असें अत्रिस्मृतीचें वचन आहे. मार्कंडेयानें वटपत्रशायी भगवंताला प्रलयांत पाहिलें आणि नारायणाच्या शरीरांत सर्व सृष्टि पाहिली. तो नारायण विग्रहवान् होता. त्या नारायणाच्याच नाभीकमलापासून ब्रह्मा झाला असें प्रकरण अनेक पुराणांत आहे, तें ' एको नारायण ' या श्रुतीचें उपबृंहण करितें; ह्मणूनही येथील मधुसूदनाचें ह्मणणें अकिंचित्कर आहे. " नचैतावता चेतनान्तरसाधारण्यं। अखंडमायोपहितत्वस्यैव व्यावर्तकत्वात् " असें मधुसूदन पुढें ह्मणतात. प्रलयांत सर्व जीव ज्याप्रमाणें राहतात, त्याप्रमाणें परमात्माही राहतो; असें ह्मणतां येणार नाहीं. कारण मायेची उपाधि धारण करणें हेंच

त्याच्या निराळेपणाचें लक्षण होऊन राहतें. या दोन पंक्तींच्या अनुरो-धानें जी ब्रह्मानंदीटीका आहे, तिजमध्यें असें म्हटलें आहे कीं, मायाअविद्येचा अभेद जेथें अंगीकारिला आहे, तेथें मायावीपणाच परमे-श्वराला निराळा करणारा आहे. मायेचे जे अनेक प्रदेश आहेत, तेच अविद्यासंज्ञक आहेत; आणि त्यांच्या उपाधीनेंच जीव झाले आहेत. अनादि मायेविषयीं "अजामेका"मित्यादि श्रुतिप्रमाणें जशीं आहेत, तशीं अनादि ईश्वरदेहाविषयीं कांहीं प्रमाणें नाहींत, इत्यादि, मूळका-राचें व टीकाकाराचें ह्मणणें बहुधा अयुक्त आहे. कारण, दृष्टिसृष्टि-पक्षांत एकच जीव असल्यामुळें, आणि 'गूढार्थदीपिका' 'सिद्धान्तबिंदु' वरून मधुसूदनाला दृष्टिसृष्टिवादच अधिक अभिमत असल्यामुळें, सृष्टिदृष्टिवादांतही एकच अज्ञान बिंबप्रतिबिंबाची उपाधि आहे, असा विवरणकाराचा पक्ष विद्यमान असल्यामुळें, अखंडमायोपहितत्व ईश्वराचें व्यावर्तक होतें हें म्हणणें, सर्वतंत्र वेदान्तसिद्धान्तरूप नाहीं. टीकाकाराचें म्हणणें कीं, अविद्यामायाऐक्यपक्षामध्यें मायावीत्वच व्यावर्तक आहे, यांतही कांहीं स्वारस्य नाहीं; कारण मायाअविद्या जर एक आहे, तर मायावीत्व म्हणजे काय ? अंशावच्छिन्नत्व कीं, पूर्णअविद्यावच्छिन्नत्व? प्रथमपक्षीं ईश्वर अव्यापक होतो, व द्वितीय पक्ष मानल्यास जीव होतो. निर्मथित शुद्धसत्वावच्छिन्नत्व असा त्याचा अर्थ केल्यास, निर्म-थनेच्छा पूर्वीं उपलब्ध होतअसल्यामुळें, विग्रहार्थच निर्मथन आहे, हें सिद्ध होतें. योगभाष्यवार्तिकादिकांत तसें म्हटलेंही आहे. याविषयीं "ईश्वरप्रणिधानाद्वा" इत्यादि योगशास्त्रांतील समाधिपादीय सूत्राव-रील भाष्य व टीका पाहव्या. अविद्यामायेचे प्रदेश मानून पक्षपरित्याग पूर्वीं दाखविला आहे. अनादिविग्रहाविषयीं कांहीं प्रमाण नाहीं, हें टीकाकाराचें म्हणणें अकिंचित्कर आहे; कारण "नित्यसाकार:" इत्यादि त्रिपादमहानारायणश्रुति विद्यमान आहेत. आतां उपन्यस्त केलेला विवरणकाराचा पक्ष वादी अंगीकार करील, तर त्यांत आमचाच पक्ष सिद्ध होतो; कारण, बिंबत्व हेंच अनध्यस्तविवर्तत्वाचें अवच्छेदक आहे; आणि अनध्यस्तविवर्तत्व मायाव्याप्य नसून चेतनव्याप्य आहे, असा आमचा सिद्धान्त आहे. टीकाकारानेंही या अद्वैतसिद्धीच्या टीकें-

तच " अनध्यस्तेऽप्यलीके सत्तादात्म्यस्यारोपसंभवात् ( प्रथमपरिच्छेद )
असें प्रथमारंभींच म्हटलें आहे. वस्तुतः सर्व भावाभावपदार्थ मायाकल्पित आहेत, हा वेदान्तसिद्धान्त असूनहि, अनध्यस्त अलीक पदार्थाचा अंगीकार करून, त्याचे ठिकाणीं सत्तादात्म्य, या गौडब्रह्मानंदानें जर संभवनीय मानलें आहे, तर शुद्धव्याप्य अनध्यस्तविवर्तरूप भगवच्छरीर या लोकांनां मानण्याला काय होतें समजत नाहीं. अलीक जर अनध्यस्त होईल, तर वास्तविक तें सतच झालें पाहिजे; कारण एक सत् नित्य व मायारहित, एक अलिक नित्य; असें सर्वदा द्वैत राहील, ह्मणूनच आम्हीं विवर्तशब्द घातला आहे. ज्ञानानें निवृत्त होत नाहीं, ह्मणून तें अध्यस्त नाहीं. व नुस्त्या विग्रहज्ञानानें अविद्येची निवृत्ति होत नाहीं ह्मणून तें विवर्त आहे, असें आमचें म्हणणें आहे. " तस्यललाटात् त्र्यक्षः शूलपाणिरजायत " या श्रुतीचा अर्थ, टीकाकारांनीं ललाटशब्दानें माया घ्यावी, किंवा प्रलयांतीं व सर्गारंभीं उत्पन्न होणाऱ्या शरीराचें ललाट घ्यावें, असा सांगितला आहे. परंतु प्रथमार्थ रूढीस सोडून रूपकरूप असल्यामुळें, द्वितीयार्थाचे मानानें तुच्छ आहे. सर्गारंभीं उत्पन्न होणारें भगवच्छरीर मानलें, तर त्याला चतुर्थमूर्तित्व सहजच येतें. 'एकोनारायण' इत्यादि श्रुति महोपनिषदीं आहेत. शिवतत्वविवेकोक्त शिवशरीरालाही चतुर्थमूर्तित्व आहे; परंतु ही टीकाकाराची संमति मूळ अद्वैतसिद्धिकाराच्या भौतिक भगवद्विग्रहदंशाशीं विरुद्ध आहे.

ओव्याः—पुनः बोले मधुसूदनू । "नित्योनित्यानां चेतनश्चेतनानां " हे श्रुति मानूं । परी विग्रह नित्य म्हणूं । ऐसें नाहीं ॥ ६५ ॥ स्वरूप-चैतन्याचा अंगीकार । करोनी श्रुत्यर्थ घडे सुंदर । हाही मधुसूदनाचा विचार । उन्मत्त प्रलापू ॥ ६६ ॥ नित्यानां हें अनेक वचन । स्वरूप-चैतन्यीं लागे काय म्हणून । अनेक मानतां स्वरूपचेतन । तरी सजातिय भेद होईल ॥ ६७ ॥ आणि जीवचैतन्याशीं । नित्यता नाहीं ब्रह्मा ऐसी । ज्ञानें बाधसामानाधिकरण्यासी । वेदान्त सांगे म्हणूनी ॥ ६८ ॥ यावद्व्यवहार नित्य ईश्वर । मुक्तप्राप्य तोचि सुंदर । हें बोलताहे शारीरक सूत्र । ह्मणोनी अनध्यस्तशरीर नित्य ॥ ६९ ॥ इया शारीरकसूत्रा-वरून । जरीं नित्य आहे ईश्वरचेतन । तरी तें एक ह्मणोन । नित्यानां हें

वचन घटेना तेथ ॥ ७० ॥ अनेकेश्वरवाद कांहीं । आम्हांसी तव मान्य नाहीं । गौरवदोषीं पडलाही । वाचस्पति तो ॥ ७१ ॥ म्हणोनी अनध्यस्तविवर्त । हस्तपादादि अवयव समस्त । नित्य तयांचीं हीं नित्य यथार्थ । परमार्थसत्तावंत ही श्रुतिसंगति ॥ ७२ ॥ शब्दें शब्दोपलक्षित बोधू न नाशे म्हणोनी प्रतिभासावच्छेदू । परमार्थसत्तेशीं अविरोधू । अनध्यस्तविवर्तसूत्रवशें ॥ ७३ ॥ भाषासूत्रः– पुढती " पुरा कल्पापाये स्वकृतमुदरीकृत्य विकृतं " म्हणजे पूर्वसृष्टिनाशीं सकल विकारातें उदरस्थ करिता झाला । येथें सृष्टीचे संस्कार अविद्येंत राहणें हेंच पोटांत असणें समजणें । ऐसें मधुसूदन बोलिजेला । तो वायफुलाचा झेला । विचारें पाहतां वोफळ झाला । ओवीः–पुराण आणि इतिहास । इहीं श्रुत्यर्थ कीजे हे स्मृतिभाष । प्रलयीं निद्रित नारायणास । मार्कंडेय पाहोनी उदरीं गेला ॥ ७४ ॥ तेणें आंत पाहिली सृष्टि । ऐशा सकल पुराणीं गोष्टी । एथ रूपक करतां ओठी । रूढीत्याग मात्र ॥ ७५ ॥ मार्कंडेयमन । तरी न पाहूं शके अविद्येंतील संस्कार सुतंजन । म्हणोनी देहस्थीति कारण । मानिली पाहिजे 'उदर' शब्दार्थी ॥ ७६ ॥ ततो विराडजायत ही श्रुति । सर्गारंभीं सांगे विराडुत्पत्ति । म्हणोनी प्रलयीं विराडदेहस्थीति । न मानिजे हे ॥ ७७ ॥ भाषासूत्रः– आणिक मधुसूदन बोलिला कीं । पोटीं ब्रह्मांडाचा प्रवेश झाल्यानें प्रलय व्यर्थ होतो याला टीकाकाराची पुष्टि ऐसी कीं । कारणामध्यें कार्य लीन होण्यास प्रलय बोलिजे । या दोघांतें ही पुसणें कीं । पोटीं जगत्प्रवेशअर्थु तुम्हीं काय जाणितला! । अन्न पोटीं भरिजे ऐसा कीं पेटींत ठेविजे जैसा पैसा ! । पहिल्यापक्षीं धरितां धिंवसा । तरी सूक्ष्म होवोनी जगासी पावणें आलें एकसरसा । एथ सत्कार्यवादही मिळे आपैसा । भगवद्देह-कारणचि सरिसा । म्हणोनी विषम जीवदेहदृष्टान्तठसा । व्यवहारीं भाट्टनयवेदान्तीं संमत जैसा । नैय्यायिकांचा विशेष सामान्यभाव संमत तैसा । म्हणोनी अनध्यस्तविवर्त उदरस्थ मायाकाशसृष्टिसंस्कारासह व्यावर्ती । मार्कंडेयें पाहिली रीति । तयाचें कारण सूक्ष्मयोगदृष्टिप्रतीति । समाधींत मुनिमाया देखती । हें श्वेताश्वतरश्रुतींत आणि भागवतीं वर्णिलें " ते ध्यानयोगानुगता अपश्यन् देवात्मशक्तिं स्वगुणैर्निगूढाम् " ही श्रुति

आणि याचाचि अनुवाद भागवतीं एवं पहिल्यापक्षीं इष्टापत्ति । सत्कार्य सांगती ह्मणूनी ।। दुसऱ्यापक्षीं महाघोरू । प्रमादीं अद्वैतसिद्धिकारू । " अत्ता चराचरग्रहणात् " हें सूत्र पराशरकुमरू । बोलिले त्याचा अर्थ प्रलयीं विश्वा खाय ईश्वरू । जैसा भक्तहृदयीं प्रवेशे सूक्ष्म साकारु । तैसा सूक्ष्मउदरीं अवघा विश्वाकारु । ह्मणोनी योग्य नव्हे स्थूलकोटी प्रकारू । अल्पही अंशाचे ठायीं सर्वव्यापकता हा मायाविकारु । जैसा अल्प हृदयाकाशीं दिसे स्वप्नावडंबरु । अथवा प्रतिजीवसृष्टीचे मतें । दृष्टि-सृष्टिवादाचे हातें । प्रलय बोलिला ज्याचा तयातें । ह्मणोनी अन्याभास नाहीं निषेधले परते । प्रलय श्रुतिसांगे लयचिंतनातें । ह्मणूनी मुख्यार्थत्व आलें उदरवाक्यातें । अथवा ' उदर ' शब्द ह्मणतां अविद्येतें । दोष कांहीं न वाटे आम्हातें । मुक्तप्राप्य ईश्वर जेविं प्रलयीं राहतो तेविं अनध्यस्तविवर्तही राहे तेथें । जें त्याची ब्रह्मज्ञानें हानि न होते । ह्मणोनी सांपडते भक्ति शुद्ध ।।

ओव्याः– पुढती बोले मधुसूदन । जें कीं श्लोक सांगे पुराण । परमात्मदेह नित्य म्हणोन । तेंही समाधान ऐकावें ।। ७८ ।। " सर्वे नित्याः शाश्वताश्च देहास्तस्य महात्मनः । परमानंदसंदोहा ज्ञानमात्राश्च सर्वदा " । या वाक्याचे ठायीं । प्रलयपर्यंत देह बोलिले स्थायी । आणि दुःखाचा भोग नाहीं । ज्ञानमात्र प्रधान ।। ७९ ।। म्हणोनी जडु आणि ब्रह्मभिन्नु । समजावी भगवत्तनु । येथें चळला मधुसूदनू । पदज्ञाना-वांचुनी ।। ८० ।। नित्या आणि शाश्वता ऐसे । दोनी पदें मुळीं सरिसे । परमानंदसंदोहा ज्ञानमात्राश्च विशेषें । आणि सर्वदा हें पद ।। ८१ ।। अवघीयाचा अर्थ । प्रळयावधिपर करितां समस्त । तरी स्कंदपुराणलीला-वाक्यासी येत । विरोध सहज ।। ८२ ।। पुराण पुराणें समन्वयीजे । मार्कंडेयदृष्टउदर ऐतिह्यही येथ विचारिजे । नित्य तें बोलिजे यावदीश्वर ।। ८३ ।। शाश्वत बोलिजे लीलादृष्टीं । सर्वदा बोलिजे भक्तहृदय प्रगटीं । याची वचनाऱ्या टीकाकाराची गोमटी । संमति ऐसी ।। ८४ ।। टीकाकार म्हणतो भगवद्देह आवरणशून्य । आणि जड म्हणतो मूळकार मधुसूदन । गूढार्थदीपिकेशीं पाहतां मिळवून । मूळकारस्ववचनवि-रोधी ।। ८५ ।। आवरणशून्य देह जरी । ब्रह्मभिन्न जड होय कैसा

तरी । म्हणोनी गुप्तविरोधसरी । उभयस्लेद्कंठीं ॥ ८६ ॥ शोकादि आवरण । रघुनाथाचे ठायीं दिसावयाचें कारण । ब्राह्मणशापाचें अंगीकरण । लोकशासन करावया ॥ ८७ ॥ प्रलयपर्यंत देह राहती । परी श्रीकृष्णें देह दग्ध केला योगस्थीती । तरी तेथही नाहीं क्षति । सजातीय देह निर्मुनी देती दर्शन भक्तां ॥ ८८ ॥ ऐसें टीकाकाराचें बोलणें । ब्रह्मसूत्र-शांकरभाष्यविरुद्ध म्हणोनी लाजिरवाणें । " यावदधिकारमवस्थितिराधि-कारिकाणां " या सूत्रभाष्यांत आचार्यबोलणें । कीं आधिकारिक जन्मती परि ते जातिस्मर न म्हणावे ॥ ८९ ॥ सजातिय देह उपजविता । आधिकारिक जीव तयांत शिरता । तरी दुर्निवार्य जातिस्मरता । सर्वथा त्यांची ॥ ९० ॥ म्हणोनी तोचि देह उत्पन्न होवावा । तरीच आधिकारिकांचा जातिस्मरभाव निवटावा । तेथ मरणप्रत्यय आभास असावा । आणि जन्मप्रत्यय तो सत्य ॥ ९१ ॥ एवं आधिकारिकांची स्थीति । तेथ अवतारदेह सजातिय कैसे होती । आणि जातिस्मर जीव नव्हे राधिकापति । हें गूढार्थदीपिकेंत चतुर्थीं मधुसूदनाचि बोलिला ॥ ९२ ॥ तेव्हां येथील टीकाकाराची एवढी पंक्ति । सर्वथा न मानिजे श्रोतीं । आतां निरीक्षूं पुढती । मधुसूदनजीव्हा ॥ ९३ ॥ " आनंदरूपममृतं यद्विभाति । आप्रणखात् सर्व एवानंदः मोदो दक्षिणः पक्षः यदात्मको भगवान् तदात्मिका शक्तिः किमात्मको भगवान् ज्ञानात्मक ऐश्वर्यात्मक " या वाक्यावरून सर्पानें वेटोळी घातल्या प्रमाणें ब्रह्माशीं अभिन्न भगवद्देह आहे असें म्हणतां येतनाहीं; कारण या सर्वश्रुति ब्रह्मपर आहेत. ऐश्वर्यात्मकत्व सांगणारें वाक्य मायोपहित ईश्वराचा बोध करितें. मोद उजवा हात आहे, इत्यादि वाक्यें आनंदमय-कोशाचा बोध करितात आनखाग्रआनंदस्वरूप, इत्यादि वाक्यें भगवं-ताच्या लीलाविग्रहाचा बोध करितात, असें मधुसूदनाचें म्हणणें आहे; आणि तें निव्वळ चुकीचें आहे असें आम्हाला म्हणतां येत नाहीं. कारण, सर्पाच्या वेटोळीप्रमाणें भगवद्देह अविकृतपरिणामवादी वल्लभ मानतात; आणि मधुसूदनानेंही आपल्या गूढार्थदीपिकेंत मानला आहे, तरी आम्ही मानीत नाहीं. कारण, अविकृतपरिणाम देखील सावयवाचाच होत असतो, निरवयवाचा होत नाहीं. अनध्यस्तविवर्त निरवयवाचाही होतो,

म्हणून हें मधुसूदनाचें बोलणें वल्लभाला किंवा त्यालाच विघातक आहे; आम्हांला नाहीं. आतां टीकाकारानें जें पांडित्य केलें आहे, त्याची परीक्षा करूं. चेष्टावान् असून अंत्यावयवी असणें, याला वृद्धशरीर म्हणतात. तें सावयव असल्यामुळें विनाशी असलेंच पाहिजे. ब्रह्माशीं अभिन्न आहे असें मानलें, तर "निष्कलं निष्क्रियं" इत्यादि श्रुतींचा विरोध येतो, असें टीकाकाराचें म्हणणें आहे; पण तें समंजस नाहीं. कारण, जें, जें, सावयव असतें तें तें विनाशी असतें, हें अनुमान नैय्यायिकांचें आहे. प्रथम नैय्यायिकांचें व वेदान्तियांचें आपसांत भांडण असलें, तरी प्रसंगीं हे मूर्ख भक्तिरहित वेदान्ती मोठ्या शब्दासाठीं नैय्यायिकांच्या आड लपत असतात; आणि त्यामुळें आपला कोणता घात होतो, हें समजत नाहींत. भगवच्छरीर सावयव आहे असें मानलें, तर या वेदान्तियांना आरंभवाद मानावा लागेल आणि भगवच्छरीर भूतकार्य होईल. कारण, पृथ्व्यप्तेजवायु या भूतचतुष्टयांचें कार्यच सावयव आहे. असें नैय्यायिकांचें म्हणणें आहे. परंतु भूतकार्य भगवद्देह मानणें गीता-शांकरभाष्याच्या विरोधी आहे. कारण त्यांत मायाकार्य भगवद्देह म्हटला आहे. मायेचा परिणाम म्हटल्यास तो भूतकार्यच होतो, हें मागें दाखविलें आहे. मायेचा विवर्त संभवत नाहीं. कारण सर्व विवर्ताधिष्ठान ब्रह्म आहे आणि माया सावयव नाहीं किंवा निरवयव नाहीं; कारण ती अनिर्वचनीय आहे, असें विवेकचूडामणींत आचार्यांनीं म्हटलें आहे; म्हणून मायावयवारब्धकार्य भगवद्देह संभवत नाहीं; एवढ्याकरितां टीकाकाराचें म्हणणें समीचीन नाहीं.

वादीः—अहो दृश्यत्वास्तव भगवद्देह सावयव आहे असें सिद्ध होत आहे.

सिद्धान्ती उवाचः— दृश्यत्व हें सावयवाचा सर्वदा साधकहेतु नाहीं. कारण, आरंभवादांतच तें सावयवाचें साधक आहे, विवर्तवादांत नाहीं; नाहीं तर, रज्जुसर्पालाही अवयव आहेत, असें ह्मणावें लागेल. आणि तसें मानलें तर सत्ख्यातीचा प्रवेश होईल.

शिष्य उवाचः— भगवन्! अनिर्वचनीयख्यातीमध्यें ही दृष्टिसम-कालीन दृश्योत्पत्ति असल्यामुळें, रज्जुसर्प सावयव ह्मणण्यांत हानि नाहीं.

श्रीगुरु रुवाचः— अरे रज्जुसर्प अनिर्वचनीय उत्पन्न होतो, तरी सावयव नाहीं; कारण, द्व्यणुकादि क्रमानें तो उत्पन्न होत नाहीं. यद्यपि स्वप्नांशारंभवादाशीं दृष्टिसृष्टिवादाचा विरोध नाहीं, तथापि त्याचा आभासत्वेंकरूनच अंगीकार आहे, म्हणूनच रज्जुसर्पविवर्त आहे; परंतु तो अध्यस्त आहे आणि सुवर्णकुंडल अनध्यस्तविवर्त आहे. तें बुद्धिपूर्वक आहे. यद्यपि कुंडलत्व खोटीच्या दृष्टीनें अविकृत परिणाम आहे, तथापि खोटीच सुवर्णाच्या दृष्टीनें अनध्यस्तविवर्त आहे. आणि म्हणून कुंडलही अनध्यस्तविवर्त आहे. अन्य धातूच्या खोटीपासून, सुवर्णखोटी भिन्न करतां येते. यांत सुवर्ण प्रत्यक्षदर्शनहेतु आहे, खोटीचें दर्शन हेतु नाहीं; म्हणून सुवर्णनिरवयवाचे सर्व अलंकार अनध्यस्तविवर्त आहेत. यद्यपि ब्रह्मदृष्टिनें सुवर्णादिक अनध्यस्तविवर्त आहेत, तथापि दृष्टान्तांशाचे ठायीं सिद्धदृष्टीचा अंगीकार नसतो. कारण, अंगीकार केला तर, साध्यसिद्धि त्यापासून होत नाहीं. म्हणून दृष्टान्तांशाचे ठायीं सुवर्णालंकारच अनध्यस्तविवर्त आहेत. दार्ष्टान्तीं अनध्यस्तविवर्त भगवच्छरीर आहे; ह्मणून जेथें, जेथें विवर्त असतो, तेथें, तेथें अध्यास असतोच, या पक्षाचेंही निराकारण झालें. परमात्मा बुद्धिपूर्वक शरीरग्रहण करितो अशी योगसूत्र, भाष्य, वार्तिक, या सर्वांची संमति आहे, त्यांत शरीराकरितां सत्वमथन करितो असें ह्मटलें आहे. सत्वमथन करणारी बुद्धि सत्वच असणें संभवनीय नाहीं. ह्मणून, मायोपहितत्वावच्छिन्न परमेश्वररूपच ती असली पाहिजे असें सिद्ध होतें. आणि सृष्टिकार्यार्थ परमात्मा सत्वशरीर घेत असला, तरी अन्य त्याचें नित्यशरीर आहे, असा त्रिपादमहानारायणोपनिषदेचा व स्कंदपुराणाचा उद्घोष आहे. एवं कार्यस्थानभेदानें योगभाष्याशीं अविरोध आहे.

वादी उवाचः— कृष्णदेह दग्ध झाला, तो गुप्त झाला, अर्जुनानें त्याला अग्नि दिला, इत्यादि भारतभागवतादिकांत कथा आहेत.

सिद्धान्ती उवाचः— तो नित्य आहे इत्यादि वाक्येंही श्रुतिपद्मपुराण व भागवतादिकांत आहेत, आणि कृष्णनिधनादिक तर ब्राह्मण शापाचा परिणाम दाखविला आहे. म्हणून तेथेंही मिथ्यामरणाभास आहे, नाहीं तर रामाच्या ठिकाणीं असलेला शोक आभास-

मात्र आहे असें जें टीकाकारानें म्हटलें, या त्याच्याच वचनाशीं विरोध येतो.

मध्यस्थ उवाचः— अहो भगवद्देह जर तुह्मीं ब्रम्हाहून भिन्न मानीत नाहीं व ब्रह्मस्वरूपही मानीत नाहीं, तर तुमच्या मतांत भाट्टाप्रमाणें गुणगुणिभेदाभेदवाद किंवा जैनाप्रमाणें भेदाभेदवाद तुह्मी मानतां काय ?

सिद्धान्ती उवाचः-छे, मुळींच नाहीं; कारण भेदाभेदवादांत समसत्तात्मक दोन्ही पदार्थ असतात, कोणताही पदार्थ विवर्त नसतो; आणि विवर्तवादांत एक पदार्थ विषम सत्ताक असतो परंतु तेथें अध्यास असतो. विषमसत्तावच्छेदोपहित मूळसत्तात्मक अनध्यस्तविवर्त असतो. "स्वरूपापरित्यागे सत्यपररूपग्रहणं" हें विवर्ताचें सामान्य लक्षण आहे. तें प्रपंचाचे ठिकाणीं अध्यासपूर्वक वर्ततें आणि भगवद्देहाचे ठिकाणीं अध्यासारंभाभावपूर्वक असतें; किंवा अध्यासराहित्यपूर्वक वर्ततें.

ओव्याः — जरी त्रिपादमहानारायणादिश्रुति । परमेश्वरदेह नित्य सांगती । तरी तो मानावा आपुले मतीं । युक्तिविण ॥ ९४ ॥ नाहीं तरी सर्वं खल्विदं ब्रह्म । इत्यादि श्रुतीनें प्रपंचही होईल ब्रह्म । ऐसें मधुसूदन बोलिला परी तें वर्म । चुकला आहे ॥ ९५ ॥ युक्तिरहित श्रुति प्रमाण । ब्रह्माचे ठायीं सर्वदाग्रहण । हें ब्रह्मसूत्रकार आपण । बोलिले आहाती ॥ ९६ ॥ " श्रुतेस्तु शब्द मूलत्वा"दिति श्रुतिस्वतः प्रमाण म्हणुनी न लगे युक्ति । ऐसा भाष्यकारही अर्थ करिती । शंकराचार्यादि सकळ ॥ ९७ ॥ ब्रह्मजगद्रूप होये । हें श्रुति सांगतआहे. । आणि ब्रह्म जगावेगळें राहे । श्रुतिचि सांगे ॥ ९८ ॥ ह्मणोनी दोहीं पक्षीं श्रुतिचि प्रमाण । म्हणोनी नायकों पूर्वपक्षाचें भाषण । येथ शंकराचार्य आपण । विवर्तवादें करिती संगति ॥ ९९ ॥ परी याचि पक्षाचा करिती अंगीकार । कीं श्रुति युक्तिवांचूनी प्रमाण स्वतंत्र । आतां नित्य आहे भगवच्छरीर । हें त्रिपादमहानारायणश्रुति सांगे ॥ १०० ॥ आणि ा आहे अमूर्त । ऐसें मुंडकोपनिषदीं श्रुत । याचा समन्वयही यथार्थ । र्तवादेंचि होय ॥ १०१ ॥ अध्यस्तविवर्तवादें समन्वय करितां । नित्यपदविरोधा दुर्निवारता । म्हणोनी नित्यसाकार या त्रिपाद-

महानारायणोक्ता । अनध्यस्तविवर्त बोलिजे ।। १०२ ।। आणि मुंडकोपनिषच्छ्रुति । सांगताहे शुद्ध चिति । एवं समन्वय निगुती । आणि मधुसूदनोक्ति समूळ मिथ्या ।। १०३ ।। एवं पुराणादि वाक्य । येथांचि यावती ऐक्य । आणिकही मधुसूदनदुर्वाक्य । परीक्षूनि पाहूं ।। १०४ ।। स्वरूपानंद जैसा नित्य । तैसा ब्रह्माचा विग्रह नित्य । ऐसें म्हणशील तरी ब्रह्म जें सत्य । त्यासचि विग्रह म्हटलें त्वां ।। १०५ ।। नाममात्रें वस्तुभेद नाहीं । म्हणोनी आमुची हानि न कांहीं । शरीर म्हणजे उपादान घेवोनी सर्वही । चेष्टावदंत्यावयवित्वलक्षण ।। १०६ ।।
भाषासूत्रः— चेष्टा म्हणजे चलण । तद्वत् म्हणजे तेणेंकरूनसहित । अंत्यवयवी म्हणजे ज्याचें पुनः— कार्य होत नाहीं ऐसें । घटही अंत्यावयवी आहे पण चळण नाहीं । म्हणून तयातें शरीरत्व नाहीं । ऐसें नैय्यायिकांचें मत घेऊन टीकाकारानें मूळकारांच्या मताला पुष्टि दिली आहे, तें योग्य नाहीं; कारण नैय्यायिकांचें शरीरलक्षण जर सर्वथा धरून चाललें, तर भाष्यकारोक्त मायाविग्रहाचा देखील निषेध होतो. कारण, मायेचे ठायीं अवयवित्व नाहीं, आणि अवयवित्व मानलें तर भूतकार्यत्व येतें. अवयवित्व म्हणजे तुकडे तुकडे मिळून एक होणें. जैसें दोन कपाल म्हणजे मातीचे खापरे मिळून घट होतो. परमतखंडणाकरितां नैय्यायिकांचा आश्रय केला, तर स्वमतीय शंकराचार्य वचनांचाही परित्याग होतो, इकडे या गौडब्रह्मानंदाचें लक्ष गेलें नाहीं. आतां वल्लभाला उद्देशून जर मूळकाराचें ह्मणणें असेल, तर तें मात्र आह्माला इष्टही आहे. कारण, सर्वच ब्रह्म विग्रहस्वरूप जसें ते मानतात, तसें आम्हीं मानीत नाहीं. आम्हीं अनध्यस्तविवर्त मानतों ह्मणून हा दोष आमच्यावर येत नाहीं. भाषासूत्र— पुढती मधुसूदनवाक्य ऐसें, नैषामतिस्तर्केणापनेया, ऐसी श्रुति आहे. आपली बुद्धि तर्काच्या योगानें भलतीकडे जाऊं देऊं नये, ऐसा तियेचा अर्थ आहे. यावरून भगवद्विग्रहाचे ठायीं तर्क करणें उचित नाहीं; ऐशा पूर्वपक्षावर मधुसूदनाचें उत्तर कीं । निर्विशेषब्रह्म शुद्धचैतन्य त्याचेच ठिकाणीं तर्क चालत नाहीं, सविशेष जें सगुणब्रह्म त्याचे ठिकाणीं तर्क चालतो, असा श्रुतीचा

अभिप्राय आहे; हें मधुसूदनाचें उत्तर वेदान्तविरोधी आहे आणि भक्ति-विरोधीही आहे; तें एवंविध– ओव्या– सर्व सविशेष ब्रह्माचे ठायीं। तर्कप्रमाण मानतां पाहीं। तरी तदंतर्गत वैदिक फळाचे ठायीं। होईल तर्क प्रमाण ॥ १०७ ॥ मग सकल पूर्वमीमांसा बुडेल। नियतस्वरवेद-पाठ उडेल। चांडालाही वेदाध्ययन घडेल। तर्कविशेषें ॥ १०४ ॥ भाषासूत्र:– " श्रुतेस्तु शब्दमूलत्वात् " या सूत्राचें भाष्य करितां, शंकराचार्य ह्मणतात:– निर्गुणब्रम्ह उरतें आणि जगत् उत्पन्नहि करितें. ह्या दोन्हीही गोष्टी श्रुतीनेंच सांगितल्या आहेत; म्हणून तर्काची अपेक्षा नाहीं. याचा आशय असा कीं, निर्विशेष आणि सविशेष ब्रह्म, या दोहींचेही ठायीं तर्क अपेक्षित नाहीं. किंबहुना भाष्यकार ह्मणतात कीं, लौकिकशक्ति देखील उपदेशावांचून तर्कगम्य नाहींत. तें भाष्यवचन येणें प्रमाणें " लौकिकानामपि मणिमंत्रौषधिप्रभृतीनां देशकालनिमित्तवैचित्र्य-वशाच्छक्तयो विरुद्धानेककार्यविषया दृश्यन्ते। ता अपि तावन्नोपदेशमंत-रेण केवलेन तर्केणावगंतुं शक्यन्तेऽस्य वस्तुन एतावत्य एतत्सहाया एत-द्विषया एतत्प्रयोजनाश्च शक्तय इति " ( अ. २, पा. १, सू. २७ ) भाष्यभावार्थ:– लौकिकपदार्थाचे ठिकाणीं ज्या विचित्र कार्य करणाऱ्या शक्ति दिसतात, त्या देखील उपदेशावांचून केवल तर्कानें जाणल्या जात नाहींत. अमुक या शक्तीचें प्रयोजन आहे, अमुक यांना सहायक आहेत इत्यादि गोष्टी उपदेशानेंच कळतात.

मध्यस्थ उवाच:– अहो ! " प्रकृतिभ्य: परं यच्च तदचिंत्यस्य लक्षणं। " असें याच सूत्राच्या भाष्यांत पुराणवाक्य आहे; आणि त्याचा अर्थ अचिंत्य, निर्गुण, ब्रह्मालाच म्हणावें असा आहे.

सिद्धान्ती उवाच:– अहो ! तुम्हीं हा केवळ श्लोकाचा उत्तरार्ध म्हटला; परंतु याच श्लोकाच्या पूर्वार्धांत, " अचिंत्या: खलु ये भावा न तांस्तर्केण योजयेत् " असें अनेकवचन आहे; ब्रह्म कांहीं अनेक नाहींत, म्हणून ब्रह्मभिन्न कांहीं पदार्थही तर्कगम्य नाहींत. " प्रकृतिभ्य: " याचा अर्थ आनंदगिरीनें माया असा केला नाहीं; तर प्रत्यक्ष दिसणाऱ्या पदा-र्थांचा स्वभाव असा केला आहे. या आनंदगीरीवचनान्वयें वैकुंठादिकानां-ही अचिंत्यत्व प्राप्त होत आहे, असें आमचें ह्मणणें आहे. भाष्य देखील

तर्कगम्य नसून अनिर्वचनीय आहे व अचिंत्य आहे, असें सर्व वेदान्त-ग्रंथ ह्मणतात. श्रीमद्भागवतांत तर, निर्गुण ब्रह्मच किंचित्तर्कगम्य आहे, सगुणब्रह्माचे ठिकाणीं सर्वथा तर्क चालतच नाहीं, असें ब्रह्मदेवानें दशमस्कंदांतील चौदाव्या अध्यायाच्या सहा व सात या दोन श्लोकांनीं स्पष्ट म्हटलें आहे; आणि श्रीधराचार्यांनीं त्याचा अभिप्रायही असाच दाखविला आहे. तो मी भावार्थासह येथें सांगतों:—

" तथापि भूमन् महिमा गुणस्य ते विबोद्धुमर्हत्यमलांतरात्मभिः ।
अविक्रियात्स्वानुभवादरूपतो ह्यनन्यबोध्यात्मतया न चान्यथा ॥१॥

श्रीधरी टीकाः— एवं तावत्सगुणनिर्गुणयोरुभयोरपि ज्ञानं दुर्घटमिति । त्वत्कथाश्रवणादिनैव त्वत्प्राप्तिर्नान्यथेत्युक्तम् । इदानीं यद्यप्युभयोरविशेषेण दुर्ज्ञेयत्वमुक्तं तथापि गुणातीतस्य ज्ञानं कथंचिद्भवेन्न तु सगुणस्य तवाचिंत्यानंतगुणत्वादिति श्लोकद्वयेन स्तौति तथापीति । हे भूमन् अपरिच्छिन्नगुणस्य ते महिमा अमलैरंतरात्मभिः प्रत्याहृतेंद्रियैर्विबोद्धुं बोधगोचरी भवितुमर्हति योग्यो भवति । अथवा विबोद्धुं ज्ञातुमर्हति अर्हते शक्यत इत्यर्थः । यद्वा महिमेति महिमानं कश्चिद्बोद्धुमर्हतीत्यर्थः । कथम् । स्वानुभवादात्माकारान्तःकरणसाक्षात्कारात् । नन्वंतःकरणमपि सविकारमेव विषयीकरोतीति कथमात्माकारता तस्येत्यत आह । अविक्रियादिति । विक्रियाविशेषाकारस्तद्रहितात् । विशेष [illegible] परित्याग एवात्माकारतेत्यर्थः । नन्वंतःकरणसाक्षात्कारविषयत्वेऽनात्मत्वप्रसंगः स्यादत आह अरूपत इति । रूपं विषयः अविषयात् । वृत्तिविषयत्वमेवात्मनो न फलविषयत्वमतो नायं दोष इति भावः।कथं तर्हि स्फूर्तिः । अनन्यबोध्यात्मतया स्वप्रकाशत्वेनैव न त्वन्यथा । इदं तदिति विषयत्वेनेत्यर्थः । अथवा मा सर्वतोऽतरंगा लक्ष्मीरप्यगुणस्य ते महिमहिमानममलैरंतर्वृत्तिभिरिंद्रियैरपि तथा यादृग्वस्तुतस्तेन रूपेण विबोद्धुं किमर्हति नार्हत्येवेत्यर्थः । कथंतर्ह्यर्हति तदाह । स्वानुभवादित्यादिना । उक्तार्थमेवैतत् ॥ ६ ॥

भावार्थः—या प्रमाणें, सगुण व निर्गुण ह्या दोन्ही स्वरूपांचें ज्ञान दुर्घट असल्यामुळें, तुझ्या कथाश्रवणादिकेंकरूनच तुझी प्राप्ति होते अन्यथा होत नाहीं असें सांगितलें. आतां जरी दोन्ही स्वरूपांचें

ज्ञान दुर्घट म्हणून मागितलें, तथापि निर्गुणस्वरूपाचें ज्ञान कदाचित् होईल, परंतु तूं अचिंत्य व अनंतगुण असल्यामुळें, तुझ्या सगुण स्वरूपाचेंच ज्ञान होणार नाहीं असें सांगतों. हे व्यापका ! विषयासक्त-पुरुषांना जरी तुझा महिमा जाणण्यास अशक्य आहे, तथापि इंद्रियनिग्रह केलेल्या पुरुषांनां, गुणातीत अशा तुझा महिमा, इंद्रियांना विषय नसल्यामुळें, त्यांच्या प्रवर्तकत्वेंकरून विशेष आकार नसल्यामुळें, जगाच्या अधिष्ठानत्वेंकरून व आत्माकार झालेल्या अंत:करणामध्यें त्याचा साक्षात्कार होत असल्यामुळें, स्वप्रकाशत्वेंकरून जाणण्यास योग्य होतो; विषयत्वेंकरून मात्र जाणतां येत नाहीं.

" गुणात्मनस्तेऽपि गुणान् विमातुं हितावतीर्णस्य क ईशिरेऽस्य ।
कालेन यैर्वाविमिताः सुकल्पै भूपांसवः खे मिहिकाद्युभासः ॥७॥

श्रीधरी टीका:— गुणात्मनो गुणानामात्मनो गुणाधिष्ठातुस्ते तव पुनर्गुणान्विमातुमेतावंत इति गणयितुमपि के ईशिरे समर्था बभूवु दूंरतस्तद्विशेषवार्ता । कथंभूतस्य तव अस्य विश्वस्य हिताय पालनाय बहुगुणाविष्कारेणावतीर्णस्य । ननु कालेन निपुणैः किमशक्यमत आह । कालेनेति । वाशब्दो वितर्के । सुकल्पैरतिनिपुणै र्बहुजन्मना कालेन भूपरमाणवो विमिता विशेषेण गणिता भवेयुः । तथा खे मिहिका हिमकणा अपि तथा द्युभासो दिवि नक्षत्रादि किरणपरमाणवोऽपि ॥ ७ ॥

भावार्थ:—हे प्रभो ! ज्या अतिनिपुण लोकांनीं पुष्कळ जन्म परिमितकालानें, पृथ्वीच्या रज:कणाची, अंतरिक्षलोकांतील तुषारांच्या कणांची व स्वर्गांतील चंद्रसूर्यादिकांच्या किरणांच्या परमाणूंची गणना केली आहे, असेही ते कोण बरें पुरुष, या जगाच्या पालनाकरितां बहुत गुण प्रगट करून अवतीर्ण झालेल्या, तुज गुणअधिष्ठात्या परमेश्वराच्या, गुणांची गणना करावयास समर्थ होतील ? कोणच होणार नाहींत. ॥ ७ ॥

एवं ज्ञानाचे ठिकाणीं तर्क चालतो, पण उपासनेचे ठिकाणीं तर्काची आवश्यकता नाहीं; असें विद्यारण्यानीं देखील पंचदशींतील नवध्यान दीपप्रकरणांत, २९ ते ३१ या सहा श्लोकांनीं म्हटलें आहे. तें विस्तरभयास्तव मी लिहीत नाहीं, तेथेंच वाचून पहावें; केवळ २९

वा, व ३० वा, हे दोन श्लोक मात्र अर्थासह सांगतों. " सकृदाप्तोपदेशेन परोक्षज्ञानमुद्भवेत् । विष्णुमूर्त्युपदेशो हि न मीमांसामपेक्षते " ॥ २९ ॥ " ब्रह्मसाक्षात्कृतिस्त्वेवं विचारेण विना नृणाम् । आप्तोपदेशमात्रेण न संभवति कुत्रचित् ॥ ३० ॥

भावार्थः—परोक्षज्ञानसह विष्णुमूर्त्युपदेशू । गुरुवाक्यमात्रेंचि लाभे विशेषू । म्हणोनी विचाराचा हव्यासू । नलगे तेथ ॥ १०९ ॥ ब्रह्मसाक्षात्कार तैसा नाहीं । तो गुरूपदेशमात्रें न कळे कहीं । गुर्वनुज्ञापूर्वक सर्वदाही । विचारचि करणें लागे ॥ ११० ॥ म्हणेल निर्विशेषज्ञानाच्याचि ठायीं । तर्क बोलिला तो अर्थी नाहीं । तरी सविशेषाच्याही ठायीं । अर्थी तर्क जाऊंचि न शके ॥ १११ ॥ भाषासूत्रः—ज्ञानाचा विषय निर्विशेषब्रह्म बोलिजे । उपासना आणि भक्तीचा विषय सविशेषब्रह्म बोलिजे । त्यांत उपासनेचा विषय मायासंवलित सविशेषब्रह्म बोलिजे । आणि भक्तीचा विषय मायावच्छेदसंवलित अनध्यस्तविवर्त सविशेषब्रह्म बोलिजे । अभेदाचे ठायीं भेदप्रत्यायक धर्म विशेष ह्मणावा । जैसी सर्वत्र सत्ता आहे तेथें ही सत्ता । याप्रमाणें इदंताविषय जो शब्दांत येतो तो । तो भेदें करून उपाधिअवच्छेदात्मक आणि सत्तारूपेंकरून अनध्यस्तविवर्त बोलिजे । म्हणून वंगदेशीयकृष्णचैतन्यमताचा प्रवेश नाहीं । अवच्छेद ह्मणजे इयत्ताकरण ऐसा वेदान्तांत अर्थ समजावा । मायावच्छेदावच्छिन्नचैतन्यविग्रहवान् हें आमच्या मधुराद्वैतांतील ध्येय होय. एवं मधुसूदनाच्या वाक्यार्शीं बहु विरोध येतात. तथापि विद्यारण्य व मधुसूदन दोघेही वेदान्ती म्हणून निर्णय ऐसा कीं, निर्विशेषब्रह्माचे ठायीं तर्क गम्य आहे कीं नाहीं ऐसा विवाद संभवतो; आणि मननपूर्वक निदिध्यासनवृत्तिगोचर तें आहे ऐसा निर्णयही होतो; परंतु सविशेषब्रह्माचे ठायीं तर्क संभवतच नाहीं, हा प्राचीन प्रमाणावरून निश्चय आहे.

शिष्य उवाचः— अहो स्वामिन् ! तरी सगुणब्रह्म श्रद्धाजाड्यपूर्वक तुच्छ जाहलें.

श्रीगुरुरुवाचः—ऐसें नोहे. तेथेंही अश्रद्धानिवर्तक तर्काची अपेक्षा आहे; श्रद्धाभंजक तर्काची अपेक्षा नाहीं हा अर्थ समजावा. मधुसूदनाचें

म्हणणें प्राचीन प्रमाणावरून श्रद्धाभंजक आहे, म्हणून तें तुच्छ समजावें. ओवी:—आणिक म्हणे मधुसूदन । जो का आत्मा विग्रहवान । तयाचे ठायीं तर्क चाले म्हणून । अरूपत्वास्तव अदृश्यत्वप्रसंग ॥ ११२ ॥ सरूपत्व असतां क्षणीं । मानावें लागेल पिशाचादिवदंतर्धानी । परी हें तर्कप्रमाणीं । आलेंचि होय ॥ ११३ ॥ चूर्णिका:— ऐसें मधुसूदन बोलिला तें सम्यक् नाहीं । कारण आकाशादि दृष्टान्त निर्विशेषब्रह्माचे ठायीं । ब्रह्मज्ञानी देताती सर्वही । म्हणोनी आमुची हानिही नाहीं । आणि हा आक्षेप ये मायाविग्रहावरही । मायाविग्रह मान्य सर्ववेदान्तियांही । ह्मणोनी स्वपक्षदोषें भक्षिलें मधुसूदनालाही । प्राचीनवचनप्रमाणें दोषवत्ता नाहीं आम्हां ॥ (ओवी)— आतां टीकाकार गौडब्रह्मानंद । बोलतो तयाचा कराया भेद । आधीं सांगतों विशद । बोलिला जें तो ॥ ११४ ॥ ( गद्य )— इंद्रादिकांप्रमाणें, परमेश्वराच्या अंतर्धानशक्तीमुळें, श्रीकृष्णादिकांचे देह सदा असूनही कोणाला कचितच दिसतात, असें ह्मणणें ह्मणजे डोळ्यानें दिसण्यायोग्य ते नाहींत, असें ह्मणण्यासारखेंच आहे. आह्मीही ह्मणतों कीं, ते डोळ्यानें दिसूंच शकत नाहींत. ह्मणजे चाक्षुषत्वाचा अप्रसंग आह्मी सांगतों, आणि तुह्मी चाक्षुषत्वाचा अभाव सांगतां, असा विशेष असल्यामुळें विग्रह आहे, असें तुमचें ह्मणणें आहे. पण तें योग्य नाहीं. कोणत्याही ठिकाणीं विग्रहाचें रूप स्वीकार करणें अयोग्य होय; कारण, नीलत्व, पीतत्व, रक्तत्व इत्यादि जातींची व्याप्य जीं नील, पीत, रक्त रूपें सामान्यत: पृथ्वीचे ठिकाणीं राहतात, आणि पृथ्वीजन्य आहेत, ह्मणून ब्रम्हाचे ठिकाणीं तें रूप संभवत नाहीं. आणि रूपाच्या जन्यत्वास्तव नित्यही तें संभवत नाहीं. बरें जन्यरूपाचा विग्रहाचे ठिकाणीं अंगीकार केला तर, तें काय विग्रह ज्या कारणापासून उत्पन्न होतो त्याच कारणापासून उत्पन्न होतें, किंवा पाकापासून उत्पन्न होतें? अग्नीच्या संयोगानें जें पदार्थाचें दुसरें रूप होतें, त्याला पाक ह्मणतात. यांतील विग्रहाला नित्य मानणाऱ्या तुझ्या मतांत, प्रथमपक्ष संभवत नाहीं; आणि द्वितीयपक्षही संभवत नाहीं; कारण, पाकजरूप मानलें तर, श्रीकृष्णाचीं अनेक रूपें मानावीं लागतील. पाकाच्या पूर्वीचें रूप निराळें, व पाकाच्या नंतरचें रूप निराळें, असें स्पष्ट ह्मणावें लागेल; हें टीकाकाराचें ह्मणणें

व्यर्थ आहे. कारण, पार्थिव किंवा पाकजरूप, नैय्यायिकमतांतच मानलें आहे. वेदांतमतांत रूप हा अग्नीचा धर्म मानला आहे. तेव्हां अद्वैत-सिद्धीच्या टीकाकारानें वेदान्तमताला घेऊन तरी शंका करावयाची होती. पण आपल्या उरावर धोंडा पडेल म्हणून न्यायमताला कार्खेत घेऊन त्यानें विग्रहावर दोष आणले. पण तेंही अप्रयोजक आहेत; कारण भूत-कार्यविग्रह आम्ही मानीत नाहीं आणि वेदान्तीही मानीत नाहींत. म्हणून पार्थिवरूपाची शंकाच करणें शक्य नाहीं. पार्थिवरूपानें आमची अमायि-कविग्रहवत्ता सिद्ध न होवो; परंतु मायिकविग्रहवत्ता तरी सिद्ध कशी होते? आतां भगवद्रूप विग्रह कारणजन्य आहे काय असा पक्ष जो टीकाकारानें विचारला आहे, त्यांतील 'कारण' शब्दाचा अर्थ 'पार्थिव-परमाणु' आम्हीं समजावा, कीं 'माया' समजावा ? प्रथमपक्षीं, मायिक-विग्रह तुमच्याच मतांत मानलेला आहे; तेव्हां तुम्हीं आपल्यालाच प्रश्न विचारावा. जो भूतकार्यभगवच्छरीर मानीत असेल, त्यालाच पार्थिव-परमाणु घेऊन प्रश्न विचार; आह्माला काय विचारतोस ? द्वितीयपक्षाचें अनेक वेळां आम्ही खंडण केलेंच आहे. शिवाय, आम्ही वल्लभाप्रमाणें । सर्वब्रह्माचा नित्यविग्रह मानीत नाहीं; तर अनध्यस्तविवर्त मानतों. तो दुर्जनतोषन्यायानें परिभाषामात्र स्वीकारला तरी, नाममात्र होत नाहीं, ह्मणूनही विरोध नाहीं. पाकज श्रीकृष्णाचें रूप आहे काय, हा प्रश्नही टीकाकारानें व्यर्थ केला आहे. कारण, पाकजरूप देखील भूतकार्याचे ठिकाणींच असतें. हाही प्रश्न त्यानें मायाविग्रहवादी स्वमतियासच विचा-रावा; आह्मांस विचारूं नये. आम्हीं तर भगवद्विग्रहाचे ठिकाणीं पाकज-रूपच मानीत नाहीं. पुनः टीकाकार वटवट करितोः— पाकज नानारूपें श्रीकृष्णाला मानलीं तर, नवीन मेघाप्रमाणें सावळ्या रूपाचें ध्यान करावें, किंवा इंद्रनीलाप्रमाणें निळ्या रूपाचें ध्यान करावें, असा संशय येऊन अवश्य अव्यवस्था होईल. सर्वच रूपें उपास्य आहेत असें ह्मणतां येणार नाहीं. कारण, गौतमीय मंत्रादिकांचे ठिकाणीं नवीन मेघा-प्रमाणें ध्यान करावें, असें सांगितलें आहे. ह्यावर टीकाकारा ! यानें सुरापान निश्चयानें केलें आहे. " आसन्वर्णास्त्रयो ह्यस्य गृह्णतोऽ-"नु युगं तनुः । शुक्लो रक्तस्तथा पीत इदानीं कृष्णतां गतः " ( श्रीमद्भाग-

वत स्कंद १०, अ० ८, श्लो० १३. ) हा श्लोक न्यायाची भाषा बडबडणाऱ्या या टीकाकारानें पाहिला नाहीं. गर्गाचार्य नंदास ह्मणतात:— तुझ्या पुत्राचीं रूपें तीन आहेत; व तीं तो युगानुरूप घेत असतो. पांढरे, लाल, पिवळे असे त्याचेच अवतार असून, आतां हा नीलरूपी अवतार झाला आहे. शिवाय गौतमीयमंत्रांत एका रूपाचीच उपासना सांगितली आहे; आणि तेंही रूप पाकज कोणी मानीत नाहीं; म्हणून टीकाकाराचा उन्मत्तप्रलाप अश्रोतव्य आहे. पुन: टीकाकार म्हणतो:— हे भगवद्विग्रहवादी तूं असें म्हणशील कीं, श्रीकृष्णादि विग्रहाच्या नीलत्वादि जातींपैकीं, प्रत्येकजातीयरूप उपास्य आहे, म्हणून पाकजन्य नानारूपें जरी श्रीकृष्णादिकांचे ठिकाणीं मानिलीं, तरी उपासनेची अव्यवस्था होत नाहीं. तर असें म्हणूं नको.

सिद्धान्ती उवाच:— अरे म्हणतो कोण ! तूं आपल्या मनाचाच पूर्वपक्षी उत्पन्न केला आहेस. जगांत अशाप्रकारचा पूर्वपक्ष कोणी आजपर्यंत काढला नाहीं, व वेदान्ताश्रयानें पुढें काढणें शक्य नाहीं, असें मी आज सांगतों. भूतकार्य भगवद्विग्रहवादी तर नास्तिकपक्षनिक्षिप्त असल्यामुळें, प्रमाणच नाहीं. बरें, या स्वकपोलकल्पित पूर्वपक्षाला जें टीकाकारानें उत्तर दिलें आहे, तेंही विचित्र आहे. तें असें:— पाकजरूप मानलें तरी, अशा प्रकारचा अग्निसंयोगानें ब्रह्माचे ठिकाणीं पाक होतो, याला कांहीं नियामक नाहीं. अरे पण हा मद्यपी टीकाकार हें लादतो कोणावर ? कोण म्हणतो कीं ब्रह्म हें अग्नीच्या संयोगानें भाजलें जातें किंवा शिजलें जातें ? जो म्हणत असेल त्याला विचार. आम्हाला काळें तोंड दाखवूं नको. आह्मी रूपाची सिद्धि श्रुतिस्मृतिपुराणवचनांनीं मानीत असल्यामुळें कुतर्काची प्रथा मुळींच मानीत नाहीं. पुन: टीकाकार आपलाच हठ पुढें चालवितो:—सृष्टीच्या आरंभीं अशा प्रकारचा ब्रह्माच्या ठिकाणीं पाक होतो म्हणावें, तर तेंही योग्य नाहीं. कारण, रूप, रस, गंध, स्पर्श हे नुसते गुणच नाश पावतात, अशी कल्पना करण्यांत गौरवदोष आहे. द्रव्यनाशानेंच त्यांचा नाश होतो; ह्मणून अनादि रूपादिमान् पूर्वदेह नाश पावून, त्याच प्रकारचा दुसरा देह सृष्टीच्या आरंभीं पाकापासून उत्पन्न होतो, असेंच म्हणावें लागेल. म्हणूनच

" रूपादिमत्त्वाच्च विपर्ययो दर्शनात् ( ब्र० सू० अ० पा० ) या सूत्रांत पृथिव्यादि भूतांची विशेष व सामान्यत: विनाशिता प्रतिपादन केली आहे. त्यावर सूत्रमुक्तावली नांवाची जी आमची टीका आहे, तींत त्रसरेणूचे ठिकाणीं पाकजरूप उत्पन्न होतें, असें म्हणण्यापेक्षां अनादि रूपादिविशिष्ट त्रसरेणूच पाकज आहे असें मानणेंच बरें, असें आम्हीं तर्कपूर्वक म्हटलें आहे.

सिद्धान्ती उवाच:—म्हटलें असेल. सूत्रमुक्तावलीचा विषय, शांकर-भाष्यसमर्थन हा आहे. भगवद्विग्रहखंडण हा नाहीं. शिवाय तूं आपल्या वाक्याचेंच प्रमाण दिलें आहेस, त्याला तुझी स्त्री मानेल. आम्हाला मानण्याची आवश्यकता नाहीं. अनादिरूपादिविशिष्टद्रव्याचा पाक मानल्यास, गुणांची अनादिता व गुणीची अनित्यता असा एक दोष उत्पन्न होतो. तो सध्यापुरता तरी वैशेषिकांच्या आड लपणाऱ्या तुझ्या वैशेषिक मताच्या विरोधी आहे. जरी वेदान्तियांना पक्षें करून वैशेषिक मत मान्य आहे, तरी नास्तिकमतखंडणाकरितांच मान्य आहे. आस्तिक-मतखंडणाकरितां मान्य नाहीं. परंतु अल्पज्ञानानें दुर्विदग्ध झालेले हे टीकाकारासारखे अरण्यपंडित, वेदान्ती म्हणवून घेऊन, प्रसंगीं भलत्याच्याच पाठीस दडून, तुला न मला घाल कुत्र्याला, अशाप्रकारची नीच लबाडी करीत असतात. त्याचें हा टीकाकार स्पष्ट उदाहरणच आहे. यद्यपि शास्त्रांतरानेंही स्वमतसिद्धि करावी असें आहे, तथापि स्वमतभंग होऊं देऊं नये, इकडे पाहिलें पाहिजे. पण या अद्वैतसिद्धीवरही टीका करणाऱ्याचा, येथें वैशेषिकांच्या आड लपल्यामुळें, स्वमतभंग झाला आहे. कारण, सृष्टीच्या आरंभीं अग्निसंयोगानें अनादिरूपादिविशिष्ट पूर्वभगवद्देहाचा नाश होऊन, दुसरा भगवद्देह अग्नीच्या योगानें ईश्वर भाजून उत्पन्न होतो, असें म्हणा; हें हा मूर्ख पूर्वपक्षावर लादतो. पण अशाप्रकारचा पूर्वपक्ष याच्या स्वप्नांतच उत्पन्न झाला असेल. जगांत उत्पन्न होणें शक्य नाहीं. कारण आपलें उपास्य भाजलें जातें, कीं शिजलें जातें, इत्यादि कल्पना म्लेंच्छ धर्मांतही नाहींत; तर मग त्या आर्यधर्मांस कशा शिवतील ? या पूर्वपक्षाचा या मूर्खानें अर्धांगीकार केला आहे, परंतु मायाकार्यभगवद्विग्रहवादी

देखील अग्निसंयोगानें परमेश्वर भाजला जातो असें मानीत नाहीत. कारण, तसें मानणें म्हणजे भूतकार्यविग्रहवाद येतो. गर्भपाकाप्रमाणें जठराग्निसंयोगानें देखील अवतारशरीराचा पाक होत नाहीं, असें भागवतदशमस्कंदांत, व त्याच्या श्रीधरी टीकेंत, स्पष्ट ह्मटलें आहे; तें येणें प्रमाणें:— " भगवानपि विश्वात्मा भक्तानामभयंकर: । आविवेशांशभागेन मन आनकदुंदुभे: ॥ अध्याय १२ श्रीधरी टीका:— मन आविवेश मनस्याविर्बभूव । जीवानामिव न धातुसंबंधमित्यर्थ: । भावार्थ:— भक्तांनां अभय देणारा, जगताचा आत्मा भगवान् वसुदेवाच्या मनामध्यें प्रविष्ट झाला. मनामध्यें प्रविष्ट झाला असें ह्मणण्याचें कारण, जीवाप्रमाणें जठराग्निसंयोगानें धातुपाकजगर्भ अवताराचा होत नाहीं हें आहे. भाषासूत्र:— अवारुदेवरूपाये । मुळुभक्तिजुटित मुळुपासनाजुटित अंत:-कण्णम्मि जुगपत्संमिलिद्म्मुळुवे ।ध्यानसंमिलिद्मवारुवे। पर्यायू आदि दुसरे। अंत:कण्णम्मि आविर्भाव तरी मानसशरीर ह्मणावें तें नाहीं । देवकीगर्भाचे ठायीं प्रवेश न होईल म्हणून । देवकीमनीं आविर्भाव होऊन मानसशरीरही नाहीं । बाहेरी प्रगटलीया मनोनाशप्रसंग येईल म्हणून । मनाचें अंशरूप शरीर नाहीं । वेदान्तमतीं मन भौतिक मानिलें म्हणून आणि न्यायमतांत दीधीतिकारानें ही मन अणुकार्य मानलें म्हणून । मानसभगवच्छरीराला भूतकार्यता येईल, । यालागीं सशरीर देवाविर्भाव मानसीं आणि जगतीं प्रगट जाणिजे! गर्भादि मागणी फळ बोलिजे । नाहीं तर प्रथम अष्टवर्ष-जन्मादि विरोध येईल! भक्तिरूपाचे ठायीं । एवं पाकजत्व नाहीं । तैसें उपास्यरूपाचे ठायीं । श्रुतिचि सांगे पाकजत्व नाहीं । ती श्रुति तापनी-यांतील येणेंप्रमाणें: — " चिन्मयस्याद्वितीयस्य निष्कलस्याशरीरिण: । उपासकानां कार्यार्थं ब्रह्मणो रूपकल्पना " । भावार्थ:— भाषासूत्र—अज्ञान-निवृत्तिविशिष्ट, वृत्तिज्ञानवर्ज्य ज्ञान म्हणजे जाणीवमात्र स्वरूप, तें चैतन्य बोलिजे । चैतन्य ह्मणजे चिन्मय । अन्य सर्व विषमसत्ताक असल्यामुळें ज्याच्या स्वरूपांत कोणत्याही प्रकारचा विकार उत्पन्न करीत नाहीं । ह्मणून ज्याच्या समान कांहींच नाहीं । असें तें अद्वितीय बोलिजे । विषमसत्ताक विवर्त असला तरी अधिष्ठानाची हानि होत नाहीं ह्मणून तें निष्फळ बोलिजे । अनध्यस्तविवर्तावांचून ईश्वरशरीर

नाहीं आणि अध्यस्तविवर्तावांचून जीवशरीर नाहीं ह्मणून तें अशरीरी बोलिजे । तयाचे ठायीं उपासकांच्या कार्यासाठीं रूपाची कल्पना आहे । कल्पना ह्मणजे प्रतिबिंबापेक्षिकबिंबत्वारोपावच्छिन्नबिंबभूताची जीवातें अपेक्षा होय । नाहींतर सकल अवतार व्यर्थ होतात । अथवा कल्पना-शब्दाचा मनोवृत्ति असा अर्थ घेऊन चाललें तर ही श्रुति ध्यान सांगते इतकेंच म्हणावें लागेल । परंतु कोणत्याही पक्षांत पाकजदेह परमेश्वराचा मानतां येत नाहीं. म्हणून या वेड्या गौडब्रह्मानंदाचें कल्पित पूर्वपक्ष उभारणें, त्याचा अर्धा अंगीकारही करणें, आणि त्याला उत्तर देणें, हे तिन्हीही वृथा सुरामत्त प्रलाप आहेत. त्रसरेणु पाकज आहेत ह्मणूनच नीलादिव्यक्ति एक एक स्वतंत्र आहे, असें मीमांसक ह्मणतात आणि याचमुळें " कृष्णाय देवकी पुत्राय " इत्यादि श्रुति, आणि तशाच कांहीं स्मृति, सार्थ ठरतात; असें टीकाकार म्हणतो. अनादिरूपादिविशिष्ट पूर्वदेह नाश पावून, सर्गकालीं पाकापासून तसाच दुसरा देह उत्पन्न होतो, असा अंगीकार येथें आहेच. परंतु या श्रुति-स्मृतींचा अर्थ तर, श्रीमद्भागवतांतील वर जो श्लोक दिला आहे, त्या प्रमाणें आहे. नाहीं तर, हा वेदान्ती असूनही बलानेंच याच्या गळ्यांत भगवद्विग्रहाचें भूतकार्यत्व पडतें, आणि मायाकार्यवादावरही यानें आण-लेले दोष येत असल्यामुळें, हा स्वपक्षदोषदूषित आहे. शिवाय, या अनवधानपटूनें अद्वैतसिद्धीच्या टीकेंतच भगवद्देह मायाकार्य मानिलाही आहे. तेव्हां यानें आपल्यालाच प्रश्न करावा. आह्माला काय विचारतो ? मधुसूदन पुनः ह्मणतो.– विग्रहपक्षीं " अपाणिपादो जवनो गृहीता पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः " इत्यादि श्रुतींचा विरोधही आहे. हात नसून घेणारा, पाय नसून चालणारा, डोळे नसून पाहतो, आणि कान नसून ऐकतो, असा या श्रुतीचा अर्थ आहे. यावर पूर्वपक्षी असें ह्मणेल कीं, " अदुःखमसुखं " इत्यादि शब्दानें जसा प्राकृत सुखाचा निषेध केला आहे, तसा प्राकृत हस्तपादांचाच या ठिकाणीं निषेध आहे. नाहीं-तर, पाहतो, ऐकतो, इत्यादि वाक्यार्शीं विरोध येतो; तर हें पूर्वपक्षाचें म्हणणें सम्यक् नाहीं. कारण, ' ऐकतो ' या वाक्यांत शब्दसाक्षित्व, व ' पाहतो ' या वाक्यांत रूपसाक्षित्व, विवक्षित आहे. हा मधुसूदनानें

तर हें सुखदु:खाचें घोंगडें कांहीं न करितां परमेश्वराच्या गळयांत पडेल. परकर्मजन्यशरीरांत शिरलेल्या पिशाचाला ज्याप्रमाणें पिटण्याचें दु:ख होतें, तसें देवाल्हाही होईल. आणि अत्यंत परार्थभोग्य मानल्यास, भगवद्विग्रह सचेतन होणार नाहीं; तर प्रेतरूप होईल. इत्यादि अनेक दोष येतात. आतां ईश्वर आपल्या इच्छेनेंच विग्रहाचा उपसंहार करितो, असें मानलें तर भक्ताच्या इच्छेकरितां जो दयालु आहे तो दयेनेंच नित्यविग्रह धारण करतो, असेंही मानण्यास प्रतिषेध नाहीं. शिवाय इच्छा ही मायारूप मानल्यास, पूर्वोक्त दोष येतो; आणि मायारहित मानल्यास, नैय्यायिक म्हणतात तशी, ती काय ईश्वराचा गुण आहे, कीं अनध्यस्तविवर्त आहे ? असा प्रश्न उत्पन्न होतो. प्रथमपक्ष वेदान्तविरुद्ध आहे. आणि द्वितीयपक्ष आम्हाला इष्ट असून, अनध्यस्तविवर्त भगवद्विग्रहाची सिद्धिही अनायासेंच होते. आतां स्वयंविशीर्ण होणें हा विग्रहाचा स्वभावच मानला, तर प्रत्यक्षानुमानाप्रमाणें शाब्दप्रमेय-स्वभावनियमानें मानतां येत नाहीं. नाहींतर मनोविषयवास्तव, ब्रह्माचा देखील दृश्य स्वभाव मानावा लागेल. किंवा स्वर्गीयदेवशरीराचा देखील, मर्त्यशरीरवत्, स्वभाव मानावा लागेल. अणुशरीरवाद आकाशशरीर-वाद, भूतविशच्छरीरवाद किंवा ब्रह्मा, विष्णु, शिव व रामकृष्णादि शरीर-वाद, ईश्वराविषयीं नैय्यायिकांनींही अंगिकारिला; म्हणून न्यायाच्या आड लपणाऱ्या मधुसूदनानें येथें विचार करावयाचा होता. कारण, परमाणु-शरीरत्वादिकानें महत्वादिकांचा आक्षेप न्यायमतानेंच नष्ट होतो. विग्रहाला नित्यत्व सांगणाऱ्या श्रुतीचें व्याख्यान आम्हीं अन्य प्रकारानें केलें आहे, असें जें म्हणणें आहे, त्यावर आम्हीही त्याचें खंडण केलेंच आहे; असें आमचें उत्तर आहे. साधनव्यापकत्वामुळें, प्राकृतत्वउपाधि तुला म्हणतां येणार नाहीं, असें जें मधुसूदनाचें म्हणणें, तें अत्यंतसाकार-वादियांना योग्य आहे. सावयवत्वामुळें विग्रह नित्य नाहीं, असें जें म्हणणें, तें यावद्व्यवहार मुक्तेश्वराभेदाप्रमाणें विग्रह नित्य असल्यामुळें, तुच्छ आहे. आणि अनादिजीवप्रवाहास्तव, व्यवहारसमाप्तिही गणतां येत नाहीं. यामुळें विग्रहाला परिणामीनित्यत्व तरी असो, असेंही म्हणतां येत नाहीं. विवरणोक्त मुक्तीलाही तें म्हणावें लागेल म्हणून,

अनध्यस्तविवर्त आहे ह्मणून, कूटस्थनित्यत्वापात नाहीं; आणि लीला-विच्छेद नाहीं ह्मणून, तुच्छ नाहीं. एवं न्यायमकरंदोक्त पंचमप्रकारक तृतीयनित्यत्व आहे. यावद्व्यवहार विवरणोक्तमुक्तींत, सगुणधर्मांचा जो अंगिकार आहे, तो मायोपाधिमुळें आहे, असें ह्मणणाऱ्यास दुर्जन तोषन्यायानें आमचेंही असें ह्मणणें आहे कीं, ज्ञानानें नाश पावत नाहीं, प्रारब्धपातानंतर निवृत्त होत नाहीं, आणि जीवाला भ्रांति उत्पन्न करीत नाहीं, असें जर मायाकार्य ह्मणावयाचें असेल, तर आमुचा तुमचा विवाद नाममात्रच आहे. आणि चेतनत्वेंकरून प्रतिबिंबसत्यत्वा-वच्छिन्नबिंबसत्यत्ववत् कूटस्थनित्यत्वही विग्रहातें रहस्य प्राप्त आहे; यद्यपि अन्य श्रुतीचा अर्थ अन्यथा केला आहे, आणि त्याचें आह्मीं खंडणही केलें आहे, तथापि त्रिपान्महानारायणश्रुतीचा अर्थ अन्यथा होत नाहीं. कारण, प्रलयादिव्यावृत्ति अन्यलोकपर्यायें त्यांत केली आहे; आणि तें उपनिषत्वेदान्तज्ञानविरोधी नाहीं, हें आलोचनानें सहज समज-ण्यासारखें आहे; आणि अवैदिक नाहीं. शांतिपाठेंकरून वैदिक नियमा-दृष्टाची अध्ययनाला अपेक्षा आहे. ह्मणून टीकाकाराचें मध्यमपरिमाण-त्वास्तव अनित्य, असें जें ह्मणणें आहे, तेंही योग्य नाहीं. मायापक्षीं देखील सत्कार्यवादाचा अंगिकार आहे ह्मणून, आणि मायेच्या विक्षेपां-शांत लीनत्व सिद्ध होत नसल्यामुळें, प्रलयाविनाही कार्याला ज्ञाननाश्य-त्वाभावीं यावत्व्यवहार नित्यत्ववक्तुं शक्य ह्मणजे बोलतां येण्यासारखें आहे ह्मणून, ज्ञातृत्वोपलक्षणनित्यत्ववत् विग्रहातें नित्यत्व असंभवनीय नाहीं. या प्रमाणें टीकाकारवचन असंगत आहे. आतां पुन्हा; मूळ अद्वैतसिद्धिकार मधुसूदन पुन्हा ह्मणतो :— विग्रहाचे उपा-दान अवयव असतील तर ब्रह्मविग्रहाचे ठिकाणीं ते संभवत नाहींत; आणि ब्रम्हाचा एकदेशमात्रच विग्रह असेल, तर गगन व आत्मा हेही एकदेश आहेत. मग त्यांनांही विग्रह ह्मणावें लागेल हें मधु-सूदनाचें ह्मणणें सुसंगत नाहीं. कारण, भगवद्विग्रहाचें उपादानअवयव आहेत, असें आह्मी मानितच नाहीं. अवयव उपादान मानल्यास भूत-कार्यवाद येतो; पण वेदान्ती मायाकार्यभगवद्विग्रहवादी असल्यानें ते तरी माया उपादान घेऊन ब्रह्मविग्रह कसा सिद्ध करतात ? मनुष्यादिकां-

प्रमाणें केला तर भूतकार्थवादच येतो. ब्रह्मैकदेश भगवद्विग्रह मानला तरी, तो मायावच्छेदावच्छेदानें अनध्यस्तविग्रह आम्हीं मानतों. गगनादिक मायाकार्य असल्यामुळें त्याचे ठिकाणीं विग्रहसमत्व येत नाहीं. गगनादि व्यभिचारावरून एकदेशमात्राचाच सर्वथा निषेध केला तर गगनवन्हि-पृथ्वीला देखील साम्यता येईल. बरें आतां अवच्छेदाच्या अनवस्थेनें सर्वच ब्रह्म अनध्यस्तविवर्त आहे, असें कोणी ह्मणेल तर तें योग्य होणार नाहीं; कारण प्रतिभासावच्छिन्न परमार्थसत्तानिरूपकच अवच्छेद आहे; आणि तसें अनंत झालें तथापि शुद्धचैतन्यास तसें होतां येत नाहीं, आणि शबलचैतन्यही अनंत होत नाहींत. वास्तविक मायावच्छेदच एक होऊं शकतो ! पुढील अवच्छेद सर्व चैतन्याचेच होत असल्यामुळें हा आक्षेपच गौरवदोषयुक्त आहे, म्हणून त्याज्य आहे.

शिष्य उवाचः— (भाषासूत्र) अहो मायावच्छेदजन्य अनध्यस्त-विवर्ताचे ठायीं । माया निरास बोलिजे तो कैसा ? । श्रीगुरु ह्मणती पाणियाचा तरंगाकार होय जैसा । वायुनिमित्तें जलतरंग उमटे । तरंग हातीं घेतां पाणीचि प्रगटे । तेथ वायु न सांपडे नेटें । इतर जगासी मायापरिणामित्वेंकरून आणि ब्रह्मविवर्तत्वेंकरून उपादान होय । भगवद्दे-हासी माया निमित्तत्वेंकरून चैतन्यउपादान होय । तेथ मायानिवृत्तनिमित्त बोलिजे । निमित्त द्विविध आहे । अन्वयनिमित्त आणि निवृत्तनिमित्त । रथगतीचे ठायीं सारथी अन्वयनिमित्त बोलिजे । घटाचे ठायीं दंडचक्रकु-लाल निवृत्तनिमित्त बोलिजे । तैसी येथ माया निवृत्तनिमित्त । वायु तरंगाचे ठायीं निवृत्तनिमित्त । तरंग स्पर्शितां पाणी । तैसें आलिंगतां चक्रपाणि । चैतन्यचि तें निर्वाणीं । जड नोहे हें मनांत आणीं । जडाचे ठायीं भातित्व आहे । अस्ति भाति प्रिय हा अंश ब्रह्माचा होय ! सगुणीं काय भातित्व जाय । ह्मणोनी ऐसें भलतें चिंतितोसी कैसा । यद्यपि संसारीं नांवरूप सहसा । तरी तेणें वासना वाढे । शास्त्रीय नामरूपाच्या ठायीं । वासना न वाढे कांहीं । ह्मणोनी प्रपंचासारिखा नामरूपाचा निषेध न होय । शिष्य ह्मणे सद्गुरुनाथा । अस्ति भाति प्रिय अपरोक्ष असतां । नामरूपाची परोक्षता चुकेल कैसी ॥ ११५ ॥ परोक्षत्वें निवृत्ति ! तैं श्रीगुरु ह्मणती । परोक्ष शबल ब्रम्हही आहे । तथापि तयाची निवृत्ति

नांहे । शिष्य म्हणे भगवंता । हें आलिंगनसुख समर्था । भेदें अनुभविजे कीं अभेदें अनुभविजे । पाहिलीया पक्षीं प्रपंच समस्थीति । दुसरिया पक्षीं वृत्ति कदर्थी । श्रीगुरु म्हणती सांगतों तुतें । चरमवृत्ति आत्मयातें । जाणें तें तयातें भेदें अनुभविजे कीं अभेदें । तेथ वाक्याविज्ञान विषय करी अभेदा । तथापि वृत्तिज्ञान विषय करी भेदा । म्हणसी तरी येथ ज्ञान विषय करी चेतनशुद्धा । वृत्तिअनुभव भेदा विषय करी ।। ज्ञानें जें न नाशे । तें तुच्छ होय कैसें । आणि भात्यंशीं विलसे । म्हणोनी अनध्यस्तविवर्ते ।। ११६ ।। पुनः मधुसूदन अद्वैतसिद्धींत म्हणतोः– हे पूर्वपक्षी, तूं असें म्हणशील कीं, उपादानावांचून एकदेश राहतो, कारण, पटादिकांचा जो एक देश असतो तो तंतूहून भिन्न असतो. हातभर पटाचा वीतभर एकदेश समजावा; पण हें तुझें म्हणणें बरोबर नाहीं. कारण, वस्त्राचें उपादान जें तंतु, त्यांचाच हातभर लांबपणा व वीतभर लांबपणा पटांत येतो; म्हणून उपादानभिन्न एकदेश आहे असें म्हणता येत नाहीं. बाहवारे ! मधुसूदन, न्यायाच्या आड लपून वेदान्ताचाही यानें चूर केला आहे. उपादानभिन्न जर एकदेश नसेल, तर माया ब्रह्माच्या एकदेशीं आहे हें वेदान्ताचें म्हणणें सिद्ध होणार नाहीं. कारण, मायेचें ब्रह्म किंवा अन्य कांहीं उपादान नाहीं. यद्यपि माया अध्यस्त आहे कीं नाहीं ? अध्यस्त म्हटली तर अध्यासाची निरूपक होणार नाहीं इत्यादि शंका दुर्घट आहेत, तथापि अध्यासाचें कार्य माया आहे, असें म्हटलें तर त्यांचें दुर्घटत्व भासतें; पण अध्यासाचें स्वरूपच माया आहे म्हणून तिचे ठिकाणीं अध्यस्तत्वादिक प्रकार आक्षेपपक्षेंकरून उत्पन्नच होत नाहींत. कारण, परिणामशंकाप्रकार स्वरूपपक्षाचे ठायीं नसतो. मायेचें एकदेशीत्व स्वामि विद्यारण्यही पंचदशींत सांगतात ! " पादोऽस्य सर्वं भूतानि त्रिपादस्ति स्वयंप्रभः । इत्येकदेशवृत्तित्वं । मायाया वदति श्रुतिः " रज्जुसर्प पृष्ठभागाचे ठायीं दृष्ट होतो तसा रज्जुउदराचे ठायीं होत नाहीं. इत्यादि सर्व संमत आहे. म्हणून चैतन्याचा एकदेश जो अनध्यस्तविवर्त तो उपादानभिन्न नाहीं हें म्हणणें न्यायविरुद्ध आहे. यद्यपि मायासंयोगास्तव संयोगाचें उभय उपादान असतें, म्हणून मायावच्छिन्न अनध्यस्तविवर्त ब्रह्मैकदेश उपादानभिन्न म्हणतां येत नाहीं अशी शंका येते, तथापि हा नियम

समसत्तेंत असल्यामुळें ती शंका योग्य होत नाहीं. विषमसत्तेचे ठायीं संयोग संभवत नाहीं. यद्यपि विषयाचा स्वरूपाध्यास व विषयीचा संसर्गाध्यास मानला आहे, तथापि विषयीचाच संसर्ग विषयाच्या ठायीं आहे; विषयांचा नाहीं. म्हणून अपर सत्तेचे ठायीं परसत्तेचा संयोग होवो; पण अपरसत्तेचा परसत्तेचे ठायीं संयोग संभवत नाहीं. अथवा विषमसत्तेंतील संयोग उपादानहेतु नाहीं. कारण, तसें मानलें तर सांख्याप्रमाणें प्रकृतिपुरुषध्वंसमोक्ष होईल, अविद्यानिवृत्तिमोक्ष होणार नाहीं. अथवा संयोग मानला तथापि विषमसत्ताक संयोग हानि उपजवीत नाहीं. जसा जिव्हामृगजलसंयोग कोणतेंही कार्य करीत नाहीं. पंचमप्रकारवत् प्रतिभासावच्छिन्न परमार्थसत्ता असल्यामुळें अनध्यस्तविवर्तीमायावच्छेदनिरूपकांत प्रातिभासिकसत्ता मानून शंका करणेंहि योग्य होत नाहीं. अंत्यावयवी विशेषच विग्रह आहे असें जें टीकाकार गौडब्रह्मानंदाचें म्हणणें, तें न्यायशास्त्रसंमत असलें तरी, विक्षेपस्वरूपमायापक्षेंकरून वेदान्तसंमत नाहींच नाहीं. आणि सत्कार्यपक्षेंकरूनहि नाहीं. पुनः मधुसूदन म्हणतो:— पूर्वपक्षी असें ह्मणेल कीं, संयोगीत्वादिकेंकरून गगनाचे ठिकाणीं एकदेशसाधन संभवतें, तर तें आम्हाला इष्टच आहे कारण, सावयवत्व व अनित्यत्व आह्मीं तेथेंही अंगिकार करितों. सुखानें कर. परंतु यावद्व्यवहार मायेची निवृत्ति नसल्यामुळें ईश्वरीं मिळालेल्या मुक्तांचें ऐश्वर्य "एवमप्युपन्यासात्पूर्वभावादविरोधं बादरायणः" (ब्रह्मसूत्र, अ. ४, पा. ४, सू. ७.) या सूत्रानें जसें नित्य सांगितलें आहे तसा अनध्यस्तविवर्तविग्रहही अनित्य होऊं शकत नाहीं. कारण, ऐश्वर्याचे जे सत्यसंकल्प सत्यकामादिक ते उपन्यस्त आहेत. तथापि त्यांचें स्फुरण भेदेंकरून होतें. अभेदेंकरून नाहीं. म्हणून त्यांचे ठायीं अवयवेवत्व आहे तसें अनध्यस्तविवर्तविग्रहाचे ठिकाणीं मानल्यास अनित्यत्वही संभवत नाहीं. आतां "यत्तु आत्मनि सुखदुःखयोः" येथून तर 'अविद्यातिरिक्तप्रकृतेरभावाच्च' येथपर्यंतची पंक्ति सर्वथा निराकार ब्रह्म न मानणाऱ्या विष्णुस्वामीमताच्या जरी विरोधी आहे, तरी आम्हां शांकरसंप्रदायिकांच्या ती विरोधी नाहीं ह्मणून मी तिचें खंडण करीत नाहीं; आणि आमच्या अनध्यस्तविवर्तविग्रहावर

तिन्यामुळें दोषही येत नाहीं. परंतु अविद्या अनित्य आहे, म्हणून तिचे ठिकाणीं व्यभिचार नाहीं असें पुढील पंक्तींत मधुसूदन म्हणतो, तरी ईश्वराची माया यावद्व्यवहार निवृत्त होत नाहीं इकडेही मधुसूदनानें लक्ष द्यावयाला पाहिजे होतें. आतां मायाअविद्येचा अभेदवाद अंगिकार करून, मायेची निवृत्ति मानील, तर मायाअविद्याअभेदवादी विवरण-कारानींही मुक्तप्राप्य ईश्वरच सांगितला आहे; म्हणून त्याच्या ऐश्वर्याचा प्रतिषेध नाहीं अशी भाष्यसंगति जुळते. अविद्यानिवृत्तीनेंच जर माया-निवृत्ति होऊन ऐश्वर्य रहात असेल, तर मग आयतेंच चेतनस्वरूपत्व विग्रहाला प्राप्त झाल्यामुळें, सोन्याहून पिवळें झालें ह्मणावयाचें. पुनः " न च जीवानामपि " येथून ' आत्मनोंशस्यौपाधिकतयास्वाभाविकत्वा-भावात् ' येथपर्यंतची पंक्ति आह्माला इष्टच आहे. कारण आह्मी भगव-द्विग्रहाला अनध्यस्तविवर्तच मानतों. ह्मणून त्याला उपाध्यवच्छेदावच्छि-न्नत्व आहे. आणि अल्पकंठनाडीचे ठिकाणीं स्वप्न ब्रह्मांड दिसतें ह्मणून, शिलेच्या ठिकाणीं ब्रह्मांड पाहिलें अशी योगवासिष्ठांत कथा आहे म्हणून, आणि कृष्णमुखाचे ठायीं ब्रह्मांड दर्शन व शरीराचे ठायीं विश्वरूपदर्शन यशोदार्जुनादि दृष्ट आहे म्हणून, " तैसा एकदेशिया व्यापका सारिसा पाडु " हें आचार्यवचन प्रमाण आहे ह्मणून, अंश इव अंशत्वच भगवद्विग्रहाचे ठायीं आम्हीं मानतो, सर्वथा अंशत्व मानीत नाहीं. आणि भागवत-टीकाकारानींही अंश इव अंशत्वेन असें म्हटलें आहे. अत एव " एतेचांशकलाः पुंसः कृष्णस्तु भगवान् स्वयम् " ही सात्वत-श्रुतिपरिभाषा गर्जित आहे. पुढें " त्वन्मते जीवानामणुरूपतया स्वाभाविकांशाभावेन काल्पनिकांशस्यैव वक्तव्यत्वात् " असें म्हणून मधुसूदनानें वालभाच्या डोळ्यांत धूळ फेंकली आहे. कारण, जीवाच्या अणुवादामुळें जीवाला स्वाभाविक अंश आहेत, असें म्हणतां येणार नाहीं. पण, ईश्वराचे अंशही काल्पनिकच आहेत, असें तेवढ्यावरून कां बरें वल्लभानीं म्हणावें ? अद्वैतसिद्धिखंडण करणाऱ्या तरंगिणीकाराचेंही इकडे लक्ष गेलें नाहीं. याचें कारण, तरंगिणीकाराचें मध्वानुयायित्वच होय. पण आम्हीं कांहीं वल्लभ नाहीं. म्हणून मधुसूदन, तरंगिणीकार किंवा वल्लभमती यांतून कोणीही मरो; आम्हाला काय

करावयाचें आहे? आमच्या अनध्यस्तविवर्तविग्रहाला यामुळें कलंक-संपर्क लागत नाहीं. पण पुढें जें मधुसूदन म्हणतो कीं " अतोहि वैष्णवा लोका नित्यास्ते चेतनात्मका: " या वाक्यांतील नित्यत्व अवांतर प्रलयींच राहतें. म्हणून भगवल्लोकांनां सर्वथा नित्यत्व नाहीं, तें साहस मात्र आहे. कारण, याच वाक्यांत चेतनात्मका: " असें म्हटलें आहे. आणि याविषयीं त्रिपादमहानारायणोपनिषत् सर्वथा प्रमाण आहे. म्हणून ईश्वरप्राप्तमुक्तैश्वर्य नित्यत्ववत् भगवल्लोकनित्यत्व सिद्ध आहे. टीकाकारानें जो ऐतरेयश्रुतीचा विरोध दाखविला आहे. त्या श्रुतींत तर आत्म्यावांचून स्थावरजंगमजगताचा निषेध केला आहे. मुक्तप्राप्यईश्वरऐश्वर्याचा निषेध केला नाहीं. आणि " चेतनात्मका: आवरणबाहुल्यशून्या: " असें म्हटलें आहे, पण तें शिशुमोहनमात्र आहे कारण, थोडेसें आवरण ईश्वराचे ठिकाणीं आहे, असें त्यावरून सिद्ध होतें. पण थोडेसें देखील आवरण मी ब्रह्म नाहीं असा बोध करण्याला पुरे आहे. अथवा हें थोडेसें आवरण ईश्वराचे ठिकाणीं सर्वदा राहतें, कीं क्षणोक्षणीं उत्पन्न होतें? प्रथमपक्षीं ईश्वर अज्ञानी होईल. कारण, आवरण थोडें जरी असलें तरी आवरणाचा अर्थच स्वविस्मृति असा आहे. आणि क्षणो-क्षणीं उत्पन्न होतें म्हटल्यास, अविद्येची उत्पत्ति मानावी लागेल. तें अनादिषट्पदार्थवादाच्या विरोधी आहे. ईश्वराची माया शुद्धसत्वरूप असल्यामुळें किंवा विक्षेपरूप असल्यामुळें आवरणरूप नाहीं, असें अविद्यामायेचा भेद मानणारे सर्व वेदान्ती म्हणतात; आणि उपाधि प्रतिबिंबपक्षपाती असतो, म्हणून बिंबभूत परमेश्वराला आवरण नाहीं, असें अविद्यामायेचा अभेद मानणारे म्हणतात. यद्यपि तमोगुणी मायेचा अंगिकार केल्यानें ब्रह्म जगताचें उपादान होतें, आणि शुद्धसात्विकमायेचा अंगिकार केल्यानें निमित्त होतें, असें विद्यारण्यस्वामी म्हणतात, तथापि तमोगुणी मायेचा परिणाम जगत् आहे; आणि तदवच्छिन्न ब्रह्माधिष्ठा-नाचा विवर्त आहे, इतकेंच त्या म्हणण्यांतील तात्पर्य आहे. ब्रह्माचे ठायीं आवरण सिद्ध करणें असें त्या म्हणण्याचें तात्पर्य नाहीं, आणि परिणत-तमांश जीवाच्याच बुद्धीचें आवरण करितो, अधिष्ठानाचें आवरण करीत नाहीं. अथवा शुद्धसत्वनिमित्तावच्छेदावच्छिन्न अनध्यस्तविवर्तविग्रह व

ाक आह्मीं मानतों, ह्मणून दोष येत नाहीं. ईश्वराला आवरण अंगिकार णारे नीच वेदान्ती बहिर्भूत होत. जगदुपादान ब्रह्मानें तमोगुणी ाचा अंगिकार केला तरी, मी ब्रह्म नाहीं अशी त्याला विस्मृति झाली ीं. नाहींतर जीवउपादानत्ववाद आला असता. यद्यपि दृष्टिसृष्टिवादानें यजीव उपादान ठरतो, तथापि तेथेंही मुक्तिकांक्षारहितत्वादिकेंकरून ारणशून्यत्वच अभिमत आहे. ब्रह्म हें शुद्धचैतन्यनिर्गुण असून विग्रह साकार व सगुण आहे. त्यांतील लीलागुण अनध्यस्तविवर्त आहे णे जीवापेक्षिकगुण मायिक आहेत, आणि शुद्धत्वेंकरून विग्रहहि णच आहे ह्मणून सर्व मधुसूदनाचें म्हणणें निरर्थक आहे. येथपर्यंत ाद्वैतदृष्टीनें अद्वैतसिद्धीचें खंडण आम्हीं केलें आहे. परंतु सर्वथासा- वादियाकरितां तर अद्वैतसिद्धिकाराचें म्हणणें बरोबरच आहे. तथापि र्थदीपिकेंत मधुसूदनानें मायारहित भगवद्देह मानला आहे; आणि ा अनध्यस्तविवर्त ह्मटलें नाहीं ह्मणून, मधुसूदनानें आपल्या गूढार्थ- केचेंच अद्वैतसिद्धि रचून खंडण केलें आहे असें एकपक्षी म्हणणें आहे. मधुसूदन या अद्वैतसिद्धिग्रंथांत वल्लभाचें खंडण करो कीं ःचें करो. पाहिजे असल्यास त्याला आम्ही अनुमोदन देऊं, पण ाकडे मात्र वांकडी दृष्टि करण्याचें त्याचें सामर्थ्य नाहीं. हें मात्र ध्यानांत असूं दे. साकारसिद्धि इत्यादि ग्रंथांत जितकें साकाराचें ा झालें नाहीं, त्यापेक्षां कोटीपट साकाराचें खंडण अद्वैतसिद्धिकारानें आहे. किंबहुना अद्वैतसिद्धिकारासारिखें साकारखंडण इतरत्र दुर्दृष्ट . ह्मणूनच आम्हींहि अतिशय शक्तिपातानें त्याचें अखंडणीय खंडण आहे. अद्वैतसिद्धिपक्षीं ज्ञानरूपानें, व गूढार्थदीपिकापक्षीं भक्तिपक्षानें, सूदनस्वामी आमचे वडीलच असल्यामुळें, बालभाषेनें केलेल्या खंड- राधाची, नमस्कार करून क्षमा मागतों. आणि हें खंडण योग्यच असा द्वेष नसल्यामुळें, ते आशिर्वादही देतील अशी मला आशा . आतां भगवंताच्या अनध्यस्तविवर्तत्वाविषयीं व अमायिकत्वाविषयीं म सांगतों.

श्रीमद्भागवतीं दशमस्कंदू । तेथ महामायापरमेश्वरसंवादू । अवतार ायाचा संबंधू । बोलिला आहे ॥ ११७ ॥ तेथ महामाया जन्मली

यशोदेपोटीं । देवकीगर्भी आले जगजेठी । माया वसुदेवें आणिली शेवटीं । यशोदेगृहीं जगजेठी गेले ॥ ११८ ॥ ऐसी वर्णिली आहे कथा । ह्मणोनी मायाभिन्न कृष्णावतार तत्वतां । मायाकार्य जरी भगवद्देह असता । तरी वेगळा न वर्णिता मायावतारु ॥ ६८ ॥ ती वैष्णवीच माया ह्मणोन । पार्वति ह्मणणें होईल गौण । लक्ष्मीचा अवतार रुक्मिण । राधिकाहि भिन्न निजशक्ति ॥ ६९ ॥ यालागीं योगमाया । जिणें मोहिलें विश्वा यया । तिच जाहली नंदतनया । ह्मणोनी कृष्णकाया नोहे मायाकार्य ॥७०॥ अहो माया नंदतनया झाली । तरी चेतन पाहिजे बोलिली । तेणें वेदान्ताची निरासिली जडमाया कीं ॥ ७१ ॥ तरी ऐसें न ह्मणावें । भगवदाज्ञा चैतन्य गणावें । शब्दें आज्ञा स्वभावें । भिन्नत्वीं चाले ॥७२॥ विषमसत्ताकत्वें अनिर्वचनीयाभिन्न । अधिष्ठेयत्वें माया ईश्वरासी ह्मणोन । वृत्तिआज्ञाचि तेथ प्रमाण । येणें माया चेतनवादप्रवेश नाहीं ॥ ७३ ॥ यद्यपि योगमायेचा आश्रय करूनी । रास रची हे भागवती वाणी । तथापि पुरवावया कात्यायनी । बोलिले हो हें ॥ ७४ ॥ कां योगमाया समीपे केली । ऐसी बिंबचैतन्यमाऊली । कृष्णरूपें प्रगटली सावळी तनू ॥ ७५ ॥ अथवा गोपीपतींचें मोहन । कराया योगमायाश्रवण । आतां सकल शाक्ता उपास्य म्हणोन । कात्यायन्यादि नामें ॥ ७६ ॥ " विष्णोर्माया भगवती यया संमोहितं जगत् । आदिष्टा प्रभुणांशेन कार्यार्थे संभविष्यति ॥ ( स्कंद १०, अ. १, श्लो. ) भाषासूत्र— विष्णोर्माया येणें शब्दें उमा व्यावृत्ति बोलिजे । प्रभुणा अंशेन आदिष्टा म्हणजे वृत्तिरूप आज्ञा बोलिजे । यया संमोहितं जगत् येणें अघटितघटनापटु प्रकृतिच ओळखिजे । अंशेन आदिष्टा ह्मणजे चेतनेनें चितिमतींपरिसृष्टिकार्य ऐसीचि बोलिजे । यद्यपि ब्रह्माविष्णुरुद्र सृष्टिकार्यार्थी मायादेह धारण करिती तरीहि तयांचे कार्य चेतनप्रेरणाविशेष बोलिजे। व्रजांतील मायेचें कार्य मायाअधिन गौणचेतन बोलिजे। जैसें अविद्यारूप जीव कांहीं करी। जो मायेतें भगवदादेश तो वृत्तीनें कीं, शब्दें ? । प्रथमपक्षीं मायेतें स्वभिन्न व्रजीं उपजविलें ऐसें झालें। द्वितीयपक्षीं प्रकृत्यभिमानिनी देवता। जी विज्ञानभिक्षुरचित योगवार्तिकोक्ताचा उल्लेख समजावा ।

ओव्या:— परंतु स्मृति होय ऐसी । ते प्राचीन ध्यानीं आणावी

आपैसी । तेणें सहज कार्य• विशेषीं फावेल तुम्हां ॥ ७७ ॥ " प्रकृतिं पुरुषं चैव प्रविश्यात्मेच्छया हरिः । क्षोभयामास संप्राप्ते सर्गकाले व्ययाव्ययौ " प्रकृति आणि पुरुषाच्या ठायीं । आपुल्या इच्छेनें शेषशायी । प्रवेशोनी सर्गसमयीं । क्षोभवीतु ॥ ७८ ॥ म्हणोनी मायारहित इच्छा हरीची । ते मायावच्छेदें आपादिली साची । अनध्यस्तविवर्तचि तयाची । तैसी मूर्तिहि बोलिजे ॥ ७९ ॥ यद्यपि इच्छादि कांहीं । नैय्यायिक म्हणती तेविं आत्मगुण नाहीं । तदपि सुरभिस्फुरणन्यायीं । मायावच्छेदें अनध्यस्तविवर्त प्रगटे ॥ ८० ॥ " यो विज्ञाने तिष्ठन् विज्ञानोदंतरो यम-यति । ऐसी बृहदारण्यक श्रुति । म्हणोनी ही स्मृति । अविरोधिनी ॥८१॥ आणिक श्वेताश्वतरश्रुति । तेही पैं ऐकावी श्रोतीं । शांकरभाष्यासहित प्रमिति । करोनियां ॥ ८२ ॥ द्वे अक्षरे ब्रह्मपरे त्वनंते । विद्याविद्ये निहिते यत्र गूढे । क्षरंत्वविद्या ह्यमृतं तु विद्या । विद्याविद्ये ईशते यस्तु सोन्यः ॥१॥ भाष्यः— द्वे विद्याविद्ये यस्मिन्नक्षरे ब्रह्मणो हिरण्यगर्भात्परे ब्रह्म परे परस्मिन् ब्रह्मण्यनंते देशतः कालतो वस्तुतो वा ऽपरिच्छिन्ने । यत्र यस्मिन् द्वे विद्याविद्ये निहिते स्थापिते गूढे अनभिव्यक्ते विद्याविद्ये विविच्य दर्शयति क्षरंत्वविद्याक्षरणहेतुः संसृतिकारणं । अमृतं तु विद्या मोक्षहेतुः । यस्तुपुनर्वि-द्याविद्ये ईशते नियमयति स ताभ्यांमन्यस्तत्साक्षित्वात् । (अध्याय५भाग १) भाषासूत्रः— हिरण्यगर्भाहून पलीकडे म्हणजे ईश्वराचे ठायीं । किंवा ब्रह्मपरे परब्रह्माचे ठायीं / परनिपात वैदिकविरुद्ध नाहीं । विद्याअविद्या अनभिव्यक्त / तेथ अनभिव्यक्त म्हटल्यानें विद्याविद्येचें अंतःकरणधर्मत्व वारिलें । क्षर म्हणजे संसाराचें कारण / येणें ईशावास्योक्त अविद्येचा कर्मपर्याय घेऊन कोणी शंका करील तें न होय ऐसें केलें । अविद्या आवरणरूप विद्या सत्वगुणी ज्ञानरूप या दोहींचें ईशन करी तो दोहींचा साक्षी नियंता परमात्मा । कोणी येथ मुक्तजीव अर्थ करिती । परी तो करूं न शके ज्ञानाचें नियमन करतां न ये म्हणून. ।

ओव्याः—उलटें ज्ञानचि मुक्तातें नियमी । बंधनकालीं अविद्या--बद्ध जीव अविद्या काय नियमी । म्हणोनी विद्याअविद्यादिकांचा स्वामी । परमात्मा भिन्नु ॥ ८३ ॥ परी कंकरे सुरभी एकांगस्फुरण । आन धरी सुरभीचें मन । तैसें मायावच्छेद स्फुरवी चेतन । ते इच्छा

जाण श्रीहरीची ॥ ८४ ॥ मक्षीके सुरभीस्फुरण घडे । परी स्फुरणें मक्षिका उडे। तैसी मायावच्छेदें इच्छा जोडे। इच्छा वर्तवी मायेतें ॥८५॥ यद्यपि बालमोहनी । अंगिकारिली देवता प्रकृत्यभिमानिनी । तथापि कृतयुगींचिया आत्मोपासनीं । प्रकृति न मिळे ॥ ८६ ॥ हिरण्यगर्भपर म्हणतां । तरी विरोध ये भक्तिधर्में कैलासवैकुंठप्राप्ता । म्हणोनी चेतनमायाप्रवेश सर्वथा । नाहीं नाहीं येथ ॥ ८७ ॥ एवं माया स्फुरवितां स्फुरे । तें जें मथितसत्व देहें अवतरे । तें सृष्टिकार्यार्थ धर्मकार्यार्थ पुरे । आणि मोहकार्यार्थ अवतरे माया ॥ ८८ ॥ यद्यपि देविभागवतीं । मायाधिष्ठान बोलिली भगवती । तथापि तेथ उद्धारस्फुर्ति । येथ नाहीं ॥८९॥ यद्यपि देवकार्य केलें म्हणून । परंपरया झालें जगदुद्धरण । तथापि स्वेच्छया उद्धारण । हरिचि करी ॥ ९० ॥ मायामय देहावतार भजनें । तरी मोक्ष होय श्रौतस्मार्तसाधनें । आणि कामेंहि गोपी मुक्त केल्या कृष्णें । म्हणोनी स्वेच्छावपुधारी अनध्यस्तविवर्त हरिदेव ॥ ९१ ॥ अहो धेनुस्फुरणन्याय समसत्ताक घडे । अरे विषमसत्तेंतहि तो जोडे । रज्जुसर्प पाहतां रोमांच फुडे । कंपही होय ॥ ९२ ॥ रज्जुसर्प तंव अध्यस्त । परी कंप अध्यस्त कीं अनध्यस्त । रज्जुसर्पसत्ते अनध्यस्त । कंप तो म्हणीजे ॥ ९३ ॥ यद्यपि ज्ञानाध्यास होय । तरी अंतरअविद्येचा सर्प ज्ञानाकारचि राहे । कंप वा रजताध्यासप्रेर्यलोभ तंव होय । अनध्यस्तचि ॥ ९४ ॥ अहो कंपादिकाचें उदाहरण । देती जीवन्मुक्तप्रारब्धाकारण । सिद्धान्ति म्हणे तें संपूर्ण । चुकलेंचि आहे ॥ ९५ ॥ यद्यपि शंका नोहे दृष्टान्तावरुती । तरी अधिक साम्यता तिकडे दृष्टान्तगति । अनारिसें ययाही प्रती । म्हणतांचि नये ॥ ९६ ॥ अध्यासनिमित्तें जें उपजे । तें तें अनध्यस्त परी ब्रह्मविवर्त बोलिजे । निमित्ताचा केव्हांही नव्हीजे । परिणाम म्हणोनी ॥ ९७ ॥ अध्यास उपादानें जें जें । परिणामें निफजे । तें तें गा बोलिजे । अध्यस्त परी ब्रह्मविवर्त ॥ ९८ ॥ प्रारब्ध अध्यासकार्य म्हणोन । तयाचें अध्यास उपादान । यालागीं लेशाविद्ये करून । चरितार्थ घडे तेथ ॥ ९९ ॥ लशुनगंधादि दृष्टान्त । किंवा मृगजळीं जळभ्रम होत । तेणें जळींहि मृगजळविवेचन नुपजत । हे लेशाविद्या ॥ १० ॥ तैसें दृढ अविद्यासंस्कारवशें । ज्ञान जाहलि-

याहि अंतरविद्याप्रेरितवासनावशें । मृगासारिखें क्षुधादि पिसें । तें लेशाविद्यावष्टब्ध प्रारब्ध ॥ १०१ ॥ किंवा विक्षेपांशु राहे । ऐसें श्रुति-वचन आणि अनुभव आहे । हेंही समाधान उत्तम आहे । दृष्टान्तापे-क्षारहित ॥ १०२ ॥ 'ज्ञानादेवतुकैवल्यं' ही श्रुति । आणि परंपरा महद्-नुभूति । ह्मणोनी दृष्टान्तीं । काय काज ॥ १०३ ॥ आणि दृष्टान्तहि बोलिला आहे । परी कंपदृष्टान्त आम्हाकडे विशेष लाहे । म्हणाल सर्पज्ञानकार्य होये । कंपादिक ॥१०४॥ तरी रज्जुज्ञानें सर्पज्ञानही निवृत्त । परी कंपादिक राहती समस्त । ते ज्ञानधैर्यें उपसंहृत । होती पुढती ॥१०५॥ चूर्णिका:—अथवा कंपादिकांची उत्पत्ति । अध्यासें मानतां अन्यथाख्याति । पूर्वलोभाद्यपेक्षें घडेल वेदान्तीं । यद्यपि देशकालाचे ठायीं अधिष्ठानाची कारणता । मान्य आहे वेदान्ता परमात्मा सत्य म्हणोनी संसर्गाध्यासें ।१०६। ओव्या:— परी मिथ्याभ्रमप्रवाहीं । वेदान्तीं अन्यथाख्याति मान्यचि नाहीं । अनिर्वचनीयख्याति सर्वही । बोलती म्हणुनी ॥ १०६ ॥ एवं ज्ञानाभ्यासें लोभादि उपजतां । तरी पूर्वलोभाद्यपेक्षें विषमसत्ताकता । तरी अधिष्ठानज्ञानें ज्ञानाध्यास जातां । कंपादि जावे ॥ १०७ ॥ परी ते न जाती म्हणून । म्हणों आम्ही अनध्यस्तविवर्तस्फुरण । आतां ऐसें वादीचें मन । शंकेल जरी १०८ ॥ कीं कंपादि पुढें आपेआप हरती । तैसी नाशेल श्रीकृष्णमूर्ति । तरी जीवाची जैसी अविद्यानिवृत्ति । तैसी मायानिवृत्ति यावद्बुद्धव्यवहार नोहे ॥ १०९ ॥ आणि स्वरूपीं हानि नाहीं । ह्मणोनी माया न द्वेषी शेषशायी । तेथ इच्छाशरीरादि सुरभी-स्फुरणन्यायीं । उपजती होय ॥ ११० ॥ जडकार्येंचि करूं न शके चेतनाविण । हा तंव ब्रह्मसूत्रशांकरभाष्यसिद्धान्त पूर्ण । परी अक्रिय आहे चेतन । तरी तें जडा प्रवर्तवील कैसें ॥ १११ ॥ जडसंयोगें अक्रियासी । क्रिया मानतां अनध्यस्तता तियेसी । नाहींतरी जडें जडासी । संयोगें कां न प्रवर्तवावें ॥ ११२ ॥ जडसंयोगें इच्छा उपजणें । हा चेतनाचाची स्वरूपयोग्यधर्म ह्मणणें । येथ तंव त्याहोनि विशेषपणें । मायावच्छेदें स्वतंत्र सद्धर्मरूप घेणें चेतना ॥ ११३ ॥ इच्छादि जड धर्मचि ह्मणतां । तरी मायाचि चेतनासी प्रवर्तवील तत्वतां । मग चेतनकारणवाद वृथा । होईल सकळ ॥ ११४ ॥ ह्मणोनी इच्छा जरी

आत्मगुण नोहे । तरी ईक्षण तें सुरभीस्फुरणन्यायें । मायावच्छेदें ईश्वरीं होये । तैसी लीलाहि अनध्यस्तविवर्त ॥ ११५ ॥ परी श्रुतींत रजोगुणावच्छेद नाहीं । म्हणोनी द्वेषदुःखादि अनिष्ट गुणांची स्वरूपयोग्यताहि परमेश्वरीं नाहीं । एवं नैय्यायिकमतव्यावृत्ति ॥ ११६ ॥ आनानें फुंकितां लागती डोळे । तैसें एकदेशस्फुरण उजळे । असो अल्पदृष्टान्त परी सिद्धान्तीं मिळे । प्रारब्धभिन्न असुनी ज्ञाननाश्यत्वाभावानुभव ॥११७॥ भाषासूत्रः– एवं मायाकार्य हरिदेह नव्हे. ओव्याः– यद्यपि भागवतीं दशमप्रथमाध्यायीं । पंचवीसाव्या श्लोकाच्या ठायीं । बोलिलें आहे कीं अंशेंकरूनहि । उत्पन्न होईल हरिमाया ॥ ११८ ॥ तरी ते कवण्या अंशें उत्पन्न झाली । म्हणावी रजतमप्रधान जन्मली । तरी अविद्या झाली माया नोहे ॥ ११९ ॥ अविद्येची उपासना । आणि कोणी नाहीं कथिली कोणा । येथें तंव भद्रकाली आदिअभिधाना । पावली माया हें वदले देवो ॥ १२० ॥ म्हणोनी सत्वांशें जन्मली म्हणावी । तरी कृष्णमूर्ति त्याहूनि बरवी । अनध्यस्तविवर्त लक्षावी हृदयामाजीं ॥ १२१ ॥ आतां माया जन्मली वहिली । इत्यादि चेतनक्रिया बोलिली । आणि माया तंव जड लक्षिली । सांख्य वेदान्तीं ॥ १२२ ॥ द्वैतवादीं माया चेतन । बोलिली परी भागवता अद्वैत प्रमाण । म्हणोनी मायाजन्माचें समाधान । आणिकही एक आहे ॥ १२३ ॥ कीं मायाप्रधान परमेश्वरांश । जन्मला तो देविशरीर विशेष । सकल देवीस प्रकृतिभाष । सर्वपुराणीं ॥ १२४ ॥ म्हणोनी देवी किंवा सृष्टिकार्यार्थ त्रिमूर्ति । धरोत कां मायाकार्यवुंथी । परी अनध्यस्तविवर्त श्रीकृष्णमूर्ति मायाकार्य कदा नव्हे ॥ १२५ ॥ रामअवतारीं लक्ष्मी सीता । जाहली परी तेथ मायावतार नव्हता । यालागीं रामदेह मायाकार्य म्हणतां । दुर्जनतोषन्याय तरी घडे ॥ १२६॥ परी तोहि न संभवे येथ । यास्तव मायावतारभिन्न कृष्णनाथ । यालागीं अनध्यस्तविवर्त श्रीभगवंत । म्हणे सात्वतश्रुति ॥ १२७ ॥ हेंचि जया नाहीं प्रमाण । तयासवें न करूं आह्मी भाषण । आमुचिया विश्वासें नारायण। करो रक्षण पाठीं पोटीं ॥ १२८ ॥

वादी उवाचः– अहो पण, इतक्या पक्षांचें खंडणमंडण करण्याची आवश्यकताच नाहीं. परमेश्वराचा अवतार न मानला म्हणजे झालें.

उत्तर:— बाबा ! परमेश्वर दयाळु असल्यामुळें आमच्या विषयप्रीतीचाच भक्तिरूप परिणाम करून, तो परमात्मा आम्हाला अवतारशरीर दाखवितो. पुन: आम्ही केवळ अनुमानावरच चालणार नाहीं. जी भगवति आमचें अनादिकालापासून आपल्या ज्ञानरूप दुग्धानें पोषण करीत आली आहे, ती श्रुतिमाता आम्हाला जिकडे नेईल तिकडे आम्ही डोळे लावून जाणार. तिचें सांगणें असें आहे कीं, त्या ब्रह्मानें देवांनां रूप दाखविलें ॥ "ब्रह्म ह देवेभ्यो विजिग्ये तस्य ह ब्रह्मणो विजये देवा अमहीयन्त त ऐक्षन्तास्माकमेवायं विजयोऽस्माकमेवायं महिमेति । तद्धैषां विजज्ञौ तेभ्यो ह प्रादुर्बभूव तन्न व्यजानन्त किमिदं यक्षमिति ॥ ३।२ उपासकांच्या कार्यासाठीं ब्रह्माचे ठिकाणीं रूपाची कल्पना आहे. "चिन्मयस्याद्वितीयस्य निष्कलस्याशरीरिणः । उपासकानां कार्यार्थं ब्रह्मणो रूपकल्पना " ( रामतापनीय ) " अजोऽपिसन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् । प्रकृतिंस्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया " ( भ. गी. अ. ४. श्लो. ६ ) तो कृपाळु असल्यामुळें आमचें मन निराकाराचे ठिकाणीं लागत नाहीं म्हणून आम्हाला दुःख झालें तरी, निग्रहानें सामर्थ्य असूनहि तो परमात्मा त्या ठिकाणीं आम्हाला कर्षूं इच्छित नाहीं, तर आपल्या कृपेनें आमच्या प्रेमानुसार अवताररूप दाखवून आम्हाला पूर्ण करितो. हाच अभिप्राय प्रभूनें आपल्या मुखानें बाराव्या अध्यायांत " तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् । भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् " इत्यादि श्लोकानें व्यक्त केला आहे. तात्पर्य श्रुति, युक्ति, अनुभवावरून अवतार सिद्ध होतात, म्हणून ते न मानणें युक्त नसल्यामुळें, अवतारशरीर भूतकार्य मानणें अनिष्ट असल्यामुळें, वर सांगितलेल्या समीक्षेवरून मायाकार्य अवतारशरीर संभवत नसल्यामुळें, अनध्यस्तविवर्त असेंच त्या परमेश्वराचें शरीर मानलें पाहिजे, आणि तेंच सेव्य आहे असें सिद्ध झालें.

ओव्या:— ह्मणोनी अवतारप्रतिषेध । तो तंव होईल श्रुत्यादि विरुद्ध । आतां भूताविशवत्परदेहीं प्रसिद्ध । ईश्वरावेश म्हणावा जरी ॥ १२९ ॥ तरी अंतर्यामित्वेंकरून । सर्वांतचि प्रवेश पूर्ण । अनुप्रवेश ह्मणतां जाण । येईल जीवपण ईश्वरातें ॥ १३० ॥ जीव होतां होईल

अज्ञान । मग होतील ना तत्कृतवेद प्रमाण । वेदाविण कळेल ना ज्ञान । आणि ज्ञानाविण बंधन तुटेल ना ॥ १३१ ॥ परशुरामासम आवेशाव-तार । परी त्याहोनि वेगळे पूर्णावतार । ऐसें भागवतादि शास्त्र सांगतू आहती ॥ १३२ ॥ पूर्णचि आवेश होईल जरी । तच्छरीराश्रितां जीवा भोग न घडतील तरी । प्रेतांत पूर्णावेश ह्मणाल जरी । तरी कां व्हावा भौतिक शरीरीं कर्माविण ॥ १३३ ॥ अंशत्व होय आभासरीति । अथवा केवळ शक्ति । पूर्णत्वाची आभासरीति । देखिली नाहीं ॥ १३४ ॥ स्वशक्तीनें प्रेतीं पूर्णावेश होय । तरी मग नूतनदेह घ्यावया किं प्रत्यवाय । तात्पर्य अनिर्वचनीय । भगवद्देह नव्हे कदा ॥ १३५ ॥ बद्धापेक्षिक वा स्वतः सिद्ध । भगवद्देहविद्या प्रसिद्ध । ह्मणोनिहि परमानंद । रूपाचि तो ॥ १३६ ॥ न्यायमकरंदकाराच्या मतीं । जैसी पंचमप्रकार कल्पित-निवृत्ति । तेविं आमुचिया मतीं पंचमप्रकार हरिदेह ॥ १३७ ॥ अप्रसि-द्धदोषास्तव तत्वतां । न्यायमकरंदकृन्मता न पुरुषार्थता । आमुचा कल्याण-निधान भर्ता । श्रुतिस्मृतिपुराणीं प्रसिद्ध ॥ १३८ ॥ मियां नानाग्रंथीं । याच विषयीं बोलिल्या युक्ति । गोपिकादि साधूंची अनुभूती । कीं अव-तारस्थीति ज्ञानानंतरहि ॥ १३९ ॥ म्हणोनी पंचमप्रकार ह्मणतां । येथ दोष न ये सर्वथा । जैसी मुक्तौ ज्ञातत्वोपलक्षणता । तैसी अविरोधी नित्यता हरिदेहा ॥ १४० ॥ अनध्यस्तविवर्त म्हणोन । द्वैतहि न घडेचि जाण । कनकाचेंचि भूषण । कनकज्ञानें नाशतीना ॥ १४१ ॥ कनक आटवोनी भूषणांतर पावती । परी तैसें कर्म न घडे भगवंतीं । क्रिया रजोगुणाची ती बिंबभूतीं । करील कवण ॥ १४२ ॥ ह्मणोनी प्रतिबिं-बापेक्षिक । बिंबत्वारोपावच्छिन्न देख । बिंबभूत ब्रह्म निष्कलंक । अनध्यस्तविवर्त साकार ॥ १४३ ॥ कनक शुद्ध निराकार । भूषण अनध्यस्तविवर्त साकार । आणि लालित्यघटनाभूषणाकृति वर । तैसे दयादि हरिगुण समग्र अनध्यस्तविवर्त ॥ १४४ ॥ कोणी अत्यंत साकार ब्रह्म ह्मणती । तें निर्युक्तिक ह्मणोनी उपेक्ष्य निश्चितीं । यालागीं अनध्यस्त भगवदाकृति । पर्यायें मधुसूदनहि बोलता गूढार्थदीपिकेंत ॥ १४५ ॥ सत्ता एक पारमार्थिक । परी पृथगिव प्रकार प्रतिभासारोपावच्छिन्न देख । हा श्रीज्ञानेश्वरभक्तिगोपीनायक । सेव्य निष्क-

लंक सकाळिकां ॥ १४६ ॥ अनेकजीवाभास ह्मणोनि । एकजीवाभास मुक्त झालियायावरूनि । शरीर उपसंहरील मोक्षदानी । हें सर्वथा घडेना ॥ १४७ ॥ यालागीं तो सुंदर । तो दयालु तो उदार । जीवें-भावें गोपिकावर । सेव्य तोचि ॥ १४८ ॥ " सव्वज्जो सव्वसई सव्वाप्पा इस्सरो अणुववंतो । बिंबो एफुणो किवालु अज्जोत्तो मज्झ हिय सहा पूज्जो."

वादीः— भणईणेवं होति जदोत्थि अंस कण्होऽवि इणण्ण इणण्ण भण भण जदोत्थि कण्हा एफुणम्मि वअणचअम । तथाहि.

(टीका)-वादी उवाचः—दृष्टिसृष्टिवादांतहि सिद्ध होणारा, सर्वज्ञ, सर्व-शक्ति मान्, बिंबभूत परमात्मा तुम्हाला मान्य असून, तोच अनध्यस्तविवर्त-शरीरी श्रीकृष्ण आम्हाला सेव्य आहे; परंतु श्रीकृष्ण अंशावतार आहे याविषयीं विष्णुपुराण व भागवतवाक्य प्रमाण आहे; आणि रामाच्या अपेक्षेनें कृष्णाचें आचरणहि निंद्य आहे.

सिद्धान्ती उवाचः— प्रथम तुझ्या यौक्तिक आक्षेपाचें समाधान करून, नंतर वाचनीक आक्षेपाचा परिहार करितों. कृष्णापेक्षां एकपत्नि-त्वादिकामुळें जर रामाला वरिष्ठ मानतोस, तर दुस्तर अहिंसादिव्रतामुळें रामापेक्षां बुद्धाला वरिष्ठ मान, तुला जी शंका आली आहे ती ग्रंथकाराला आलीच नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. कारण, अमुक नीतीचें आहे व अमुक अनीतीचें आहे, हें देखील तूं ग्रंथकाराजवळूनच शिकला आहेस.

मध्यस्थ उवाचः— वादीचा आशय असा दिसतो कीं, बुद्धाच्या उपदेशांत विप्रलिप्सा असल्यामुळें, त्याला आम्हीं वरिष्ठ समजत नाहीं.

सिद्धान्ती उवाचः— तर मग भरताला रामापेक्षां वरिष्ठ समजावें, पण भरताला मुख्य करून रामाला आवरण करण्याविषयीं कोठेंहि उपास-नाशास्त्र उपलब्ध नाहीं. उलटें सर्व रामोपासनाशास्त्रांत भरतालाच आवरण मानलें आहे; आणि रामानें तरी पाठीमागून वालीला मार-ल्याची कथा प्रसिद्ध आहे. पण भरताविषयीं कोणत्याच प्रकारची अनीति प्रसिद्ध नाहीं. बुद्धाच्या वचनांत विप्रलिप्सा आहे हें ह्मणणेंहि योग्य नाहीं. कारण, स्वबुद्धीनें बुद्धाच्या उपदेशांत विप्रलित्सा आहे असें ह्मणतां येणार नाहीं. आधीं यथार्थ निश्चय झाल्यावांचून अन्य विप्रलिप्सा आहे, असें ह्मणणें दुर्घट आहे. ह्मणून बुद्धागमावरून तर बुद्धाच्या वचनांत

विप्रलिप्सा सिद्ध होत नाहीं, आणि वैदिक यथार्थ निश्चयावरून जर बुद्धाच्या ठिकाणीं विप्रलिप्सा सिद्ध करीत असशील, तर तुला एवढें समजावयास पाहिजे कीं, बुद्धानें नीतीचें काम करून देखील त्याच्या विषयींचें विप्रलिप्सात्व सिद्ध आहे. आणि कृष्णानें अनीतीचें काम करून-हि त्याविषयीं वेदानें वर्णन केलें आहे. कृष्णगोपालतापनियादि उपनिषत् याविषयीं प्रमाण आहेत. पुनः कृष्णक्रीडा तुला अनीतीची कां वाटते ? नास्तिक आहेस ह्मणून, कीं, आस्तिक आहेस म्हणून ? प्रथमपक्ष योग्य नाहीं. कारण, तुझ्या मतामध्यें अंगनालिंगनादिजन्य सुखच पुरुषार्थ असल्यामुळें, श्रीकृष्णाला मोक्षच मिळाला त्याबद्दल कांहीं वाटावयाला नको. आणि दुसरा पक्ष अंगिकार करशील तर, श्रीकृष्ण परमेश्वर आहे, असें शब्दप्रमाण असल्यामुळें शंकेचें कारण नाहीं असें मी वादीला म्हणतों.

वादी उवाचः— अहोपण, कर्माचें फळ झालेंच पाहिजे हा नियम आहे.

सिद्धान्ती उवाचः— कशावरून ? प्रत्यक्षावरून, अनुमानावरून, कीं आगमावरून ? आद्यपक्ष समीचीन नाहीं. चार्वाक प्रत्यक्ष वादी असूनहि नियतकर्मफल मानीत नसल्यामुळें. द्वितीय पक्षहि योग्य नाहीं. कर्म न मानणाऱ्या अनुमानवाद्यांच्या मतांत अन्य हेतु असल्यानें तुझें अनुमान सत्प्रतिपक्षदूषित असल्यामुळें, तृतीयपक्षहि अयोग्य आहे. आगम श्रीकृष्णाला कर्मफल आहे असें म्हणत नाहीं म्हणून.

वादी उवाचः— सत्वमयच परमेश्वराची तनु असते, तेव्हां सात्विक स्वभावच तिचे ठायीं दिसले पाहिजेत. गोपीसंगादिक राजस स्वभाव दिसणें योग्य नाहीं.

सिद्धान्ती उवाचः— सत्व कशाला म्हणतात, याविषयीं शास्त्राची अपेक्षा आहे. नाहीं तर यमांतच सर्वयोगाची संप्राप्ति होईल व अन्ययोगाची अपेक्षा लागणार नाहीं. किंवा, अन्ययोग हा यमरक्षणार्थ मानावा लागून यावत्समाधि यम हें अंग पूर्ण होणार नाहीं. त्यामुळें, यमाच्या अंगत्वाची हानि होऊन यमालाच अंगीत्व येईल. यद्यपि गुणाच्या अपेक्षेनेंच शास्त्रप्रवृत्ति आहे, गुणाच्या अनपेक्षेनें नाहीं, असें श्रीमद्भगवत्पूज्यपाद श्रीमच्छंकराचार्य गीताभाष्यांत ह्मणतात, तथापि वर्णविचार-

प्रकरण असल्यामुळें अधिकारविचाराच्या अपेक्षास्तव, जीवाचे यमादि-संज्ञक प्रथमसत्वादिकच अपेक्षित आहेत, आणि हें आचार्यांचें वाक्यहि प्रवृत्यनुमापक आहे. प्राप्ताच्या किंवा ईश्वराच्या सत्वाग्रहाचें दर्शक नाहीं. अन्यथा आचार्यांच्या सूत्रभाष्याशीं विरोध येईल. अहिंसा, सत्य, चोरी न करणें, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह, यांपेक्षां सत्वाचें आणि नीतीचें उच्च लक्षण तुलाहि करतां येणें शक्य नाहीं. परंतु हें मिश्रसत्वाचेंच लक्षण आहे, शुद्ध सत्वाचें नाहीं; असें आचार्यांनीं विवेकचूडामणींत ह्मटलें आहे.

" मिश्रस्य सत्वस्य भवंति धर्माः स्त्वमानिताद्या नियमा यमाद्याः ।
श्रद्धा च भक्तिश्च मुमुक्षुता च दैवी च संपत्तिरसन्निवृत्तिः" ॥१२०॥

भावार्थः–ओव्याः–यम नियम अमानित्व । श्रद्धा भक्ति मुमुक्षुत्व । दैवीसंपत्ति दुर्गुणरहितत्व । इत्यादिकां मिश्रसत्व बोलिजे ॥ १४९ ॥ शिष्य उवाचः– स्वामीचें वचन परमप्रमाण । कोण ह्मणेल अप्रमाण । परी दूर करोनी संदेहावरण । जननीविण कवण शिशु पाजी ॥ १५० ॥ मिश्रसत्व म्हणजे गुणद्वययुक्त । शुद्धसत्वें गुणद्वय अभिभूत । मलिनसत्वीं जीवप्रतिबिंबित । हें बोलिले 'तत्वविवेकांत' विद्यारण्यस्वामी ॥ १५१ ॥ तेव्हां सकल जीवांच्या ठायीं । हा अमानित्वादि गुण ~~गुण~~ कां नाहीं । श्रीगुरु ह्मणती तूं चतुर हृदयीं । परमरम्य विचारिसी ॥ १५२ ॥ अझोनि हा संशय कोणी । निरसिला हें न देखिलें नयनीं । परी मूळश्लोकें अमानित्वादि गुणीं । आणिली धर्मता षष्ठीव्यपदेशें ॥ १५३ ॥ धर्मीभूत मिश्रसत्वीं प्रतिबिंब जीव । धर्मभूत मिश्रसत्वीं साधकभाव । वृथा भासवी धर्मी धर्मत्व । अविद्यामाता ॥ १५४ ॥ आत्मभिन्नप्रतीति । ती आघवीच भ्रांती । परी धर्मी धर्मप्रवृत्ति । वाग्व्यवहारें ॥ १५५ ॥ यथार्थजीवसाधक । मिश्रसत्वीं सम्यक । ह्मणोनि तो सेवक । सेव्य शुद्धसत्व तदुपहित श्रीहरि ॥ १५६ ॥ येर वस्त्रादि देहधर्में । अधिकमिश्रसत्वादि-गुणद्वयविक्रमें । एवं सद्गुरुवचनवर्में । अमृतमर्में पुष्ट शिष्यु ॥ १५७ ॥ मध्यस्थ म्हणे पूर्वील राहिलें । सिद्धान्ती म्हणे ऐका वहिलें । मिश्रसत्व हें बोलिलें । अवगुणद्वेषी गुणरागी ॥ १५८ ॥ जनकासी अष्टावक्रमुनि । ऐसेंच पर्यायें बोलिले वाणी । तें ऐकोनी संशय मनीं । सर्वथा न ठेवावा ॥ १५९ ॥

" प्रवृत्तौ जायते रागो निवृत्तौ द्वेष एवहि ।
निर्द्वंद्वो बालवद्धीमान् एवमेव व्यवस्थित: "

(अ० १६, श्लो० ८, अष्टावक्रगीता.)

अंगीं असतां कर्तृत्वबुद्धि । अहंकाराचिया अनवधि । जें जें कीजे तें तें बांधी। सुष्ट वा दुष्ट ॥१६०॥ क्षयीं खातां रुचिकर । परी तें विषचि समग्र । उपवासें तंव निर्धार । शक्तिनाशू ॥ १६१ ॥ तैसी जया अनात्माहंकृति । तया राग उपजे होतां प्रवृत्ति । आणि मार्गे धरितां निवृत्ति द्वेष उपजे ॥ १६२ ॥ ह्मणोनि मुक्त जे होती । ते द्वंद्वरहित राहती । बालवत् ह्मणजे देहबुद्धीनें असती । दास सदा ॥ १६३ ॥ धीमान् ह्मणजे अंतरीं शहाणा । येणें ज्ञानीभक्तासी सुखपणा । आतां जया वैराग्य म्हणणें आहे जना । तोहि रागीचि अष्टावक्र म्हणती ॥ १६४ ॥

" हातुमिच्छति संसारं रागी दु:खजिहासया ।
वीतरागो हि निर्दु:खस्तस्मिन्नपि न खिद्यति "

टीका:— यस्तु रागी स दु:खजिहासया संसारं हातुमिच्छति । वीतरागस्तु निर्दु:खरागोत्थदु:खरहितत्वादस्मिन् संसारे सत्यपि न खिद्यति न खेदं प्राप्नोति । रज्जुभुजंगा बिहाला । तो शहाणा केविं जाहला । तेविं संसारत्यागीं जयाला । इच्छा तो रागीचि ॥ १६५ ॥ संसारमिळवावयाची इच्छा महाराग । संसार टाकावयाची इच्छा तो राग । दु:खनाश व्हावा हा अनुराग । दोघांच्याही मानसीं ॥ १६६ ॥ रागें महाराग जिंकोत कोणी । परी जे मुक्त विरक्तान्त:करणी । ते संसारींहि असोनी । खेद निर्वाणीं न पावती ॥ १६७ ॥ जीव भक्तिबळें राग जिंकिती । परमेश्वर-भक्तइच्छा पुरती ह्मणोनी न दिसे द्वेषवृत्ति । जेविं राग तेविं द्वेषवृत्ति । रजचि होय सत्व नव्हे ॥ १६८ ॥ नित्यमुक्त परमेश्वर । नाहीं पूर्वसंस्कार । पूर्वभवसाधनजन्य प्रारब्धप्रकार । नुपजे तया ॥ १६९ ॥ भक्तइच्छेसाठीं भगवत्प्रवृत्ति । कोणासाठीं ठेवील निवृत्ति । कारण निवृत्तिइच्छा असे स्वार्थी । आणि स्वार्थ तंव भगवंतीं मुक्तत्वास्तव नसे ॥ १७० ॥ लोकोपदेशाकारणें । नीति ठेवावी नारायणें । तरी नारायणादितनुधारणें । तेंहि केलें ॥ १७१ ॥ यद्यपि संसारीं फळ । कर्मासारिखें दे घननीळ । तरी पूज्यत्वें जो आपणा सेवी केवळ । तयातें दे फळ जैसी आहे इच्छा

॥ १७२ ॥ ययाचा विशेष प्रकार । संप्रदायसुरतरूंत सुंदर । सांगितला असे सविस्तर । त्रिपुरारहस्यप्रमाणें ॥ १७३ ॥ जिया तया भजति पतिभावें । तेणें तिया तितुकें व्हावें । येथ अधर्म म्हणावया सरसावें । तरी तया पुसावें कीं धर्मफळ हरिविण कवण ॥ १७४ ॥ एक ईश्वर अनेक तनूंनीं । बहुयुवतीभोगें पातकी होतांक्षणीं । सुपुत्रहि मातृगमनी । होईल एकजीवास्तव पितृभोगी ॥ १७५ ॥ अनेक जीव घेतां तरी । तयाच्याचि अवस्थांतरीं । स्वप्नें कर्में पापकारी । होईल जीवू ॥ १७६ ॥ स्वप्नाचें स्वप्नीं होयेचि फळ । हा नियम व्यभिचारी केवळ । मध्येंचि प्रबळ जागृति म्हणुनी ॥ १७७ ॥ बोधाविण अनाद्यविद्यानाशू । न होय म्हणोनी जीवा भवविलासू ॥ अथवा अनेककृष्णशरीरीं ईश्वरा भासू । अनेकचिदाभासवत् म्हणतां न ये कां ॥ १७८ ॥ वाचस्पतीचा अनेकेश्वरवादू । तो येथें आणी उपयोगसंबंधू । अयथार्थ तथापि तुझाहि संशयवादू । यथार्थ कोठें ॥ १७९ ॥ शशशृंगें वंध्यापुत्र सोडितां । लीलाविनोद नुपजे कवणाच्या चित्ता । ह्मणोनि आमुचिया भगवंता । दोषदाता महादोषी ॥ १८० ॥

श्लोक.

वाचस्पतीचे बहु ईश जैसे । प्रत्येकही ईशचि कृष्ण तैसे ।
लीला स्त्रिभोगी तरि ते स्वतंत्र । होतील केवीं मग पापपात्र ?

ओव्याः— करावें पतीचें भजन । हा स्त्रीधर्म यथार्थ पूर्ण । परी तेथहि पतित्वें नारायण । भजावा हेंचि पैं लिहिलें ॥ १८१ ॥ पतित्वें जीव भजावा तत्वतां । हें तंव श्रुतिविरुद्ध पाहतां । आणि पतित्वें ईश्वर भजतां । तरी पतिदेहाविष्टेश भोक्ता पतिव्रता मानी हें प्राप्त ॥ १८२ ॥ परी येथ रहस्य एक । अज्ञात माधूर्यभक्ति सम्यक । साक्षात्कृष्णींच होय तारक । अन्यत्र ज्ञात माधूर्यभक्तीचि योग्य ॥ १८३ ॥ यद्यपि अज्ञात ज्ञात माधूर्य दोन्ही । होती श्रीकृष्णाचेचि चरणीं । रामीं घडे म्हणती अगस्तिमुनि । तरी ते जन्मांतरीय कृष्णसाधकश्रुतिप्रमाणें ॥ १८४ ॥ रामीं माधूर्य मुनीनीं ठेविलें । तें जन्मांतरीं कृष्णें परिपूर्ण केलें । ऐसें कृष्णोपनिषदीं बोलिलें । ह्मणोनी अगस्तिसंहिता तदनुसार लावावी ॥ १८५ ॥ अज्ञातमाधूर्य म्हणजे ईश्वर न जाणतां । जो अत्यंत पतिप्रेम तत्वतां ।

तो श्रीकृष्णीं ठेवितां। उत्तम फळ होय ॥ १८६ ॥ तेंचि बोलिलें भागवतीं। शुकातें विनवी परीक्षिती। आणि उद्धवाचीहि उक्ति। तैसीचि आहे।१८७।

श्लोक.

" कृष्णं विदुः परं कान्तं न तु ब्रह्मतया मुने " ।

ऐसे परीक्षितिवाक्यातें प्रमाणता ओळखा ॥ १ ॥

" नन्वीश्वरोऽनुभजतोऽविदुषोऽपिसाक्षात्। श्रेयस्तनोत्यगदराज इवोपयुक्तः॥

हें उद्धवें निगदिलें म्हणुनि स्वभावें। माधूर्य नेणत घडे नयनात्तभावें। जेव्हां नसेचि हरिचा अवतारवेळ। माधूर्य तैंहि घडतें परि ज्ञानशीळ॥२॥

आर्या.

भक्तचरित्रीं गोष्टी आहे कीं कोणि बाळकृष्णछवी।

भजतां हरिरुप धरुनी जारें कान्ताचि केलि ते सुनवी ॥१॥

ओव्याः— मग तयासी रायें धरितां। तैं जारा कृष्ण पावला कृष्ण स्मरतां। तें तंव अनुतापयुक्तस्मरणफल तत्वतां। शेवटीं कृष्णवचनें कान्ता ती जाहली त्याची ॥ १८८ ॥ ह्मणवुनि प्रगट लीला नसतांक्षणीं। कृष्णीं माधूर्यभक्ति करावी जाणुनी। म्हणजे ईश्वरत्वसंस्थानीं। ठेविजे बुद्धि ॥ १८९ ॥ असो हें प्रासंगिक विधान। येथ कोणाचें जरी बोलणं। कीं गोपिका भजती आर्यपथ सोडून। म्हणून वेदविरुद्ध मार्ग त्यांचा ॥ १९० ॥ तरी ही उक्ति वृथा आघवी। "या दुस्त्यजं स्वजनमार्यपथं च हित्वा" या श्लोकींची बरवी। पुढें उक्ति "भेजुर्मुकुंदपदवीं। श्रुतिभिर्विमृग्यां" म्हणूनी ॥ १९१ ॥ ह्मणजे आर्यपथ तिहीं जरी सोडिला। तरी आर्यपथफळचि मिळालें गोपीजनाला। तेंही फळ कोणतें तरी मुनि बोलिला। श्रुति शोधिती जयातें ॥ १९२ ॥ ह्मणोनि म्लेच्छ बौद्ध जैन। शाक्त शैवादिकांप्रमाण। हा मार्ग नोहेचि जाण। गोपिकांचा ॥ १९३ ॥ यालागी साक्षात् चोदना भागवताची। ते वेदसमताचि होय साची। जया खंडणीं आचार्यसारख्यांची। लवली न जिव्हा ॥ १९२ ॥ मग निजरूपें तयांप्रति। गोपीसंगीं कवण आपत्ति। योगी असतां निश्चीती। तरी भोगितां युवती पावता क्षय ॥ १९३ ॥ कायव्यूह करोन। कोण्या योगियानें दैव घेतलें असेल भोगोन। ऐसें ह्मणतां प्रत्येकीच्या इच्छेसमान। होईल कैसा ॥ १९४ ॥ योगीमुक्त

साहूं शके एवढी अनीति । तरी ईश्वरासीचि कां बांधे तुझी नीति । ईश्वर सदा सत्व ह्मणसी चित्तीं । आणि मुक्त पापप्रारब्धमिश्रितु ॥१९५॥ तरी पापप्रारब्ध आहे जोंवरी । जीव जीवन्मुक्तचि न होय तोंवरी । ह्मणोनी अरिहंत अत्यंत पुण्यशरीरी । हा अंगिकारी जैनवादू ॥ १९६ ॥ परी आंगीं असोनी अनंत शक्ति । अनंतदयादि असोनी चित्तीं । केवळ उपदेश-मात्र जीवाकरिती । परी कर्म न छेदिती वीतराग ह्मणुनी ॥१९७॥ असली शक्ति रक्षोन । उपदेशावरी समजाविती जन । अहो हें दयालुलक्षण । पहा कैसें ॥ १९८ ॥ कर्मेची बंधक जैन ह्मणती । कर्मे कर्मनाशयाहि तेचि मानिती । अरिहंत असोनि सर्वशक्ति । मोह नाहीं ह्मणुनी जना मुक्त न करी ॥ १९९ ॥ तरी उपदेशाची खटपट कासया । जन जावे कां अवघे वाया । जरी उपजत आहे दया । तरी बळें जीवमुक्तकरणीं कवण दोष ॥ १०० ॥ अधिक कर्म बांधेल । ह्मणसी तरी तीर्थंकरकर्म कव-णयोगें सुटेल । अरिहंततीर्थंकरपरकर्म नसेल । तरी बांधेल केविं ॥ २०१ ॥ परमोचनीं प्रवृत्त सर्वशक्ति । तरी इच्छानुसार विस्तरावी भक्ति । हें वृथा नीतिमंताच्या हातीं । श्रीकृष्णाविण निश्चितीं न सांपडे ॥ २०२ ॥ एरवीं हें एक सत्व । येविषीं न मिळे अत्यंतत्व । येथ यमाचेंचि मात्र तत्व । उदाहरितां कळे ॥ २०३ ॥ जया ग्रासावरुती । अनेक पिपीलिका जीवती । तो ग्रास भक्षितो पिंडपोषणार्थी । नाना मुखींचा काढोनि ॥ २०४ ॥ तो ग्रास आपण न भक्षितां । तरी प्रवर्तणें होय आत्मघाता । दोष तेणेंहि तत्वतां । धर्मशास्त्र सांगे ॥ २०५ ॥ ग्रास घेतां घडे हिंसा । ह्मणोनी न साधे अत्यंताहिंसा । सत्याचीहि दशा । ऐसीचि होय ॥ २०६ ॥ असत्य हें पातक । आणि हिंसात्मक सत्य महा पातक । हें महाभारतीं सम्यक । बोलिलें आहे ॥ २०७ ॥ आतां ब्रह्मच-र्याची रीति । तेथही न सांपडे आत्यंतिकस्थीति । कारण मैथुन त्यागावया-प्रति । आधीं मैथुनलक्षण कीजे ॥ २०८ ॥ सम्मेलनमात्र मैथुन । कीं उप-स्थयोनिसंयोग मैथुन । कीं योनौ शुक्रप्रपातन । बोलिजे मैथुन या नांव॥२०९॥ आद्यपक्ष असिद्ध । कन्यापितयाचेंहि सम्मेलन प्रसिद्ध । द्वितीयपक्ष अति असिद्ध । बालजन्मतां मातृयोनिबालोपस्थसंयोग प्रसिद्ध ह्मणुनी ॥२१०॥ तृतीय पक्ष अंगिकारितां । तरी बुडाली अत्यंतता । श्रीकृष्ण बाळ आणि ऊर्ध्व-

गेता । ह्मणोनी शंका सर्वथा अघटमान ॥ २११ ॥ अपरिग्रह अचौर्य दोन्ही । तयासिहि प्रसंग व्यभिचारक्षणीं । म्हणोनी हें अत्यंत तत्व समजोनी । सत्वविश्वासें कोणी न चालावें ॥ २१२ ॥ रासक्रीडेंत गर्भ-प्राप्ती । बोलिली आहे कवणे ग्रंथीं । यालागीं शास्त्रसंमतचि सत्यप्रतीति । जीवें यथाशक्ति आचरावी ॥ २१३ ॥ परमेश्वरासी कांहीं । तयाचा बाध सर्वथा नाहीं । येणेंचि मोडिले सर्वही । रूपकयत्न ॥ २१४ ॥ ऐतिह्य मानुनी रूपक करितां । तरी तयातें काव्यमात्रता । एरवीं अनुपयोगिता सर्वथा तया ॥ २१५ ॥ ऐतिह्य भंगूनि रूपक प्रमाण । मानावया कवण कारण । रासक्रीडेंतुनी वेदान्तनिरूपण । वेदान्तियावांचून कोणी करूं न शके ॥ २१६ ॥ वेदान्तियासी रूपकें वेदान्त । सांगावया कवण हेत । उपनिषद्वाक्या वाचुनी द्विज विरक्त । न होती मुक्त आचार्य ह्मणती ॥ २१७ ॥ जे होती साधनचतुष्टयसंपन्न । तयासी बोध होय स्पष्ट वेदान्तवाक्येंकरून । जे अनधिकारी तयां कारण । वेदान्तचि न कळे मा अस्पष्ट केविं कळे ॥ २१८ ॥ विरक्त कामपरवचनें न पाहती । बद्ध तंव वेदान्तांतूनहि कामपराचि घेती । मग वेदान्तरूपकें कामक्रीडा सांगाव-याची प्रवृत्ति । व्यासाप्रति कां झाली ॥ २१९ ॥ आप्तासी मिथ्या बोध करणें । उचित नाहीं कवणेंमानें । स्वब्रह्मसूत्रीं कृष्णाचरणहि तेणें । खंडिलें नाहीं ॥२२०॥ व्यासासी न म्हणतां आप्त । तरी तुजचि आम्ही ह्मणतों अनाप्त । मग भागवत संगति तरी व्यर्थ । रूपकें लावूं इच्छिसी कां ॥ २२१ ॥ जे अविद्या तिमिरतरणी । हृदयचौरंगचिन्मणी । तदीय भारती गर्जोनी । रूपक वारोनी हेंचि सांगे ॥ २२२ ॥

" जे विषय जिणाया निघाले । ते शुकादिक दादुले ।
विषयाचि वर्णितां झाले । भाट जयाचे " ॥ २२३ ॥

येरवीं तरी रूपकें । माना न येती निकें । आणि भागवत तंव पारंपरिकें । प्रमाण आहे ॥ २२४ ॥ रूपकाची उपासना । करितांचि न ये कवणिया गुणा । रूपकासाठीं त्यजिती प्राणा । कोणी हें न घडे ॥२२५॥ कृष्णासाठीं सांडिला प्राण । ऐसें भक्तमालेंत बहुवर्णन । तेव्हां रूपक म्हणतां भगव-द्वर्णन । विरोधी जाण इतिहासू ॥ २२६ ॥ शारीरसूत्रीं हराया प्रकृति । शरीररूपकोपन्यस्ती । परंतु आघवीच ती । प्रकृत्यपलापक ॥ २२७ ॥

तेव्हां कृष्णापलाप करावया । असेल रूपकाची प्रक्रिया । तरी प्रेमळ चर्या । बुडेल आघवी ।। २२८ ।। अथवा अनिर्णीत पक्षीं । परस्पर होतील स्वस्वापेक्षी । तूं होवावें रूपकपक्षीं । इतिहासपक्षीं आम्हीं राहूं ।। २२९ ।। हेतुअसिद्धि दाखवून । आम्ही रूपकाचें करूं खंडण । जैसें कां पुरंजनाख्यान । तैसें हें रूपक न म्हणावें ।। २३० ।। तेथ बोलिलेंचि आहे कंठरवें । कीं पुरुषा पुरंजन बुद्धीतें पुरंजनी म्हणावें । आतां अतिशयोक्त्यलंकारें स्वभावें । रूपक न घटे ।। २३१ ।। सकळ-इतिहासअपलापें । अपलपिती तव आईबापें । यालागीं रूपकप्रतापें । असत् द्यूत न मांडीं ।। २३२ ।।

“ तद्रूपकमभेदोयमुपमानोपमेययोः ।
ऐसें काव्यप्रकाशांत केलें रूपकलक्षण ।। १ ।।
असल्यावांचुनी पूर्वी उपमानोपमेय तें ।
कवणावरि कोणाचें घडे रूपक सांग पां ।। २ ।।
वंध्यापुत्रीं शशश्रृंगीं खपुष्पीं नरसागरीं ।
उपमानोपमेयत्व साहित्यशास्त्रवर्जित ।। ३ ।।
असल्या इतिहासाचें करणें जरि रूपक ।
काव्यमात्र सुखें हो तें न कथे परि लोपक ।। ४ ।।
पुन्हा भागवताहूनि होय ना सिद्धरूपक ।
रासपंचाध्यायिचाची प्रथमश्लोक देखणें ।। ५ ।।
अनेकयोगमायेनें रूपें धरित माधव ।
आरोपेंचि स्वयें मायारूप रूपक होतसे ।। ६ ।।
माया जहीं इतीहासू तें रूपक कसें घडे ।
व्यावहारिकसत्तेचें प्रातिभासिक रूपक ।। ७ ।।
प्रतिभासकथा तेव्हां केविं रूपक संभवे ।
मायेंत मायारोपानें जरी रूपक संभवे ।। ८ ।।
स्वाप्नरज्जूसर्पसत्ता तेव्हां चवथि मान तूं ।
‘मायाकरुणालीला’ सांगे शाश्वतकोश तें ।। ९ ।।
परंतु त्या दोहिंचेंही सांग रूपक कें घडे ।
लीलेच्या रूपकाचीही चेष्टा मात्र कपीसम ।। १० ।।

आर्धी स्वीकारतां लीला काय रूपककारण ।
किंवा रूपक लीलेचें मनोलीलास्वरूपची ॥ ११ ॥
इतिहास जरी साचू तरी व्यर्थचि रूपक ।
असत्य इतिहासाचें अवघें व्यर्थ रूपक ॥ १२ ॥
स्पष्टवेदान्ताधिकारीदृष्टीनें व्यर्थ रूपक ।
वेदान्तीं जो नाधिकारी तद्दृष्ट्या व्यर्थ रूपक ॥ १३ ॥
शृंगाररससंपन्ना किंतु निवृत्तिबोधका ।
रासपंचाध्यायिं ऐसें जरी श्रीधर बोलती ॥ १४ ॥
तथापि त्यांची निवृती नाहीं रूपकवाचक ।
आत्मारामीं कामभाव कामसंपत्तिनाशक ॥ १५ ॥
कामेंचि कामनिवृत्ती भगवन्महिमा असा ।
पूर्णावतार गोविंद एवं श्रीधराशय ॥ १६ ॥
आम्हीं 'हृद्गर्भकेलींत' याचा सर्व विशेषही ।
सांगूं येथें दिशामात्र दाविली सज्जनाप्रती ॥ १७ ॥
समाधान तुझें ऐसें केलें प्रथम युक्तिनें ।
आतां शब्दप्रमाणाच्या शंकेचें ऐक आवडी ॥१८॥
तूं बोललास कीं विष्णूपुराणीं अंश कृष्णही ।
भागवतांतही ऐसें परि त्वां नाहिं वाचिलें ॥ १९ ॥
" एवं संस्तूयमानस्तु भगवान् परमेश्वरः ।
उज्जहारात्मनः केशौ सितकृष्णौ महामुने ॥
उवाच च सुरानेतौ मत्केशौ वसुधातले ।
अवतीर्य भुवोभारक्लेशहानिं करिष्यतः ।

( विष्णुपुराण, अंश ५, अ. १, श्लो. ६०।६१ )

श्रीधरी टीकाः–एवमिति उज्जहार उत्पाटितवान् ॥ ६० ॥ उवाचेति अयं भावः मम दुष्करंचेद्युष्माभिः कार्यसहाय्यं स्यात्। नन्विदमस्ति भूभारहरणादौ महत्यपि कार्ये मत्केशमात्रस्यैव समर्थत्वादिति न तु केशमात्रावतार इति मंतव्यम् मद्दृक्पातविचूर्णिता इति कृष्णाष्टम्यां अहमुत्पत्स्यामि इत्यादिषु साक्षात्स्वावतारस्योक्तेः । सितकृष्णकेशधारणमपि शोभार्थमेव मिश्रकेशी~~अत्पसोक्त्~~ नत्वजरामरस्यार्थपलितत्वं संभवति " काष्ठामूहूर्तादि-

मयश्चकालो न यद्विभूतेः परिणामहेतुः " इत्युक्तत्वात् । मत्केशौ वसुधा-तले्ऽवतीर्य भुवोभारनिमित्तस्य क्लेशस्य हानिं करिष्यतः ॥ ६१ ॥

" भूमेः सुरेतरवरूथविमर्दितायाः क्लेशव्ययाय कलया सितकृष्णकेशः ।
जातः करिष्यति जनानुपलक्ष्यमार्गः कर्माणिचात्ममहिमोपनिबंधनानि "

( भागवत, द्वितीय स्कंध, अ० ७ श्लोक २६ )

टीकाः— श्रीकृष्णावतारमाह भूमेरिति दशभिः । सुरेतरा असुरांशसंभूता राजानस्तेषां वरूथैः सैन्यै र्विमर्दितायाः भारेण पीडितायाः कलया रामेणसह जातः सन् । ननु कोऽसौ जातः सितकृष्णौ केशौ यस्य भगवतः स एव साक्षात् । सितकृष्णकेशत्वं शोभैव न तु वयःपरिणामकृतं अविकारित्वात् । यत्तूक्तं विष्णुपुराणे " उज्जहारात्मनः केशौ सितकृष्णौ महामुने " इति यच्च भारते,

" स चापि केशौ हरिरुच्च जन्हे शुक्लमेकमपरं चापि कृष्णम् ।
तौ चापि केशावाविशेतां यदूनां कुले स्त्रियौ रोहिणीं देवकीं च ॥
तयोरेको बलभद्रो बभूव यो सौ श्वेतस्तस्य देवस्य केशः ।
कृष्णो द्वितीयः केशवः संबभूव केशो योऽसौ वर्णतः कृष्ण उक्तः"

इति तत्तु न केशमात्रावताराभिप्रायम् किंतु भूभारावतारणरूपं कार्यं कियदेतन्मत्केशावेवैतत् कर्तुं शक्ताविति द्योतनार्थं रामकृष्णयोर्वर्णसूचनार्थं च केशोद्धरणमपि गम्यते अन्यथा तत्रैव पूर्वापरविरोधापत्तेः । " कृष्णस्तु भगवान् स्वयं "मित्येतद्विरोधाच्च । कथंभूतः परमेश्वरतया जनैरनुपलक्ष्यो मार्गो यस्य । तर्हि ईश्वरत्वे किं प्रमाणं अतिमानुषकर्मान्यथानुपपत्तिरेवेत्याह आत्मनो महिमोपनिबध्यतेऽभिव्यज्यते येषु तानि ॥ २६ ॥

भावार्थ.

तूं बोलिला ते हे श्लोक व्याख्यानें किंतु त्याचि गा ।
विशेष प्रतिपत्ती तूं करिं संशय वारुनी ॥ २० ॥
श्रीमद्विष्णुपुराणींची श्रीमद्भागवताचि ही ।
श्रीधरस्वामिनीं व्याख्या केली ती मज मानवे ॥२१॥
सर्व श्लोकार्थ यासाठीं स्वामिव्याख्यान्वयें करूं ।
कृष्णावतार या श्लोकीं बोलिला स्वामि बोलती ॥२२॥
शोभेसाठींच देवाचे केश ते नील पांढरे ।

न म्हणावे वयोवृद्धपरिणामादिबोधक ॥ २३ ॥
अविकारी दयासिंधू कोठला परिणाम त्या ।
माझ्या केशींच भूभारहरणीं पूर्ण शक्तता ॥ २४ ॥
यासाठीं दाविलें देवें स्वकेश धरुनी करीं ।
जन्मेन देवकीपोटीं कृष्णाष्टमिदिनिं स्वयें ॥ २५ ॥
ऐसें त्याचि पुराणांत वदले देव वास्तव ।
केशमात्ररूप कृष्ण न म्हणावें कदापिही ॥ २६ ॥
देवकीरोहिणीगर्भी केशें ती पांढरी निळी ।
राहिली यद्यपी ऐसें महाभारतिं बोलिली ॥ २७ ॥
तथापि तदभिप्रायवर्णमात्रनिदर्शक ।
ऐसा हा भगवन्महिमा सर्वसंसारतारक ॥ २८ ॥
श्रीमद्भागवताचाही हाचि भावार्थ वर्णिला ।
तेविं विष्णुपुराणाचा हाचि भावार्थ वर्णिला ॥ २९ ॥
आणीक एक यामाजीं तत्व कीं केश मस्तकीं ।
अर्थ कीं श्रीविष्णुच्याही श्रीकृष्ण वसतो शिरीं ॥३०॥

आर्या.

आणीक या पुराणीं कृष्ण जसा विष्णुजन्य बोलियला ।
तैसा ब्रह्मविवर्ती नारायण कृष्णजन्य बोलियला ॥ १ ॥

श्लोक.

ब्रह्मखंड तृतीयाध्यायांत वाचोनि पाहणें ।
श्रीकृष्णदक्षिणांगापासुनी नारायणा जनी ॥ ३१ ॥
श्रीधरस्वामिनीं श्लोक भारतांतून घेतले ।
त्यांच्या टीकेंत हें तत्व चतुर्धरहि बोलती ॥ ३२ ॥

" तौ चापि केशौ निविशेतां यदूनां कुले स्त्रियौ देवकीं रोहिणीं च। अत्र केशावेव रेतोरूपौ। पांडवानामिव रामकृष्णयोरपि प्रकरणसंगत्यर्थं साक्षाद्देवरेतस उत्पत्तेरवश्यवक्तव्यत्वात्। अत एव देवक्यां रोहिण्यां च साक्षात् केशप्रवेश उच्यते न तु वसुदेवे। तथा सति तु देवानां रेतो वर्षं वर्षस्य रेत ओषधय इत्यादि श्रौतप्रनाड्याऽस्मदादिवत्तयोरपि व्यवधानेन देवप्रभवत्वं स्यात्। तथा च कृष्णस्तु भगवान् स्वयमिति श्रीमद्भागव-

तोक्तिः संगच्छते। न च केशोद्धरणात् कृष्णस्याप्यंशत्वं प्रतीयत इति वाच्यम् केशस्य देहावयवत्वाभावात्। तस्मान्नमुचिवधे कर्तव्ये यथाऽपां फेने वज्रस्य प्रवेश एवं देवकीरोहिण्योर्जठरप्रवेशे कर्तव्ये केशद्वयेन द्वारभूतेन भगवतः कार्त्स्न्येनैवाविर्भावो द्रष्टव्य इति युक्तं " ।

" तयोरेको बलदेवो बभूव योऽसौ श्वेतस्तस्य देवस्य केशः ।
कृष्णो द्वितीयः केशवः संबभूव केशो योऽसौ वर्णतः कृष्ण उक्तः

( आदिपर्व, अ० १९७, श्लोक ३३. )

श्लोक.

स्वामीच पूर्वी वदले मुलपद्यसारा ।
व्याख्यार्थमात्र वदतों मिहि येथ सारा ।
श्रीकृष्णतत्व बुझुनी भव दूर सारा ।
त्या वाचुनी अनृत वाचुं नको पसारा ॥ १ ॥
देवादिकांस भूतत्व तयाच्या रेत यास्तव ।
भूतत्व ईश्वरीं नाहीं यास्तव तद्रेत केशची ॥३३॥
गोविंद देवकीगर्भी केशद्वारें समस्तची ।
निजाविर्भाव दावी तो केशमात्र न बोलिजे ॥३४॥
देवकीम् या मूलशब्दे देवकीउदरीं हरी ।
राहिला न वसूदेव जठरीं जीववत्कदा ॥ ३५ ॥
उदरीं जरि बापाच्या असता व्रजवल्लभ ।
तरी पंचाग्निविधोक्त शुक्रमार्गेचि जन्मता ॥ ३६ ॥
" भगवानपि विश्वात्मा भक्तानामभयंकरः ।
आविवेशांशभागेन मन आनकदुंदुभेः "

( भागवत, दशमस्कंध, अ० २, श्लो० १६. )

आत्मा सर्व जगाचा जो भगवान् भक्तवत्सल ।
राहिला अंशभागानें वसुदेवमनांत तो ॥ ३७ ॥
ऐसें भागवतीं वाक्य परी यांचा समन्वय ।
कीं आधीं मानसीं देव ध्येयस्वरुप राहिला ॥ ३८ ॥
देवक्यालिंगनीं ही तो न सत्वीं चळला नृप ।
प्रेमें मात्र देवकीच्या पोटीं देव प्रवेशला ॥ ३९ ॥

याचा मुख्यार्थ ऐसा कीं वात्सल्यप्रेमवस्तुता ।
नारीसचि मिळे शुद्ध ब्रह्मधीला न राहुनी ॥ ४० ॥
म्हणोनि आई देवाची व्हावें न जनिता कदा ।
भक्तिरूपें पहातां तो पितरीं मातरीं समू ॥ ४१ ॥
श्रीमद्भागवतीं उक्ती 'कृष्णस्तु भगवान् स्वयम्' ।
यालागीं म्हणती स्वामी कृष्ण पूर्णावतारची ॥ ४२ ॥
बलिरामास अंशत्व श्रीधरादि समस्तही ।
सांगती परि त्यांचीही हो उपासनिं पूर्णता ॥ ४३ ॥

( मागें हें वचन श्रीधरी टीकेंत आलें होतें तें भावार्थ करतांनां सुटलें होतें म्हणून येथें घातलें )

ओव्या:— एरवीं तरी पाहतां । देवा कोणेपरी अंशता । चैतन्य-दृष्टीं तत्वतां । निरंशचि सदा ॥ २३३ ॥ मायादृष्टीं अंशता जरी । सत्वाचे अंश न होती तरी । अंशही मानतां सत्वाचे परी । अल्पता न ये रजस्तमाविणें ॥ २३४ ॥ देशकाल मायेचें कार्य । कारणमाया देशपरिच्छेदा न ये । रजस्तमाविण सत्वांशसोय । न सांपडे ॥२३५॥ आपुलें अल्पज्ञान हें आवरण । सर्वथा न होय अविद्येविण । आणि अविद्येंत तव मम रमण । कदाचि न ये ॥ २३६ ॥ सत्वपरिच्छेदें सकळा । सर्वसमत्व मानतां अंश म्हणणें विकळा । एवं महावराहीं केवळा । उक्तीही असती ॥ २३७ ॥

" सर्वे नित्याः शाश्वताश्च देहास्तस्य परात्मनः ।
हानोपादानरहिता नैव प्रकृतिजाः क्वचित् ।
परमानंदसंदोहाज्ज्ञानमात्राश्च सर्वतः ।
सर्वे सर्वगुणैः पूर्णाः सर्वे दोषविवर्जिताः । "

या श्लोकांचा भावार्थ । कीं भगवद्देह नित्य समस्त । सर्वज्ञ सर्वशक्तिमंत । लीलामात्र देहदेहीभाव ॥ २३८ ॥ आणि सुसिद्धान्तोत्तमीं प्रियादास । बोलिले कीं अधिक उणें न म्हणावें कोण्याही अवतारास । परी तारतम्यभेद जो विशेष । तो माधूर्यकृपादिगुणावेशमात्र ॥ २३९ ॥ येथहि आहे प्रमाण । प्रत्यक्ष विष्णुपुराण । नृसिंहरामादिसमानहि श्रीकृष्ण । विशेष होय प्राकट्यें ॥ २४० ॥

मैत्रेय उवाच.

हिरण्यकशिपुत्वे च रावणत्वे च विष्णुना ।
अवाप निहतो भोगान्नप्राप्यानमरैरपि ॥ १ ॥
न लयं तत्र तेनैव निहतः स कथं पुनः ।
संप्राप्तः शिशुपालत्वे सायुज्यं शाश्वते हरौ ॥ २ ॥
एतदिच्छाम्यहं श्रोतुं सर्वधर्मभृतां वर ।
कौतूहलपरेणैतत्पृष्टो मे वक्तुमर्हसि ॥ ३ ॥

श्रीपराशर उवाचः— दैत्येश्वरस्य वधायाखिललोकोत्पत्तिस्थितिविनाशकारिणा पूर्वतनुग्रहणं कुर्वता नृसिंहरूपमाविष्कृतम् ॥ ४ ॥ तत्र च हिरण्यकशिपो विष्णुरयमिति एतन्नमनस्यभूत् ॥ ५ ॥ निरतिशयपुण्यसमुद्भूतमेतत् सत्वजातमिति ॥ ६ ॥ रजोद्रेकप्रेरितैकाग्रमतिस्तद्भावनायोगात्ततोवाप्तवधहेतुकीं निरतिशयामेवाखिलत्रैलोक्याधिक्यकारिणीं दशाननत्वे भोगसंपदमवाप ॥ ७ ॥ न तु स तस्मिन्ननादिनिधने परब्रह्मभूते भगवत्यनालंबिनि कृते मनसस्तल्लयमवाप ॥ ८ ॥ एवं दशाननत्वेप्यनंगपराधीनतया जानकीसमासक्तचेतसा भगवता दाशरथिरूपधारिणा हतस्य तद्रूपदर्शनमेवासीत् नायमच्युत इत्यासक्तिर्विपद्यतोंतःकरणे मानुषबुद्धिरेव केवलमस्याभूत् ॥ ९ ॥ पुनरप्यच्युत विनिपातमात्रमखिलभूमंडलश्लाघ्यचेदिराजकुले जन्म अव्याहतैश्वर्यं शिशुपालत्वेऽप्यवाप ॥ १० ॥ तत्र त्वखिलान्येव स भगवन्नाम्नां त्वंकारकारणमभवत् ॥ ११ ॥ ततश्च तत्कालकृतानां तेषामशेषाणामेवाच्युतनाम्नामनवरतमनेकजन्मसुवर्द्धितविद्वेषानुबंधि चित्तो विनिंदनसंतर्जनादिषूच्चारणमकरोत् ॥ १२ ॥ तच्चरूपमुत्फुल्लपद्मदलामलाक्षिमत्युज्ज्वलपीतवस्त्रधार्यमलकिरीटकेयूरहारकटकादिशोभितमुदारचतुर्बाहुशंखचक्रगदाधरमतिप्ररूढवैरानुभावादटनभोजनस्नानासनशयनादिष्वशेषावस्थान्तरेषु नान्यत्रोपययावस्यचेतसः ॥ १३ ॥ ततस्तमेवाक्रोशेषूच्चारयंस्तमेवहृदयेनधारयन्नात्मवधाय यावद्भगवद्धस्तचक्रांशुमालोज्ज्वलमक्षयतेजस्वरूपं ब्रह्मभूतमपगतद्वेषादिदोषं भगवंतमद्राक्षीत् ॥ १४ ॥ तावच्च भगवच्चक्रेणाशुव्यापादितस्तत्स्मरणदग्धाखिलाघसंचयो भगवतां तमुपनीतस्तस्मिन्नेव लयमुपययौ ॥ १५ ॥ एतत्तवाखिलं मयाभिहितम् ॥ १६ ॥ अयंहि भगवान् कीर्तितश्च संस्मृतश्च द्वेषानुबंधेनापि अखिलसुरासुरादिदुर्लभफलं

प्रयच्छति किमुत सम्यक् भक्तिमतामिति ॥ १७ ॥

भावार्थः– ओव्याः– मैत्रेय ह्मणे भगवंता । हिरण्यकशिपु देवा झगटतां । मुक्ति कां न पावला चिंता । हे मज वाटे ॥ २४१ ॥ यद्यपि सनकादिशापें जन्म तीन । जयविजयां नियत हा हेतु कळे प्रधान । तथापि योगवासिष्ठीं वराभिमान । शापनाशक जाहला ही कथा असे ॥ २४२ ॥ अंबा गंगाशाप अर्धदेहें भोगुनी । अर्धदेहें शिखंडी झाली हें भारतीं वदले मुनी । दुर्वासशाप अंबरीषा लागुनी । हरिकृपें न लागे ही पुराणीं कथा ॥ २४३ ॥ यास्तव भगवद्भक्ता कांहीं । शाप वर सर्वथा नाहीं । तस्माद्व्यर्थ चिंता ही । ह्मणिजे श्रोतीं ॥ २४४ ॥ असो मैत्रेयाचा ऐसा । प्रश्न ऐकोनी आपैसा । ऋषीच्या हृदयोल्हासा । प्रेमभरतें ॥२४५॥ ह्मणे गा हिरण्यकशिपुनें नृसिंह देखिला । तैं विष्णु ऐसा नोळखिला । वाटे महापुण्यें जन्मला । कोणी जीव ॥ २४७ ॥ तथापि दर्शनसुकृतें महाफळ । रावणजन्म पावला केवळ । तेथही जानक्याद्यासक्तिशीळ ॥ मनुष्यबाळ मानी रामा ॥ २४८ ॥ यद्यपि शिवोपासनाजन्य रावणैश्वर्य । तथापि रामदर्शनेंचि प्राप्त शिशुपाळजन्मैश्वर्य । म्हणवोनी रावणजन्म-ऐश्वर्य । नृसिंहदर्शनफळ ह्मणूं ॥ २४९ ॥ आधीं जयविजय वैष्णव होते । यालागीं शिवोपासित निमित्तचि येथें । शिशुपाळजन्मीं श्रीकृष्णातें । अग्रपूजासमयीं निंदी ॥ २५० ॥ तेथ शंखचक्रादि चिन्हस्थीति / नारायणनामप्रवृत्ति । हा विष्णुचि ऐसें जाणोनि निश्चितीं । द्वेषें वृत्ति एकाग्र करी ॥ १५१ ॥ तेणें तेथेंचि पावला लय । पराशर म्हणती हे मैत्रेय । द्वेषेंहि कृष्णभक्ति मुक्तिप्रद होय । मा भक्तिमंता काय शंका ॥ १५२ ॥ नृसिंहीं बहुधा लालन । पितृमातृत्वें भगवद्भजन । लालनवात्सल्याश्रय रघुनंदन । आणि मानसमर्यादा माधूर्याश्रयहि ॥ २५३ ॥ लालन वात्सल्य माधूर्य तिन्ही । मर्यादापुष्टिमय घडती श्रीकृष्णीं । जें निरसिलें आहे वेदांनीं । तेंही साधन करोनी उद्धरिलें यास्तव पूर्ण कृष्ण ॥ २५४ ॥ किंबहुना आपली प्रतिज्ञा मोडून । आपणचि केलें अन्य साधन । येच विषयीं प्रमाण । किंचित् ऐकें ॥ २५५ ॥ "कामक्रोधस्तथालोभस्तस्मादेतत्रयंत्यजेदिति" । गीतेंत षोडशाध्यायीं उक्ती । यद्यपि "धर्माविरुद्धो कामोऽस्मीति" । गीतेंतचि वदले देवो ॥२५६॥ निषिद्धकामवर्जन प्रथमउक्त्यर्थु ।

विहितकामसेवन द्वितीयउक्त्यर्थू । तथापि निषिद्धकामचि मोक्षहेतु । गोपींस झाला ॥ २५७ ॥ येविषयीं श्रीमद्भागवत । कंठरवेंचि सांगत । तोहि श्लोक उद्धवोक्त । प्रमाण आयिकें ॥ २५८ ॥

" आसामहोचरणरेणुजुषामहं स्यां ।
वृंदावने किमपि गुल्मलतौषधीनाम् ॥
या दुस्त्यजं स्वजनमार्यपथं च हित्वा ।
भेजुर्मुकुंदपदवीं श्रुतिभिर्विमृग्याम् ॥
( स्कंध. १०, अ० ४७, श्लो० ६२ )

भावार्थः– उद्धव म्हणे होर्जा । ह्या आणि मी कृष्णरजीं । लंपट तदपि दोघांमार्जी । उमजे भेदु ॥ २५९ ॥ म्हणोनी यांचे चरणरज । जे सेवुनी पावले निज । ते वेलिवृक्षपाषाण सहज । होवावें मिया ॥२६०॥ जयांचें सामर्थ्य अतिअद्भुत । उल्लंघोनी वैदिकपंथ । अपवर्ग पावल्या श्रौत । श्रीकृष्णचरणीं ॥ २६१ पंचरात्रादि देवनिर्मित । ते वेदविरोधास्तव निंदित । परी ययांचें कृत्य अवेदोक्त । महामुनिहि प्रशंसिती ॥ २६२ ॥ यद्यपि श्रीकृष्णाच्या ठायीं । सर्वपतित्वास्तव निषिद्ध काम नाहीं । तथापि यदा ग्रहकर्मोच्या ठायीं । तद्दृष्टया निषिद्ध कामु गोपी-कृत्य ॥ २६३ ॥ तो निषिद्धकामहि साधन । झाला आपुलें असुरत्व सोडून । यालागीं अवतार पूर्ण । श्रीकृष्णनाथु ॥ २६४ ॥ एवं अंशवाक्यसमाधान केलें । आतां स्पष्ट पूर्णवाक्य पाहिजे ऐकिलें । श्रीमद्भागवतीं बोलिलें । प्रथमस्कंधीं तृतीयाध्यायीं ॥ २६५ ॥ एते चांश-कलाः पुंसः कृष्णस्तु भगवान् स्वयम् । इंद्रारिव्याकुलं लोकं मृडयंति युगे युगे ॥ २८ ॥ अन्नप्रदाने पालक पिता । परी एक न होती पालक पिता । पालकातें नये पितृता । पितया पालकता सहजची ॥ २६६ ॥ तेवि जयाचेनि प्रगटणें । इंद्रादिकांचें मात्र पोषणें । ते अवतार परी कृष्णें । प्रगटलिया होणें सहजचि ते ॥ २६७ ॥ पृथ्वीवरी आविर्भाव । येणेंचि-मानें व्रजराव । अवतार हे बोलती सर्व । परी तो स्वयमेव परमात्मा ॥२६८॥ यद्यपि युक्तिबळें पाहतां । अवतारीं न सांपडे भिन्नता । तथापि कार्या-पुरतीच ज्ञानशक्तिता । अन्यावतारीं ॥ २६९ ॥ येथ सकळचि परिपूर्ण । यालागीं श्रीकृष्ण स्वयं भगवान । दशावतारीं नाहीं कृष्ण । येथ अभि-

प्रायें प्रमाण जयदेवस्वामी ।। २७० ।।

“ वेदानुद्धरते जगन्निवहते भूगोलमुद्बिभ्रते ।
दैत्यं दारयते बलिं छलयते क्षत्रक्षयं कुर्वते ।।
पौलस्त्यं जयते हलं कलयते कारुण्यमातन्वते ।
म्लेच्छान्मूर्च्छयते दशाकृतिकृते कृष्णाय तुभ्यं नमः ”।।१।।

[ राग–मालव ताल–रूपक. ]

“ प्रलयपयोधिजले धृतवानासि वेदम् ।
विहितवहितचरित्रमखेदम् ।। १ ।।
केशव धृतमीनशरीर जय जगदीश हरे ।। धृ० ।।
क्षितिरतिविपुलतरे तव तिष्ठति पृष्ठे ।
धरणिधरणकिणचक्रगरिष्ठे ।।
केशव धृतकच्छपरूप जय जगदीश हरे ।। २ ।।
वसति दशनशिखरे धरणी तव लग्ना ।
शशिनि कलंककलेव निमग्ना ।।
केशव धृतसूकररूप जय जगदीश हरे ।। ३ ।।
तव करकमलवरे नखमद्भुतशृंगम् ।
दलितहिरण्यकशिपुतनुभृंगम् ।।
केशव धृतनरहरिरूप जय जगदीश हरे ।। ४ ।।
छलयसि विक्रमणे बलिमद्भुतवामन ।
पदनखनीरजनितजनपावन ।।
केशव धृतवामनरूप जय जगदीश हरे ।। ५ ।।
क्षत्रियरुधिरमये जगदपगतपापम् ।
स्नपयसि पयसि शमितभवतापम् ।।
केशव धृतभृगुपतिरूप जय जगदीश हरे ।। ६ ।।
वितरसि दिक्षु रणे दिक्पतिकमनीयम् ।
दशमुखमौलिबलिं रमणीयम् ।।
केशव धृतरघुपतिरूप जय जगदीश हरे ।। ७ ।।
वहसि वपुषि विशदे वसनं जलदाभम् ।
हलहतिभीतिमिलितयमुनाभम् ।।

केशव धृतहलधररूप जय जगदीश हरे ॥ ८ ॥
निंदसि यज्ञविधेरहह श्रुतिजातम् ।
सदयहृदय दर्शितपशुघातम् ॥
केशव धृतबुद्धशरीर जय जगदीश हरे ॥ ९ ॥
म्लेच्छनिवहनिधने कलयसि करवालम् ।
धूमकेतुमिव किमपि करालम् ॥
केशव धृतकल्किशरीर जय जगदीश हरे ॥ १० ॥
श्रीजयदेवकवेरिदमुदितमुदारम् ।
शृणु सुखदं शुभदं भवसारम् ॥
केशव धृतदशविधरूप जय जगदीश हरे" ॥ ११ ॥

ओव्या:— या श्लोकीं दशरूपें । धरिलीं आथि व्रजभूपें । 'हलं कलयते' या पदें साक्षेपें । बोलिला बलदेव दशावतारीं ॥ २७१ ॥ आणि केशव धृतहलधररूप' । येणेंहि सुचविला हाचि संकल्प । कीं दशावतारीं व्रजभूप । नाहीं म्हणूनी ॥ २७२ ॥ एवं प्रबंधें कां श्लोकें । जयदेव हें बोलिलें निकें । यद्यपि 'गोपाळतापनीय' श्रुतींत विशेखें । बोलिलें अवतारत्व ॥ २७३ ॥ तथापि सकलावतारश्रेष्ठता । आणि तेथेंचि बोलिली प्रज्ञाता । यालागीं श्रीकृष्णपूर्णता । उपलब्ध होय ॥ २७४ ॥ निजधामा न जातां कृष्ण । वसविलें पंढरीनिधान । हें वारकरीसंप्रदायभाषण । देश कीं कृष्ण नाहीं दशावतारीं ॥ ३७५ ॥ आधीं रचिली पंढरी । मग वैकुंठ नगरी । इत्यादि वचनसरी । करी तेंचि ॥ २७६ ॥

" यद्यपि तत्रांशेनावतीर्णस्य " । " दिष्ट्यांब ते कुक्षिगत: पर: पुमानंशेन साक्षाद्भगवान् भवाय न: " " ताविमौ वै भगवतो हरेरंशा-विहागतौ " इत्यादि अनेक ठिकाणीं अंशत्व सांगितलें आहे, तर एकाच वाक्यानें पूर्णत्व कसें साधलें जातें, अशी शंका येणें साहजिक आहे. पण तिचें समाधान हा शास्त्रारंभीं जन्मगुह्यसूत्ररूप अध्याय असल्यामुळें, व त्यांतील हें परिभाषासूत्र असल्यामुळें, व शास्त्रामध्यें परिभाषा एकच वेळ पठण केली जात असल्यामुळें, तिनें दाखविलेला अर्थ या एकाच वाक्यानें सिद्ध होतो; अशा रीतीनें विश्वनाथानें केलें आहे; आणि अंश-वाक्य प्रकरणरूप आहे; व येथील वाक्य श्रुतिरूप आहे; " श्रुतिलिंग-

वाक्यप्रकरणस्थानसमाख्यानां समवाये पारदौर्बल्यमर्थविप्रकर्षात् ( अ० १ सू० ) असें पूर्वमीमांसेंत जैमिनीयसूत्र असून त्याचा अर्थ श्रुति, लिंग, वाक्य, प्रकरण, स्थान, समाख्या एकत्र प्राप्त झालीं असतां क्रमानें पुढचीं पुढचीं प्रमाणें दुर्बल होतात. कारण त्यांना मागच्यामागच्याची कल्पना करावी लागते, असा त्या सूत्राचा अर्थ असून "श्रुत्यादिबलियस्त्वान्नबाधः" ( ब्रह्मसूत्र, अ० ३, पा० ३. सू० ४९, ) असें उत्तरमीमांसेचें भगवान् बादरायणाचार्यप्रणीत ब्रह्मसूत्र असून, त्याचाहि अर्थ असा वरील सूत्राप्रमाणेंच आहे. हें वाक्य श्रुतिरूप असल्यामुळें प्राकरणिक अंश वाक्यापेक्षां प्रबल आहे. शिवाय श्रीकृष्णाला अंशावतार मानण्याविषयीं वैदिकपौराणिक संप्रदायहि नाहीं. श्रीधरस्वामींनींहि असेंच समाधान पुष्कळ ठिकाणीं केलें आहे. किंतु माझ्या मतानें याचें समाधान असें आहे कीं,

" अवारुकण्हकेवलिजवुराआअंसकेवलिअहिल्लो ।
जोगेवळअलिवल्लीनाणमिणंहोतितासवअणादो ।
वअणमनुगीताईजहा :—

" अबुध्या नाग्रहीर्यस्त्वं तन्मे सुमहदप्रियम् ।
न च साद्य पुनर्भूय स्मृतिर्मे संभविष्यति ॥ १० ॥
नूनमश्रद्दधानोऽसि दुर्मेधोह्यसि पांडव ।
न च शक्यं पुनर्वक्तुमशेषेण धनंजय ॥ ११ ॥
स हि धर्मः सुपर्याप्तो ब्रह्मणः पदवेदने ।
न शक्यं तन्मया भूयस्तथा वक्तुमशेषतः ॥ १२ ॥
परं हि ब्रह्मकथितं योगयुक्तेन तन्मया ।
इतिहासं तु वक्ष्यामि तास्मिन्नर्थे पुरातनम् ॥ १३ ॥
यथा तां बुद्धिमास्थाय गतिमग्र्यां गमिष्यसि ।
श्रुणु धर्मभृतां श्रेष्ठ गदितं सर्वमेव मे ॥ १४ ॥

भावार्थः— अर्जुन विसरलिया गीता । पुढती पुसिलें भगवंता । तैं देव म्हणे तुज अविश्वासवंता । न ये सांगतां पुनः मज ॥ २७७ ॥ मियां योगसाधनेंकरून । जेणें मी मिळें तो धर्म दिला तुजलागुन । येणेंचि वचनें आवेशानुमान । पूर्णाचें जाण घडे अंशीं ॥ २७८ ॥ 'वृष्णीनां वासुदेवोऽस्मी'ति । गीतेंतहि दशमाध्यायीं श्रीपति । बोलिले

येणेंमानें द्वारावती । केला विभूतिबोध सत्य ॥२७९॥ विभूतित्व आपुलें आपणा । अनुपाधिक माने कवणा । उपाधि मानी अंशपणा । चुकेचि ना कीं । २८०।

अंसकण्हो वैष्णवे पढिदं ' अज्जोत्तो हि सहायो भअवा मिदि भ।अव ॅम्मि पढिदं बम्हवैवत्तम्मि एवमवारुअदो ज्जेव कण्हा । कुदो ण्यदा समण्वओ पुणा विभावअदम्मि भणिदं गग्गाऽजेण णण्दम् जहा:—

' तवायमात्मज: प्रागिति सामान्योक्त्या ऋषिरयं जन्मांतरगतं नाम कथयति इति नंदो मन्यतेस्म ' इति श्रीधरस्वामिचरणा:

भावार्थ, आर्या:—

तव नंदन हा पूर्वीं नंदा वसुदेवसदनिं अवतरला ।
वासुदेव म्हणति तया यास्तव जो मुनिसमाज भव तरला ॥१॥
मम नंदन नंदातें वाटे हा पूर्वजन्मिं वसुदेव ।
गृहिं अवतरला यास्तव म्हणती या वासुदेव भूदेव ॥ २ ॥

तदो अज्जउत्तस्यदाराबदिम्मि केवलि विभूति अत्थि इदि जाणिमो आ कुदि भेवो अविमिलदि जहा गोपाळतापणीए:—

" सत्पुंडरीकनयनं मेघाभं वैद्युतांबरम् ।
द्विभुजज्ञानमुद्राढ्यं वनमालिनमीश्वरम् " ॥

भावार्थ:— द्विभुज वनमाली कमललोचनी । येर पदार्थ स्पष्ट पंडितमनीं । या श्रुतीच्या उपबृंहणीं । पद्मपुराणीं बोलिलें हें ॥ २८१ ॥ येथ आणिकहि उपयुक्त । भगवन्महिमा बोलिला यथार्थ । यालागीं ते श्लोक येथ । संग्रहोनि भावार्थ सांगूं

सेंद्रियोऽपि यथा सूर्यस्तेजसा नोपलक्ष्यते ।
तथा कांतियुत: कृष्ण: कालं मोहयति ध्रुवम् ॥ ४२ ॥
न तस्य प्राकृती मूर्तिर्मेदोमांसास्थिसंभवा ।
योगीचैवेश्वरश्चान्य: सर्वात्मा नित्यविग्रह: ॥ ४३ ॥
काठिन्यं दैवयोगेन करकाधृतयोरिव ।
कृष्णस्यामिततत्वस्य पादपृष्ठं न देवता ॥ ४४ ॥

( पातालखंड अ० ७७ )

या तिन्ही श्लोकांचा अर्थू । दैव म्हणीजे ईश्वरशक्तू । तो कठिण अनध्यस्तविवर्तु । आपुल्या योगें ॥ २८३ ॥ आस्थिमांसमेदभरित । तयाचा

देह न म्हणिजे प्राकृत । ज्ञानेंहि न नासे संसारवत । यालागीं नित्य तो बोलिजे ।। २८४ यद्यपि महावराहपुराणीं । सकल देह नित्य म्हणती मुनी । तथापि संपूर्ण सामर्थ्य प्रगट कैवल्यदानी । श्रीकृष्ण नित्य म्हणोनि पूर्ण ।। २८५ ।। ' न कदाचिच्चतुर्भुजः ' या अर्धश्लोकांन । केलें गोपालतापनीयउत्युपबृंहण । आणि वसुदेवदर्शनादौ चतुर्भुजकृष्ण । भागवतीं आणि हरिविजयादि ग्रंथीं निरूपिला ।। २८६ ।। या सकळाचें निर्णायक । पद्मपुराणवाक्यचि सम्यक । तेंही प्रमाण निष्कलंक । ऐकावें सुजनीं ।। २८७ ।।

वृंदावनपरित्यागो गोविंदस्य न विद्यते ।
अन्यत्र यद्वपुस्तत्तु कृत्रिमं तन्नसंशयः ।। ६० ।।

भावार्थः— वृंदावनपरित्याग । कदापि न करी गोपिरंग । मथुराद्वारकादिस्थानीं जें कृष्णांग । तें कृत्रिम चांग अंशरूप ।। २८८ ।।

ब्रज तजि अनंत न जावुहूं येही मेरी टेक ।
भूतलभार उतारहूं करहूं रूप अनेक ।।

इत्यादि साधु|वअणम्मि अवारुकण्हा होन्ति.

" कृष्णोऽन्योयदुसंभूतो यः पूर्णः सोऽस्त्यतः परः ।
वृंदावनं परित्यज्य स क्वचिन्नैव गच्छति ।।
द्विभुजः सर्वदा सोऽत्र न कदाचिच्चतुर्भुजः ।
गोप्यैकया युतस्तत्र परिक्रीडति नित्यदा ।।

यामलभावार्थः— यदुकुळीं अवतरला कृष्ण । तो तंव अंशरूप वेगळा जाण । आणि गर्गसंहितेंत जो परिपूर्ण । सांगितला तो कृष्ण वेगळा ।। २८९ ।। तो प्रगटला नंदभुवनीं । सर्वदा राहे वृंदावनीं । एक गोपी मात्र घेउनी । तिन्ही काळीं क्रीडतु ।। २९० ।।

एष नारायणः साक्षात् क्षीरार्णवनिकेतनः ।
नागपर्यंकमुत्सृज्य ह्यागतो मथुरां पुरीं ।। १ ।।

भावार्थः— ययाचा सार कीं मथुरेंतील कृष्ण नारायण । आणि ब्रह्मवैवर्तीं नारायणाविर्भाव कृष्णापासून । यालागीं उभयविध कृष्ण । उपलब्धि होय ।। २९१ ।। ब्रह्मवैवर्तपुराणीं । ब्रह्मखंडीं चतुर्थाध्याय पहावा सकळानीं । परी पूर्णा कृष्णा पासुनी । नारायणाविर्भाव कीं ।।२९२।।

त्रिपादमहानारायणीं । मुख्य वैकुंठीं जी तनु स्थानीं । बोलिली ती तंव नारायणकृष्णीं । वैष्णवचतुर्थमूर्तिपणीं विराजे ॥ २९३ ॥ विभूति नारायण कृष्ण विवादू । एरवीं वैष्णवीं समान बोधू । तातभागवतवचनसंबंधु । श्रीकृष्णस्थान वैकुंठीं म्हणोनी ॥ २९४ ॥ परी भक्तिवशें आविर्भावें । परी पूर्णत्व व्रजस्था यावें । अंशत्व उपलंभावे । द्वारावतिस्था ॥ २९५ ॥ हेंही श्रुतिपुराणतंत्रान्वयें । सिद्ध ह्मणोनि शंकाहि नोहे । जो नामपणें उपाय । उपेय रूपपणें ॥ २९६ ॥ कदाचिन्न जायें अन्यत्र । तंव वादी ह्मणे हें न मानती रूपाचार्यादि साधुवर । कीं कृष्णविरहद्वारकागमनादि कथा समग्र । विरोधी म्हणोनी ॥ २९७ ॥ सिद्धान्ती ह्मणे ऐक वचन । 'तत्रैवांतरधीयत' या भागवतश्लोकपदें-करून । गोपीचें हृदयींच एकीभवन । संयोगीं वियोगलालन कृष्णविरहू ॥ २९८ ॥ द्वारकागमन तंव अंशाविर्भावलीला । उद्धव तंव शहाणा करावया पाठविला । यालागीं रूपाचार्यादिवचनाला । सम्मान नाहीं ॥ २९९ ॥ वेदपुराणें शोधितां । तापनीयभागवतादि विलोकितां । श्रीकृष्णाची स्वयंरूपता । आणि अंशरूपता सांपडे ॥ ३०० ॥ त्याहूनि पाहिली । गणावी व्रजस्थ केवली । आन अन्यत्र केवली । बोलिजे कीरू ॥ ३०१ ॥ सकळहि अवतार समान । अंशत्व तंव अघटमान । सत्वांश न होती रजस्तमाविण । आणि ब्रह्म तंव संपूर्ण निरंश ॥ ३०२ ॥ परी वेदोक्तसाधनें उद्धारु । येणें मर्यादित अन्यावतारु । आणि श्रीकृष्णीं सर्वदा उद्धारु । निःसाधनेंचि ॥ ३०३ ॥ जे आगम सकर्म ईश्वर कथिती । तेथ उपास्य सृष्टिकार्यार्थ विष्ण्वादिव्यक्ति । जे आगम निष्कर्मईश्वरप्राप्ति ह्मणती । त्याचा अभिप्राय गोकुळपति कृष्ण अजय निघे ॥३०४॥ म्हणाल एके ईश्वरीं हा आधारु । तरी उत्तर कीं मायाविनोदु । तेथ सात्वत शब्दु । प्रमाणहि आहे ॥ ३०५ ॥

" दुरवबोध इव तवायं विहारयोगो यदशरणोऽशरीर इदमनवेक्षितास्मत्समवाय आत्मनैवाविक्रियमाणेन सगुणमगुणः
सृजसि पासि हरसि ॥

स्कं. ६ ( अ. ९, श्लो. ३४॥२॥. श्रीभागवत )

श्रीधरी टीकाः– ननु केवलानुभवरूपत्वे मम सृष्ट्यादि कर्तृत्वं

कथं तत्राहुः दुरवबोध इव तवायं विहारयोगो यद्यस्मादशरणो निराश्रय इदं विश्वम् अनवेक्षितोऽस्माकं समवायो मेलनं सहाय्यं येन सः ॥ ३४,२. ॥

अथ तत्रभवान् किं देवदत्तवदिह गुणविसर्गपतितः पारतंत्र्येण स्वकृतकुशलाऽकुशलं फलमुपाददात्याहोस्विदात्माराम उपशमशीलः समंजसदर्शन उदास्त इति ह वाव न विदामः ॥ ३५ ॥

टीकाः— दुर्ज्ञेयांतरमाहुः अथ तत्रेति यथेह देवदत्तो गृहादि निर्माय तत्र स्वकृतशुभाशुभयोः फलमुपादत्ते एवं भवान् ब्रम्हस्वरूपो जीवरूपेण गुणविसर्गे पतितः सन्नुपाददाति यद्वा समंजसमप्रच्युतं दर्शनं चिच्छक्तिर्यस्य स भवानुदास्ते उदासीनः साक्षितया वर्तत इति ॥३५॥३॥

नहि विरोध उभयं भगवत्यपरिगणितगुणगण ईश्वरेऽनवगाह्यमाहात्म्ये ऽर्वाचीनविकल्पवितर्कविचारप्रमाणाभासकुतर्कशास्त्रकलिलांतःकरणाश्रयदुरवग्रहवादिनां विवादानवसरे उपरतसमस्तमायामये केवल एवाऽऽत्ममायामंतर्धाय कोऽन्वर्थो दुर्घट इव भवति स्वरूपद्वयाभावात् ॥३६॥४॥

टीकाः— तदेवं विरोधेन दुर्ज्ञेयत्वमुक्त्वा तत्परिहारेण ज्ञानप्रकारमाहुः । भगवतीति । अपरिमिता गुणगणा यस्य तस्मिन्नीश्वरे स्वतंत्रेऽनवगाह्यमतर्क्यं माहात्म्यं यस्य तस्मिन् । विकल्प एवंवेति वितर्कः किमत्र युक्तमिति विचार इत्थमेवेति तत्र प्रमाणाभासास्तदनुग्राहकाः कुतर्काश्चार्वाचीना वस्तुस्वरूपासंस्पर्शिनो ये विकल्पादयस्ते येषु शास्त्रेषु तैः कलिलं व्याकुलमंतःकरणमाश्रयो यस्य दुरवग्रहस्य तेन वादिनां विवादस्यानवसरेऽगोचरे । ननु श्रद्धामात्रमेतत् युक्तिरुच्यतां तत्राहुः । उपरतो मायामयः संसारो यस्मिंस्तस्मिन् केवलेऽप्यात्ममायां मध्ये निधाय कोन्वर्थः कर्तृत्वादिर्नसंभवति । यदि वस्तुतः कर्तृत्वादि भवेत्तर्हि विरोधः स्यान्नतु तदस्तीत्याहुः स्वरूपद्वयाभावात् ॥ ३६ ॥

समविषममतीनां मतमनुसरसि यथा रज्जुखंडः सर्पादिधियाम् ॥३७॥

टीकाः— तदेवं विरोधं परिहृत्य निश्चितं परमार्थमाहुः । स एव हि नानारूपेण प्रतीत वस्तुस्वरूपः सद्रूपः । सर्वेषां गुणानां विषयाणामाभासैः प्रकाशैरुपलक्षितः । ननु तैर्जीव एवोपलक्ष्यते । न । सर्वप्रत्यगात्मत्वात्सर्वजीवांतर्यामित्वात् । जडतादात्म्याध्यासेन जीवस्यापि जडप्रयत्वान्न तेन विना प्रकाश इति भावः । पर्यवशेषितो नेति नेतीत्यादि श्रुतिभिः ॥ ३८ ॥

भावार्थः– भगवंता तुझा क्रीडायोगु। लक्षितां आमुची प्रज्ञा पंगू। तूं जीवरूपें भोगिसी भोगु। कीं अवलंबिसी योगु उदासत्वें ॥ ३०६ ॥ हे दोन्ही तुझिया ठायीं। साचचिपणें विरुद्ध नाहीं। तूं सर्वेश्वर विश्वआई। म्हणोनियां ॥ ३०७ ॥ सर्पाकारें भय दाविता। आणि जलधाराकारें तृषा उपजविता। रज्जु जैसा भ्रांतिमंता। तूं भगवंता तेविं जीवा ॥ ॥ ३०८ ॥ स्वयें बोलिले देवराव। ईश्वराविषीं त्रिविध भाव। उदासीन आणि कर्मफलदातृत्व। भक्ततारकत्व तिसरें ॥ ३०९ ॥

" न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः
न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते ॥ ५–१४ ॥
तानहं द्विषतः क्रूरान् संसारेषु नराधमान्।
क्षिपाम्यजस्रमशुभानासुरीष्वेव योनिषु ॥ १६–१९ ॥
लभते च ततः कामान् मयैव विहितान्हितान् ॥ ७–२२ ॥
समोहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः।
ये भजंति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥ ९–२९ ॥
अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक्।
साधुरेव स मंतव्यः सम्यग्व्यवसितो हि सः " ॥ ९–३० ॥
( श्रीमद्भगवद्गीता, )

कर्तृत्व कर्म कर्मफलदान। या अवघिया माया वा जीवसंकल्पकारण। परमात्मा अलिप्त याहून। उदासपणें ॥ ३१० ॥ तया पापियांचीं कर्में। पाहोनि फळ दीजे म्यां पुरुषोत्तमें। आसुरीयोनीचेनि धर्में। युक्त करोनी ॥ ३११ ॥ प्राणी मजचिपासोनि पावती काम। मज जैसे जे भजती तैसा मी त्यां राम। मी मित्रशत्रुरहित सर्वसम। परी भजती त्यां सुगम हृदयांतु ॥ ३१२ ॥ महापापी मज भजतां साधु। एवं बोलिले करुणासिंधु। आपणचि जीव झालिया संबंधु। न राहे विरोधु कर्माकर्मीं ॥ ३१३ ॥ आणि येथ स्वप्नीं दिसे। हेंही गा बोलिजे तैसें। स्वप्नाभासु भोगितु असे। एक कर्मातें ॥ ३१४ ॥ तेथ स्वप्नींच्या त्रिमूर्ती। स्वप्नाभासा कर्मफळें देती। तेथ अवचितां एक व्यक्ति। अकर्मउद्धारु जरी करी ॥ ३१५ ॥ तरी काय स्वप्नीचे नाशें। स्वप्ना कर्मप्रधान म्हणती ते पिसे। प्रत्यक्ष अविद्या दिसे। म्हणोनियां ॥ ३१६ ॥ आघवेंचि स्वप्न

एकादी व्यक्ती । कां न तारी ही वृथा प्रश्नोक्ति । तारलियाही माया कवण आपत्ति । होय तेथ ॥ ३१७ ॥ न तारलिया स्वप्नचि दिसे । स्वप्नस्था प्रश्न स्वप्नीं काय असे । स्वप्नींचे तर्क विचार निश्चय आपैसे । स्वप्नद्रष्ट्यासी स्पर्शली ना ॥ ३१८ ॥ तैसें या मायेच्या ठायीं । जीव भोक्ता फलदाते सृष्टिकार्यार्थ विश्वादिही । कर्माविण त्राता यशोदांकशायी । गोविंद माझा ॥३१९॥ यांत श्रीगुरुचरणगत रहस्य एक । दृष्टानुमिति विश्व ग्राहक । मायेतें तंव प्रकाशक । शब्दु एक उमसतु ॥ ३२० ॥ म्हणोनि सकर्मागम मायांशीं । निष्कर्मागम श्रीकृष्णवेशीं । एवं समता होय शब्दासी । अविरोधेंचि ॥ ३२१ ॥ येणें मानें मुकुंदु । पूर्ण ऐसा प्रसिद्धु । व्रजविहारी निर्द्वंद्वु । सेव्य तोचि ॥ ३२२ ॥ व्रजस्थाहूनि पांडवपाळणा । तातें दिधला वरिष्ठपणा । तो बोधमात्रदृष्टि जाणा । आणि ' कुमारीसाठीं गोकुळीं गेला ' या तातवचना प्रेमदृष्टी अवलोकिजे ॥ ३२३ ॥ म्हणोनि विरोध नाहीं । शहामुनी तीन कृष्ण म्हणती तेथ आवेश सर्वही । यालागीं त्यागिले तेंही । मानभावमत ॥ ३२४ ॥ येथ रहस्य मात्र बोलिलें । विस्तारें अवतारतत्व पाहिजे कथिलें । परी तें जाईल निरूपिलें । सुरतरूमार्जीं ॥ ३२५ ॥ तो श्रीकृष्णत्वें द्वापारीं आम्हां पति । ये युगीं माता-पिता आळंदिपति । हृदयस्थानीं सद्गुरु मायबाप पति । श्रीज्ञानेश्वरमूर्ति दीनबंधू ॥ ३२६ ॥ तया वल्लभाचे चरण । आत्मीय कालत्रयीं धरून । श्रीज्ञानेश्वर हेंचि स्मरण । द्यावें म्हणोन प्रसाद मागें ॥ ३२७ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे, नानाछंदबद्धे, प्रेमनिकुंजे, ' सेव्यनिर्णयो ' नाम, द्वितीया वल्ली.

॥ श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु. ॥

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली समर्थ. ॥

# तृतीया वल्ली.

जय, जय, सद्गुरो करुणार्णवा। जय, जय, सद्गुरो देवाधिदेवा। जय, जय, सद्गुरो भावाभावा। वेगळा तूं ॥ १ ॥ जय, जय, सद्गुरो निर्गुणा। जय, जय, सद्गुरो समाना। घालोनियां प्रेमजीवना। पुढें वल्ली वाढवीं ॥२॥ मागां सेव्यनिर्णयो ऐकुनी। श्रोते उत्सुक जाहले मनीं। कीं सेवकपणलक्षणीं। सादर श्रवणीं ऐकावें ॥ ३ ॥ तरी तिया वैरागरा। शोभादान गर्भ न धरोनी अंतरा। पुजूं आसनदेव्हारा। वचनसुमनीं ॥४॥ सेवक असावा अतिनिर्मळ। कीं आंत बाहेरीं गंगाजळ। सेवक असावा प्रतापशीळ। सूर्य जैसा ॥ ५ ॥ सेवक असावा प्रेमळ। सेवक असावा चतुर केवळ। सेवक असावा कुशळ। स्वामिकार्या ॥ ६ ॥ जो स्वामिभाग्यें भगवंत। जो स्वामिकार्य करावया निश्चयवंत। जयाची प्रज्ञा महंत। होऊनि बैसे ॥ ७ ॥ जयाच्या क्रियेचें फळ। स्वामीचि भोगी सकळ। परी भाग्यपणाचें शिरोळे[1]। जयास लाहे ॥ ८ ॥ स्वामीची आज्ञा परमप्रमाण। सर्वदा गर्वरहित दीन। परी न करीच याचन। विप्रवीजना ॥ ९ ॥ स्वामी सद्गुरु नारायण। सेवक पालनशील विदितगुण। तरीच स्वामीसेवकपण। अक्षय चाले ॥ १० ॥ एरवीं मोलाचिया साठीं। धावती स्वामीचिया पाठीं। ते द्रव्यसेवकता गोमटी। उपयोगा न ये ॥ ११ ॥ कोणाचें सेवकपण। जितां स्वामीहित नेणती आपण। मग मेलिया विकारवश होवोन। देती प्राण जनलाजे ॥ १२ ॥ एकान्ती परसंगसंपत्ति। भोगोनि मेलिया निजपति। जन लाजे जावया सती। निवे जैसी ॥ १३ ॥ असो हें आणिकाचें मत। सेवक वर्णूं प्रस्तुत। जयाचिया सेवे भगवंत। स्वामिपणा घेवों लाजे ॥ १४ ॥ कीं सजहूनि या जगीं कीर्ति। सेवकास देवो पाहती श्रुतिस्मृति। हेचि ईर्ष्या धरोनि चित्तीं। चाले श्रीपति मागेंपुढें ॥ १५ ॥ " जे अभिमान वाहती आंगीं। आम्ही हरीचे भूषावयालागीं "। या तातवचनचौरंगीं। बैसला

---

१ शिरोमणित्व.

एकादी व्यक्ती । कां न तारी ही वृथा प्रश्नोक्ति । तारलियाही माया कवण आपत्ति । होय तेथ ।। ३१७ ।। न तारलिया स्वप्नचि दिसे । स्वप्नस्था प्रश्न स्वप्नीं काय असे । स्वप्नींचे तर्क विचार निश्चय आपैसे । स्वप्नद्रष्ट्यासी स्पर्शली ना ।। ३१८ ।। तैसें या मायेच्या ठायीं । जीव भोक्ता फलदाते सृष्टिकार्यार्थ विश्वादिही । कर्माविण त्राता यशोदांकशायी । गोविंद माझा ।।३१९।। यांत श्रीगुरुचरणगत रहस्य एक । दृष्टानुमिति विश्व ग्राहक । मायेतें तंव प्रकाशक । शब्दु एक उमसतु ।। ३२० ।। म्हणोनि सकर्मागम मायांशीं । निष्कर्मागम श्रीकृष्णवेशीं । एवं समता होय शब्दासी । अविरोधेंचि ।। ३२१ ।। येणें मानें मुकुंदु । पूर्ण ऐसा प्रसिद्धु । व्रजविहारी निर्द्वंद्वु । सेव्य तोचि ।। ३२२ ।। व्रजस्थाहूनि पांडवपाळणा । तातें दिधला वरिष्ठपणा । तो बोधमात्रदृष्टि जाणा । आणि ' कुमारीसाठीं गोकुळीं गेला ' या तातवचना प्रेमदृष्टी अवलोकिजे ।। ३२३ ।। ह्मणोनि विरोध नाहीं । शहामुनी तीन कृष्ण ह्मणती तेथ आवेश सर्वही । यालागीं त्यागिले तेंही । मानभावमत ।। ३२४ ।। येथ रहस्य मात्र बोलिलें । विस्तारें अवतारतत्व पाहिजे कथिलें । परी तें जाईल निरूपिलें । सुरतरूमार्जीं ।। ३२५ ।। तो श्रीकृष्णत्वें द्वापारीं आम्हां पति । ये युगीं माता-पिता आळंदिपति । हृदयस्थानीं सद्गुरु मायबाप पति । श्रीज्ञानेश्वरमूर्ति दीनबंधू ।। ३२६ ।। तया वल्लभाचे चरण । आत्मीय कालत्रयीं धरून । श्रीज्ञानेश्वर हेंचि स्मरण । द्यावें ह्मणोन प्रसाद मागें ।। ३२७ ।।

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे, नानाछंदबद्धे, प्रेमनिकुंजे, ' सेव्यनिर्णयो ' नाम, द्वितीया वल्ली.

।। श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु. ।।

॥ श्रीज्ञानेश्वरमाऊली समर्थ. ॥

# तृतीया वल्ली.

जय, जय, सद्गुरो करुणार्णवा । जय, जय, सद्गुरो देवाधिदेवा । जय, जय, सद्गुरो भावाभावा । वेगळा तूं ॥ १ ॥ जय, जय, सद्गुरो निर्गुणा । जय, जय, सद्गुरो समाना । घालोनियां प्रेमजीवना । पुढें वल्ली वाढवीं ॥२॥ मागां सेव्यनिर्णयो ऐकुनी । श्रोते उत्सुक जाहले मनीं । कीं सेवकपण-लक्षणीं । सादर श्रवणीं ऐकावें ॥ ३ ॥ तरी तिया वैराग्य । शोभादान गर्भ न धरोनी अंतरा । पुजूं आसनदेव्हारा । वचनसुमनीं ॥४॥ सेवक असावा अतिनिर्मळ । कीं आंत बाहेरीं गंगाजळ । सेवक असावा प्रतापशीळ । सूर्य जैसा ॥ ५ ॥ सेवक असावा प्रेमळ । सेवक असावा चतुर केवळ । सेवक असावा कुशळ । स्वामिकार्या ॥ ६ ॥ जो स्वामिभाग्यें भगवंत । जो स्वामिकार्य करावया निश्चयवंत । जयाची प्रज्ञा महंत । होऊनि बैसे ॥ ७ ॥ जयाच्या क्रियेचें फळ । स्वामीचि भोगी सकळ । परी भाग्यपणाचें शिरोळें[1] । जयास लाहे ॥ ८ ॥ स्वामीची आज्ञा परमप्रमाण । सर्वदा गर्वरहित दीन । परी न करीच याचन । विषयीजना ॥ ९ ॥ स्वामी सद्गुरु नारायण । सेवक पालनशील विदितगुण । तरीच स्वामीसेवकपण । अक्षय चाले ॥ १० ॥ एरवीं मोलाचिया साठीं । धावती स्वामीचिया पाठीं । ते द्रव्यसेवकता गोमटी । उपयोगा न ये ॥ ११ ॥ कोणाचें सेवकपण । जितां स्वामीहित नेणती आपण । मग मेलिया विकारवश होवोन । देती प्राण जनलाजे ॥ १२ ॥ एकान्ती परसंगसंपत्ति । भोगोनि मेलिया निजपति । जन लाजे जावया सती । निवे जैसी ॥ १३ ॥ असो हें आणिकाचें मत । सेवक वर्णूं प्रस्तुत । जयाचिया सेवे भगवंत । स्वामिपणा घेवों लाजे ॥ १४ ॥ कीं मजहूनि या जगीं कीर्ति । सेवकास देवों पाहती श्रुतिस्मृति । हेचि ईर्ष्या धरोनि चित्तीं । चाले श्रीपति मागेंपुढें ॥ १५ ॥ " जे अभिमान वाहती आंगीं । आम्ही हरीचे भूषवयालागीं " । या तातवचनचौरंगीं । बैसला

---

१ शिरोमणित्व.

जो ॥ १६ ॥ विषयाचें करितां ध्यान । संग होय दारुण । आणि संगा-पासून । उपजे कामु ॥१७॥ कामात्क्रोध क्रोधें मोह । मोहें हारपे स्मृति-समूह । स्मृतिनाशीं प्रज्ञाडोह । आटे सकळ ॥ १८ ॥ प्रज्ञानाशें विनाशन । या अवघियांचें कारण । निश्चयें विषयचिंतन । तिया चिंतना कारण अनात्माहंता ॥ १९ ॥ ती मारोनि अनात्माहंता । ज्यानें साधिली दीनता । तेणें सगोत्र रिपूच्या माथां । घातले घाय ॥ २० ॥ लीनता घेवोनि अंतरीं । होवोनि साखरेची सुरी । प्रवेशोनि जिव्हारीं ॥ मारिले वैरी कामादि ॥ २१ ॥ एक दास्य करावयासाठीं । लटिकी देहबुद्धि सुवोनि पोटीं । जहालें भगवच्चरणपेटी । हृदय जयाचें ॥२२॥ देहाचे माथां वर्णाश्रम । वर्णाश्रमा विहित कर्म । विहित कर्म सांगे निगम । निगम आज्ञा स्वामीची ॥ २३ ॥ सेवका आज्ञा स्वामीची प्रमाण । तेथ कामा न ये हुंचूंपण । याचिलागीं वेदवचन । निष्कारण पाळी जो ॥ २४ ॥ तया सेवकत्वाचिया गुणीं । ऐसेंही वाहे अंतःकरणीं । कीं काळ खाये क्षणोक्षणीं । शरीरा इया ॥ २५ ॥ माझा गेलिया प्राण । मग स्वामि-आज्ञा पाळील कवण । येणें भयें शिकवी जन । वेदाज्ञा पाळोनी ॥२६॥ जयाचा सकामकर्मी संन्यास । निष्कामकर्मी अतिहव्यास । आपणा ऐसें स्वामीस । सेवक द्यावें म्हणूनी ॥ २७ ॥ स्वामी आपुला बळवंत । तया जिंकूं न शके कोणी हें यथार्थ । परी भयें अंतरीं शत्रुवत् । न होवावें कोणी ॥ २८ ॥ स्वामी आपुला अति उदास । हातातळींचे जीव निःशेष । जाहाले दारा पुत्र दास । तरी तिकडे पाहेना ॥ २९ ॥ परी आपुलिया सद्गुणीं । सेवक हाटभरोनी । विना मोलें स्वामिचरणीं । अर्पावे ते ॥३०॥ एवं सेवकाची देखोनि सेवा । ऐसें वाटों लागे देवा । कीं माझी नित्य-तृप्ति जीवा । जिकणें शक्य ॥ ३१ ॥ सेवकाचिया मोहेंकरून । स्वामी विसरे स्वामीपण । तें हलु हलु आपण । सेवकआंगीं जडों पाहे ॥३२॥ मग अत्यंत भेदाचा ठावो पुसे । स्वामीच्छेनें संबंध उल्हसे । जो निरू-पिला असे । अगस्तिसंहितेमाजीं शिवें ॥ ३३ ॥

“ देहत्रयविनाशं च कृत्वादौ गुरुवक्त्रतः ।
ततः संबंधयोग्यत्वं प्राप्नोति मुनिसत्तम ” ॥

( अध्याय शेवटला. )

एवं झालिया साधनभक्ति । ज्ञान होय सद्गुरुउक्ती । तैं देहत्रयाची आसक्ति । सुटोनि जाय ॥ ३४ ॥ जैसें स्वप्नींचें घरदार । जागृतीं येतां आटे समग्र । तैसें सद्गुरुमुखें श्रवण सुंदर । करतां देहत्रयविनाशु ॥३५॥ देहत्रयविनाश झालिया । संबंधयोग्यता ये भक्तराया । साधनभक्तिनि तया । फलदात्री होय ॥ ३६ ॥ श्रीभागवतसंदर्भी भगवत्संदर्भांत । जीवगोस्वामी बोलिले मात । कीं भगवत्प्रभावें उमटत । भक्ति ज्ञानोत्तराही ।३७। "ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा मद्भक्तिं लभते परां" ही शाब्दी प्रमा । होवावयाची पुरुषोत्तमा । बोलणें घडलें ॥ ३८ ॥ म्हणवुनी आहार्यद्वैतें । संबंध जोडिजे भक्तें । आहार्यद्वैत अद्वैतातें । विरोध नाणी ॥ ३९ ॥ भिक्षुआदि द्वैतमतीं । जीव जड हे म्हणविली ! तरी तेथ दास्य निश्चितीं घडे कैसें ॥४०॥ जीवासी आनंद कवणेपरी । प्रेम उपजेल कवणेपरी । मध्वादि द्वैतमतीं निर्धारीं । जरी जीव चेतनू ॥ ४१ तरी तो अत्यंत भिन्न । परी येथ संबंधचि अप्रमाण । दास्याविण संबंध आन । घडेलाचि ना ॥ ४२ ॥ दास ऐसें बोलतां । कीं मी स्वामीचा पिता । तरी तो होईल सर्वथा । अधर्मचि ॥ ४३ ॥ तैसें कौसल्यादशरथ यशोदानंद । यांचे व्यर्थ होतील संबंध । जाणें लागेल विशद । नरकीं ययां ॥ ४४ ॥ अथवा दास्यसंबंधाहून । इतर संबंध आरोपित होतील संपूर्ण । तेणें भक्तीसी येईल मिथ्यापण । किंवा होईल नारायण संसारी ॥ ४५ ॥ जो जीव ईश्वरपुत्र जाहला । तो इतरदासाहूनि श्रेष्ठ बोलिला । तयाचा पक्ष देवें धरिला । होईल ऐसें ॥ ४६ ॥ यद्यपि कलींत संकीर्तनें तरण । सुलभ मार्ग कथिला म्हणोन । जडापेक्षें नारायण । सकलजीवपक्षधरिता ॥ ४७ ॥ तैसा जीवाजीवां माझारीं । भक्तपक्ष देव धरी । परी भक्ताभक्तांमाझारीं । पक्षपातु नोहे ॥ ४८ ॥ तथापि स्वपुत्रादिकेंकरून । पक्ष धरील नारायण । तरी स्वभोगार्थ म्हणोन । दयावृत्ति क्षीण होईल कीं ॥ ४९ ॥ अत्यंत भिन्न जीवाचा । पुण्यें पुत्रादिसंबंध देवाचा । होईल तरी तो साचा । कर्मजन्य आणि दृढ ॥ ५० ॥ कर्मजन्य म्हणोनि नाशेल । दृढ म्हणोनि देव संसारीं फसेल । दयावृत्तिही न दिसेल । पक्षपातें ।५१॥ यद्यपि लीला होय अणुभोगें । तेथही दयाविरोध प्रसंगे । तथापि आहार्यद्वैतें अनध्यस्तरंगें । लीला जे होय ॥ ५२ ॥ ते प्रयोजनरहित म्हणोन । दयाविरोधी नोहेचि जाण ।

असो आतां रामानुजादि विशिष्टाद्वैतमतीं पूर्ण । अंश जीवू ॥ ५३ ॥ तेथ संबंध जरी घडे । तरी चिदचिच्छरीर ईश्वर जोडे । यालागीं प्रकृति-अपेक्षेंही न घडे । जीवपक्षु परमेश्वरीं ॥ ५४ ॥ आणि सर्वदा अंश जीव । ईश्वर सर्वशक्तीचा ठाव । तरी जीवासी दुःख घडवीं प्रकृतिस्वभाव । हें लांछन परमेश्वरातें ॥ ५५ ॥ स्वभक्ति केली नाहीं ह्मणोन । स्वपुत्रासी करी यमाधीन । तरी ते दया नोहेचि जाण । स्वभोगार्थ दंडण बोलिजे ॥५६॥ जीवासी द्यावया तयाचें सुख । दंड करितां दयाचि होईल देख । परी ईश्वरासारिखें जीवासी सुख । अंश म्हणोनि विशिष्टाद्वैतीं नसे ॥ ५७ ॥ म्हणोनि अभक्तासी दंड करितां । तरी निर्दयता आणि विषमता । दुर्निवार्य होईल सर्वथा । ईश्वराविषयीं ॥ ५८ ॥ अद्वैतीं जीवाचें सुख । ईश्वररूपचि असे देख । तयाच्याचि ज्ञानें सम्यक । प्राप्त तया ॥ ५९ ॥ यालागीं ज्याची तया सुधारणा । करावया नारायणा । दंड देणेंहि जाणा । दयाचि होय ॥ ६० ॥ कां लेकुराचिया सुखा । मायेनें दंड केलिया देखा । तरी दयाप्रतिबंधका । न म्हणावें त्या ॥ ६१ ॥ तैसें न्याय आणि दया । अद्वैतीं विरोध नाहीं यया । आणिक अव्यापकत्वादि देवराया । दोष विशिष्टाद्वैतीं ॥ ६२ ॥ हेचि वल्लभमतीं शुद्धाद्वैतीं । निश्चयें करोनि दोष येती । जरी वल्लभ म्हणती । तत्वदीपनिबंधीं ॥ ६३ ॥ कीं "आत्मसृष्टेन नैर्घृण्यं वैषम्यंचापि विद्यते" । तरी येथ ईश्वराची लीला होते । आणि दुःख होय जीवातें । वाऊगेंचि ॥ ६४ ॥ एकाचें मरण एकाचा खेळ । येणें उन्मत्त होय घननीळ । म्हणाल जीवहीं ईश्वरचि केवळ । तरी आनंदार्थ भक्ति कां कीजे ॥ ६५ ॥ आपुली सृष्टि असली जरी । समसत्तेत खेळ करतां न ये तरी । मृत्तिकागजचि निर्धारीं । करणें मोडणें होईल सम ॥ ६६ ॥ साक्षात् गज उगाचि मोडतां । तरी युद्धचि होईल सर्वथा । अथवा आपुलें अंग तोडितां । आपणासचि महादुःख ॥ ६७ ॥ तैसा समसत्ताक ईश्वरजीवभेद । तरी सदा होईल तयाचें युद्ध । आणि समसत्ताक जरी भेदाभेद । तरी अवयवच्छेददुःख देवा ॥ ६८ ॥ ईश्वर सर्वशक्ति ह्मणोन । दुःख नाहीं होणार तयाकारण । तरी इतर जीवासी गहन । दुःखचि होय ॥ ६९ ॥ यद्यपि वल्लभमतीं जीवेश्वरअभेद । तरी युक्त्या निरखितां सांपडे भेदाभेद । ह्मणवुनि तेथही संबंध । घडवितां

उक्त दोष येती ॥ ७० ॥ येथ बोलतील ओठीं । कीं दुःख सोसावें देवासाठीं । तरीच प्रेम शेवटीं । म्हणवल्या जाय ॥ ७१ ॥ देवप्रेम करूं कीं न करूं । आपणासी हा न लगे विचारु । तरी आपण परमेश्वरआज्ञा साचारु । सोसावें दुःख ॥ ७२ ॥ वाहवा हें वल्लभवचन । येथ कामी प्रेमी होतील समान । एकादा जार म्हणे आपण । रांडेसाठीं सोसिन नरक ॥ ७३ ॥ अनेक कुयोनि भोगुनी । राजपत्नि अहल्या मिळाली इंद्रलक्षणालागुनी । ऐसें योगवासिष्ठीं वसिष्ठमुनि । कृत्रिमाहल्योपाख्यानीं । प्रतिपादिती ॥ ७४ ॥ म्हणोनि वायकोसाठीं जन्मजन्म । धरोनि ठेवितांचि काम । तरी या अनादि संसारीं परम । मिळेलचि कधीं ते ॥ ७५ ॥ तैसाचि प्रेम देवाचा तत्वतां । तरी तो कां ठेवावा वृथा । विषय आणि भगवंता । निश्चयसाम्यता जाहली ॥ ७६ ॥ आणिकही एक कोटी । कीं दुःखसहनशक्ति नाहीं जीवाच्या पोटीं । ह्मणवोनिच शरण्यता गोमटी । सुखार्थ पाहे ॥ ७७ ॥ यद्यपि दुःखसहनशक्ति । पूर्वी दाखविली आहे भक्ति । तरी तो लाभ अद्वैतीं । ज्ञानेंचि घडे ॥ ७८ ॥ दुःख विषमसत्ताक ह्मणोन । भगवंतासाठीं सोशिलां ये संपूर्ण । परमात्माहि दुःख न दे आपण । केवल दयालु ह्मणोनि वरिष्ठ ॥ ७९ ॥ जीव दुःख सोसेल । आणि परमात्मा दुःख देईल । तरी तो जीवचि वरिष्ठ होईल । परमात्मा न होय ॥ ८० ॥ जेविं दुष्ट परांचिया हाता । सांपडलिया पतिव्रता । तरी तियेचीच कीर्ति तत्वतां । पतीस कोणी न पुसे ॥ ८१ ॥ तैसा स्वभक्तिविण जीवाकारण । अंशीं असतांही नारायण । दुःख देईल तरी तयाचे गुण । मुक्तीहुनि श्रेष्ठ न होती ॥ ८२ ॥

" आत्मारामाश्च मुनयो निर्ग्रंथा अप्युरुक्रमे ।
कुर्वंत्यहैतुकीं भक्तिमित्थंभूतगुणो हरिः ॥ "

ऐसें श्रीशुकाचें वचन । तयाचा भावार्थ कीं ज्ञालिया ज्ञान । वासना सुटती संपूर्ण । तरी निष्कामभक्ति करविती गुण हरीचे ॥ ८३ ॥ जे दास्यादि भाव । ज्ञानापूर्वी सकाम सर्व । तेचि निष्काम होती स्वयमेव । ज्ञानोत्तर ॥ ८४ ॥ तरी मुक्तीहून श्रेष्ठ हरीचे गुण । अद्वैतीं आहार्यद्वैतें भजन । केलिया मधुराद्वैताश्रयान । कळती ते निर्वाण भागवत सांगे ॥ ८५ ॥

" नैवात्मनः प्रभुरयं निजलाभपूर्णो मानं जनादविदुषः करुणो वृणीते ।
यद्यज्जनो भगवते विदधीत मानं तच्चात्मने प्रतिमुखस्य यथा मुखश्रीः " ॥
( भागवत, स्कं० ७, अ ९, श्लो० १०. )

अज्ञजीवापासोनी । पूजा न इच्छी मोक्षदानी । जो नित्य तृप्त सर्वांहूनि । एक आणि अद्वितीय ॥ ८६ ॥ जो सर्वदा पूर्ण जगजेठी । तो सेवा इच्छील कासयासाठीं । परी दयालु ह्मणोनि शेवटीं । अनुमोदन दे सेवेशीं ॥ ८७ ॥ थोडी परीक्षा पाहावया जरी । सेवा इच्छील पूतनारी । तथापि जीवाकडोनि क्षणभरी । सेवा सर्वथा घडेना ॥ ८८ ॥ पन्नास सहस्र योजनें शरीर । जयाचा पलंग कश्यपकुमर । तयासी चंदन लावावया साचार । कोण निर्धार करील कैसा ॥ ८९ ॥ गरुडासी धुवोनि चारील अन्न । ऐसें कोण निर्मील पक्वान्न । कीं वैकुंठीं चंदनसडासंमार्जन । कोण संपूर्ण घालील हो ॥ ९० ॥ क्षीराब्धीहूनि श्वेतवर्ण । ऐसें रमेचें लुगडें धुईल कवण । जयाचे शशीसूर्य दोन्ही नयन । कोण अंजन घालील ॥ ९१ ॥ जो चराचराचा करी ग्रास । कोण नैवेद्य दावील त्यास । सेवा करूं ह्मणतां विशेष । कोण जाणता लाजेना ॥ ९२ ॥ जो नित्यतृप्त जगजेठी । तो भक्तास्तव आला वैकुंठीं । जयविजयादिकांची सेवा पोटीं । दासासाठीं अंगिकारी ॥ ९३ ॥ जो यज्ञांत नेघे अवदान । जो गोपाळशिदोऱ्या मिटक्या देऊन । प्रेमें करीतसे भक्षण । नवल विंदान देवाचें ॥ ९४ ॥ म्हणवुनी स्वामिसेवाऋणी । हे स्तुतिमात्रचि बोलणी ॥ परी करुणानिधान चक्रपाणि । तो अनुमोदन दे भक्तासी ॥ ९५ ॥ मियां अनुमोदन न देतां । तरी सेवाचि अपराध होईल तत्वतां । तेणें जाणें लागे यमपथा । माझिया भक्ता प्रेमळा ॥ ९६ ॥ ईश्वरानुमोदनाविण । जें करणें निषिद्ध पूर्ण । म्हणूनि सेवेसी अनुमोदन । देतो आपण परमात्मा ॥ ९७ ॥ गरुडासारिखें सुंदर आसन । तयासी संध्यापात्र देऊन । काय पूजेचें प्रमाण । अधिक होय ॥ ९८ ॥ कौस्तुभभूषण जयाचे कंठीं । तयासी वाहणें कांचोटी । चंद्रसूर्यनयन जगजेठी । अलंकार घालणें काय तया ॥ ९९ ॥ जया क्षिराब्धि माजी शयन । चरणीं वाहे गंगाजीवन । तया पंचामृतादि स्नान । महाछल जाण सेवाभिमानें ॥ १०० ॥ रायावरी केर उधळतां । दंडयोग्य अपराध सर्वथा । तैसी

जीवाची सेवा भगवंता । न अनुमोदितां अपराधू ॥ १०१ ॥ इतकेंही असोनी पाहिजे भोग । तरी सत्यसंकल्प गोपिकारंग । तो भिकारिया जीवासी चांग । भीक कासया मागेल ॥ १०२ ॥ परंतु तैसें सर्वथा नाहीं । जो करुणावल्लभ शेषशायी । तो अनुमोदन देतो लवलाहीं । भक्ताचिसाठीं ॥ १०३ ॥ कोठें माला वैजयंती । कोठें गुंजांचे हार मिरविती । कोठें अमृतपात्र देव वाढिती । गौळिया लोणी मागणें कोठें ॥ १०४॥ इंद्रादिकांच्या मुकुटांचे तुकडे । नमन करितां पडती द्वारापुढें । तयासी मयूरपिच्छभूषण रोकडें । कोण नवल न मानील ॥ १०५ ॥

" म्हणोनी मद्याजी जे जाहले । ते माझिया सायुज्या आले । जिहीं उपचारमिषें दिधलें । आपणपें मज ॥ १ ॥ अर्जुना माझेठायीं । आपणपेंविण सौरस नाहीं । मी उपचारें कवणाही । नाकळें गा ॥ २ ॥ एथ जाणीव करी तोचि नेणें । आथिलेपण मिरवी तेंचि उणें । आम्हीं जाहलों ऐसें जो म्हणे । तो कांहींचि नव्हे ॥ ३ ॥ अथवा यज्ञदाना किरीटी । कां तपें हन जे हुटहुटी । ते तृणा एकासाठीं । न सरे येथ ॥ ४ ॥ पाहें पां जाणिवेचेनि बळें । कोणी वेदापासूनि असे आगळें । कीं शेषाहूनि तोंडाळें । बोलकें आथी ॥ ५ ॥ तोही आंथुरणातळवटीं दडे । येरु नेति नेति म्हणोनि बहुडे । एथ सनकादिक वेडे । पिसे जाहले ॥ ६ ॥ करितां तापसांची कडसणी । कवण जवळां ठेविजे शूळपाणि । तोहि अभिमान सांडोनि पायवणी । माथां वाहे ॥ ७ ॥ नातरी आथिलेपणें सरिसी । कवणी आहे लक्ष्मी ऐसी । श्रियेसारखिया दासी । घरीं जियेचे ॥ ८ ॥ तिया खेळतां करिती घरकुलीं । तयां नामें अमरपुरें जरी ठेविलीं । तरी न होती काय बाहुलीं । इंद्रादिक तयांचीं ॥ ९ ॥ तिया नावडोनि जेव्हां मोडती । तेव्हां महेंद्राचे रंक होती । तिया जिया झाडाकडे पाहती ते कल्पवृक्ष ॥ १० ॥ ऐसिया जियेचिया जवळिका । सामर्थ्ये घरींचिया पाइका । ते लक्ष्मी मुख्यनायिका । न मनेचि येथ ॥ ११ मग सर्वस्वें करूनि सेवा । अभिमान सांडूनि पांडवा । ते पाय धुवावयाचिया दैवा । पात्र जाहली ॥ १२ ॥ म्हणोनि थोरपण पऱ्हां सांडिजे । एथ व्युत्पत्ति आघवी विसरिजे । जैं जगा धाकुटें होइजे । तैं जवळीक माझी ॥ १३ ॥ अगा सहस्रकिरणाचिये दिठी । पुढां चंद्रही लोपे किरीटी । तेथ खद्योत

कां हुटहुटी । आपुलेनी तेजें ।। १४ ।। तैसें लक्ष्मीयेचें थोरपण न सरे । जेथ शंभूचेंहि तप न पुरे । तेथ येर प्राकृत हेंदरें । केवि जाणों लाहे ।। १५ ।। यालागीं शरीरसांडोवा कीजे । सकल गुणांचें लोण उतरिजे । संपत्तिमद सांडिजे । कुर्वंडी करोनी ।। १६ ।। "

ज्ञानेश्वरी, अध्याय ९, श्लोक २५.

एवं हृदयाचार्यवचनें । सेवा सांगती निरभिमानें । एरवीं तेथ प्रमाणें । सामर्थ्य कायी ।। १०६ ।। परी नित्यतृप्त देव । म्हणोनि सेवा न करील जीव । घालील वेदान्ताचा आव । तरी आसुरस्वभाव गणावा तो ।। १०७ ।। रायाचे घरीं पैका थोर । म्हणोनि न दे नेमिला कर । तरी प्रजा नव्हे तो चोर । दंडावा साचार सर्वभावें ।। १०८ ।। आपण यथेष्ट विषय भोगी । नित्यतृप्त मानोनि देवालागीं । जो सेवाचोर होय श्रीरंगीं । तया असिपत्रचोरंगीं यम दंडी ।। १०९ ।। अल्पही देवासी वहावें । परी जीवितान्त श्रम करावे । कोटीकल्प श्रम करोनियां आघवें । अल्पचि होय ईश्वरा ।। ११० ।। परंतु श्रमहि केलियाविण । केवळ प्रेमें फळ फूल पान । उदकही वाहतां घे नारायण । हें करुणानिधान स्वयें वदती ।। १११ ।।

" पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः " ।।

( अ० ९, श्लो० २६ गीता. )

आपण बैसे पलंगीं । देवासी बैसवी शीलाचौरंगीं । आपण पुरणपोळी भक्षी घृतांगी । देवासी वाहे उदक जरी ।। ११२ ।। तरी ती सेवा नव्हे थट्टा । उगा दंभ कां दावितो चोरटा । परी प्रेम असलिया अंतरीं मोठा । मग वाटा अव्हाटा हरि न पाहे ।। ११३ ।। भक्तमालेंत कथा ऐसी । कीं विदुरगृहीं हृषिकेशी । केळें उकलोनि तयासी । विदुरपत्नि देतसे ।। ११४ ।। जेऊं घालावें देवा लौकरी । म्हणवुनी सालटेंचि घाली करीं । आणि आपण बैसावें देवाबरोबरी । म्हणोनि केळेंचि भक्षी ।।११५।। परी तेंहि आनंदें देवाधिदेव । सेवितां प्रफुल्लितस्वभाव । विदुर पातला तंव । अकस्मातचि ।। ११६ ।। तयानें स्त्रियेचा प्रमाद दाविला । तेव्हांचि तियेसी उमज पडला । मग क्षमा मागोनि स्तविला । देवराणा ।।११७।।

परी नाहीं केलें मंडण । कीं नित्यतृप्त नारायण । तयासी सालें दिधलिया जाण । नैवेद्यचि घडे म्हणोनी ॥ ११८ ॥ चुकीचाकी नसे प्रेमीं । देह स्मरल्या दास्यधर्मीं । वर्तावें मनोवाचाकर्मीं । सेवार्थ झटुनी ॥ ११९ ॥ हृदयाचार्य पुढती । द्वापरींच्या स्वोक्तमंत्राचें उपनिषत् करिती । तेंही ऐकावें अधिकारीं सज्जनीं । जे भक्तिपंथीं ब्राह्मण जाहले ॥ १२० ॥

"मग निःसीमभावउल्हासें । मज अर्पावयाचेनि मिसें । फळ एक आवडे तैसें । भलतयाचें हो ॥ १ ॥ भक्त माझियाकडे दावी । आणि मी दोन्ही हात वोडवीं । मग देंठ न फेडितां सेवीं । आदरेंसीं ॥ २ ॥ पैं गा भक्तीचेनी नांवें । फूल एक मज द्यावें । तें लेखें तरी म्यां तुरंबावें । परी मुखींचि घालीं ॥ ३ ॥ हें असो कायसीं फुलें । पानचि एक आवडतें जाहलें । तें साजुकही न हो सुकलें । भलतैसें ॥४॥ परी सर्वभावें भरलें देखें । आणि भुकेला अमृतें तोखे । तसें पत्रचि परी तेणें सुखें । आरोगूं लागे ॥ ५ ॥ अथवा ऐसेंहि एक घडे । जे पालाहि परी न जोडे । तरी उदकाचें सांकडें । नव्हेल कीं ॥ ६ ॥ तें भलतेथ निमोलें । न जोडतां आहे जोडलें । तेंचि सर्वस्वकरूनि अर्पिलें । जेणें मज ॥ ७ ॥ तेणें वैकुंठापासोनि विशाळें । मजलागीं केलीं राउळें । कौस्तुभाहोनि निर्मळें । लेणीं दिधलीं ॥ ८ ॥ दुधाचीं सेजारें । क्षिराब्धि ऐसीं मनोहरें । मजलागीं अपारें । सृजिलीं तेणें ॥ ९ ॥ कर्पूर चंदन अगरू । ऐसेया सुगंधाचा महामेरू । मज हातिवा लाविला दिनकरू । दीपमाळे ॥ १० ॥ गरुडासारिखीं वाहनें । मज सुरतरूंचीं उद्यानें । कामधेनूंची गोधनें । अर्पिलीं तेणें ॥ ११ ॥ मज अमृताहूनि सुरसें बोनीं वोगरलीं बहुवसें । ऐसा भक्ताचेनि उदकलेशें । परितोषें गा ॥ १२ ॥ हें सांगावें काय किरीटी । तुवांचि देखिलें आपुलिया दिठी । मी सुदामयाचिया सोडीं गाठी । पव्हयासाठीं ॥ १३ ॥ पैं भक्ति एकी मी जाणें । तेथ सानें थोर न म्हणे । आम्ही भावाचे पाहुणे । भलतेया ॥ १४ ॥ येर पत्र पुष्प फळ । हें भजावया मिस केवळ । वांचूनि आमुचिया लागीं निष्कळ । भक्तितत्व ॥ १५ ॥ म्हणोनि अर्जुना अवधारीं । तूं बुद्धि एकी सोपारी करीं । तरी सहजें आपुलिया मनोमंदिरीं । न विसंबें मातें ॥१६॥" ( अ० ९, श्लो० २६, ज्ञानेश्वरी. )

परी कुश्चरपणाविण । हें प्रेमेंचि लाभे संपूर्ण । प्रेमें तटस्थही होतां जाण । भक्ति ह्मणोन पैं थारे ॥ १२१ ॥ भक्ति देणें आणि रक्षणें । हेंहि स्वयेंचि कीजे नारायणें । म्हणोनि प्रेमाचिया अभिमानें । फुंजतां न ये ॥ १२२ ॥ ' जे अभिमान वाहती अंगीं ' । इत्यादि वचनें प्रसंगीं । कीं अभिमानहि प्रेमसंगीं । शोभा पावे ॥ १२३ ॥ परी अभिमानाचि-या चोरीं । प्रेमाचें नव्हे हलुवें भारी । म्हणोनि निराभिमानेंहि कुसरीं । वदले तात ॥ १२४ ॥

" पैं सर्वभावेंसि उखितें । जें वोपिलें मज चित्तें । जैसा गर्भ-गोळ उद्यमातें । कोण्याहि नेणें ॥ ३३५ ॥ तैसा मी वांचूनि कांहीं । आणिक गोमटेंचि नाहीं । मजचि नाम पाहीं । जिणेया ठेविलें ॥ ३३६ ॥ ऐसें अनन्यगतिकें चित्तें । चिंतितसाते मातें । जे उपासिती तयांतें । मीचि सेवीं ॥ ३३७ ॥ ते एकवटोनि जियेक्षणीं । अनुसरले गा माझिये वाहणीं । तेव्हांचि तयांची चिंतवणी । मजचि पडली ॥ ३३८ ॥ मग तिहीं जें जें करावें । तें मजचि पडलें आघवें । जैसी अजातपक्षाचेनि जीवें पक्षिणी जिये ॥ ३३९ ॥ आपुली तहानभूक नेणें । तान्हया निकें तें माऊलीसाचि करणें । तैसे अनुसरले मज प्राणें । तयांचें सर्व मी करीं ॥ ३४० ॥ तया माझिया सायुज्याची चाड । तरि तेचि पुरवी कोड । कां सेवा म्हणती तरी आड । प्रेम सुयें ॥ ३४१ ॥ ऐसा मनीं जो जो धरिती भावो । तो तो पुढां पुढां लागे तयां देवो । आणि दिधलि-याचा निर्वाहो । तोहि मीचि करीं ॥ ३४२ ॥ हा योगक्षेम आघवा । तयांचा मजचि पडला पांडवा । जयांचिया सर्वभावा । आश्रय मी " ॥ ३४३ ॥

ज्ञा० अ० ९, श्लो० २२.

एवं हृदयाचार्यश्रुति । आणि ' मुख्यतस्तु महत्कृपयैव भगवत्कृपा-लेशाद्वा ' हे भक्तिसूत्रोक्ति । समन्वय करीत प्रीति । कीं संतकृपें वा भगव-त्कृपालेशें प्रेम मिळे ॥ १२५ ॥ येथ विकल्प द्यावयाचें कारण । कीं खरा दास साधूचा आपण । यालागीं भगवंत भेटेचि तयाकारण । परी सत्संगनिषेधन नोहे विकल्पार्थू ॥ १२६ ॥ आतां श्रीतुकारामवाणी । ती तंव प्रत्यक्ष विनवणी । भगवंतासी करोनी । याचिला प्रेम ॥ १२७ ॥

" माझे हातीं आहे करावें चिंतन । तुम्ही कृपादान प्रेम द्यावें ॥ १ ॥
मागतियां भांडवल आळवण । नामाची जतन दातियासी ॥ २ ॥
बाळक धांवोनी आड निघे स्तनीं । घालावा जननी कृपें पान्हा ॥३॥
तैशापरी पुढें तुझिया मी आशें । धांवोनी ओरसें देई भेटी ॥ ४ ॥
तुका म्हणे करीं कासवांचे परी । आहे सूत्रदोरी तुझे हातीं ॥ ५ ॥
( तुकाराम गाथा. )

एवं कवणेही परी । सर्वथा सांभाळिता हरी । तंव एक तोंड पिटीं करीं । कीं न भजतां प्रेम हरि दे न कां ॥ १२८ ॥ परी सिद्धान्ती येथ उत्तरला । म्हणे प्रभूनें आत्मप्रेमठेवा जीवा दिधला । परी तो मूढें देहीं बैसविला । तरी काय कीजे ॥ १२९ ॥ यालागीं विनंतिप्रेम वाढे । तरीच मोल जोडे । म्हणोनि संबंध रोकडे । पोषी देवचि ॥ १३० ॥ प्रऱ्हाद दैत्यपुत्र असोन । देवें अंकावरी केलें लालन । यशोदेचें वात्सल्य पूर्ण । परी गोवर्द्धनोद्धारणीं लालन। भगवंतीं केलें ॥ १३१ ॥

" ब्रह्मांडनायका मी तुझी जननी । ह्मणतां लाज वाटे मनीं । मात।पिताबंधुभगिनी तूंचि माझी श्रीरंगा ॥ "
( हरिविजय. )

ऐसें श्रीधर ' हरिविजयांत' । यशोदोक्ति बोलिले यथार्थ । येणें लालन वात्सल्यांत । साचचि घडे ॥ १३२ ॥ माधूर्यांत लालन । प्रसिद्ध आहे परिपूर्ण । रूक्मिणीपत्रिका उदाहरण । स्वकीयानाईकामाधूर्यलालनाचें ॥ १३३ ॥ आणिक एक गोपीगीत । परकीयामाधूर्यलालनीं उदाहरण होत । परी वात्सल्यमाधूर्यादि संबंध समस्त । निष्कामप्रेमद्योर्तक तिची ॥ १३४ ॥ अभिमान जाया लालन । निष्कामासाठीं संबंध आन । स्वयें आपुलीच पूजा आपण । करितों म्हणून उपकार नाहीं देवा ॥१३५॥ मुखासी करितां शोभा । तरी तें दिसे मुखप्रतिबिंबा । प्रतिबिंबासी प्रत्यक्ष शोभा । करितांचि न्ये ॥ १३६ ॥ तैसा मिथ्याजीवासी प्रेमसंकल्पें । वाहतां अभिमानभारें दडपे । म्हणवूनि जीव मुख्यस्वरूपें । ईश्वरीं समर्पिजे प्रेमपूजा ॥ १३७ ॥ ईश्वररूप मुखा दिधल्या मान । तो जीवरूपप्रतिबिंबीं भासे संपूर्ण । ईश्वरा दिधलें क्षुल्लकासन । तें जीवाकारण वैकुंठ होय ॥ १३८ ॥ ही मात्र विशेष करुणा गोमटी । म्हणवुनीच मुक्त गाती

पेटीं । सकलसुलभामाजी शेवटीं । ताराया ठेविलें सुलभ नाम ॥१३९॥ अर्चा प्रतिमारूप निश्चलु । याकारणें जाहला घननीळु । कीं मी जाहालिया चंचलु । तरी प्रणताध्यान वडेलना ॥ १४० ॥ येथ साक्षात्काराचेनि मिसें । न होय म्हणुनी मूर्ख पिसे । सांडिती परी तेंही उससे । आपुलेनि हातें ॥ १४१ ॥ ध्यानस्वप्नावरी तरी । सत्ता मिळविणें सर्वोपरी । कृतादि युगीं भारी । होय सोपारी सर्वथा ॥ १४२ ॥ म्हणवूनि तेणें तरी मानें । सेविजे यादवराणें । जे संबंधी नारायणें । धरिले ते तुच्छ गणूं नये ॥ १४३ ॥ एरवीं इतर तुच्छदृष्टि । व्यावहारिक संसारीं करणें शेवटीं । तेथ स्वप्नादीचि गोठी । कायसी असे ॥ १४४ ॥ परी व्यावहारिकमूर्तिकादर्शनें । ईश्वराविखीं स्वप्नादि तेणेंमानें । जागृतींत मृदु मध्य स्वप्नीं होणें । पुढती जागृतीं तीव्र मध्य वा वेगू ॥ १४५ ॥ ध्यानें स्वप्न हें घडतां । तरी अयथार्थक नोहे सर्वथा । जे तत्सजातीय सर्वथा । फळ मिळविणें म्हणोनी ॥ १४६ ॥ परी स्वप्नाचिया अनुभवा । पावलिया जीव तर्की न यावा । म्हणोनि सावधपणा धरावा । सुधारणेविषयीं ॥१४७॥ दिवसदिवस तेंचि होवावें । परी तुष्टि धरोनि मागें न यावें । एवं कोणत्याही अवस्थेंत स्वभावें । साक्षात्कारीं ही दशा ॥ १४८ ॥ निद्राजन्य स्वप्न एक । शिथिलांगासनस्थ ध्यानजन्य एक । पहिलें मध्यम दुसरें सम्यक । परी अधिकारें ओळगावें ॥ १४९ ॥ येणेंचि योग साधावा । "स्वप्ननिद्राज्ञानालंबनं वा"। ऐसा पतंजलिसूत्रठेवा । आहेचि कीं ॥१५०॥ येथ पिसियाचे परी । जाहलिया दोषबोहरी । आणिक युगविपर्ययकुसरी येथचि फावे ॥ १५१ । जें कां सुंदर केशवराजा । समर्पिली मानसपूजा । ते अनुभवकाजा । चढे येथ ॥ १५२ ॥ परी ते अरडवरडपणें । नाशु पावे सद्गुरुविणें । येथ सिद्धीचें उमटणें । तेंहि होय ॥ १५३ ॥ येथाचि नटनाट्य करावें । स्वयें राधाहि होणें । कां येथचि स्वयंज्योति आघवे । ईश्वराधिष्ठान असोनिहि स्वातंत्र्य मिळे ॥ १५४ ॥ म्हणजे जागृतींत ईश्वर-परतंत्र । जीवसंवेगकर्म तीव्र । मृदुसंवेगासी अणुमात्र । अनुमोदन दे परमात्मा ॥ १५५ ॥ तेथ स्वयें संवेग ते तीव्र होती । अधिक अनुमोदन दे श्रीपति । व्यावहारिकप्रातिभासिकसत्तीं । ईशविषयीं विशेषु नाहीं ॥ १५६ ॥ नातरी शालिग्रामाच्या ठायीं । विष्णुव्यावहारि-

कसत्व कैसेंकायी । प्रातिभासिक म्हणतां लवलाहीं । तरी तें विष्णुपरोक्षज्ञान भ्रम नाहीं हें विद्यारण्य ह्मणती ॥ १५७ ॥ येथ अपरोक्षप्रातिभासिक कैसें । म्हणवोनि जें अधिष्ठान अवस्थासम असे । तेथ लावों नये पिसें । व्यवहारप्रतिभासाचें ॥ १५८ ॥ यद्यपि मानसकर्माचें फळ । स्वप्नीं भोगी हें नीळकंठवचन प्रांजळ । तेणें तुच्छत्व केवळ । ये कीं तया॥ १५९ ॥ तथापि गाढानुभवचिंतेच्या ठायीं । सहाय मानस अदृष्टही । आणि ईश्वरभिन्न पुण्यकर्माविषयीं । तुच्छता त्याची ॥ १६० ॥ म्हणवोनि ईशप्रसाद गुरुमंत्र । स्वप्नीं सत्य होती हें आचार्यशंकर । शतश्लोकींत बोलिले सुंदर । आणि शांकरभाष्यांत बोलिले ऐसें ॥ १६१ ॥ काम्यकर्माच्या ठायीं । वनिता स्वप्नीं पाही । परी समृद्धि होय हे ग्वाही । देतसे श्रुति ॥ १६२ ॥ तें अन्यार्थक जाहलें । म्हणवोनि यथार्थ हें बोलिलें । सर्व दौर्बल्य परिहरिलें । येणेंचि जाय ॥ १६३ ॥ असलिया नसलिया चक्रकुसरी । कीजे हें फावेल तरी । मरतां समाधान जरी । तरी काय उणें ॥ १६४ ॥ एवं कवणेही परी । असंग राहोनियां हरी । अद्वैतींच सेवाकुसरी । सांग घडे ॥ १६५ ॥ यद्यपि निरखिलिया दृष्टि । सेव्यसेव्यकता द्वैताचे पोटीं । तेथ अद्वैताची गोठी । विरोधिची ॥ १६६ ॥ परी आहार्यद्वैत कांहीं । ज्ञानासी विरोधी नाहीं । द्वैतसत्यत्वचि लवलाहीं । ज्ञानविरोधी ॥ १६७ ॥ जीवन्मुक्तींत प्रारब्धभोग । तो अनाहार्यबाधितानुवृत्तिकर्षणप्रसंग । यालागीं आहार्यद्वैतें रुक्मिणीरंग । भक्तभवभंग सेवावा ॥ १६८ ॥ अहो आहार्यद्वैताच्या ठायीं । वादी म्हणे आनंद नाहीं । सिद्धान्ती म्हणे तरी कायी । ब्रह्मानंदवृत्तिभेदीं ॥ १६९ ॥ वृत्तीचेनी भेदें । वेगळें भासिजे सच्चिदानंदें । हें श्रीमत्पद्मपादें । निरूपिलें आहे ॥ १७० ॥ तें जंव वृत्तिद्वैत चाले । तरी भक्तिद्वैतें काय केलें । जीवन्मुक्तींत आहार्य झालें । दोन्ही म्हणोनी ॥ १७१ ॥ शिष्य ह्मणे भगवंता । तया वृत्तिस्थ आनंदद्वैता । प्रयोजन पुरे अभ्यसितां । मा अन्य आहार्यद्वैता कां घेयावें ॥ १७२ ॥ अगा हें सत्यचि होये । परी तेथ अहंकणु लाहे । तो समाधींत नोहे । परी व्युत्थानीं पीडी ॥ १७३ ॥ म्हणोनि सगुणा श्यामसुंदरा । यशोदानंदना दीनोद्धारा । गोगोपवत्सला परमउदारा । आहार्यद्वैतें सेविती साधु ॥ १७४ ॥

" कां बिंबप्रतिबिंबाद्योतक । प्रतिबिंब बिंबा अनुमापक ।
तैसें द्वैतमिसें एक । मिरवतसे ॥ "

( अमृता० अ० १ ओ० २६. )

इया प्रकृतिपुरुषप्रकरणीं । जीवप्रतिबिंबदृष्टान्तेंकरोनी ।
जीवप्रकृतित्व करुणादानी । तात बोलिले ॥ १७५ ॥
" अविद्येचेनि आडबे । भुंजीत जीवपणाचे भवे । तया
चैतन्याचे धावे । धावेकारू जो ॥ १७६ ॥ "

( अमृतानुभव, अ. २, ओ. २ )

एवं गुरुमहिमावर्णनीं । बोलिली आळंदीपीठवासिनी । कीं प्रकृतिपुरुषभेद निर्वाणीं । अविद्यावश ॥ १७६ ॥ कित्येकांचें मत । कीं शांकरवेदान्तभिन्न बोलली तात । मायाअंगिकार नाहीं तेथ । हें ह्मणणें आघवें मिथ्या ॥ १७७ ॥ पंधरावे अध्यायीं सातवे श्लोकीं । अवतरणटीकेंत करुणात्रलोकीं । अवच्छेदआभासप्रतिबिंबता निकी । तात जीवाविषयीं बोलिले ॥ १७८ ॥ तेथ मायेचाही अंगिकारू । ह्मणोनि शांकरमतविरोधी तात हें बोलणें अविचारू । माया न मानितां वल्लभमतप्रकारू । होईल तातांचा ॥ १७९ ॥ तो भावार्थदीपिका–अमृतानुभव–समन्वय–विरुद्ध । ह्मणोनि आह्मीं न मानूं शुद्ध । आणि अद्वैत तंत्र विशद।सनातन वेदीं वासिष्ठीं ॥ १८० ॥ ह्मणोनी तें कवणाचें । न होयेचि साचें । तातानीं शुष्कत्व मात्र तयाचें । निवारिलें ॥ १८१ ॥

" अहो ऐक्याचें मुदल न ढळे । आणि साजिरेपणाचा
लाभु मिळे । तरी स्वतंरगाचे मुकुळें। तुरुंबू कां पाणी " ।

अमृ. अ. १ ओ. ५९

" देवदेऊळपरिवारू । कीजे कोरूनि डोंगरू। तैसा भक्तीचा
व्यवहारू । कां न व्हावा ॥ " (अमृ० अ. ९, ओ. ५९)

येणें ज्ञानोत्तरभक्ती । दाखविली मधुराद्वैतीं । हा उपकार जाहला वेदान्तीं । अभूतपूर्व ॥ १८२ । एवं आहार्यअंश होवोनि संबंध । आधीं " तस्यैवाहं " प्रसिद्ध । सकळ करुणेचा सिंधु । स्वामी माझा ॥१८३॥ मग तोही संबंध नावडे गोमटा । कीं स्वामी जाईल चिंतावाटा । तो निश्चिंततेचिया चोहटा । अक्षय बैसावा ॥ १८४ ॥ म्हणोनि स्वामि-

भाग्यें फोफावें । मग सानपण ठेवोनि [1]ठेवे । वात्सल्याचेनि भावें । भजें देवा ॥ १८५ ॥ आपुलिया निश्चलतेचा अनुभवो । निश्चिंत घे रमारावो । कीं मातापिता स्वयमेवो । सेवक झाला म्हणूनि ॥ १८६ ॥ परी सेवक वांछी आणिक मनीं । कीं मातृसेवा करावी म्हणूनि । स्वामी वांछील आपुल्या मनीं । येणें मोडेल नैश्चल्य ॥ १८७ ॥ म्हणोनि स्वामीस ऐसें वाटावें । कीं सेवकाघरीं धन आघवें । तें आपणालागीं द्यावें । न लागे कांहीं ॥ १८८ ॥ जीवत्वाचें अंशपण । येणें सचिंत होय स्वामी आपण । यालागीं आत्मधन । मिळवावें ज्ञानें ॥ १८९ ॥ स्वामीचा अनुग्रह आज्ञा वेद । तेथचि ज्ञान सिद्ध । तें ज्ञान दारवंटां प्रसिद्ध । स्वामिमंदिरातें ॥ १९० ॥ भक्ति पावावयाकारण । ब्रह्मीं असावें प्रस्थान । ऐसें बोलिले वचन । प्राचीन साधु ॥ १९१ ॥ म्हणोनि ज्ञानाचिया दारवंटां । आत्मऐक्याचिया चोहटां । बैसोनि धरीं नेटा । स्वामिसेवे ॥ १९२ ॥

" शिवो भूत्वा शिवं यजेदिति " श्रुति । " ज्ञानीत्वात्मैव मे मतम् " ही जागृच्छ्रुति । " आत्मबुद्ध्या त्वमेवाहमिति " स्मृति । ही स्वामिआज्ञा पाळूनि निश्चितीं सेवा साधीं ॥ १९३ ॥ स्वामि जाहला सेवाऋणी । प्रसंग आलिया मुक्ति देवोनी । उतराई होवूं म्हणोनी । होता मनीं भावित ॥ १९४ ॥ तंव तो आत्मैक्यधनेंकरून । ज्ञानें मोक्षही केला जेवीं बंधन । आतां सुटों न शके ऋणोपण । येणें लाजें मौन स्वामि ॥ १९५ ॥ ब्रह्म मायेचें अधिष्ठान हें लाजिरवाणेपण । हा स्वामिमाथां दोष गहन । निवटावया ज्ञानी होवोन । अविरोध साधीं दोहींचा ॥ १९६ ॥ ज्ञानें ऐक्यत्व पावला । वृत्तीनें अंशदास जाहला । तोचि एक भक्त भला । येर अवघे विभक्त ॥ १९७ ॥

" मजही शरण रिघीजे । आणि जीवत्वेंचि असिजे । धिक् बोलीं इया न लजे । प्रज्ञा केवीं ॥ १४०२ ॥ अगा प्राकृताही राया । आंगीं पडे जें धनंजया । तें दारिद्र्यही कीं तया । समान होय " ॥ १४०३ ॥ मा मी विश्वेश्वर भेटे । आणि जीवग्रंथी न सुटे । हे बोल नको वोखटे । कानीं लावूं ॥ १४०४ ॥ " ( ज्ञानेश्वरी, अ० १८. )

---

[1] तिजोरींत.

ऐसें तात वचन । अर्थ निघे यांतून । " तो वल्लभा मी कांत म्हणून " । तद्वचनचि ।। १९८ ।। सुरतसुखीं पतिपत्न्यैक्यता । तेविं ब्रह्मानंदसम देवभक्ता । परी " एकाकी न रमते " या श्रुत्यर्था । पाळी सेवकू ।। १९९ ।। लालन वात्सल्य माधूर्य । कोणताही संबंध ज्ञानोत्तर होय । तरी निष्काम सुखाची सोय । अनुषंगें मिळे ।। २०० ।। आणि महाभारतीं माधूर्यकथा ऐसी । धर्में विचारिलें भीष्मासी । कीं सुरतसमयीं सुख अधिक कवणासी । स्त्रियेतें वा पुरुषातें ।। २०१ ।। तैं भंगास्वनरायमात । सांगूनियां देवव्रत । म्हणे सुरतीं सौख्य होत । स्त्रियेतें अधिक ।। २०२ ।। भीष्म तंव पितामह अतिवरिष्ठ । धर्म वडिल पूजक परमशिष्ट । तो पुसेल ऐसी गोष्ट । हें योग्य न दिसे मज्जमतीं ।। २०३ ।। आणि कथा तंव आहे भारतीं । मिथ्या म्हणतां न ये व्यासोक्ति । यालागीं याची संगति । यथामति दावीं मी अन्य ।। २०४ ।। कीं विषयी स्त्रियाकारण । रतिसौख्य अधिक पुरुषाहून । तरी भगवंत पति जियाकारण । तया अधिक सौख्य हें वदिजे कायी ।। २०५ ।। समाधीवांचोनि ब्रह्मैक्य संचलें । वृत्तिपणें माधूर्यसुख उचंबळलें । नवल निर्गुणगुणभोक्तृ जाहलें । जीवत्व न पावोनी ।। २०६ ।। " निर्गुणं गुणभोक्तृच " म्हणोन । प्रिय बोलिले वचन । तें ब्रह्मविषयींच प्रकरणावरून । जीवाविषयीं लागेना ।। २०७ ।। आणि निर्गुणीं गुणभोक्तृता । तरी निःशेष आली पाहिजे जीवता । भोक्तृता नव्हे अधिष्ठानता । म्हणोनियां ।। २०८ ।। यालागीं एतद्वाक्यसंगती । ऐसी ओळखावी श्रोतीं । कीं पत्नि होवोनियां भक्ति । अनुभवावी ।। २०९ ।। पत्निचें प्रारब्ध तमोगुण । तदवच्छिन्न देहा भगवदालिंगन । पत्नीचा काम रजोगुण । काम्य भगवंत । फळ त्याचें ।। २१० ।। पत्नीचें पातिव्रत्य सत्वगुण । तेथ पति राधिकारमण । एवं असोनि निर्गुण । गुणभोक्तृपण भगवंता ।। २११ ।। अथवा कीर्तनें ब्रह्मकाया—पत्नि । अनध्यस्तविवर्तवपु कांत चिन्मणि । म्हणोनि भोक्तृदृष्टिहि निर्गुणीं । सुखावह ।। २१२ ।। आपण प्रिया जाहलिया उत्तमा । होय धीरोदात्त परमात्मा । सर्वगुणीं महिमा । अधिक जयाचा ।। २१३ ।। " विवक्षितगुणोपपत्तेश्च " ऐसें । शारीरक प्रथमाध्याय द्वितीयपादीं सूत्र असे । तयाचा अर्थ कीं प्रियाप्रेमवशें ।

धीरोदात्त जगत्पति ॥ २१४ ॥ जे जे विरुद्ध गुण । जयां अतिविरुद्ध भावी मन । तिहीं साधिलें जगत्कल्याण । महत्व म्हणोन तयातें ॥२१५॥ तया महत्वानुसारी चरित । म्हणोनियां राधिकाकान्त । उत्तमाप्रियानुकूल अनंत । धीरोदात्तरूप धरी ॥ २१६ ॥ एरवीं जियांचिया ठायीं । धीरोदात्तता नसे कांहीं । जो बांधला चहूंठायीं । अविद्याकामकर्मे ॥२१७॥ म्हणोनि अनध्यस्तविवर्तू । नायकू धीरोदात्तू । तेथ निर्गुणं गुणभोक्तृ च" एतद्वचनार्थू । सांपडे करीं ॥ २१८ ॥ आतां नायिका जिनें व्होावें । तिनेंहि निर्विकारी असावें । याचिलागीं भक्त विळसावें । ज्ञानोत्तरा ॥२१९॥ एवं गुणा निर्गुणा विरोध नाहीं । तरी निवटावें कवणें कायी । म्हणोनि जगाचिया ठायीं । पुत्रत्व सगळें ॥२२०॥ तया विश्वपुत्रान्तर्ठीं । भूतदया भरली पोटीं । तिनें उघडली तारणपेटी । आधिकारिक होवोनी ॥२२०॥ एवं ऐक्य पावोनियां तत्वतां । अधिक सुख भोगोनि परतंत्रता । या विरोधानुभूतैक्या पतिव्रता । वांचोनि नेणती इतर ॥२२१॥ तूं स्वतंत्र म्हणतां-क्षणीं । मुदित होय व्यभिचारिणी । तैसे कुमती ज्ञानाभिमानी । भक्ति-रहित शब्दपाठें ॥ २२२ ॥ पातिव्रत्यामुळें धरी यथार्थ । भगवंतावाचोनि नेणेंचि अर्थ । काम पुरला समस्त । एकाग्रप्रेमें ॥ २२३ ॥ ऐक्यें साधिली मोक्षस्थिति । वियोगोपलालनें दीनता पुरती । संयोगें भगवद्भक्ती । साधिला पंचम पुरुषार्थ ॥ २२४ ॥ एवं हें सेवकपण । स्वामित्वहि संपादोन । स्वामिनीपणाचा गर्व सांडोन । श्रयी पतिचरण ह्मणोनि पतिहि लाजे ॥ २२५ ॥ तिया लाजेचिया एकान्तगोष्टी । सांगितलिया शेवटीं । तो मित्र तात ह्मणोनि तदोष्टीं । आम्हाहि कळल्या ॥ २२६ ॥

" तया सग जें आम्ही कांहीं । द्यावें अर्जुना पाहीं ।
ते ठायींचीच तिहीं । घेतली केल ॥ १३१ ॥
ह्मणोनी तिहीं जे प्रेम धरिलें । तेणेंचि आमुचें देणें उपायिलें ॥
परी आम्ही द्यावें तेंहो केलें । तिहीं ह्मणिये ॥ १३२ ॥ "
( ज्ञानेश्वरी, अ० १०. )

सद्धर्में स्वाधीन केलें मजप्रति । ऐसी वरवदनें ऐकोनि कन्याकीर्ति । आनंद न समावोनि चित्तीं । स्पष्ट तालीकि पिघाल्या इया ॥ २२० ॥ दोघांचिया विश्वासाचें । एकाचि स्थान जाहलें साचें । येणें परस्परांतरींचें ।

कळलें गुज ॥ २२८ ॥ तें गुजही तेंचि स्थान । जया ज्ञानेश्वराभिधान । वंदोनियां तदीय चरण । स्थापिले हृदयीं ॥ २२९ ॥ गुंफोनियां काव्यता-माळा । घातल्या श्रीगुरुचिया गळां । मातृपितृकांतैक्यभाव आगळा । वाढला तेणें ॥ २३० ॥ श्रीज्ञानेश्वर माय बहिणी । तिन्ही काळीं हृदय-स्थानीं । बैसूनियां आटणी । करी सर्वगत्वीं ॥ २३१ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुकृपाप्रसादे, गद्यपद्यान्विते, प्रेमनिकुंजे, ' सेवकनिर्णयो ' नाम तृतीया वल्ली.

॥ श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु. ॥

---

❀ श्रीज्ञानेश्वरमाऊली समर्थ. ❀

# चतुर्थी वल्ली.

जय जय सद्गुरु मंगलधामा । जय जय सद्गुरु मनविश्रामा । जय जय सद्गुरु पूर्णकामा । आगमा निगमा अलक्ष्य तूं ॥ १ ॥ जय सद्गुरु परमानंदा । वंदोनि तुझिया पदारविंदा । सोडोनि मुनि संसारधंदा । सच्चिदानंदा पावले ॥ २ ॥ मागील वल्लींचीं मधुर फळें । सेवकपुष्टीचेनि मेळें । खादलीया बुद्धीचे डोळे । पाहों लागती निजांगीं ॥ ३ ॥ आतां सेवा कवणे रीति । जाणावया वल्लीवृत्ति । फोफावों लागे श्रीगुरुमूर्ति । पोषक जैं होय ॥ ४ ॥ सेवेमाजीं तत्व तीन । आधीं तयांचें व्हावें ज्ञान । तरीच सेवेचें विंदान । पूर्ण सेवककरीं चढे ॥५॥ प्रथमतत्व अद्वैतीं द्वैत । जें जीवन्मुक्तौ व्युत्थानीं उचंबळत । द्वितीयतत्व विख्यात । वियोगोपलालन संयोगीं ॥ ६ ॥ तृतीयतत्व गुणद्वेषरहित । गुणवैतृष्ण्य गुणार्पण-युक्त । एवं तरीच सेवा अखंडित । फोफावत निष्काम ॥ ७ ॥ अद्वैतीं द्वैत कैसें । जीवन्मुक्तींत केविं उमसे । हें अनध्यस्तविवर्तमिषें । बहुठायीं विशेषें निरूपिलें ॥ ८ ॥

" अहो ऐक्याचें मुद्दल न ढळे । आणि साजिरेपणाचा लाभु मिळे ।
तरी स्वतरंगाचें मुकुळें । तुरंबु कां पाणी " ॥
( अमृतानुभव अ० १ ओं० ५९. )

भेद तंव तंव दूण अभेदासी । इत्यादि श्रुति विशेषीं । आमुचि-याचि कल्याणासी । प्रगटल्या ज्या ॥ ९ ॥ तिहीं अद्वैतीं द्वैत । हें आद्य-तत्व बोलिलें यथार्थ । तें वाचोनि मधुराद्वैतग्रंथ । समजोनि घ्यावें सज्जनीं ॥ ११ ॥ द्वितीय तत्व जें कांहीं । तेंही बोलिलें बहुठायीं । परी सेवेची कारणता पाहीं । तया कैसी बोलिजेल ॥ १२ ॥ संयोगीं होतां अभिमान । तरी आपुलाचि वाढे मान । तेणें सेवानंद होय न्यून । महा अकल्याणकारक ॥ १३ ॥ जेवीं भामा मानवती । तिनें दान दिधला श्रीपति । एवं सेवानंदनिवृत्ति । संयोगाभिमती होतां घडे ॥ १४ ॥ वियोगही द्विविध । सप्रेम आणि सापराध । वनीं जातां श्रीमुकुंद । गोपींसि वियोग गृहीं तो प्रथम ॥ १५ ॥ अपराधही त्रिविध । मानज दैवज प्रमादज विशद । रासांत गोपींचा जो अपराध । तो मानज बोलिला ॥ १६ ॥ तेणें अपरावें भगवद्वियोग । तो पश्चात्तापें निवटे सवेग । रसभावेंशीं अव्यंग । सेवाही घडे ते वियोगीं ॥ १७ ॥ रुक्मिणीतें दुर्वासशाप । तो अपराधदैवप्रकोप । दैव ह्मणजे अलोकसंकल्प । ऋष्यादिकांचा ॥ १८ ॥ दुर्वासशाप अंबरिषातें । दैवप्रकोपाचि म्हणती तयातें । तोहि लक्षितां द्वैविध्यातें । प्राप्त होय ॥ १९ ॥ स्वापराधें दैवप्रकोप । आणि दैव स्वभावसंकल्प । यादवासी मुसलशाप । तो दैवकोप स्वापराधें ॥ २० ॥ रुक्मिणीअंबरिषाच्या ठायीं । स्वापराध नसतांही । अपराधभ्रम दुर्वासहृदयीं । तेणें जाहला दैवकोपू ॥ २१ ॥ स्वापराधभिन्न दैवजवियोगीं । गोविंद संरक्षी स्वभक्तालागीं । तेथही सेवासंभोगीं । अनुगुण वृत्ति चालतू ॥ २२ ॥ सांबावरी गलें चित्त । ह्मणोनी स्वस्त्रियांसी शापी भगवंत । कीं पुढें तुम्ही समस्त । म्लेंच्छगृहांत व्हाल वेश्या ॥ २३ ॥ हा स्वप्रमादज अपराध । एतज्जवियोगीं सेवाप्रति-बंध । तो सदनुग्रहाविण विशद । निवृत्त नोहे कल्पांतीं ॥ २४ ॥ गाल-वानुग्रहें कृष्णस्त्रिया । वैकुंठीं गेल्या आघविया । असो केवळ वियोगीं तयां । सेवाप्रबंध अतिक्लेशें ॥ २५ सकलअपराधसकलवियोगीं । संतसंग-

चि भगवत्संगीं । चवथिया स्वभाववियोगीं । संतसंगचि तारकू ॥ २६ ॥ अनादिअविद्यावशें । जीवा दृढसंसारपिसें । येणें अपराधें जो हरिवियोग असे । तो स्वाभाविकवियोग चवथा ॥ २७ ॥ या सकळवियोगीं शरण । एक सज्जनांचे चरण । आणिक उपाय संकीर्ण । संशयें स्थान दाखविती ॥ २८ ॥ संत आंधळिया हातेरू । संत पांगुळा खांदेरू । संत बुडलिया उतारू । अनायासें ॥ २९ ॥ संत दुर्बळाची काठी । संत प्रवासीं अक्षयपेटी । संत कामधेनू गोमटी । दरिद्रियाची ॥ ३० ॥ सज्जन विचारसागर । सज्जन वैराग्यवैरागर । सज्जनसंगें न पावेल पार । ऐसा न दृष्ट न श्रुत कोणी ॥ ३१ ॥ भगवंत बाप संत माता । जे अपराधांचिया कोटिकळता । उपसाहती अनंता । विझवोनियां ॥ ३२ ॥ मृत्तिका जळ पाषाण । येथ संतवचनें नारायण । एरवीं तीर्थगादिकारण । कां हें तरण उमगेना ॥ ३३ ॥ यास्तव संयोगीं वियोगीं । सज्जनप्रीतिचि असावी अंगीं । परस्परापराधप्रसंगीं । रक्षिती परस्पर ॥ ३४ ॥ कृष्णापराधी स्त्रियांप्रती । गालव रक्षिता महानती । नारदापराधी सांबाप्रती । उपाय बोलिला श्रीकृष्णें ॥ ३५ ॥ प्रत्यक्ष भगवदपराध असतां । साधु स्वबळें रक्षिती ऐशा बहुत कथा । प्रत्यक्ष साधुअपराध असतां । भगवंत रक्षी संतद्वारा ॥ ३६ ॥ अपराधी दुर्वासाप्रती । अंबरीष शरण सांगे श्रीपति । तैसेंचि नारदापराधी सांबाप्रती । सांबपुराणीं हीं कथा ॥ ३७ ॥ प्रत्यक्ष अपराध संताचा नसतां । तरी भगवंत रक्षी सर्वथा । अंबरीषाची गर्भव्यथा । अंगें सोशी यदुवर्य ॥ ३८ ॥ एवढें संतमहिमान । असावया हेंचि कारण । कीं भगवान सामान्यचेतन । विशेषचेतनप्रदीप संत ॥ ३९ ॥ म्हणवोनि इये मार्गीं । निराशा न धरावी जगीं । सत्संगीं वा भगवत्संगीं । होतां मुक्तिचौरंगीं बैसे ॥ ४० ॥ स्वभाववियोगीं सेवेप्रती । उत्तम संत मध्यम मूर्ति । इतर तीन वियोगीं सेवेप्रती । संतचि निश्चितीं आधारू ॥ ४१ ॥ सप्रेम वियोग तो निरपराध । तेथ आपणचि लाहे संतता शुद्ध । तयावियोगें भूतभाव प्रसिद्ध । भगवंत होय ॥ ४२ ॥ अपराधजन्य वियोग चार । हा पांचवा निर्विकार । येथ भगवद्रूप अंतर । भूतांसहित होतसे ॥ ४३ ॥ इतर वियोगाचें लक्षण । हृदय भासे भगवंताविण । या वियोगाचें लक्षण । हृदय

नारायण स्वयें होय ॥ ४४ ॥ जो भेद निद्रासमाधींत । तोचि अन्य वियोग आणी यांत । भक्तिसमाधी विख्यात । येणेंचि प्राप्त सज्जना ॥ ४५ ॥ परी प्रारब्धभोगाची कहाणी । भोग भोगितां वियोगहानि । तो भोगचि जाये कृष्णार्पणीं । तैं मिळे व्युत्थानीं समाधिसुख ॥ ४६ ॥ सुख प्रवेशे निर्गुणीं । यद्यपि समाधि स्वस्थानीं । तथापि दुःखाविरोधी स्वरूप गुणी ; दावी व्युत्थानीं भक्तिसमाधि ॥ ४७ ॥ परी त्यांतूनहि व्युत्थान । जें प्रारब्धभोगाचें विंदान । तें न भासवावया कारण । समर्थ सेवा ॥ ४८ ॥ म्हणोनि सप्रेमवियोगु जरी । परी तो भोगावा अंतरीं । भगवत्संयोग असतां बाहेरी । उपलालिजे ॥ ४९ ॥ दर्शनीं विश्लेषभीरुता । येणें उपलालिजे समर्था । ना हो संयोगावांचूनि सेव्यार्था । सेविजे कैसें ॥ ५० ॥ अन्यत्र सेव्यभावना करून । वियोगी सेविती सेवकजन । तें सेव्य संयोगीं असतां जाण । सेव्यापमान वियोगेच्छा ॥ ५१ ॥ बळेंचि वियोगेच्छा करितां । तरी सेव्या सेवों पाहे शत्रुता । वियोगेच्छेनें वियोग होतां । नव्हे चित्तावेश कृष्णीं ॥ ५२ ॥ संयोगाचीच इच्छा दारुण । संयोग न निवटावा एक क्षण । येणें भयें वियोगोपलालन । संयोगीं घडे ॥ ५३ ॥ संयोगीं वियोग घडेल कैसा । तो विवरणें कळेचि ना आपैसा । जेथ कल्पोनि प्रतिबंधांशा । उपळे वियोगू ॥ ५४ ॥ कां साह्मिया अधीन जाहला हरी । इणें या गर्वी मानक धरी । येणेंचि भयें कुसरी । वियोगोपलालन ॥ ५५ ॥ अथवा आणिकही एक । शास्त्रीं सांगितलें सुख । जे वियोगोपलालन देख । संयोगीं घडे ॥ ५६ ॥

" गोप्यश्च कृष्णमुपलभ्य चिरादभीष्टं । यत्प्रेक्षणे दृशिषु पक्ष्मकृतं शपंति ॥
दृग्भिर्हृदीकृतमलं परिरभ्य सर्वास्तद्भावमापुरपि नित्ययुजां दुरापम् ॥ "
( भागवत स्कं. १०, अ. ८२, श्लो. ४०. )

गोपिका पावोनी श्रीकृष्णातें । निरीक्षतां लवती पातें । तो निमिषवियोग न साहे त्यातें । म्हणोनि विधातयातें देती शिव्या ॥ ५७ ॥ कां होवावया नेत्ररक्षण । पापणिया देतो नारायण । हें स्वाभाविकप्रेमलक्षण । जीवावरी देवाचें ॥ ५८ ॥ परी त्याचि पापणिया अक्षिणि । प्रतिबंध करिती भगवदीक्षणीं । तें न आवडती गोपींच्या मनीं । हेंचि क्रोधसमर्पण भक्तीचें ॥ ५९ ॥ डोळियाद्वारा हृदयकमळीं । अवघीं बैसविला

वनमाळी । तद्रूपचि जाहल्या बाळी । एवं संयोगीं वियोगोपलालन ॥६०॥ संयोगही होतां साचा । परी प्रतिबंध वाटे निमिषाचा । ह्मणोनि अवमान न करितां संयोगाचा । वियोगोपलालन घडे ॥ ६१ ॥ अहो नित्ययोगी जे होती । ते क्रियावशें चित्त लाविती । मनामाजीं भवभीति । धरूनियां ॥ ६२ ॥ ह्मणोनी तयातें दुष्प्राप्ती । तैसी नोहे भगवद्भक्ति । भगवंता-साठीं सोशिती । कष्ट अनेक ॥ ६३ ॥ परमेश्वराचीच आवडी ह्मणोन । सुलभ भक्ता नारायण । यद्यपि हें दिसे विषयप्रीतिसमान । तरी विषयचि सोडोनि जाती प्रीतिकारका ॥ ६४ ॥ तैसा नोहे भगवान । भक्ता न विसंबेचि क्षण । ह्मणोनि विषयप्रीतिसमान । भगवत्प्रीति सुखदायी ॥ ६५ ॥ विष्णुपुराणीं प्रल्हाद । देवासी हेंचि बोलिले विशद । तोही श्लोक शुद्ध । प्रमाण ऐकावा ॥ ६६ ॥

" या प्रीतिरविवेकानां विषयेष्वनपायिनी ।
त्वामनुस्मरतः सा मे हृदयान्मापसर्पतु ॥ "

अविवेकीजनांची विषयाचे ठायीं । प्रीति तैसी तुझिये पायीं । माझी जडो शेषशायी । आणि न पावो नाश ते ॥ ६७ ॥ अनुरागाचें मुख्य लक्षण । जित्या मेलिया न सोडी प्रियचरण । तेंही प्रल्हादचि आपण । बोलिले आथी ॥ ६८ ॥

" नाथ योनिसहस्रेषु येषु येषु व्रजाम्यहम् ।
तेषुतेष्वचला भक्तिरच्युताऽस्तु सदा त्वयि " ॥

चराचर योनी नाना । मज जन्म येतां नारायणा । तुझिया उपयोगीं करुणानिधाना । होवोनि सेवा करीन तुझी ॥ ६९ ॥ येणें प्रारब्धाचें दुःख । तेंही सहज होय सुख । अनुराग विशेख । विलक्षण ऐसा ॥ ७० ॥ आणिक पुढती भय भावी मनीं । वैकुंठीं जातां झणीं । जय-विजयांसमान करणी । घडेल अभिमानें ॥ ७१ ॥ अतिप्रियकर राधा होतां । गोलोकामाजी कृष्ण भोगितां । तरी प्रसंगीं शापाशापी तत्वतां । कृष्णखंडीं कथा हे ॥ ७२ ॥ रासांत जाऊं इच्छितां । तरी सवतीमत्सर घडेल अवचितां । येणें भेणें तत्वतां । स्थावरींहि जन्म वांछी ॥ ७३ ॥ जेथें प्रियाचें पाऊल पडे । तेथें मियां होवावें खडे । जेथें प्रियमुखतांबुलरस पडे । तेथें पिकदानी होवावें म्यां ॥ ७४ ॥ जन्म घेवोनि वेळुवा

जाती । मी मुरली व्हावें हरीच्या हातीं । एवं स्थावर योनींत अनुरक्ति । प्रेमवशवृत्ति जन्म भावी ॥ ७५ ॥ सर्वत्र भरलें परब्रह्म । तरी कवण द्वेषी जन्म । मुख्य जीवा नाहीं बंधधर्म । तरी मुक्तिवर्म लीलाचि ॥७६॥ सद्गुरुसेवेसी जिता मेला । जीवभाव कैसा विकला । हा हृदयाचार्यें भाव बोलिला । भावार्थदीपिकेंत त्रयोदशीं ॥ ७७ ॥ ते आचार्योपास्तीची टीका । वाचिती नित्यचि पावती सुखा । क्षीरसागरु कैसा एका । सांठविजे कुंभीं ॥ ७८ ॥ म्हणोनि येथ बिंदुमात्र चवी । घेऊनि अमरता मिळवावी । परी मधुरतावासना पुरवीत जावी । भावार्थदीपिकाक्षीराब्धीनें ॥ ७९ ॥ असो संयोगीं वियोगोपलालन । हें हितहरिवंशहि बोलिले आपण । तें ज्ञानदृष्टया परमत पूर्ण । परी प्रमाण उपास्यांशदृष्टी ॥ ८० ॥

" अंकस्थितेऽपि दयिते कमपि प्रलापम् ।
हा मोहनेति मधुरं विदधात्यकस्मात् ॥
श्यामानुरागमदविव्हलमोहनांगी ।
श्यामामणिर्जयति कापि निकुंजसीम्नि "

( राधासुधानिधि. )

प्रिय असतांहि अंकावरी । 'हा मोहन' ऐसा आलाप करी । ती कृष्णानुरागमयी सुंदरी । वृंदारण्यमंदिरीं जय पावे ॥ ८१ ॥ संयोगीं वियोगइच्छा करितां । तरी हातचें दवडणें भगवंता । वियोगीं संयोगेच्छा करितां । तरी संयोग पावे ॥ ८२ ॥ आणि तो पावलिया वियोगवांछन । यया दुवाड न म्हणे कवण । म्हणोनि संयोगीं वियोगोपलालन । जाणोनि कीजे ॥८३॥ एरवीं प्रेमाची सत्ता । जे सूत्रीं बोलणें भगवंता । "अनिर्वचनीयं प्रेमस्वरूपम्" या सूत्रार्था । बोलिलें आहे ॥ ८४ ॥ तरी तो ब्रह्मानंदधर्म विशेष । रस परब्रह्मचि हा अग्निपुराणदंश । जे प्रेमाचे प्रकार विशेष । ते अंत:करणधर्म प्रेमाचे ॥ ८५ ॥ द्रवत्वादि नानालक्षण । बोलिलें ते तयांतचि जाण । दृष्टिपरिचयहार्दसौहार्दप्रेमअभिधान । उप्तलिप्तदलितसंतृप्तादि ॥ ८६ ॥ तें अवघें प्रेमरसायनीं । बोलिलें पहावें साधकानीं । मी आणखी कवणिये स्थानीं । निरूपीन ॥ ८७ ॥ भक्तांचे नाना प्रकार । तेथ बोलिले असती परिकर । परी आम्हीं तंव गोपिकाकिंकर । मधुराद्वैती म्हणोनी ॥ ८८ ॥ गोपीतें तंव कांहीं । श्रीकृष्णवियो-

प्राप्ति नाहीं । आणि वचनही । आहे ऐसें ॥ ८९ ॥

" गोप्यः कृष्णवियोगिन्य इति कस्तत्वतो वदेत् "

श्रीकृष्णवियोग गोपिकांसी । यथार्थ कवण ह्मणेल यासी । वियोगाभाव होतां त्यांसीं । " तत्रैवांतरधीयत " हें भागवत पद ॥ ९० ॥ ' तत्रैव ' म्हणजे तेथ गोपिकांच्या हृदयीं । अन्यत्र गेला कोठेंचि नाहीं । आणिकही लवलाहीं । वचन ऐका ॥ ९१ ॥

" नित्यमेव निमग्नास्ताः कृष्णप्रेमसमाधिषु ।
न कदापि वियुज्यन्ते गोप्यो विरहभीरवः ॥ "

( प्रेमरसायन, खंड १, श्लो. १०२. )

हरिप्रेमीं नित्य निमग्न । प्रेमसमाधि आत्मानुसंधान । विरहभीरुतावृत्ति करी समाधिरक्षण । वियोग नसुनी संयोगीं वियोगोपलालन हें ॥ ९२ ॥ ऐसिया नित्यप्रेमसमाधिस्थांच्या शरीरीं । भूतावेशन्यायें प्रवेशूनि हरी । प्रारब्धव्यवहार आघवा करी । ह्मणोनि भक्ता प्रारब्धाभिभव ॥ ९३ ॥ हेंहि बोलिले विश्वनाथ । तें वचन सांगतों येथ । आणि उपपत्तिहि बहुत । सांपडती ज्या ॥ ९४ ॥

" नित्यसमाधियुक्तानां गोपीनां व्यवहारनिष्पत्तिर्भगवतैव परमकारुणिकेन निर्वाह्यते तासु भूतावेशन्यायेन प्रवेशोपगमात् "

अर्थ बोलिलाचि आहे मागें । भक्त उद्धरे भक्तिप्रसंगें । मग जें उमटे अंगें । तो देवाचि कीं ॥ ९५ ॥ निमालिया जीवपणा । देव आवेशे भक्तहृद्भुवना । तैं सद्गुरुईश्वरराणा । हेंचि कीरु सांपडे ॥ ९६ ॥ बाह्य जगहि दृष्टिसृष्टिवादीं । जीव कल्पोनि भोगी अहंबुद्धि । निरहंकार होतां त्रिशुद्धी । वागृणमुक्त भक्तिफळ ईश्वराश्रयें पावे ॥ ९७ ॥ सद्गुरु अनध्यस्तविवर्त मान्य जया । या उपपत्ति उपचारमात्र तया । परी प्रारब्धाभिभव समजावया । बोलिल्या आहाती ॥ ९८ ॥ राधा आदि गोपी । तयां हे समाधि सोपी । परी येथ म्हणेल कोऽपि । कीं ऐसिया समाधींत सेवा केविं ॥ ९९ ॥ तरी आत्मधर्मभक्ति कळलिया । समाधि व्युत्थान समान तया । तेथ देहचेष्टा लवलाह्यां । सेवाचि घडवी ॥ १०० ॥ जैसा तटस्थ स्वप्न देखे । आणि ओसणता काय जागृति माखे । तेविं समाधि

आणि सेवा विशेषें । स्वानुभवें एके पार्ती दिसे ॥ १०१ ॥ उन्मत्तार्थ करणें । मौन धरणें कां बोलत फिरणें । लोकरहित मिरवणें । होय जैसें ॥ १०२ ॥ तैसें समाधि व्युत्थान दोन्ही । येती प्रेमोन्मादस्थानीं । तेथ उपपत्ति वा विषयकहाणी । शंकिजे कवणें ॥ १०३ ॥ मग सेवा वैदिक वा पौराणिक । तांत्रिक अथवा लौकिक । जे भागवतीं आगमिक । बोलिली तैसीच होय ॥१०४॥ विधिविशेष जो कांहीं । सुरतस्त सांगूं सर्वही । प्रेम उपजे व्हाया लवलाहीं । साधनभूत जो ॥ १ ५ ॥ फलाशा परित्यागून । हृदयीं धरुनी परमेश्वरण । गोपिका सेवक होऊन । पूज्यबुद्ध्या कर्मसमर्पणरूप सेवा कीजे ॥ १०६ ॥ विधिनिषेधाचे वोझारें । जें कां येती उणें पुरें । तें सद्गुरुरायें करुणाकरें । निवारिल्या जाय ॥ १०७ ॥ देहबुद्धीचे ठायीं । पौराणादि विधि भक्तीतही । पाळिला पाहिजे कांहीं । हें सांगणें नको ॥१०८॥ असो ऐसे जे जीवन्मुक्त । प्रेमें निर्वासन होती येथ । ते ईश्वरीं मिळालिया जरी दिसती अवतार संगत । तरी ईश्वरलीलाचि ती ॥१०९॥ मुक्तातें पार्थक्य नाहीं । ईश्वरचि होय सर्वाठायीं । अमुख्योपपत्ति लवलाहीं । तूर्यामग ईश्वरीं होऊनी अवतारीसहायक मुक्त ॥ ११० ॥ दुःख अथवा सुख । प्रेमापुढें गणिना देख । तेथ भोगावयाचीहि निःशंक । हौस नुमटे ॥ १११ ॥ पतिव्रतेसि कांहीं । संसारवासना तवं नाहीं । परी पतीच्छा लवलाहीं । उमटे भोगूं ॥११२॥ हरि तंव निर्वासन । परि लीलामात्रें करून । भोग अभोग उपसहोन । भक्त प्रेमाविण आन नेणें ॥ ११३ ॥ तदर्पिताखिलाचारता । तद्विस्मरणें परमव्याकुलता । ही सूत्रोक्तसेवा घडतां । भोग सहज घडे तो घडो ॥११४॥ आतां भोगवासना धरूनि मानसीं । प्रेमी संप्रज्ञात पावेल निश्चयेसीं । ते जावोनि भगवल्लोकासी । अवतारीं येती पुनः ॥ ११५ ॥ ते अमुक्त असती । परी समसुख भोगिती । याची ओळख न पुरे निवडतां व्यक्ति । परी आपुली प्रतीति आपण घ्यावी ॥ ११६ ॥ मुख्य सिद्धान्त धरूनि राहावा । मग भक्तिमुक्त्यैक्यतानुभव पहावा । अक्षय अविट करुणाकरा । आळंदीवरा आठवावें ॥ ११७ ॥ ज्ञानें मुक्ति प्रेमें भक्ति । चिदानंदीं निरहंकारवृत्ति । ऐसी दोहीं पक्षीं सहजस्थिति । मधुराद्वैतीं ओळखावी ॥ ११७ ॥ या उपदेशीं यत्न कीजे । तरी प्रकार होवोनी सिद्धि पाविजे ।

मृदु साधनदशा धरिजे । प्रेमतीव्र सिद्धदशा ॥ ११८ ॥ निदिध्यासनादिकासारिखें । मृदुतीव्र भेद मनोवृत्तिकें । एरवीं ब्रह्मानंदप्रेमीं निकें । अभेदत्व ॥ ११९ ॥ आणखी इच्छा असतां संयोगाची । विप्रलंभीं आविष्टता चित्ताची । मूर्ति पाहतां सद्गुरूची । संयोगेच्छाचि सुखदात्री ॥१२०॥

" परी गुरुआज्ञा धरिलें । देह गावीं असे एकलें ।
वांसरुवा लाविलें । दावें जैसें ॥ ३७८ ॥
म्हणे कैं हें विरडें फिटेल । कैं तो स्वामी भेटेल ।
युगाहूनि वडिल । निमिष मानी ॥ ३७९ ॥
ऐसें या गुरुग्रामीचें आलें । कां स्वयें गुरूनींचि धाडिलें ।
तरी गतायुषा जोडलें । आयुष्य जैसें ॥ ३८० ॥ "

( भावार्थदीपिका, अ० १३. )

एवं आचार्यवाणी । संयोगेच्छाचि वियोगलालनीं । कीं प्रियातें कंटाळा झणीं । होय संयोगीं ॥ १२१ ॥ तरी जेथ तया । सुख होय साविया । तेथ राहिलिया । आनंद वाढे ॥ १२२ ॥ ऐसी उत्तमानाधिकारीति । तथापि दासी मानावें मजप्रती । एवढी स्मरणसंयोगेच्छाप्रतीति । ठेलीचि राहे ॥१२३॥ तातवचनश्रुति।इये पद्माकरवाक्यस्मृति । उपबृंहणरीति । तेहि ऐका ॥ १२४ ॥

" पाती लिखि सुमुखि सुजान प्रिय गोविंदको श्रीयुत
सलोने श्याम सुखनि सने रहौ । कहे पदमाकर तेहारी ·
छेम छिन चाहियतु प्यारे मन मुदित घने रहौ । बिनती
इति है के हमेशहू मुहै तो निज पाइनकी पूरी परिचारिका
गनेरहौ । याहीमें मगन मनमोहन हमारो मन लगनि
लगाय लग मगन बने रहौ ॥१॥ लाओं हमैं भोगके सिखावो
कछु जोगकला लीन्है अंगरागकै परागनि घने रहौ ।
विनती इतीकपै हमारी प्रिय प्रीतमसों कहि बे को ऊधौ
उर आपने गने रहौ । अब उर अंतर इतीपै अभिलापरहि
बसहुं जहांई तहां आनंद सने रहौ । याहींते हमारे सुख
पगनि लगै गे तुम लगनि लगे हू प्रिय मगन बने रहौ ॥२॥

( पद्माकरकविः )

ह्या कवितेच्या चवथ्या चरणाचा अर्थ अशानेंच तुह्मी आमच्या पायां पडाल असा होण्याचा संभव आहे, पण तो तसा नसून आपण सुखी असल्यानेंच सुख आमच्या पायां लागेल असा आहे. अन्य अर्थ स्पष्टच आहे.

एवं संयोगीं स्वेच्छावियोगोपलालन । यया राधावल्लभमतांतून । अनुकूल म्हणोनि प्रमाण । आनहि दावूं ।। १२५ ।। निष्ठा रति भाव प्रेम । एवं चतुर्धा मुख्यभक्तिवर्म । प्रियादासकृतसुसिद्धान्तोत्तम । पाहतां मिळाले ।। १२६ ।। श्रवणादौ चित्तावेशें । लयाभाव जो उमसे । तया नांव निष्ठा ऐसें । ओळखिजे ।। १२७ ।। ध्यानीं स्फुरे इष्टमूर्ति । जे वियोगींहि नव्हे परती । तिये नांव परा रति । मुनि बोलती ब्रह्मवेत्ते ।। १२८ ।। जेविं झडपलिया भूतें । रडे, हासे, नाचे, निरुतें । तेवीं स्वानंदें वावरे सरतें । त्या नांव भाव ।। १२९ ।। प्रेमाचें लक्षण । कचित्संयोगीं वियोगस्फुरण । कचिद्वियोगीं संयोगस्फुरण । अंतःकरणानुरोधें ।। १३० ।। समाधींत परमेश्वर आत्मा पूर्ण । तोचि आहार्यभेदें व्युत्थानीं आपण । देखे सेव्यसेवकपण । प्रेमांगेंचि ।। १३१ ।। हें लक्षण बोलिले प्रियादास । परी ज्ञानाविण अस्थिति यास । आणि ज्ञान तंव राधावल्लभियांस । सम्मत नाहीं ।। १३२ ।। म्हणोनि यांचें बोलणें । हें भागवतश्लोकानुसारीत्वास्तव आह्मा प्रमाण । एरवीं बोलणाऱ्याकारण । प्रत्यय होता कीं न हा संशय मज ।। १३३ ।। जाहलिया ज्ञानसिद्धी । मग नलगे निर्गुणसमाधि । कीं ज्ञानें होतां अज्ञानावधि । ज्ञाननिधि तो महाक्षीण ।। १३४ ।।

" हा तत्वज्ञानदिवा । मरोनि इहीं लावावा ।
तरी हाही क्षीण लेवा । बोधरूपेंचि " ।। १३५ ।।

( अमृतानुभव, अ० ३, ओं० ८. )

ऐसें श्रीगुरुवचन । तेवीं ज्ञानाचें अनुसंधान । तेंहि ज्ञानिया बंधन । हें तातपूज्यचरण बोलती ।। १३५ ।।

" तैसा ज्ञानरूप आत्मा । ज्ञानेंचि आपुली प्रमा । करीतसे सोऽहंमा ।
ऐसा बंधू ।। " ( अमृ०, अ० ३, ओं० २३. )

म्हणोनि निर्गुणसमाधी पाहीं । ज्ञानिया करणें अवश्यक नाहीं । परी प्रेमातिरेकें लवलाहीं । समाधि घडे ॥ १३६ ॥ तो भक्तिबळें होय सगुणीं । यास्तव समाधि व्युत्थान दोन्ही । भक्तीचेचि भेद म्हणोनी । अनुभवी ज्ञानी निजसत्ता ॥१३७॥ व्युत्थानीं आहार्यभेदज्ञान । समाधौ सेव्यसेवक अभिन्न । परस्परां परस्परपण । प्राप्त हें विंदान विद्यापति वदती ॥ १३८ ॥ जैसा प्राणायामीं विद्यारण्यांस । इष्ट आहे अल्प श्वासोच्छ्वास । तैसा आम्हांहि भक्तिसमाधिमंतास । काचित् उद्गारविशेष इष्ट असे ॥ १३९ ॥ यास्तव विद्यापतीचें वचन । समाधिभावेंसमान । ते परिसोत सज्जन । वंगवाणी प्रमाण जें ॥ १४० ॥

" अनुखन माधव माधव सुमिरैत ॥ ध्रु० ॥ सुंदरि भोलि मधाइ ॥ ओ निज भावसो भावहि विसरल । अपन गुन लुबधाइ ॥ माधव अपरुब तो हर सिनेह । अपने विरहे अपन तनु जर्जर । जिवइते भेल संदेह । मोरहि सहचरी कातर दिठि हेरी छल छल लोचन पानी । अनुखन राधा राधा रटतिहि आधा आधा कहु बानी ॥२॥ राधासे जब गुन तहि माधव माधवसे जब राधा । दारुन प्रेम तबहु नहि टूटत बाढत विरहकि बाधा ॥ ३ ॥ दुहु दिश दारु दहने जैसे दगधइ आकुल कोट परान । ऐसन वल्लभ हेरि सुधामुखि कवि विद्यापति भान ॥ ४ ॥

( विद्यापतिकविकृत. )

अभिप्रायः– नवल प्रेमाचें विंदान । माधव म्हणतां अनुक्षण । अपूर्वस्नेहेंकरून । माधव आपण विरहबळें ॥ १४१ ॥ तैं आपुल्याचि विरहगुणीं । नयनीं वाहतां प्रेमपाणी । पावोनियां कृष्णपणीं । हा राधे म्हणोनि आपणा बाहे ॥ १४२ ॥ एवं राधामाधवस्थिति । तदपि न मोडे विरहवृत्ति । म्हणे कवि विद्यापति । नवल गति प्रेमाची ॥ १४३ ॥ येर आवघा अर्थ स्पष्ट । तें जाणती सज्जन वरिष्ठ । एवं भक्तिसमाधि अचाट । वृत्त्युद्गारविशिष्ट बोलिला हा ॥ १४४ ॥ व्युत्थानीं सेव्यसेवकपण । तेथही भरंवसा पूर्ण । जे प्राणप्रियाविण । न देखे आपणा

वेगळिक ॥ १४५ ॥ तिचेंचि नांव पतिव्रता । जे पतिहृदयीं सांठवे सर्वथा । जैसी मेघामाजीं विद्युल्लता । देखतदेखतां हारपे ॥ १४६ ॥ कां मेघ साठवे सागरीं । तेविं प्रिया आघवेंचि हृदयीं भरी । एवं सेवेचीहि परी । अगाधचि ॥ १४७ ॥ राधावल्लभाचे आचार्य । ज्या म्हणती हितहरिवंशवर्य । ते स्वग्रंथीं आर्य । बोलिले ऐसें ॥ १४८ ॥

" जोइ जोइ प्यारो करे सोहि मोहे भावे भावे मोहे जोइ सोइ सोइ करे प्यारे । मोको तो ठौर है प्यारेके नयननमें प्यारो भये चाहे मेरे नयननके तारे । मेरे तो तन मन धन प्राणहूं ते पीतम प्रिय आपने कोटिक प्राण प्यारे मोसे हारे । जय श्री हितहरवंश स्यामल गौर कहो कौन करे जल तरंग न्यारे ॥ १ ॥

भावार्थः– जें प्रियकर करतात तें मला आवडतें, व मला जें आवडतें तेंच प्रियकर करतात. प्रियकराचे डोळे माझें स्थान झाले असून प्रियकर माझ्या डोळ्याचीं पुतळीं झाले आहेत. शरीर, मन, धन व प्राण यापेक्षां मला प्रिय प्रियतम वाटतात व प्रियकरही सर्वस्व माझ्या हातचे झाले आहेत. सर्वांचें हित करणारे हरिवंशस्वामी म्हणतात, सांगा जलतरंग भिन्न कोण करूं शकतो ? ह्या वाक्यावरून राधावल्लभमतांतहि

" सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं न मामकीनस्त्वं ।
सामुद्रोऽहि तरंगः क्वचन समुद्रो न तारंगः ॥ "

ह्या शांकर अद्वैतभक्तीचा दंश सांपडतो; व अशी स्थिति प्रियादासांचीहि झाली आहे. हें असो;

सगुणसमाधींत प्रेमें तद्रूपता । आणि व्युत्थानीं सोपकरणादि रूपता । होवोनियां सेवक तत्वतां । सेव्याचि सेवी ॥ १४९ ॥ समाधि आणि व्युत्थानीं । सगुण सद्गुरु कैवल्यदानी । सेव्य हें मुकुटमणी । तात बोलिले ॥ १५० ॥

" तरी सकळ जळसमृद्धि । घेऊनि गंगा निघाली उदधी ।
कीं श्रुती हे महापदीं । पैठी जाहाली ॥ "

( भावार्थदीपिका, अ० १३, ओ० ६७२. )

कलीमाजीं अवघीं तीर्थें । गंगेंत निक्षेपिती स्वसामर्थ्यें । या पुराणोक्ति ' सकलजलसमृद्धि ' पदातें । वदले तात ॥ १५१ ॥ एवं सकल-

जल घेवुनी । गंगा गेली सिंधुमिळणीं । तरी मागाहूनि । येणें न खंडे ॥ १५२ ॥ अथवा तिहीं काळींचें जल । सागरीं नेतसे सकल । म्हणोनि पूर भरती तुंबळ । हा 'सकळजलसमृद्धि' पदार्थ ॥ १५३ ॥ तिया गंगेचिया ऐसी । साक्षात्कारानंतरहि आपैसी । आश्लेषता हृषीकेशी । वृत्ति न खंडे ॥ १५४ ॥ कां परब्रह्मीं तटस्थ श्रुति । तदपि सुचवितुजाये लक्षणावृत्ति । तेवीं भगवद्भक्ति । ज्ञानोत्तर उल्हसे ॥ १५५ ॥

" पैं गुरुकुळीं ऐसी । आवडी जया देखसी ।
जाण ज्ञान तयापासीं । पायिकी करी ॥ "

( ज्ञाने०, अ० १३, ३८४. )

एवं उमटतां सद्गुरुभक्ति । मग ज्ञान समाधीची नलगे रीति । जें स्वयेंचि ज्ञानप्रतीति । होय म्हणूनी ॥ १५६ ॥

" आणि अभ्यंतरिलियेकडे । प्रेमाचेनि पवाडें । श्रीगुरूचें रुपडें । उपासी ध्यानीं ॥३८५॥ हृदयशुद्धीचिया आवारीं । आराध्य तो निश्चळ धुर करी । मग सर्वभावेंसी परिवारीं । आपण होय ॥ ३८६ ॥ कां चैतन्याचिये पोवळीं । माजि आनंदाचिया राऊळीं । श्रीगुरुलिंगा ढाळी । ध्यानामृत ॥ ३८७ ॥ उदयिजतां बोधार्का । बुद्धीची डाळ सात्विका । भरोनियां त्र्यंबका । लाखोली वाहे ॥ ३८८ ॥ काळशुद्धि त्रिकाळीं । जीवदशा धूप जाळी । ज्ञानदीपें ओवाळी । निरंतर ॥ ३८९ ॥ सामरस्याची रससोय । अखंड अर्पित जाय । आपण भराडा होय । गुरु तो लिंग ॥ ३९० ॥ ना तरी जिवाचिये सेजे । गुरु कान्त करूनि भुंजें । ऐसी प्रेमाचेनि भोजें बुद्धि वाहे ॥ ३९१ ॥ "

( भावार्थदीपिका अ० १३. )

सगुणश्रीगुरु समाधि शुद्ध । तो इया ओवियांत बोलिला विशद । आणि मधुरभक्तीचि सिद्ध । मुकुट केला ॥ १५७ ॥ एवं सारांश ओवियांचा । पूर्ण अभिप्राय मी नेणें साचा । कें जननीस्तन्यासिंधूचा । शिशु पार पावे ॥१५८॥ तो क्षुधेपुरतें जाणें । तेविं माझें करणें । आघवें तंव जाणें । ज्याचें तोचि ॥१५९॥ एवं ब्रह्मवित् सगुणसद्गुरुसमाधि लक्षण ।

स्वयें बोलिले करुणाघन । व्युत्थानीं ससाहित्य सेवक आपण । होणें हेंहि प्रमाणपयोनिधि वदती ॥ १६० ॥

" किंबहुना यापरी । श्रीगुरुमूर्ति अंतरीं । भोगी आतां अवधारीं । बाह्यसेवा ॥४०३॥ तरी जीवीं ऐसे आवांके । म्हणे दास्य करीन निकें । जैसेनि गुरु कौतुकें । माग म्हणती ॥ ४०४ ॥ तैसिया साचा उपास्ती । गोसावी प्रसन्न होती । तेथ मी विनंति । ऐसी करीन ॥ ४०५ ॥ म्हणेन तुमचा देवा । परिवार जो आघवा । येतुले रूपें होवावा । मीचि एक ॥४०६॥ आणि उपकरतीं आपुलीं । उपकरणें आथि जेतुलीं । माझीं रूपें तेतुलीं । होआवीं स्वामी ॥ ४०७ ॥ ऐसा मागेन वरु । तेथ हो म्हणती श्रीगुरु । परी तो परिवारु । मीचि होईन ॥ ४०८ ॥ उपकरणजात सकाळिक । तें मीचि होईन एकैक । तेव्हां उपास्तीचें कौतुक । देखिजेल ॥ ४०९ ॥

( भावार्थदीपिका अ० १३. )

एवं जो सगुणसमाधी । तेथ आहार्यभेद विद्यांकुरनिधि । उमटतां व्युत्थानीं सिद्धि । सेवाप्रसादु ॥ १६१ ॥ तया श्रीगुरुप्रसादेंचि बरवें । ऐसा विनटेन सद्गुरुसेवे । जे उपकरणादि आघवे । मीचि होईन ॥१६२॥ येथ उपासना तरी उपकरणादौ स्वदृष्टि कीजे । आणि भक्ति तरी उपकरणादि आपणचि होईजे । हें रहस्य हृदयाचि उमजे । येरा न कळे ॥ १६३ ॥ हा प्रकारगुण निका । समन्वयिला अर्थी एका । कीं चित्तावेश नेटका । समाधिव्युत्थानीं गुरुपदींच ॥ १६४ ॥ ज्ञान झालिया सुखोत्तरु । मुक्तीचा निःशेष निर्धारु । आणि जीवन्मुक्तींत तव भगवान् सद्गुरु । समान दोघे ॥ १६५ ॥ यालागीं आळंदीशसेवा । हा अग्रहार वाटे देवाधिदेवा । याचकत्व रमाधवा । दातृत्व दासा ॥ १६६ ॥ असो येणें अलंकारें । द्वितीयतत्व कारण पुरें । सेवसी बोलिलें निर्धारें । आतां तृतीय ऐकावें ॥ १६७ ॥ गुणद्वेपरहित गुणवितृष्णा । आणि गुणांचें अर्पण कृष्णा । येणेंचि हारपे तृष्णा । सुखावधीची ॥ १६८ ॥ येथहि प्रमाणशिरोमणी । बोलिले जे वाणी । तेही ब्रह्मवेत्ते मुनी । अवधारोत ॥ १६९ ॥

" नाना वेटाळूनि जीवितें । गुणागुण उचितें । प्राणनाथासि उचितें । दिधलें प्रिया ॥ ३७३ ॥ तैसें सबाह्य आपुलें । जेणें गुरुकुळीं वोपिलें । आपणपें केलें । भक्तीचें घर ॥ ३७४ ॥

( भावार्थदीपिका, अ० १३. )

एवं गुणागुणा अधिष्ठान । जाहलिया श्रीगुरुचरण । तैं तयांचें अर्पण । तेथेंचि होय ॥ १७० ॥ मग प्राणनाथातें प्रिया । समर्पी भावा आघविया । तेविं आपणासहित श्रीगुरुपाया । समर्पिलें होय ॥ १७१ ॥

" ह्मणोनि शिष्य आणि गुरुनाथु । या दोहीं शब्दांचा अर्थु । श्रीगुरुचि परी होतु । दोहीं ठायीं ॥ ६१ ॥

( अमृतानुभव अ० २. )

येणें श्रुतिबोधें । तया आत्मार्पणछंदें । सगुणसमाधिप्रबोधें माधूयेंहि घडे ॥ १७२ ॥ आत्मार्पणीं ये सेवकता । तैं पृथगिव गुणार्पणीं सेवासत्ता । येणें आक्रमे चित्ता । परवैराग्यही ॥ १७३ ॥ हें एक रहस्य अंतर्गत । गुणद्वेष असतां गुण न सुटत । सत्ववृद्धिहि यथार्थ । न होय तेणें ॥ १७४ ॥ सत्ववृद्धि करितां द्वेषावा रजोगुण । परी द्वेष हें तंव रजाचेंचि लक्षण । हें कोडें योगिया अति कठीण । भगवद्भक्तीविण उकलेना ॥ १७५ ॥ रजाचे ठायीं करोनि प्रीति । सत्ववृद्धि करावी निश्चितीं । तरी रागही रजाची लक्षणसंपत्ती । येणें अप्रतीति साधका ॥ १७६ ॥ आतां उपेक्षा करावी आपण । तरी उदासत्व पुरुषाचें लक्षण । पुरुषविवेक सत्ववृद्धीविण । सर्वथाहि घडेना ॥ १७७ ॥ एवं ज्ञानमार्ग अथवा योग । हे खवाहनाचे प्रसंग । उमारंग वा रमारंग । नाश्रयितां हृदयीं ॥ १७८ ॥ अनुभवाविण शास्त्रपाठें । क्रिया करितां श्रद्धा नेटें । तत्वाविण फळ गोमटें । हाता न चढे ॥ १७९ ॥ वेदावरी वळकट श्रद्धा । तेणें आहुती देतां प्रसिद्धा । अमृत मिळे मृत्युविद्धा । अमर व्हाया ॥ १८० ॥ परी तें अमर नाहीं अमृत । हें बाहिया सांगे वेदान्त । म्हणजे तत्वाविण निश्चित । क्रियाफल नित्य न सांपडे ॥ १८१ ॥ म्हणोनि तत्वाचा विचार । करावा जंव साचार । तंव आत्मया आंगीं निर्धार । आधींच देणें कर्तृत्व ॥१८२॥ यालागीं ऐसी असावी रीति । जे

शब्देंचि व्हावी निजप्रतीति । ते उत्तमाधिकारियाप्रति श्रवणेंचि घडे ॥ १८३ ॥

" कानावचनाचिये भेटी । सरिसाचि जो किरिटी । वस्तु होवोनि उठी । आपें आप ॥ "

( ज्ञानेश्वरी. )

सिद्धान्त प्रगट वचनें येणें । आणि मननिदिध्यासन जरी होणें । तरी श्रवणावृत्तिचि करणें । श्रीगुरुसंयोगीं ॥ १८४ ॥ याहीहूनि मध्यमा । उपपत्यादि गरिमा । असो आडकथनसीमा । श्रोत्रकठोरा ॥ १८५ ॥ येणेंहि अकर्तृत्व लाभे । प्रारब्धभोगारंभें । सत्वसुखसौरभें । लाचावे मन ॥ १८६ ॥ परी गुणद्वेष वा गुणप्रीति । धरितां नोहे मनःपूर्ति । यालागीं गुणार्पणरीति । सेवासंपत्ति सुखप्रद ॥ १८७ ॥ साधकें सत्वाधिष्ठान । भगवद्ध्यान भगवद्भजन । येणेंचि गुणद्वेषाविण । सत्व वाढे ॥ १८७ ॥ ज्ञान झालिया गुणप्रवृत्ति । गुणवैतृष्ण्य सांपडे हातीं । परी गुणार्पणताप्रतीति । सेवाचि करी ॥ १८८ ॥ साधका सिद्धा दोघांसी । गुणार्पणप्रतीति सेवेसरिसी । सरहस्यें तियेसी निरोपूं आजी ॥ १८९ ॥ आत्मार्पण निजसुख । येणें सुखी निजनायक । आणि माधूर्यपातिव्रत्य चोख । तनुमनार्पण तेणें गुणें ॥ १९० ॥ तें हें सत्वसमर्पण । जे दैव संपादी सुखभोग आपण । ते भोगचि करितां भगवदर्पण । अभोक्तृपण आपणातें ॥ १९१ ॥ एवं ज्ञानें आत्मा जाणिला होता । तो भक्तीनें तैसाचि अनुभवा येतां । मग गुणगुणीभाव सुटोनि तत्वतां । ब्रह्मानंदता सांपडे करीं ॥ १९२ ॥ आतां दुःखभोग संपादावया । प्रारब्ध उपजवी राजसी माया । ते अर्पितां यादवराया । न ये आत्मया दुःखभुक्पण ॥ १९३ ॥ ननु पापप्रारब्ध दुःखदायी । तें वियोगें भक्ता नुरे कांहीं । आणि ध्यानसंयोगें सुखप्रारब्धहि । नुरे ही लवलाहीं भागवतोक्ति ॥ १९४ ॥ इये आशंके समाधान । कीं दुःखाचें द्विविधपण । एक तें प्रियवियोगलक्षण । आणि अप्रियसंयोगलक्षण अन्य ॥ १९५ ॥ तेथ प्रियवियोगभोगसंपादक पाप । भगवद्वियोगोपनाशी साटोप । ननु तरी अप्रियसंयोगभोगसंकल्प । अर्पावा काय भगवंतीं ॥ १९६ ॥ काय सर्प मूर्तीसि वहावा । विंचू देवा डसवावा । कीं देवळा अग्नि लावावा । रजार्पण म्हणोनी ॥ १९७ ॥ हाही पूर्वपक्ष वृथा । ग्रंथ पूर्वापर नाय-

कतां । असो समाधान आतां । ऐकिजे श्रोतीं ॥ १९८ ॥ केवळ सात्विक प्रारब्ध । उपजवी सुखवृत्ति शुद्ध । तयाचा अर्पणप्रकार विशद । बोलिला पूर्वी ॥ १९९ ॥ आतां बाह्यभोग संपादन । प्रारब्ध करी ते प्रकार दोन । सत्वावष्टब्ध रजेंकरून । रागजन्यभोग संपादी ॥ २०० ॥ आणि तमावष्टब्ध रजोमिषें । द्वेष्यभोग संपादी विशेषें । तेथ रागभोगाचि अर्पितां परेशें । सेवा ह्मणिजे ॥ २०१ ॥ रागचि सांडोनि लौकिकरीति । जें लाहे अलौकिक भावसंपत्ति । तैं पराभक्तिरसप्रवाहवृत्ति । अनध्यस्तविवर्तभगवंतीं आवेशे ॥ २०२ ॥ " सा परानुरक्तिरीश्वरे " । हें सूत्र शांडिल्यमुनिवरें । बोलिलें तें लक्षण अनुकरे । सेवेचि विषयीं ॥ २०३ ॥ शरीर जाणलिया वृथा । मग आश्रय हो कां द्वेष्यपदार्था । येणें दुःखाविरोधिता । सामान्य आत्मया ॥ २०४ ॥ मातें नसावे द्वेष्यभोग । एवं ज्ञानानंतरहि जो अहंतायोग । तो प्रियातें नसावे द्वेष्यभोग । ही वृत्ति चांग निवारी ॥ २०५ ॥ भूतांवरी सात्विक ममता । याहूनि दुःखद राजस देहाहंता । ह्मणोनि " भूतांची दया हें भांडवल संतां " । श्रीतुकाराम वदती ॥ २०६ ॥ परी भूताधिष्ठानीं चित्त लग्न । होणें हेंचि भक्तिलक्षण । ह्मणोनि द्वेष्यभोग सहावे आपण । आणि प्रियभोग अर्पावे प्रिया ॥ २०७ ॥ याचेंचि नांव सेवा । ते देशकालस्वभावा । आश्रवोनि निजभावा । प्राचूर्य लाहे ॥ २०८ ॥ तेचि धर्मानुसार जरी होय । तरी मध्यमताचि लाहे । आणि भावानुसार होय । उत्तम ती ॥ २०९ ॥ तथापि भावांत धर्मानुवृत्ति । मिळेचि हे रहस्यस्थिति । जे सुकृत शोधित भगवद्भक्ति । ह्मणोनियां ॥२१०॥ आणि भावहि उपजतां । तरी धर्म हो न हो सेव्यार्था । परी सेवक स्वकार्य करितां । उपजावा धर्मू ॥ २११ ॥ आतां तया प्रकारें । देशकालधर्मभावानुसारें । वाङ्मनशरीरचेष्टामात्रें भजावें देवा ॥ २१२ ॥ माझा सुकुमार पूतनारी । मी न प्रकटवीन बाहेरी । जे लोककामना महावैरी । लावील दृष्टि ॥ २१३ ॥ परी रागजभोग अर्पावया । मग मूर्ति आंतौती करी तया । तेणें शरीरचेष्टा आघविया । समर्पितु जाय ॥ २१४ ॥ रिकामा नोहे अर्धक्षण । शरीरें प्रियदास्याविण । जे मधुरभक्तीचें लक्षण । आंगीं ह्मणोनि ॥ २१५ ॥ पतिव्रताशरीरें दास्य करी । मनें कल्याण

चिंती कृपाभरीं । जीवें समता सर्वांपरी । स्वकांतयोग्य ॥ २१६ ॥ एवं दास्य, वात्सल्य, आत्मभाव । एकवटतां माधूर्येंठेव । ते सेवाप्रसंगीं सावेव । दृढावे भली ॥ २१७ ॥ ह्मणोनि दास्य शरीरें करी । जे सेवेची अगाध परी । स्वरागेंचि सुंदर परी । पदार्थ वाहे ॥ २१८ ॥ जया दैन्यदेहभाव । जाय तो मांडी उपाव । चराचरीं सख्यभाव । सहायार्थ धरी ॥ २१९ ॥ ह्मणे आजि पूजितां प्रिया । मज असमर्था एकटिया । सहाय होवावें सखिया । निजांगें तुह्मी ॥ २२० ॥ श्रमु प्रियातें बहु कार्य करितां । यालागीं मंदिरीं बैसवावें आतां । ह्मणोनि पाषाणां समस्ता । सख्यचि करी ॥ २२१ ॥ जरी तमोगुण दैवें । जीवन्मुक्ता उत्पन्न नोहे । तरी गुणाविण गुण नोहे । ह्मणोनि तम अर्पी पाषाणार्पणें ॥ २२२ ॥ मग स्थावरांचें सत्व घेवोनि । करी मंदिर प्रियालागुनी । तेथ शास्त्रप्रासाद अनुगुणीं । आधींचि धरी ॥ २२३ ॥ करितां शास्त्रउल्लंघन । ह्मणे पूजका ये रजोगुण । हाचि मानोनि अपशकून । घे शास्त्रप्रमाण प्रासादा ॥ २२४ ॥ एवं धर्मानुसार मंदिरीं । परी शास्त्रप्रतिबंधें अंतरीं । समाधान नाहीं ह्मणवोनि घरीं । विग्रह करी आनानें ॥ २२५ ॥ मग कनकरत्नसख्यवशें । आसनपात्रा निर्मी अपैसें । जलसहायें स्नानमिसें पूजी देवा ॥ २२६ ॥ तेथ सख्य परस्परभूतां । येणें चंदनाद्यर्था । समर्पित निरुता । आनंदु पावे ॥ २२७ ॥ जो जो ऋतु होय जेव्हां । तयाची चर्या करी तेव्हां । कालावच्छिन्न रागभावा । अर्पी भगवंतीं ॥ २२८ ॥ धनावच्छिन्न रागभाव । तो अर्पावया सावेव । देशोदेशींचे वस्तुभाव । घेवोनि भगवंत पूजी ॥ २२९ ॥ रागें जे सुंदर । शास्त्रें जे पवित्र । उपयोगें जे देणार । सुलभ सुख ॥ २३० ॥ ते ते अवघे पदार्थ । करी कृष्णार्पण न धरूनि स्वार्थ । अपराधभयें सभीत । आविष्टचित्त वावरे ॥ २३१ ॥ अहो उष्णकाळीं उशिरां । चंदना कां चंद्रकरा । किंवा वाहोनि व्यजनवारा । शार्ङ्गधरा संतोषवी ॥ २३२ ॥ पर्वणी साधी उत्सवें । दिवस साधी नियमासवें । घडी घडी प्रकार नवे । प्रेमाचे वाढवी ॥ २३३ ॥ एवं वर्षादि काळीं । वाराणस्यादि स्थळीं । कनकादि वस्तुमेळीं पूजितु जाय ॥ २३४ ॥ क्षण एक ह्मणे मियां । अहा प्रभूतें अकर्तिया । श्रमवोनि अर्पिल्या क्रिया । ह्मणोनि त्रिकाळ

॥ २३५ ॥ मग समष्टिहृदयडोल्हारां । कां व्यष्टिहृदयमंचकपाल्होरा । वरी पहुडवी सुकुमारा । समाधानसुखें ॥ २३६ ॥ तें प्रारब्ध नेटकें नियत । निकें भोगपात्र वाढित । तें पुढती जागवित । विनवोनि नम्र ॥ २३७ ॥ एवं सेवा करितां । दिवसरातींचीं नेणें वार्ता । जैसा काळ जन्मलाचि नव्हता । परब्रह्मीं ॥ २३८ ॥ सुखभरी अर्पी पदार्था । श्रद्धा नवी नवी भजतां । जेवीं व्यक्त व्यापकसत्ता । सर्व पदार्थीं ॥ २३९ ॥ मग हृदयींच्या वासना । त्याही अर्पी हृदयरमणा । जणुं आनंदलेशें आनंद जना । ते पूर्तिस्तव आनंदघनामाजि बुडवी ॥ २४० ॥ हें असो जितुक्या वृत्ति । त्या तीव्र होवोनि पदार्थ निर्मिती । मग स्वबळें संपादिती । भगवत्सेवा ॥ २४१ ॥ म्हणोनि संयोगीं वियोगोपलालन । करितां सेवक सौभाग्यसंपन्न । अप्रमाद सेवालक्षण । हें सिद्धार्थ जाण निरूपिलें ॥ २४२ ॥ कीं सागर प्रेमें नदी निघतां । वाणीचि शिणे ओघ वानितां । तेविं प्रियसेवाउल्हास अगणितां । निर्देशिले मात्र ॥२४३॥ सकळमनोरथांची पूर्ती । श्रीज्ञानेश्वरकृपामूर्ति । ओवियाप्रबंधें तदीय कीर्ति । गातां स्फूर्ति पुढेंहि हो ॥ २४४ ॥ इया ओविया श्रीगुरुराजा । सद्भावें पुजोनि ओजा । पुढें निरूपणीं पैजा । निखिळ बांधिल्या ॥२४५॥ श्रीज्ञानेश्वरपंचाक्षरी । भूतभावा झाडणी करी । आतां निरखिलें निर्मळ नेत्रीं । निजनिधान ॥ २४६ ॥ पुढें प्रसंग नागर । तो परिसोत श्रोते चतुर । परी आधीं आळंदीश्वर । धरावा हृदयीं ॥ २४७ ॥ श्रीज्ञानेश्वर-मायमाऊली । स्मरणेंचि वत्सा पान्हावली । करितुचि आहे साउली । अखंड कृपेची ॥ २४८ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे, ओवीछंदबद्धे, ' प्रेमनिकुंजे, ' सेवातत्वनिर्देशपूर्वक ' सिद्धसेवाप्रकारनिर्णयो ' नाम चतुर्थी वल्ली.

॥ श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु. ॥

❀ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ. ❀

# प्रेमनिकुंज पंचपदी.

जय, जय, हृदयरमणा सद्गुरो । जय, जय, निजजनकामकल्पतरो । जय, दीनतारण-धैर्यमेरो । आळंदीपते ॥ १ ॥ अहो जी समर्थांचिया आश्रयें । कवणा थोरपणा न ये । बोलिला कीं स्वामी स्वयें । पुष्पसंगें थोर दोरा ॥२॥ सिंहें मस्तकीं बैसविली । ह्मणवोनि अजा गजपूज्य जाहली । तुमचिया नामाची सत्ता भली । जे यशस्वी करी अवघीकडे ॥ ३ ॥ कोणी नारी तुमचे पायीं । प्रेम धरोनि जाहली विदेही । तियेवरी कुदृष्टि ठेवोनि लवलाहीं । चतुर्भुजरूप घेतलें जारें एकें ॥ ४ ॥ मग तया दोघां संगीं रायें । धरवूनि नेलें चावडिये । तैं जारें स्मरले तुमचे पाये । कीं माऊलि ये धांव आतां ॥ ५ ॥ मी जरी महापापी । तरी वरि वरि जाहलों भवद्रूपी । शरण येतां ऐसिया संकल्पीं । तुह्मी तात्काळ पावलेती ॥ ६॥ तुह्मासि शत्रुता केली जिहीं । कैवल्य दिधलें त्यानांही । मग माझी लेंकुराची नवाई । पुरवाल येथें काय शंका ॥ ७ ॥ ह्मणवूनि जी करुणाकरा । मियां धरला तुमचा आसरा । आतां उचित तें करा । ग्रंथ दातारा वदवा पुढें ॥ ८ ॥ येणें स्तवनें श्रीगुरुरावो । प्रेरी मति आणि उत्साहो । जो आळंदीवल्लभ ज्ञानदेवो । सच्चिदानंद दीनबंधु ॥ ९ ॥ मागां केलेंचें निरूपण । यथामति जाहलें संपूर्ण । आतां फलानुसंधान । तेंहि ऐकिजे ॥ १० ॥ गंगा जरी मिळे सागरीं । तरी मिळताचि राहे वरच्यावरी । प्रवाहाची कुसरी खंडूंचि नेदी ॥ ११ ॥ गंगापणासी न संडी । आणि अभेदें बैसे समुद्रमांडीं । तैसी जोडावी जोडी । भगवत्सेवेची ॥ १२ ॥ भगवंत होवोनि भगवंत सेविजे । भक्ति ऐसीचि कांहीं उपजे । हें बोलिलें गुरुराजें । आळंदीवरें ॥ १३ ॥

" तैसी क्रिया कीर न साहे । परी अद्वैतीं भक्ति आहे ।
हें अनुभवाचि जोगें नोहे । बोला ऐसें " ॥ ( ज्ञानेश्वरी. )

परी ते अद्वैतभक्ति कैसी । जेविं व्यतिरेकांतीं अन्वय जगासी । तेविं प्रीतिवृत्ति सद्गुरुदेवासी । अवलंबितु ॥ १४ ॥

" अहो ऐक्याचें मुद्दल न ढळे । आणि साजिरेपणाचा लाभु मिळे । मग स्वतरंगाची बुकुळें । तुरंबु कां पाणी ॥ अ० ॥ १-५९ ॥ अखताचि देवता । अखतीचि असे न पूजितां । मा आखतीं काय आतां । पूजों जावी ॥९-४३॥ ऐसाही स्वामिभृत्यसंबंधा । लागीं उठती श्रद्धा । तरी देवोचि नुसुधा । कामविजे ॥ ९-३८ ॥ देव देऊळ परिवारू । कीजे कोरोनि डोंगरू । तैसा भक्तीचा व्यवहारू । कां न व्हावा ॥ ९-४१ ॥ तैसें ग्रासूनि दुसरें । स्वरूपीं स्वरूपाकारें । आपुलियेपणें उरे । बोधु जो कां ॥३-३१॥ तें ऋणशेष वाचा इया । न फेडवेचि मरोनियां । ते पायां पडूनि मियां । सोडविलें ॥ ३-३२ ॥ ( अमृतानुभव. )
" आम्हा भोगमोक्षाचिया ठायीं । इये श्रीमूर्तीवांचूनि नाहीं । ह्मणूनि तैसाचि साकार होई । हें उपसंहरीं आतां ॥ " ( ज्ञानेश्वरी, अ० ११. )

ऐसी श्रीतातचरणोक्ति । ह्याचा अभिप्राय येणें रीति । कीं प्रारब्धभोग जे जीवन्मुक्ति । तेथ श्रीमूर्तिवीण दृष्टदुःख निवृत्त नव्हे ॥१५॥ आणि कैवल्य जो अपवर्ग । तेथही निजस्वरूपें चांग । उरेचि भगवदनुराग । निजभक्तातें ॥ १६ ॥ कवणांचें ऐसें मत । कीं मुक्तीमाजी असे द्वैत । परी ते श्रुतियुक्तिअसंमत । आणि विशिष्टाद्वैतही तैसें ॥ १७ ॥ अद्वैत द्वैत सत्य दोन्ही । तयाची एकेठायीं मिळणी । हें न येचि प्रमाणीं । शतकल्प विचारितां ॥ १८ ॥ सत्यमिथ्याचा विरोधु । एकाधिकरणीं अप्रसिद्धु । ह्मणोनि आमुचिये मतीं सिद्धु । ईश्वरीं मिळे ॥ १९ ॥ महाभारतीं मोक्षधर्म । तेथ मुक्तउपासना सांगे भीष्म । आणि जीवोपासना तो महाभ्रम । हें ब्रह्मसूत्रीं बोलिले ॥ २० ॥ तो वाक्यविरोधु निवटावया । मुक्त लाभे निरवग्रहऐश्वर्या । हाचि सिद्धान्त येर वायां । साधिल्या मुक्ति ॥२१॥ ननु सगुणसायुज्यगता । संकल्पें सृष्टिभोगार्था । होये तदपि सावग्रहता । बोलिली जगद्व्यापारवर्ज्याधिकरणीं ॥ २२ ॥ ऐका येथ समाधान । जे सायुज्य पावती सगुण । तयांचें अंतःकरण । निवटेना कदा ॥ २३ ॥ अळी ध्यानें झाली भिंगोटी । ते बैसे एकजातीय

पेटीं । परी व्यक्तिभेदाचिया वाटी । न चुके कदा ॥ २४ ॥ कां जळीं मिळविलिया साखर । ते दिसेना परी रस मधुर । तेवीं सगुणीं अभेद झालिया साचार । भेद अंतर चुकवी ना ॥ २५ ॥ ज्ञानावांचोनि अविद्यानिवृत्ति । ध्यानें नोहेचि कल्पांतीं । कीं ध्यान कर्माचिया हातीं । ह्मणोनियां ॥ २६ ॥ यालागीं सगुणोपासका । साक्षात्कार नोहे निका । तेणें अंतःकरणभेदें आवांका । शक्तिभेदाचा ॥ २७ ॥ अहो सत्यसंकल्पादि गुण । तेणेंहि ब्रह्म सगुण । मग सगुणसाक्षात्कारियाकारण । सगुण सायुज्यांत भेद कां ॥ २८ ॥ आणि निर्गुणसाक्षात्कारी जे होती । ते सगुणईश्वरीं कैसे मिळती । हें साच परि सावचित्तीं । समाधान आयिका ॥ २९ ॥ समसत्तेंत साधकबाधकता । आणि विषमसत्तेंत तदविरोधिता । ह्मणोनि सामान्यचेतनीं पाहतां । सत्यसंकल्पादिगुणवत्ता अविरोधी ॥ ३० ॥ यदपि व्यापार जक्षणादि । चित्सामान्या अविरोधी । तथापि तयाचा उपाधि । घे निजांगीं जीव स्वयें ॥ ३१ ॥ भोक्त्यावांचूनि भोग । सुखदुःख नुपजविती चांग । काय आधार गगना रंग । रजाचा चढे ॥ ३२ ॥ कीं औषधीअग्नींत जीव असती । ते औषधीजीवभोगा न भोगिती । कीं विटादि व्यवहाराप्रती । लिंपे न दीपू ॥ ३३ ॥ तेवीं आधारमात्रेंकरून सामान्यचिति अहंतेविण । जक्षणादिभोगाकारण । अलिप्त जाण पूर्णत्वें ॥ ३४ ॥ जीवासी जोंवरी आरूढाहंता । तोंवरीच भोगी जक्षणाद्यर्था । विदेहमुक्तींत अविद्या निवृत्ता । आरूढाहंता न राहे ॥ ३५ ॥ यालागीं जक्षणादि । तयातें न भासती कधीं । परी ऐश्वर्यसत्यसंकल्पादि । अनावृत्तिसिद्ध ह्मणोनि राहे ॥ ३६ ॥ जक्षणादि कल्पी आवृती । तियेची ज्ञानें होय निवृत्ती । आणि ईश्वरा तंव अनावृत्ति । सर्व वेदान्तीं अंगिकारू ॥ ३७ ॥ ईश्वरीं मानितां आवरण । तरी वेद होतील अप्रमाण । मग मोक्षाचें साधन । लोपेल आघवें ॥ ३८ ॥ नित्यसुखाची प्रवृत्ति । जीवाचिये ठायीं सर्वदा प्रतीति । निरोधमात्रें निवृत्ति । नोहे तियेची ॥ ३९ ॥ यास्तव ईश्वराचे ठायीं । आवरण मानणें उत्तम नाहीं । ह्मणोनि सत्यसंकल्पादिक पाहीं । अनावृतिसिद्ध ॥ ४० ॥ उपाधिचिया पाठीं । जीवकल्पनापेक्षेचे पोटीं । उघडली आहे पेटी । ईश्वरऐश्वर्याची ॥ ४१ ॥ तयीं अपेक्षाकृतऐश्वर्या ।

परानुग्रहार्थेचि मियां । विरोध नाहीं स्वीकारलिया । हा सगुणवस्तुसाक्षात्कारू ॥ ४२ ॥ जयाची जैसी वस्तुस्थिति । ती तैसीच जाणणें साक्षात्कार म्हणती । ह्मणोनि ज्ञानाविण जीवाप्रती । सगुणसाक्षात्कृतिहि शुद्ध नोहे ॥ ४३ ॥ ध्यानें जो सगुणसाक्षात्कार । तो कर्तृभावनागोचर । आणि कर्तृभावनाप्रकार । नित्यसिद्ध नाहीं ॥४४॥ सत्यसंकल्पादि गुण । यावत्संसार नित्य पूर्ण । जो सायुज्य पावला सगुण । तो तंव ये परतोन । अथवा ज्ञानें मुक्त होय ॥ ४५ ॥ म्हणोनि ज्ञानावांचूनि कहीं । सगुणसाक्षात्कार शुद्ध नाहीं । हें मी म्हणें लवलाहीं । युक्तिसिद्ध ॥ ४६ ॥ अलंकाररूपें पाहुनी । जो लांचावला राहे मनीं । तो पितळेचियाहि भूषणीं । हेममोल वेंचे ॥ ४७ ॥ ओळखलिया कनक शुद्ध । भूषण भोगी महानंद । तेवीं ज्ञानें ओळखतां निर्गुण शुद्ध । परमानंद सगुणसाक्षात्कारीं ॥ ४८ ॥

पूर्वपक्ष— ननु एक जाहलिया मुक्त । तो सगुणईश्वरीं मिळत । इतर जीवा अपेक्षित । ईश्वर ह्मणोनि ॥४९॥ तुह्मां तंव एकजीव संमत । तो झालिया कीर मुक्त । शुद्धचैतन्यचि होय प्राप्त । हें ' अपय्यदीक्षित ' बोलिले ॥ ५० ॥

सिद्धान्ती— उत्तर ऐकें लवलाहीं । अपय्यादीक्षितवरें कहीं । एकजीववाद नाहीं । विचारिला अज्ञोनी ॥ ५१ ॥ घेवोनियां एक अज्ञान । तयाच्या अंशनाशेंकरून । मुक्त होय सगुणेशसंपन्न । हें ' रत्नप्रभाकर ' वचन बोलिले ॥ ५२ ॥ अन्यजीवाविद्याराचित । ईशैश्वर्य दीक्षितां संमत । परी पुसतों मी तेथ । तमोविद्याकृत कीं सत्वाविद्याकृत असे ॥ ५३ ॥ तमोविद्या कल्पावया । समर्थ नाहीं ईशैश्वर्या । सत्वाविद्या तंव दीक्षितवर्या । अंतःकरणाविण मान्य नाहीं ॥ ५४ ॥ तया अंतःकरणा आधार । सामान्यचैतन्य हो कां ईश्वर । अंतःकरणीं बहुताकार । जीवाभास ॥ ५५ ॥ तो एक जीवाभास प्रमाता । जरी कां मुक्त होता । अन्यजीवाभाससत्वाविद्याकृता । सत्यसंकल्पाद्यर्थां हानि नाहीं ॥ ५६ ॥ वास्तव एकजीववादियांप्रति । वदतां ये मुक्ता सगुणेशभावापत्ति । किंवा जीवप्रतिबिंब बिंबेश्वराप्रती । अंगिकारिती एकजीववादी ॥ ५७ ॥ एवीं ज्ञानें जीवन्मुक्त ।

झालिया जरी स्वप्न प्राप्त । व्याघ्र देखिलिया आरंबळत । सवज्ञत्व यथार्थ विसरोनि ॥ ५८ ॥ यद्यपि ज्ञानें अविद्याआवरण । जाये तथापि प्रारब्धें प्रतिबिंबभान । यास्तव जीवन्मुक्ता सर्वज्ञपण । स्वाकर्ता असोन स्वप्नसृष्टीचें नाढळे ॥ ५९ ॥ यद्यपि हिरण्यगर्भासम । सर्वगर्वात्मा नव्हे मेघश्याम । जागृतीं स्वप्नीं साक्षित्वें देखे मुक्तवर्म । यालागीं पुरुषोत्तम तोहि ॥ ६० ॥ तथापि मुक्त स्वप्नीं व्याघ्र देखतां । जैसें कां भय उपजे चित्ता । तेवीं न उपजे समर्था । पुरुषोत्तमा ॥ ६१ ॥ स्वप्नव्याघ्रदर्शनीं मुक्त । ब्रह्मानुसंधान धरीत । तैसा नोहे भगवंत । लीलाचि वाटत सृष्टि ज्या ॥ ६२ ॥ इतुकेनि भेदें । जीवन्मुक्तीत अभेदें । आनंदरूपिणी नांदे । भगवद्भक्ति ॥ ६३ ॥ हिरण्यगर्भ सर्वाभिमानी । परी कारणसृष्टी अज्ञानी । परमात्मा अकुंठित ज्ञानी । म्हणवोनि भेदू ॥ ६४ ॥ येणेंहि भेदव्यपदेशें । एकजीव/ ईश्वर उमसे । दृष्टिसृष्टिबोधक वासिष्ठीं असे । हाचि अनुवादू ॥ ६५ ॥ मुमुक्षुप्रकरणीं यत्न निरूपितां । प्रयत्नें जीवास विधिहरिहरता । बोलिली आणि ऐंदवकथा । कीं दशब्रह्मता तयातें ॥ ६६ ॥ एवं जीव ब्रह्माहरिहर । परी नित्यमुक्त दुसरे ईश्वर । तेहि ब्रह्माहरिहर । म्हणिजेती ॥ ६७ ॥ ईश्वर हरिहर नित्यमुक्त । हें वासिष्ठनिर्वाणप्रकरणीं नवमाध्यायांत । बोलिलें आहे म्हणोनि एकजीववादांत । अंगकारितां भगवंत विरोध न ये ॥ ६८ ॥ तेथ सत्यसंकल्पादिगुण । प्रतिबिंबापेक्षिकबिंबत्वारोपलक्षण । म्हणोनि तदवच्छिन्न । बिंबभूत परमात्मा मुक्तप्राप्य ॥ ६९ ॥ तत्पदपरमात्मा अपरोक्ष हृदयीं । हें मीं बोलिलें बहुठायीं । तेंचि दहर मुक्तजीवप्राप्य लवलाहीं । समन्वयाध्यायीं सूत्रभाष्यकार वदले ॥ ७० ॥ अविरोधाध्यायींहि तैसें । दश सुचविती आपैसे । आणि साधनाध्यायींहि विशेषें । बोलती संध्यविचारीं ॥ ७१ ॥ संध्यधिकरणाभिप्राय पाहतां । जीवासी स्वप्नसृष्टी सत्यसंकल्पता । ते जागृत्सृष्टी तत्वतां । अविद्यावशें तिरोहित ॥ ७२ ॥ तेंचि विद्यावशें निवृत्त झालिया । आविर्भवें जीवा यया । म्हणोनि मुक्तातें लवलाह्या । सगुणेश्वरभावापत्ति स्पष्ट ॥ ७३ ॥ एवं फलाध्यायीं मुक्तप्राप्यविचार । चतुर्थपादीं परिकर । सांगती सूत्रभाष्यकार । तृतीयाधिकरणीं ॥ ७४ ॥ प्रथम जैमिनीचें मत । कीं मुक्ता सत्यसंकल्पादि प्राप्त ।

आणि औडुलोमीचें मत । कीं शुद्धब्रह्मीं मुक्त मिळती ॥ ७५ ॥ म्हणोनि सत्यसंकल्पादि श्रुति । निरावलंबी जेविं सकेशाहृतपति । तेथ व्यास स्वसिद्धान्त करिती । कीं कोणीहि श्रुति न निरावलंबी ॥ ७६ ॥ परमार्थ-दृष्टि पाहतां । तो शुद्धचि होय तत्वतां । व्यवहारदृष्टि अवलोकितां । ईश्वरचि मुक्त ॥ ७७ ॥ यद्यपि जक्षणादि व्यापार । ब्रह्माविरोधी म्हणोनि समग्र । जीवन्मुक्तासही निर्धार । अविरोधी वाटे ॥ ७८ ॥ तथापि जक्षणादिका । आरब्धक्रिया नियामका । ती निवर्तलिया निष्क-लंका । विदेहकैवल्य ७९ ॥ जक्षणादि व्यापार कांहीं । परप्रारब्धनिर्मित नाहीं । म्हणोनि विदेहाचे ठायीं । अनवश्यक तो ॥ ८० ॥ ईश्वरीं सत्यकामादि समस्त । हें बद्धजीवआरोपित । यालागीं झालिया एक मुक्त । अन्यबद्धार्थ ईशावशेषु ॥ ८१ ॥ तो यावत्संसार सधर्मपूर्ण । मुक्त तयासींचि होय अभिन्न । हा बादरायणाभिप्राय पूर्ण । " एवमप्युपन्यासात्पूर्वभावादविरोधं बादरायणः " इये सूत्रीं ॥ ८२ ॥ प्रतिबिंबां-तरसंपत्ति । मानितां प्रतिबिंबाप्रति । तरी बद्धजीवत्वसंपत्ति । मुक्ताप्रति होवूं शके ॥ ८३ ॥ म्हणोनि प्रतिबिंब बिंबासी अभेद । पावे तेविं ईश्वरीं सिद्ध । एवं अभिप्राय शुद्ध । दीक्षित 'परिमेलीं'[1] बोलिले ॥ ८४ ॥ परी हा अभिप्राय पुरातन । प्रकाशात्मयतिकृत पंचपादिकाविवरण । तेथ निरूपिला संपूर्ण । बिंबप्रतिबिंबभाव हा ॥ ८५ ॥ प्रकाशात्माचार्यांचें मत । कीं प्रतिबिंबहि यथार्थ । बिंबस्वरूप निश्चित । म्हणोनियां ॥ ८६ ॥ उपाधीच्या ठायीं । प्रतिबिंबाची उत्पत्ति नाहीं । जैसा मुखाभास पाहीं । दर्पणीं नुपजे ॥ ८७ ॥ नेत्रद्वारा चित्त । वृत्तिरूपें बहिर्गत । तें दर्पणें होय अभिहत । मग परतोनि मुखप्रांत विषय करी ॥ ८८ ॥ तें मुखचि प्रति-बिंब । प्रतिबिंबापेक्षें मुखचि बिंब । परी बिंबत्व प्रतिबिंबत्व स्वयंभ । भ्रम-मात्र वदनीं ॥ ८९ ॥ तेवीं ईश्वरस्वरूपाचि जीव । परी जीवत्व ईशत्व भ्रम-भाव । तो मुक्त झालिया सावेव । ईश्वरत्व पावलाचि आहे ॥९०॥ अहो जीवत्वभाव कीं जाती । प्रथमपक्षीं स्वरूपोत्पत्त्यापत्ति । द्वितीय पक्षीं

---

१ परिमल म्हणजे, वेदान्तकल्पतरूवर अपय्यादीक्षितांची परिमल नांवाची टीका आहे ती.

उत्पन्न झाल्याविण अनेक व्यक्ति । न सांपडे जाती म्हणोनियां अन्योन्याश्रय ॥ ९१ ॥ परी या दोन्ही कोटी । छलरूप महाचावटी । त्वप्रत्यय वेदान्तदृष्टी । बौद्धार्थे अधिकरणभिन्न मी म्हणे ॥ ९२ ॥ प्रतिबिंब तेजाकार । तेथ प्रतिबिंबत्व हा बौद्धभेदविचार । नाहीं तरी तेजावर । प्रतिबिंबत्व येईल ॥ ९३ ॥ त्वप्रत्यय वाचारंभणीं । भेदु घडेचि अनुगुणीं । नातरी ब्रह्मत्व बोलतां वाणी । प्रकृतिप्रत्यय घडेल केवीं ॥ ९४ ॥ प्रकृतीसी वाच्यार्थ । आणि प्रत्यय तो अनर्थ । हें बोलतांचि समस्त । महाभाष्यविरुद्ध ॥ ९५ ॥ म्हणोनि प्रकृतिवाच्या परमार्थता । प्रत्ययवाच्या यावदर्थता । एवं होय कल्पितां । अविरोधू ॥ ९६ ॥ आतां शुद्धाचिया ज्ञानें । शबल प्राप्त कवण्यागुणें । तरी हें अनुभवमानें । सिद्धचि आहे ॥ ९७ ॥ अहो प्रतिबिंब मुखाचें । ऐसें ज्ञान साचें । तरी प्राप्य प्रतिबिंबाचें । मुख न घडे ॥ ९८ ॥ अथवा मुखचि प्राप्य जरी । मुखविभागु अंश तरी । तैसा शुद्धप्राप्य म्हणतां निर्धारीं । शुद्धांश होईल ॥ ९९ ॥ जीवासी सुवर्णांश दृष्टान्त मी दिधला । तो बोधावयातें बाळां । आणि अनध्यस्तविवर्तार्थ जो कनकदृष्टान्त दिधला । तो प्रौढबोधीं ॥ १०० ॥ उपासकाचें सुखप्रारब्ध । तेणें मुक्तासह भगवल्लीला शुद्ध । परी हा खेळु विशद । वासनाची ॥ १०१ ॥ म्हणोनि लोकीं वासना न धरावी । जीवन्मुक्तौ प्रेममात्र भक्ति करावी । पुढील वृत्ति अर्पावी । श्रीकृष्णचरणीं ॥ १०२ ॥ सलोकता कीं समीपता । सरूपता कीं सायुज्यता । या वासना सोडाव्या समस्ता । प्रेमासाठीं ॥ १०३ ॥ प्रेमाच्या उन्मादमिसें । जे जे लीला विलसे । ते कैवल्यीं वसे । तरी ना कवण म्हणे ॥ १०४ ॥ परी लोकवासना कुडी । ते प्रेमाची वाढ मोडी । जे होय धडफुडी । आपुल्या काजा ॥ १०५ ॥ मी पतिगृहीं जावोनि शेवटीं । पतिवश करोनि मागीन नगोटी । ऐसे डोहळे उठतां पोटीं । पतिप्रेम उणा म्हणिजे ॥ १०६ ॥ तेवीं हरीतें मी भोगीन । किंवा आलिंगन देईन । हे इच्छा शोभे साधकाकारण । परी सिद्धासी उण यामाजीं ॥ १०७ ॥ न भोगतां गोपाळें । तरी कां चित्तीं यावें काळें । बोलवितां मुरली मेळें । न सावरावी वृत्ति ॥ १०८ ॥ प्रेमाचिया वृत्तिविण । कासया पाहिजे सखिप्रेषण । जो

विश्वकल्याण करुणानिधान । तो काय प्रेम न जाणे ॥ १०९ ॥ देव काय चाकर । तुह्मांसवें खेळेल दिनरात्र । ही भक्ति नव्हे घोर । लागला देवा ॥ ११० ॥ प्रेमीं आपुलेपणा उरे । तरी द्वैत कल्पांतीं न मुरे । म्हणवोनि प्रेम भरे । ऐसें होवावें ॥ १११ ॥ स्वामीचिया इच्छा लीला घडो । कां मोक्ष अथवा बंध पडो । परी स्वामीवरी सुरवाडो । प्रेम अत्यंत ॥ ११२ ॥ अथवा देवासी सुख द्यावें म्हणोन । लीलेची इच्छा उपपन्न । तरी तथही स्वसुखाचें कारण । नाहींसें होय ॥ ११३ ॥ ह्मणोनि स्वामीचा प्रेम दवडितां । तरी दवडणें होय वृथा । प्रेमें पावे सुखैकता याचिलागीं ॥ ११४ ॥ इतुक्याहिवरी । लीला उठती लोकाकारी । तरी तेथही निर्धारीं । कैवल्यचि ॥ ११५ ॥ एवं अनध्यस्तविवर्तेसीं । मिळे सेवाचि पैं ऐसी । जीवन्मुक्तिविशेषीं । सेवाचि फळ ॥११६॥ यद्यपि परप्रारब्धेंकरून । भगवद्देह नाहीं उपपन्न । तथापि परमायाअपेक्षेंकरून । ऐश्वर्य पूर्ण अबंधक ॥ ११७ ॥ परकर्में प्राप्त होतां । तरी दु:ख होईल सर्वथा । परमायाहि कल्पी सुखरूपता । याचिलागीं ईश्वरीं मुक्ता मिळणें विरुद्ध नाहीं ॥ ११८ ॥ हेंचि श्रीतातचरण । दीनकरुणाद्रवें पूर्ण । 'अमृतवंशीं' समुद्गीर्ण । करिती तें प्रमाण ऐका ॥ ११९ ॥

" कां बिंब प्रतिबिंबा द्योतक । प्रतिबिंब बिंवा अनुमापक ।
तैसें द्वैतमिसें एक । मिरवत असे "

(अमृ०, अ० १, ओ० २६.)

एवं जीवेश्वरनिर्णयें । तेविंचि बद्धमुक्तनिर्णयें । वदती कीं उपाधिनाशें स्वयें । ईश्वरचि जीवु ॥ १२० ॥

" हा घटाकार जैसा । निमालिया तया अवकाशा । न लागे जाणे मिळों आकाशा । आना ठाया ॥ तैसा देहाहंकार नाथिला । हा समूळ जयाचा नाशिला । तो परमात्मा संचला । आधींचि आहे ॥

(ज्ञानेश्वरी.)

म्हणोनि सत्यसंकल्पादिक । विदेहमुक्तासी अविरोधी सकाळिक । परी प्रतिबिंब मिथ्या सकलंक । हे बोलिले दीक्षित सिद्धान्तलेशीं ॥१२१॥ प्रतिबिंबाचें सत्यत्वखंडण । तरी आभासवादाचेंचि अंगिकरण । आभास-

वादीं उपाधिहनन । तैं आभास आपण विनाश पावे ।। १२२ ।। मग बिंबाची तयासीं ऐक्यता । दीक्षित कोठोनि बोलती वृथा । प्रतिबिंबा स्वरूपता । जंव तत्वतां न मानिती ।। १२३ ।। असो हे खंडणमंडण-रीती । दीक्षितही अद्वैतवेदान्ती । यास्तव तयांचीही उक्ति । मान्य असो कां ।। १२४ ।। येथ आमुचा दृष्टान्तु । जेविं स्वर्णकण धातुमिश्रितु । तो स्वर्णी मिळवावा अन्य धातु । वेगळी करूनि ।। १२५ ।। तो मिळालिया सुवर्णी । ये अलंकारादियोग्यतास्थानीं । तेविं जीव आला अंशपणीं । उपाधिसंसर्गें ।। १२६ ।। तो उपाधिनाश होतां । जीवु ब्रह्मचि तत्वतां । परी अंशत्वें पाहतां । अंशीसीं मिळे ।। १२७ ।। अंशी तंव परमेश्वर । सत्यकामादिगुणविढार । ह्मणोनि मुक्तहि साचार । तोचि तो होय ।। १२८ ।। ज्ञानानंतर मात्र भक्ति । संपादित जीवन्मुक्ति । आणि विदेह तंव मुक्ति । वागविषय ।। १२९ ।। यद्यपि निदिध्यासनप्रकाशांत । भक्ति विदेहमुक्तिगत । आह्मीं बोलिलें तें वादिजयार्थ । जो वाग्विषय मानीत विदेहकैवल्या ।। १३० ।। तया वादिया वाग्विषय । आह्मीं बोलिलें निःसंशय । जरी विदेहकैवल्य वाग्विषय । तरी भक्तिहि तेथ राहों शके ।। १३१ ।। किंवा बद्धजीवारोपित । जे सत्यसंकल्पादि समस्त । तेणें लीला होत । आरोपवशें ।।१३२।। आणि एकजीववादीं पाहतां । नाहीं मुक्तीची आवश्यकता । जे बंधाचीच असत्यता । अत्यंत म्हणुनी ।। १३३ ।। यालागीं ब्रह्मप्रत्ययु आघवा । तेथ अध्यासु कळलिया जीवा । कळत कीं केव्हांचि मुक्तभावा । पासून न च्यवलों मी ।। १३४ ।। म्हणोनि जीवता कीं ब्रह्मता । हें नाममात्र भिन्नता । एरवीं मुक्ततेची वार्ता । तैसीचि राहे ।। १३५ ।। म्हणोनि तया स्फुरणा । अध्यास निवर्तलिया क्षणा । प्रत्ययें सत्यसंकल्पादिगुणा । विश्वचि भरे ।। १३६ ।।

" तैसा जाणणियाचा व्यवहारू । जेथें माखला सुमरू ।
तेथें आणिजे पुरू । अज्ञानाचा ।।१३।। यया नांव अज्ञान
ऐसें । तरी ज्ञान होवावें तें कैसें " । एवं तातवचन असे ।
अनुभवामृतसप्तमीं ।। १३७ ।।

" सोनें सोनेपणा उणें । न येतांचि झालें लेणें । तेविं न

वेचतां जग होणें । अंगें जया ॥ ४ ॥ कल्लोळाचे कंचुक ।
न फेडितां उघडें उदक । तेविं जगेसी सम्यक । स्वरूप जो ।५।"

( चांगदेवपासष्टी. )

इत्याद्युपदेशगोष्ठी । कीं दृष्टिसृष्टि कल्पकापाठीं । सत्यसंकल्पादिकांची पेटी । अविरुद्ध ब्रह्मीं ॥ १३८ ॥ म्हणवोनि ब्रह्माभेदें । एकजीवापेक्षिक आरोपभेदें । लीला होय अविरोधें । देवभक्तादि ॥ १३९ ॥ एरवीं तें परब्रह्म । आघवा वागविषयक्रम । परी वाग्विषयोपक्रम । उपलक्षणें जरी ॥ १४० ॥ घरावरी पाखरूं बैसलें । तेणें घरातें वेगळें केलें । तें देखोनि एक चाले । तया घराकडे ॥ १४१ ॥ मध्यें अवचितां उडालिया पाखरूं । त्याचि सदनीं पावे नरू । तेवीं ज्ञानें अविकारू । ज्ञात जें ब्रह्म ॥१४२॥ ते केलिया अज्ञाननिवृत्ति । ज्ञातत्व न लावी अंगाप्रति । तथापि विदेहमुक्ति । ब्रह्मींचि घडे ॥ १४३ ॥ अतएव ज्ञातत्वोपलक्षित । ब्रह्म हें अंगिकारी वेदान्त । उपलक्षण तंव आरोपित । राहे जैसें ॥ १४४ ॥ तेविं एकजीवापेक्षिकआरोपावच्छेदें । जे ईश्वरी लीला उमटे भेदें । तें अद्वैत ब्रह्माविरोधें । परीं विनोदें विवर्त ॥ १४५ ॥ ह्मणोनि प्रतिभासावच्छिन्न । पारमार्थिकी ते सत्ता पूर्ण । यास्तव विशिष्टाद्वैतग्रहण । केलें ऐसें ह्मणों नये ॥ १४६ ॥ अनध्यस्तविवर्तभेदविषयिणी । विद्यमान श्रुतिजननी । त्रिपादमहानारायणीं । परब्रह्माणि आकार बोधी ॥ १४७ ॥

" साकारोऽपि पुनर्द्विविधः नित्यसाकारो मुक्तसाकारश्चेति । नित्यसाकारस्त्वाद्यंतशून्यः शाश्वतः । उपासनया ये मुक्तिं गताः तेषां साकारो मुक्तसाकारः । तस्याखंडज्ञानेनाविर्भावो भवति । सोऽपि शाश्वतः । मुक्तसाकारस्त्वैच्छिक इत्यन्ये वदंति "—

ज्ञाने न निवर्ते ह्मणोन । अनध्यस्तविवर्ता नित्यसाकारपण । ईश्वरीं मिळालिया मुक्ताकारण । तेंचि साकारपण अनध्यस्तविवर्तें ॥ १४८ ॥ ह्मणोनि देवभक्तादि लीला । विरोधी न येचि वेदान्ताला । विशेष अ[illegible] स्पष्ट केला । अन्यग्रंथीं ॥ १४९ ॥ या श्रुतीचें उपबृंहण । लब्ध स्कंदपुराणवचन । यास्तव आह्मा व्याख्यानाविण । श्रुतिविशेषप्रतिपत्ति मिळे ॥१५०॥ वैष्णवखंडीं स्कंदपुराणीं । व्रजनाभा सांगती शांडिल्यमुनी । कीं लोकान्तरीं

न जातां जिये स्थानीं । जाय मुक्त ॥ १९१ ॥ तें जीवापेक्षिक ऐश्वर्य-पद । पूर्णपरब्रह्म अभेद । तयातें भक्त शुद्ध । ह्मणती व्रज ॥ १९२ ॥

" श्रुणुत दत्तचित्तौ मे रहस्यं व्रजभूमिजम् ।
वृजिनं व्याप्तिरित्युक्त्या व्यापनाद् व्रज उच्यते ॥ १९ ॥
गुणातीतं परंब्रह्म व्यापकं व्रज उच्यते ।
सदानंदपरंज्योतिर्मुक्तानां पदमव्ययम् " ॥ २० ॥
(स्कं०पु०,वै०,भा०मा०,अ०१.)

गद्यार्थः– शांडिल्यमुनि व्रजनाभा व परिक्षितीला ह्मणतात, चित्त देऊन ऐका; ह्या व्रजभूमीचें रहस्य मी तुह्माला सांगतों. 'व्रजन' शब्दाचा अर्थ व्याप्ति असा असून सर्वव्यापक असल्यामुळें 'व्रज' ह्मणतात. ह्मणजे तीन गुणाहून रहित, प्रकृतीहून पर, असें जें वेदप्रतिपाद्य ब्रह्म, अध्यास मिथ्या असल्यामुळें ज्याच्या व्याप्तीचा परिच्छेद करीत नाहीं, ह्मणून त्याला व्रज ह्मणतात तेंच सत्यरूप, आनंदरूप व चैतन्यरूप असून मुक्तानां गम्य म्हणजे प्राप्य आहे. यद्यपि या श्लोकांत शुद्धब्रह्मच मुक्तप्राप्य आहे, तथापि बिंबभूत परमेश्वराची प्राप्ति सत्यस्वरूपाहून भिन्न नसल्यामुळें, शुद्धाचीच प्राप्ति आहे हा विवरणकोराचा आम्ही अभ्युपगम केलेला सिद्धान्तच पुढील वचनावरूनहि स्पष्ट होणार आहे.

" तस्मिन्नंदात्मजः कृष्णः सदानंदांगविग्रहः ।
आत्मारामश्चाप्तकामः प्रेमाक्तैरनुभूयते " ॥ २१ ॥
(स्कं०पु०,वै०,भा०मा०,अ०१.)

पूर्वीं बोलिला सिद्धान्त । कीं ईश्वरीं मिळालिया मुक्त । लीला होय यथार्थ । तो गूढ सिद्धान्त इये श्लोकीं ॥ १९३ ॥ त्या व्रजसंज्ञक परब्रह्माणि । नंदात्मज शार्ङ्गपाणि । अनध्यस्त विवर्त म्हणोनी । सदानंदविग्रह बोलिजे ॥ १९४ ॥ आपुलियाचि नानारूपीं । किंवा अभेदस्वरूपीं । रमे म्हणोनि सत्यसंकल्पीं । आत्माराम बोलिजे हा ॥ १९५ ॥ यासी कदापि नाहीं अज्ञान । आणि मायावृत्तीनें अहंब्रह्म-ज्ञान । उपजे तेंहि तयाकारण । अनुपयोगी ॥ १९६ ॥ अज्ञान नसतां कासयाची निवृत्ति । मग कां प्रशंसावी ज्ञानवृत्ति । यालागीं ईश्वराची अहंब्रह्मवृत्ति । लोकानुग्रहार्थीं वेदरूप होय ॥ १९७ ॥ म्हणोनि अज्ञान

आणि ज्ञान । दोहीं विषयीं तो आपण । अकाम असोनि परिपूर्ण । आप्तकाम यास्तव ॥ १५८ ॥ प्रेमाक्तैरनुभूयते। येणें शुद्ध पदार्थे । भक्तासीच प्रत्यया येतें । कृष्णब्रह्म ॥ १५९ ॥ म्हणजे ज्ञानी जे होती । तेही निर्गुणींच मिळती । परी रसाभेदप्रतीति । तयां न मिळे ॥ १६० ॥ ज्ञान झालिया रसाभाव । आणि विदेहमुक्तींत ब्रह्मस्वभाव । एवढीच ज्ञानियाची ठेव । भक्ता विशेषभाव याहुनी ॥ १६१ ॥ कीं ज्ञान झालिया रसप्रतीति । तैसे सरसाचि विदेहमुक्त होती । रस परब्रह्माचि सिद्धान्तीं । अग्निपुराणोक्ति ऐसी ॥ १६२ ॥ ज्ञानी आणि भक्ताप्रती । समान मुक्तौ सगुणेशभावापत्ति । तथापि रसलीला भक्ताप्रती। हा विशेष आम्हीं म्हणों ॥ १६३ ॥ विदेहमुक्तींत कांहीं । विशेष आवश्यकतम साच नाहीं । परी अनध्यस्तविवर्तता लवलाहीं । चुकेचिना हे ॥ १६४ ॥ कां वचनाचेनि अनुरोधें । विदेहकैवल्ये सिद्धे । तेथ वचनाचेचि अनुरोधें । अनध्यस्तविवर्त मिळे ॥ १६५ ॥ नित्यसाकार अनध्यस्तविवर्त । जेविं महानारायणश्रुति सांगत । तेविं भक्तीनें जाहले मुक्त । तयाचाहि साकार शाश्वत सांगते श्रुति ॥ १६६ ॥ श्रुतींत उपासनाशब्द । तो भक्तिविषयींच प्रसिद्ध । अज्ञदृष्ट्या साम्यता सिद्ध । दोहींची म्हणूनि ॥ १६७ ॥ ' उपासनया ये मुक्तिंगताः ' ह्मणे श्रुतिजननी । आणि ' प्रेमाक्तैरनुभूयते' हें पद उपबृंहणीं । प्रेमपर्याय भक्तिलागुनी । क्रियाप्रधान उपास्तिते तसें ॥ १६८ ॥ प्रेमांत क्रिया शिथिल होत । हा अनुभव जाणती महंत । यालागीं उपबृंहित श्रुत्यर्थ । कीं येथील उपासक भक्त निश्चयें ॥ १६९ ॥ म्हणोनि भक्तासीचि कृष्णानुभव । या उपबृंहणार्थी सम्यग्भाव । आणि विद्यावृत्या स्वयमेव । उपपन्नही ॥ १७० ॥ स्वानुपयोगी परानुग्रहार्थी । जे परमेश्वरीं विद्यावृत्ति । तदापेक्षिक अनध्यस्तविवर्ती । होय परब्रह्म ॥ १७१ ॥ किंवा ज्ञानी जे होती । ते अवतारकार्या सहाय न येती । अथवा जीवन्मुक्तींत श्रीकृष्णप्रतीति । अभक्तज्ञानिया नव्हे कदा ॥१७२॥ म्हणोनि 'प्रेमाक्तैरनुभूयते' । हें वचन मुळीं विराजतें । येणेंचि उपबृंहण होतें । नित्यसाकार मुक्तसाकार श्रुतीचें ॥ १७३ ॥ अभेदेऽपि भेदप्रत्यायक । धर्म तोचि विशेषक । जैसी सत्ताभेद प्रत्यायक । ही सत्ता या वचनें ॥ १७४ ॥ तैसेंचि तुमचें मत । म्हणोनि अचिंतनीय भेदा-

भेदसिद्धान्त । प्रविष्ट झालिया येथ । मधुराद्वैत विशेष कायी ।। १७५ ।। साचाचि अचिंत्य भेदाभेद आणि मधुराद्वैत । मूढदृष्टी एक दिसत । परी यामाजी रहस्य गुप्त । तें त्वद्दत्त उदाहरणेंचि मिळे ।। १७६ ।। अभेद-सत्तेंतही सत्ता । हा भेदप्रत्यय तत्वतां । वाक्योपाधिमुळें पाहतां । अन्यथा नाहीं ।। १७७ ।। धर्मचि जरी ह्मणावा । तरी तो सर्वदा प्रत्यया यावा । वाक्यलयीं लया जावा । ऐसें न व्हावें ।। १७८ ।। आणि सत्येचा भेदप्रत्यय । जो वाक्यबळें होय । तो वाक्यलयीं लय । पावे हें दिसे ।। १८९ ।। यद्यपि वाक्यासहि सत्ता । ह्मणोनि भेदप्रत्यय कां धर्मविशेषता । तरी पुसों आम्ही कीं विशेषा सत्ता । पृथक् कोठली ।। १८० ।। अभेदसत्तेंत विशेषभान । सर्वथा नोहे उपाधिविण । ह्मणोनि वाचारंभण । भेदप्रत्यायक धर्मू ।। १८१ ।। तेवीं आमच्याहि मतीं । प्रतिबिंबापेक्षिक बिंबत्वारोपावच्छिन्नत्ति । म्हणवोनि ईश्वरीं बिंबभूतीं अनध्यस्तविवर्तता ।। १८२ ।। आणि अभेदीं भेदप्रत्यय पूर्ण । तया प्रत्यया सत्यपण । हें आम्हा नाहीं प्रमाण । चैतन्यमत ।। १८३ ।। यास्तव वरील उपबृंहण । तयाचें केलें निरूपण । आतां पुढेंहि अनुसंधान । चित्त श्रोता दृढ राखो ।। १८४ ।।

" आत्मा तु राधिका तस्य तयैव रमणादसौ ।
आत्मरामतया प्राज्ञैः प्रोच्यते गूढवेदिभिः ।। २२ ।।
कामास्तु वांछितास्तस्य गावो गोपाश्च गोपिकाः ।
नित्याः सर्वे विहाराद्या आप्तकामस्ततस्त्वयम् ।। २३ ।।
(स्कं०पु०,वै०,भा०मा०,अ०१.)

गद्यार्थः– त्या श्रीकृष्णाचा आत्मा राधिका असून, तिच्यासह रममाण होतो ह्मणून त्याला आत्माराम म्हणतात, आणि त्याचे वांछित काम गोपिका, गायी व विहार हे सर्वच नित्य असल्यामुळें, अर्थात् त्याला आप्तकाम ह्मणतात. या दोन श्लोकांचें तात्पर्य पूर्वी उद्धृत केलेल्या श्रुतीमध्यें जे नित्यसाकार व मुक्तसाकार सांगितले असून, नित्यसाकार नित्यच आहे परंतु मुक्तसाकार देखील शाश्वत आहे, असे जें म्हटलें आहे तेंच हें आहे. ह्मणजे, अभेद परब्रह्माचे ठिकाणींहि, ज्याप्रमाणें सत्यसंकल्पा-दिक बद्धजीवापेक्षेनें नित्य आहेत, तद्वत् पूर्वी दाखविल्याप्रमाणें श्रीकृष्ण

व त्याचे गायी, गोपी आदिक विहारहि नित्य आहेत; हाच या श्लोकांचा व पूर्वींच्या श्रुतींचा अर्थ आहे.

“ रहस्यं त्विदमेतस्य प्रकृतेः परमुच्यते ।
प्रकृत्या खेलतस्तस्य लीलाऽन्यैरनुभूयते ” ॥ २४ ॥
(स्कं०पु०,वै०,भा०मा,अ० १.)

अर्थः— ‘इदं’ म्हणजे हें आतां निरूपिलेलें, एतस्य म्हणजे श्रीकृष्णाचें किंवा व्रजभूमीचें रहस्य, प्रकृतीच्या पलीकडचें आहे. परब्रह्मच रहस्य आहे, अशा वादाची व्यावृत्ति करण्याकरितां ‘ इदं ’ हें मूळांत पद आहे. ‘इदं’ ह्मणजे ज्याचें प्रकरण चाललें आहे तें. प्रकरणहि परब्रह्माचेंच चाललें आहे, अशी शंका येऊं नये म्हणून ‘एतस्य’ हें पद घातलें आहे. ‘एतस्य’ म्हणजे श्रीकृष्णाचें किंवा व्रजभूमीचें, पूर्वील श्लोकांत परब्रह्माला व्रजभूमित्व सांगून “ तस्मिन्नंदात्मजः कृष्णः ” या श्लोकानें श्रीकृष्णाचें अनध्यस्तविवर्तत्व स्पष्ट केलें आहे. आधाराधेयभाव वस्तुतः नसूनहि, पंचपादिकाकारानें ह्मटलेल्या सच्चिदानंदाच्या पृथगिवभानाप्रमाणें, येथीलहि आधाराधेय इव भान विरोधी नाहीं. वस्तुतः आधाराधेयाचा अभेदच आहे, हें श्रीकृष्णानें मी ब्रह्माचा आधार आहें, असें ह्मटल्यानें सिद्ध होत आहे. पूर्वीं उद्धृत केलेल्या श्लोकांत, ज्याप्रमाणें व्रजसंज्ञक ब्रह्म श्रीकृष्णाचा आधार आहे असें प्रतिपादिलें आहे तसें,

“ ब्रह्मणोऽहि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च ।
शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकांतिकस्य च ” अ० १४-२७.

या गीतावचनांत परब्रह्माचा मी आश्रय आहें, असें म्हटलें आहे. व असाच भाष्यकार व आनंदगिरीहि अर्थ करितात. ब्रह्म माझा आधार आहे. प्रकाशाची ज्याप्रमाणें सूर्य घनीभूत प्रतिमा आहे, त्याप्रमाणें मी ब्रह्माची घनीभूत प्रतिमा आहें; असा अर्थ श्रीधरस्वामी व परमार्थप्रपाकार करितात. या परस्परवचनामध्यें ब्रह्माचा व परमेश्वराचा अभेद असल्यामुळें, विरोध होऊं शकत नाहीं. शिवाचें हृदय विष्णु आहे व विष्णूचें हृदय शिव आहे, हें शास्त्रीय वचन अभेद दाखवीत असून, “ माझ्या हृदयांत तूं व तुझ्या हृदयांत मी आहें, ही लोकप्रसिद्ध ह्मणहि प्रेमाभेदच दाखवित असते. तात्पर्य मुळांतील ‘इदं’ शब्दाचा व ‘एतस्य’ शब्दाचा

ह्याप्रमाणें गीता वचनांच्या व वरील स्कंद पुराण वचनांच्या विरोध येत नाही

(0) I N Kathmandu 02 N Chitwan [redacted]

संबंध प्रकरणपठित श्रीकृष्णाकडेच आहे. आतां मूळांतील "प्रकृतेः परम्" या पदाचा अर्थ तर असा आहे कीं, राधा, कृष्ण, गायी व गोपिका हे सर्व विहार नित्य असल्यामुळें मायाकार्य नाहींत. ह्या परमेश्वराची प्रकृत्यात्मक जी लीला आहे, ती मात्र अन्य लोकांनीं अनुभविली जाते.

" लीलैव द्विविधा तस्य वास्तवी व्यावहारिकी ॥ २६ ॥
वास्तवी तत् स्वसंवेद्या जीवानां व्यावहारिकी ।
आद्यां विना द्वितीया न द्वितीया नाद्यगा कचित् ॥ २७ ॥
आवयोर्गोचरेयं तु तल्लीला व्यावहारिकी ॥ २७ ॥

( स्कंद, वैष्णव०, भागवतमहात्म्य, अ० १. )

गद्यार्थः— लीला किती प्रकारची आहे ? उत्तर— दोन प्रकारची. प्रश्न— कोणती ? उत्तर— वास्तवी व व्यावहारिकी. त्यांतून वास्तवी ही स्वसंवेद्य म्हणजे श्रीकृष्ण व भक्तांनाच गम्य असून व्यावहारिक लीला प्रकृतिरूप असल्यामुळें शांडिल्य म्हणतात आपल्याला ती गोचर आहे. प्रयोजनावांचून जो खेळ त्याला लीला म्हणतात. याविषयीं " लोकवत्तु लीला कैवल्यं " हें बादरायणाचें सूत्र प्रमाण आहे. सर्वज्ञता व आप्तकामता असून इतर लोकांचें त्याचेपासून कार्य होतें, म्हणून ती लीला उन्मत्तचेष्टेप्रमाणें व्यर्थहि नाहीं. ह्या लीलाविषयाचें उद्घाटन मी 'सूत्रद्वयी' व्याख्यानांत उत्कृष्ट केलें आहे तें पहावें. आद्यलीला आहे म्हणूनच द्वितीयलीला होऊं शकते; ह्मणजे सत्यसंकल्पादि गुणवान् परमात्मा आहे, ह्मणूनच तो जड प्रकृतीला चालवूं शकतो. शुद्धब्रह्म सर्वथा उदासीन असल्यामुळें चालवूं शकत नाहीं; आणि अनध्यस्तविवर्तशरीर असल्यामुळें भक्तोद्धार व अवतारांचें सृष्टिकार्यहि होतें; परंतु द्वितीया ह्मणजे परमेश्वराची प्रकृत्यात्मक जी लीला आहे, तिचा मात्र आद्यलीलेमध्यें प्रवेश नाहीं. ह्मणजे उत्पत्तिस्थितिलयकरणादि जे ब्रह्माविष्णुरुद्रांचे गुणानुसार धर्म, त्यांचा व त्यांच्या कार्यांचा आद्यलीला नित्य असल्यामुळें तिला अगदी स्पर्श नाहीं. तुम्हाआम्हांला जी गोचर लीला आहे, ती ह्या परमेश्वराची प्रकृत्यात्मक समजावी. पहिली लीला अनध्यस्तविवर्त असून, दुसरी लीला अध्यस्तविवर्त आहे. विवर्तास्तव पहिलीलाहि लीलाच म्हटलें आहे. याप्रमाणें या श्लोकाचा अर्थ आहे.

एवं सेवाफल मुक्तींत भक्ति । येथ प्रमाण बहुत श्रुति स्मृति । अथवा वामदेवप्रिय विदेहमुक्ति । तरी अवतारसहायादिप्रतीति सेवाफल ॥ १८६ ॥ मुक्तासी सगुणेशभावापत्ति । जाहलियाहि पुढती । रघुनाथादि अवतार होती । भक्तांसहित ॥ १८७ ॥ येचविषयीं रामावतार । ध्यातां रामायणानुसार । तरी एकत्वअनेकत्वप्रकार । दृष्टीं पडे ॥ १८८ ॥ एकचि परमात्मा चतुर्धा होऊन । झाला राम सौमित्र भरत शत्रुघ्न । हें वाल्मीकांचें निरूपण । तो श्लोक प्रमाण ऐकावा ॥ १८९ ॥

" विष्णो पुत्रत्वमागच्छ कृत्वात्मानं चतुर्विधम् ।

( बालकांड, अ० १९, २१. )

देव ह्मणती नारायणा । भक्तभूषणा करुणाघना । दशरथाच्या तिघी अंगना । तियांच्या उदरीं अवतरें तूं ॥ १९० ॥ स्वरूपें करोनि चार मूर्ति । रावण निर्दाळीं कृपामूर्ति । तुझी ऐकोनि निर्मल कीर्ति । अचलस्थिति मिळो विश्वा ॥ १९१ ॥ देवाचें मानोनियां वचन । तैसेंचि करी नारायण । हें याचि अध्यायीं निरूपण । एकतिसावे श्लोकीं ॥१९२॥

" मानुष्ये चिंतयामास जन्मभूमिमथात्मनः ।
ततः पद्मपलाशाक्षः कृत्वात्मानं चतुर्विधम् ।

( बालकांड, अ० १५, श्लो० ३१. )

मग तो जलजाकांत जलनिधिशयन । जलजनाभ जलजनयन । चतुर्विध होवोनि आपण । चिंती जन्मग्रहण मनुष्ययोनीं ॥ १९३ ॥ एवं वाल्मीकसंमति । विष्णुपुराणीं अग्निपुराणीं आणि भागवतीं । एवंविधचि वचनें असती । आतां पद्मपुराणोक्ति ऐकावी ॥ १९४ ॥

" मध्यान्हसमये लग्ने सर्वग्रहशुभान्विते ।
कौसल्या जनयामास पुत्रं लोकेश्वरं हरिम् " ॥९२॥

शुभयोगीं शुभलग्नीं । शुभदिवशीं माध्यान्हीं । पुत्ररूपें शार्ङ्गपाणि । उपजविती झाली कौसल्या ॥ १९५ ॥

" कैकेय्यां भरतो जज्ञे पांचजन्यांशसंभवः ।
सुमित्रा जनयामास लक्ष्मणं शुभलक्षणम् ॥९३॥
शत्रुघ्नं च महाभागा देवशत्रुप्रतापनम् ।
अनंतांशेन संभूतो लक्ष्मणः परवीरहा ॥ ९४ ॥

सुदर्शनांशाच्छत्रुघ्नः संजज्ञेऽमितविक्रमः ।
ते सर्वे ववृधुस्तत्र वैवस्वतमनोः कुले ।। ९५ ।।
( पद्मपुराण, उत्तरखंड, अ० २६. )

कैकयींचे ठायीं भरत । झाला पांचजन्यांशसंभूत । सुमित्रेचे ठायीं सुत । शेष जाहला लक्ष्मण ।। १९६ ।। सुदर्शनांश शत्रुघ्न । तो सुमित्रेतें जाहला उत्पन्न । कोठें तो कैकेयीचा नंदन । तरी हे कल्पभेदानें व्यवस्था ।।१९७।। एवं सांगे पद्मपुराण । ऐसेंचि वदे अध्यात्मरामायण । या विरोधाचें परिहरण । तिलककार एवं वदती ।। १९८ ।।

" अत्रात्मानमित्युक्त्या शंखचक्रानन्तानामपि भगवद्रूपता सूचिता "
( बालकांड, वाल्मीकिरा०, अ० १५ श्लो० २१, टीका. )

अनंतादिक भक्त । आणि तेचि भगवंत । रहस्य हें यथार्थ । या वचनाचें ।। १९९ ।। कीं मुक्तातें सगुणेशभावापत्ति । जाहलिया जे अवतार होती । तेथ मुख्य अनध्यस्त श्रीपति । येर मुख्यसहायक ।। २९० ।। ह्मणोनि तयासि पुनर्जन्म नाहीं । लीला मात्र करिती पाहीं । हा अवघाचि खेळ लवलाहीं । अनध्यस्तविवर्ते ।। २०१ ।। तयासी मानतां धर्मार्थता । तरी मोडेल भगवन्नित्यमुक्तता । एवं बोलिले तत्वतां । सिद्धान्तलेशीं दीक्षितवर ।। २०२ ।। ह्मणोनि अनंतादिक । मुक्तींत झालियाहि एक । अवतारसमयीं सहायक । भक्त होवोनि क्रीडती ।। २०३ ।।

" तरी ऐकें गा रघुनाथा । तुह्मां अवतारांची सत्ता ।
न ये जीवांचिया हाता । जरी यथार्थता मुक्त जाहला " ।।१५९।।
( भावार्थरामायण. )

ऐसी भावार्थरामायणीं । विलसली नाथवाणी । अवतारसमयीं म्हणोनि । मुक्त भक्तसहायक ।। २०४ ।। भगवदंगापासोन । अवतारसमयीं सहायक उत्पन्न । येथ संमत पद्मब्रह्मवैवर्तादिपुराण । करावें विलोकन त्यांचें जनीं ।। २०५ ।। ' वासुदेवकलानंत ' हें एक वचन । आणि ' अंशेन अवतीर्ण ' हें द्वितीयवचन । ' कृष्णस्तु भगवान् स्वयं ' हें तृतीयवचन । श्रीभद्भागवतीं प्रमाण असती ।। २०६ ।। म्हणोनि 'अंश-' शब्दें बाळिराम । मुक्तावतारसहायक परम । आणि ' पूर्ण ' शब्दें मेघश्याम । अनध्यस्तविवर्त ।। २०७ ।। एवं ज्ञानें सगुणसाक्षात्कारु । होय

तयासि हा प्रकारु । श्रीकृष्णध्यानेंहि अविकारु । अहेतुकज्ञान मिळोनि मिळे ॥ २०८ ॥ गौण जें निरूपिलें ध्यान । जें ब्रह्मलोकपदउपासनेंतील जाण । श्रीकृष्णाचें ध्यान व ज्ञान समान । श्रीभागवतमानें ॥ २०९ ॥ किंवा लीलामात्रचि सहायक । एरवीं तो परमात्माचि सकाळिक । एवं उपपत्ति पाहतां अनेक । सेवाफल सेवाचि उरे ॥ २१० ॥ बाग्विषय मानितां विदेहमुक्ति । तरी तेथ एवंविध नांदे भक्ति । ही आवडीची प्रतीति । सदा महंतीं ओळखावी ॥ २११ ॥ एरवीं जीवन्मुक्तींत । भक्तीविण नाहीं परमानंद प्राप्त । यालागीं सदेह झालिया निश्चित । सेवेचें फळ सेवासुखचि ॥ २१२ ॥ आतां संक्षेपशारीरकमतें । कीं प्रारब्धसंपातीं ज्ञान होतें । तोंवरी श्रवणमनननिदिध्यासातें अभ्यासावें ॥ २१३ ॥ तेथ प्रष्टव्य ऐसें आहे । ब्रह्माभ्यास व्यतिरेकें कीं अन्वयें । व्यतिरेकें समाधि होये । आणि व्युत्थानीं लाहे कैवल्य ॥ २१४ ॥ म्हणोनि अन्वयब्रह्मभावना । तरी निका भूतां सगुणपणा । कां श्यामसुंदरा करुणाघना । भूतसमर्पणा सगुणभक्ति उरे ॥ २१५ ॥ निर्गुणध्यान सगुणध्यान । संपातसमयाविण नाहीं ज्ञान । आणि निर्गुणध्यानाहूनि सुखद सगुणध्यान । बोलिले भगवंत द्वादशीं ॥ २१६ ॥ श्रवणाद्यभ्यासें मरणसमयीं । ज्ञान होणें पडे ठायीं । तें अपरोक्षतीव्रत्वें कीं अपूर्वे लवलाहीं । बोलिजे आधीं ॥ २१७ ॥ संपातसमयाविण अपरोक्ष नाहीं । म्हणोनि आद्यपक्ष अयुक्त पाहीं । द्वितीयपक्षीं श्रवणज अपूर्वाहूनिहि । भगवत्प्रसादज अपूर्व बळिवंत ॥ २१८ ॥ वासुदेवे भगवति । दृढ प्रयोजितां भक्ति । आशु उपजे ज्ञानविरक्ति । यालागीं आमरणान्त भक्तिचि सर्वज्ञमतीं अंगिकारावी ॥ २१९ ॥ एवं ज्ञानोत्तर देह राहो न राहो । परी भक्तीचा सारिखा लाहो । हा जीवन्मुक्तप्रत्यय पाहा हो । दाविला ठावो विवरूनी ॥ २२० ॥ विदेहकैवल्यीं मुक्त भगवंत । एक झालिया शब्द खुंटत । पुढें भगवंताचें समस्त । भगवंत जाणे ॥ २२१ ॥ म्हणोनि तेथ आम्हीं मौन । सेवाचि दृढ मानी मन । मीमांसकांचें समाधान । उपरीचि केलें ॥ २२२ ॥ यास्तव सर्वभावें आतां । मी वाहिलों सद्गुरुनाथा । आळंदीवल्लभा कृपावंता । श्रीज्ञानेश्वरातें ॥ २२३ ॥ येथ परिहार यात्रया कांहीं । माझा मजला महिमा नाहीं । उणें पुरें ज्ञानेश्वरआई ।

जाणें मी तत्पार्यीं निवांत ।। २२४ ।। श्रीज्ञानेश्वरजनकजननी । येणेंचि नामें चाऱ्ही वाणी । सदा लागोत श्रीगुरुभजनीं । हा आळंदीमणी-दत्तवरू ।। २२५ ।।

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे, नानाछंदबद्धे, प्रेम-निकुंजे, चंपुकाव्ये, सेवैवफलनिदर्शनन्नाम, पंचमी वल्ली.

।। श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु. ।।

---

**समाप्त.**

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ. ॥

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ,, | १९ | त्तयाच्या | तयाच्या |
| ३ | ७ | कळे | कळले |
| ५ | २१ | आनंदधन | आनंदघन |
| ६ | १ | विषद | विशद |
| ,, | २० | निर्णय सिंध्वादि | निर्णयसिंध्वादि |
| १० | १८ | सिद्धान्ती उवाच | श्रीगुरु उवाच |
| ११ | १२ | भववद्भक्ति | भगवद्भक्ति |
| ,, | २६ | भक्युपदेश | भक्त्युपदेश |
| १२ | ३ | मारतांना असे आपण | मारतानां आपण |
| १३ | ५ | शिवलिंगम्य | शिवलिंगस्य |
| ,, | १३ | नाहि | नहि |
| १६ | २० | ध्यक्त | व्यक्त |
| २२ | ४ | चिदभिव्यत्तत्यंकभूत | चिदभिव्यक्त्यंगभूत |
| २३ | ४ | उप्तन्न | उत्पन्न |
| २३ | ६ | इश्वर | ईश्वरा |
| २६ | ४ | परप्रारब्धापेक्षां | परप्रारब्धापेक्षी |
| २९ | १० | निर्माणकार्यत्व | निर्माणकार्यत्व |
| ३० | २ | एवं मौक्तिक | एवं भौतिक |
| ३४ | २ | संयोगानें | संयोगाचें |
| ,, | ४ | उप्तन्न | उत्पन्न |
| ३८ | १० | तात्पर्य, | तात्पर्य, |
| ४१ | १८ | "तत्वबिंदा | "तत्त्वविदां |
| ४४ | ८ | शुन्याचा | शुद्धाचा |
| ४५ | ४ | वालाकीला | वालाकीला |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ४६ | २२ | दोष | शेष |
| ,, | २७ | पाणिपादान्तः | पाणिपादंतत् |
| ४९ | २३ | मक्तांच्या | भक्तांच्या |
| ५० | ३ | असते, | राहते, |
| ५५ | ४ | श्लो० | श्लो० २१६ |
| ५६ | १३ | याक्याचें | वाक्याचें |
| ६२ | १३ | उप्तन्न | उत्पन्न |
| ६४ | ५ | सूक्ष्मउदरीं अवघा | सूक्ष्मउदरीं घे अवघा |
| ६५ | १० | उप्तन्न | उत्पन्न |
| ,, | ,, | जरीच | तरीच |
| ,, | २७ | तरी | तसा |
| ६७ | ९ | आहे. तें | आहे. कारण तें |
| ६९ | १४ | दंखील | देखील |
| ७० | ३ | वैदिक फळाचे | वैदिक कर्म फळाचे |
| ,, | २७ | प्रत्यय | प्रत्यक्ष |
| ७० | २७ | दिसणाऱ्या | दिसण्यांत येणारा |
| ,, | २९ | प्राप्त होत आहे. असे | प्राप्त होत आहे. आह्मीं निर्गुण ब्रह्माचें ठिकाणीं अचिंत्यत्व मानीत नाहीं असें नाहीं पण सगुण ब्रह्मही अचिंत्यच आहे. असें |
| ७१ | १८ | त्रिशेष | विशेष |
| ,, | १६ | वन्वंतःकरण | नन्वंतःकरण |
| ७२ | १४ | कयंभूतस्य | कथंभूतस्य |
| ७२ | १ | कोणच | कोणीच |
| ,, | ३ | विद्यारण्यानीं | स्वामी विद्यारण्यानीं |
| ,, | २८ | नवध्यान दीपप्रक० | नवव्या ध्यानदीपप्रक० |
| ७९ | १ | सांगितलें | स्पष्ट सांगितलें |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ,, | २ | गृण्हन्तो | गृण्हतोऽ |
| ७६ | १ | बडबडणाऱ्या | संस्कृतांत बडबडणाऱ्या |
| ८२ | ९ | निग्रह् | विग्रह् |
| ८७ | ११ | येथपर्यंतची पंक्ति | येथपर्यंतची ग्रंथपंक्ति |
| ९१ | ९ | विज्ञानोदंतरोयम– | विज्ञानादंतरोयम– |
| ,, | १३ | परे परस्मिन् | परे परस्मिन् वा |
| ९२ | ६ | षरिणामें | परिणामें |
| ,, | २६ | लेशाविद्यें | लेशाविद्यायोगें |
| ९४ | १० | जम्मली | जन्मली |
| ९५ | ३ | चालणार | चालणारे |
| ९९ | ८ | स्वामानिताद्या | स्वमानिताद्या |
| ,, | १६ | गुण गुण | गुणगण |
| १०० | २६ | स्वार्थ तंव । | स्वार्थ तंव |
| १०३ | २४ | तेथही सांपडे | तेथही न सांपडे |
| १०४ | १३ | वेदान्ताचि | स्पष्ट वेदान्ताचि |
| ,, | १४ | गा अस्पष्ट | मा अस्पष्ट |
| १०५ | १४ | रवपुष्पीं | खपुष्पीं |
| १०६ | २९ | अत्पसोवत् | अप्सरोवत् |
| १०७ | २ | तलेऽतीर्य | तलेऽवतीर्य |
| ,, | १० | उत्तूक्तं | यक्तूक्तं |
| १०८ | १० | तदभिप्रा यवर्ण० | तदभिप्राग्रवर्ण० |
| १०९ | ४ | कात्स्नेनैवाविर्भावो | कार्त्स्न्येनैवाविर्भावो |
| ,, | २० | पंचाग्निविधोक्त | पंचाग्निविद्योक्त |
| ११० | १ | वात्सल्यप्रेमवस्तुता | वात्सल्यप्रेमवास्तुता |
| ११० | ९।१० | (मागें............घातले.) | हें वाक्य श्लोक ४२ नंतर वाचावे. |
| १११ | ३ | भोगा न प्राप्यानमरैरपि | भोगानप्राप्यानमरैरपि |
| ,, | ६ | एतदिच्छा म्यहं | एतदिच्छाम्यहं |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ,, | १७ | विनिपातमात्रमखिल० | विनिपातमात्रफलमखिल० |
| ,, | २६ | व्रह्मभूतमपागत० | ब्रह्मभूतमपगत० |
| ,, | २३ | लानन | लालन |
| ११४ | २२ | धृतजगदपगतपापम् | जगदपगतपापम् |
| ११५ | ८ | मुदितमुदारम् | मुदितसुदारम् -? |
| ११६ | १ | स्थान समारब्धानां | स्थानसमाख्यानां |
| ११७ | ३ | असकण्हो वैष्णवे० | असकण्होवैण्हवे० |
| ,, | १३ | अज्जउत्तस्यदाराबदि | अज्जउत्तस्सदारावदि |
| ,, | १४ | वैद्युतां वरम् | वैद्युतांबरम् |
| ,, | २९ | अस्थिमांसभेदभरित | अस्थिमांसमेदभरित |
| ११८ | ४ | नकदाचिच्चतुर्भजः | 'भुजद्वयावृतः कृष्णो न कदाचिच्चतुर्भुजः' |
| ,, | १३ | अनंतंन | अनतन |
| ११९ | २६ | आत्मने वाविक्रियमानेन | आत्मनैवाविक्रियमाणेन |
| ,, | २८ | ( अ. ५१ श्लोक ३४॥२॥. श्रीभागवत. ) | स्कं. ६ अ. ९ श्लो. ३४।२ |
| १२० | २६।२९ | टीकाः—तदेवं विरोधं परिहृत्य निश्चितं..........नेतीत्यादि श्रुतिभिः ॥ ३८ ॥ | टीका—अनुग्रहनिग्रहादिकं तु तत्तन्मतिभेदेन त्वय्यन्यथा त्वयि स्फुरतीत्याहुः । समा विषमाच मति येषां तेषां मतमभिप्रायम् । सर्पादिविषया धीर्येषाम् यथा रज्जुखंडस्तथा तथा भाति । यद्वा तमेवाविरोधं पुरुषमतिभेदेन दर्शयति सम विषमेति ॥ ३७ ॥ (श्रीमद्भागवत स्कं. ६ अ. ९) |
| १२ | १४ | विरोधे न | विरोधेन |
| ,, | १७ | इत्य मेवेति | इत्यमेवेति । |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ,, | २० | गोचेर । | गोचरे । |
| १२२ | ५ | विश्वादिही | विष्णवादिही |
| ,, | ६ | विश्व मत ग्राहक | विश्व ऋत ग्राहक |
| १२३ | १२ | भगवंत | भाग्यवंत |
| १२८ | २३ | जें करणें | जें करणें तें |
| १२९ | १३ | यज्ञदाना | यज्ञदानादि |
| १३४ | २४ | होवें । | होवावें । |
| ,, | ४ | ईश्वर परतंत्र | ईश्वरपरतंत्र |
| १३६ | २१ | तरुंबू | तुरंबु |
| १४० | १३ | सद्गुरु परमानंदा | जय सद्गुरु परामानंदा |
| १४१ | १६ | रसभाववेषें | रसभावावेशें |
| ,, | २१ | द्वैवकोप | दैवकोप |
| १४७ | ७ | उत्पन्न | उत्पन्न |
| ,, | ९ | वोखारे | वोरबारे |
| ,, | २२ | संप्रदात | संप्रज्ञात |
| १४८ | २ | मनोवृतिकें | मनोवृत्तिकें |
| १४९ | २८ | आपु | आपुली |
| १५३ | २१ | प्रकारगुण | प्रकारगण |
| १६० | ८ | स्वस्वरूपीं | स्वरूपीं |
| ,, | २६ | मुक्ति | युक्ति |
| १६२ | ९ | अलंकारसोनें | अलंकार सौंदर्य |
| १६३ | १२ | एकजीव | एकजीववादीं |
| १६६ | ११ | एसी | ऐसी |
| १६७ | २ | प्रतिबिंब— | प्रतिबिंबा— |
| ,, | १५ | वागविषय । | वाग्विषय |
| १७२ | १२ | या श्लोकानें अनभ्यस्त | या श्लोकानें श्रीकृष्णाचे अनभ्यस्त |
| ,, | २६ | होऊं शकत नाहीं. शिवाचें | होऊं शकत नाहीं. ह्याप्रमाणें गीता वचनाचा व वरील स्कं- |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| | | | दपुराण वचनाचा विरोध येत नाहीं. शिवाचे |
| १७४ | २ | वागविषय | वाग्विषय |
| १७९ | १३ | मुख्य सहायक | मुक्तसहायक |